म. ग्रं. सं. ठाणें
वर्ग निलांहा
क्र. १८६१

कांहीं पाउलें

(ना. श्री. दादासाहेब मावळंकर यांची रोजनिशी)

खंड २ रा

REFBK-0007923

१९८३ ई

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

९८७

२७०

६३ ४ २३

२९.१२.६७

निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संलग्न योजना
१९७०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलांक
ग्रंथालय ६३४२३ वि. ...निबंध...
प्रवेश ...९८६७... क्र. वि. २५-२-७१

"कांहीं पाउलें"

(ना. श्री. दादासाहेब मावळंकर यांची रोजनिशी)

खंड २



प्रस्तावना

श्री. पु. ह. पटवर्धन, संपादक "साधना"

संकलन व संपादन

श्री. भाऊ धर्माधिकारी

१९५३

REFBK-0007923

महाराष्ट्र ग्रंथभांडार, कोल्हापूर.

प्रकाशक :
गो. वा. कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथभांडार, कोल्हापूर.

मूल्य ३ रुपये

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

संपादकाचे दोन शब्द

'कांहीं पाउलं'च्या वाटचालीचा हा दुसरा खंड बऱ्याच काळानें वाचकांच्या हातीं पडत आहे. मराठी वाङमयांत या प्रकारचें साहित्य विरळा आहे. लोकांच्या अपेक्षा अशा प्रकारच्या साहित्यासंबंधीं अजून बनावयाच्या आहेत, आणि ज्या बनल्या आहेत त्या असल्या प्रकारचें परदेशीय वाङमय वाचून बनल्या आहेत. परदेशांतील—विशेषतः इंग्लंडमधील—कांहीं नामवंत राजकारणी पुरुषांच्या डायऱ्यांचे जे खंड प्रसिद्ध झाले आहेत त्यांत प्रसिद्ध ऐतिहासिक घटनांच्या घडणीला कारणीभूत झालेल्या 'भिंती आड'च्या लहान लहान घटनांचा उल्लेख वाचायला सांपडतो. त्यांतून इतिहास-शास्त्राच्या आणि समाजशास्त्राच्या अभ्यासकाला बरेंच विचारार्ह साहित्य मिळतें आणि सामान्य शिक्षित वाचकाला बौद्धिक मनोरंजनाचें साधन मिळतें.

श्री. दादासाहेबांच्या 'पाउलं' चा पहिला खंड १९४८ सालीं प्रसिद्ध झाला तेव्हां महाराष्ट्रांतल्या कांहीं प्रसिद्ध विचारवंतांनीं त्याचें स्वागत केलें होतें. पण सर्वसामान्य वाचकांच्या उपर्युक्त अपेक्षा पुरविण्याजोगें साहित्य त्यांत नसल्यामुळें त्यांची निराशा झाल्याचेहि उद्‌गार ऐकूं आले होते. तरीहि हा दुसरा खंड प्रसिद्ध करण्याचें धाडस प्रकाशकांनीं केलें आहे, आणि मीहि त्यांच्या या धाडसाला मदत करून पाठिंबा दिला आहे. याचें कारण लोकरुचीप्रमाणें वाङ्मयनिर्मिति करण्याचें धोरणच योग्य असें आम्ही मानत नाहीं. लोकरुचीलाहि वळण लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे, आणि सतत प्रयत्नानें तें लागूं शकतें असा आम्हांला विश्वास वाटतो. अर्थात् यांत प्रकाशकांची कसोटी लागते ही गोष्ट वेगळी.

श्री. दादासाहेब हे एक सामान्य 'असामान्य' गृहस्थ आहेत. कुटुंब-परायणता, व्यवहारीपणा, धन कमावण्याची इच्छा, स्वतःच्या बुद्धिमत्तेची आणि व्यक्तिमत्वाची जाणीव या त्यांच्यांतील सर्वसामान्य गुणांमुळें त्यांना 'सामान्य' म्हटलें. या सामान्यपणांतून त्यांना वर काढणारी जी आध्यात्मिकता त्यांच्यांत आहे, ती असामान्य आहे. या आध्यात्मिकतेमुळें

कुटुंबवत्सल राहूनहि भोगवृत्तीला प्राधान्य न देतां धर्मबुद्धीचा आदेश ते मानतात; आध्यात्मिकतेमुळें त्यांची कुटुंबाची व्याप्ति चार निकटच्या नाते-वाइकांपुरती मर्यादित न राहातां सबंध घराणें आणि घराण्याशीं संबंधित असलेल्या कुटुंबांनाहि ते आपलींशी करतात, इतकेंच नव्हे तर उत्तरोत्तर ती व्याप्ति वाढून साऱ्या समाजाला ते आपला मानूं लागतात. या आध्यात्मिकतेमुळें समाजांत सुख-शान्ति आणण्यासाठीं ते सतत निरलसपणें व त्यागपूर्वक झटत राहातात– त्यांत आनंद मानतात, आणि या आध्यात्मिकतेमुळेंच सत्याचा पदोपदीं होणारा आविष्कार म्हणजे नैतिक जीवन हें समजून तसें जीवन घडविण्यासाठीं ते धडपडतात. या आध्यात्मिकतेबरोबरच त्यांच्यांत सत्यनिष्ठेंतून आलेली तेजस्विताहि आहे; या दोन उत्कट गुणांमुळें त्यांच्या जीवनाची असामान्यांत गणना करतां येते.

' पुढे गेले त्यांचा शोधीत मारग । चला जाऊं माग घेत आम्ही ॥ ' असें संतवाणी म्हणते. दादासाहेब ' पुढे गेले ' आहेत असें मी म्हणतों तेव्हां त्यांची श्रीमंती, त्यांचें उच्च पद अथवा त्यांची समाजांत असलेली मानमान्यता हीं माझ्यापुढें नाहींत. या गोष्टींचें अनुकरण करावयाचें असेल तर त्यासाठीं दादासाहेब मावळंकर यांचीच निवड कशाला करावयाला पाहिजे ? तसे अनेक लोक या देशांत पडलेले आहेत. दादासाहेब धनवंताच्या घरांत जन्माला आले आणि स्वतः उत्तम व्यवहारानें धन जोडण्याला समर्थ झाले, असें असूनसुद्धां त्यांनीं आपली आध्यात्मिकता आणि तेजस्विता यांचा वळी दिला नाहीं; उलट उत्तरोत्तर त्यांनीं ती वाढवीत नेली आणि ' आत्मार्थें पृथिवीं त्यजेत् ' या त्यागाच्या अंतिम सीमेकडे जाण्याची त्यांची धडपड चालूं आहे. यांतच त्यांचें पुरोगामित्व आहे. त्याचें आपल्याला अनुकरण करतां येईल.

त्यांची ही आध्यात्मिकता आणि तेजस्विता कशी वृद्धिंगत होत गेली हें ज्यांना त्यांच्या नित्याच्या जीवनांतून समजून घेण्याची इच्छा असेल त्यांच्यासाठीं हे खंड उपयुक्त होतील. दादासाहेबांनीं दिनवृत्त लिहावयास सुरवात केली त्यावेळीं ते आपल्या कुटुंबी जनांव्यतिरिक्त इतरांच्या वाचनांत यावें किंवा येईल अशी त्यांच्या मनोमनसुद्धां कल्पना नव्हती आणि नसणें

साहजिक आहे. हा उपक्रम करण्याची प्रेरणा त्यांना त्यांच्या हिशेबी चोखपणाच्या वृत्तींतून झाली. पण ज्ञानेश्वरांनीं एके ठिकाणीं मार्मिकपणें म्हटलें आहे कीं—

" तरि गा ऐसें करी । यया आठां पाहारांमाझारीं ।
मोटकें निमिषभरी । देतु जाय ॥
मग जें जें कां निमिख । देखेल माझें सुख ।
तेतुलें अरोचक । विषयीं घेईल. "

त्याप्रमाणें पुढें पुढें दिनवृत्त लिहिणाऱ्याची वृत्ति होत जाते. आत्मनिरीक्षण–परीक्षणाचा हा एक सोज्वळ मार्गच त्याला सांपडतो. दिनवृत्त–लेखन हा एक माणसाचा जीवश्चकंठश्च मित्र आहे. आपण जें जें कांहीं बोलतों, करतों, घडवितों तें पुनः कुठें तरी प्रकटविण्याची माणसाला इच्छा असते. भाग्य असलें तर माणसाला तसे सन्मित्रहि मिळतात. पण 'दिनवृत्त वही' हा असा एक आत्मीय मित्र आहे कीं तो सहृदयतेनें आणि निरपेक्षपणें माणसाचें बेरं–वाईट सर्व कांहीं घेतो आणि माणसाला मुक्तीचा आनंद देतो; इतकेंच नव्हे तर तो त्याला शुद्ध आणि सावध होण्यालाहि मदत करतो.

दादासाहेबांनीं मनाच्या या वृत्तीनें लिहिलेल्या या वृत्तान्ताकडे इतरांनीं कोणत्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे हें सुज्ञ वाचकांना सांगण्याची जरूर नाहीं. आपल्या आजूबाजूच्या वातावरणांतून धडपडत आपला मार्ग काढीत मुमुक्षु जीव जात असतो. त्यांत त्या जीवाची मुमुक्षा जशी पहावयाची तशी त्याची धडपडहि अभ्यासावयाची असते. वातावरण त्यानें निर्मिलेलें नसतें, तें ईश्वरनिर्मित असतें. धडपड त्याची असते. हें लक्षांत घेऊन ज्या सहानुभूतीनें आणि सहृदयतेनें मी माझ्या वाचक–सोबत्यांकरितां हा मजकूर निवडला त्याच सहानुभूतीनें आणि सहृदयतेनें वाचक–सोबत्यांनीं तो ग्रहण करावा अशी माझी अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. त्यामुळेंच त्यांना लाभ होईल असें मला वाटतें.

अर्थात् पहिल्या खंडाच्या 'चाहूल' नांवाच्या प्रस्तावनेंत आचार्य श्री. काकासाहेब कालेलकर यांनीं म्हटल्याप्रमाणें, " गुजरातच्या आणि

आतां सर्व हिंदुस्थानच्या सार्वजनिक जीवनांत प्रमुखपणें भाग घेणाऱ्या श्री. दादासाहेब मावळंकरांचें स्थान महत्त्वाचें आहे...समकालीन इतिहास म्हणून त्यांच्या या वासरीचें महत्त्व आहे... " आणि तो इतिहास घडविणाऱ्या महापुरुषांशीं आणि घटनांशीं निकट संबंध आलेला असल्यामुळें त्यांचा जवळून परिचय करवून देण्याच्या दृष्टीनेंहि या दिनवृत्तांचें महत्त्व विशेष आहे.

'कांहीं पाउलां'च्या या दुसऱ्या खंडांत राजकीय स्वरूपाची–(१) सायमन कमिशनच्या निषेधार्थ अहमदाबादच्या गुजरात कॉलेजमधील विद्यार्थ्यांनीं पाडलेला संप आणि प्रिन्सिपॉल शिरासच्या रूपानें साम्राज्यशाहीनें विद्यार्थ्यांचा व नागरिकांचा तेजोवध करण्याकरितां केलेली कारवाई (२) अहमदाबाद म्युनिसिपालिटींतील गोंधळ (३) मजूर–चळवळ. (४) हिंदु संघटन (५) राष्ट्रीय वृत्तीचें नवीन कॉलेज काढण्याचा प्रयत्न, (६) खादी व स्वदेशी चळवळ (७) १९२९ चें लाहोरचें कॉंग्रेस अधिवेशन हीं प्रकरणें आणि त्यांच्या अनुषंगानें म. गांधी, श्री. वल्लभभाई पटेल, श्री. गुलझारीलाल नंदा, सर चिमणलाल सेटलवाड, डॉ. मुंजे अशा नामवंत पुढाऱ्यांशीं आलेले संबंध यांचा उल्लेख आढळेल.

सामाजिक स्वरूपाचे–(१) परदेशगमनानिमित्त प्रायश्चित्तविधि आणि तत्संबंधीं ब्राह्मणवर्गाची वृत्ति. (२) विधवांची अवस्था. (३) स्त्रीशिक्षण आणि सुधारणा. (४) मुली पाहाण्याची रूढि. (५) हिंदुत्वनिष्ठा. (६) कौटुंबिक कलह आणि वकिलाचें कर्तव्य. (७) समाजांतील वागणुकींत एकंदरींत आलेला ढिलेपणा. (८) तरुण पिढीचें शील. (९) समाजसेवक संघ हे विषय आले आहेत. शेवटच्या विषयाच्या अनुषंगानें श्री. अमृतलाल ठक्कर (ठक्करबाप्पा) यांच्याशीं आलेल्या संबंधाचा उल्लेख आहे.

व्यक्तिगत दृष्टीनें– (१) मातृ–पितृ भक्ति (२) स्वदेश–भक्ति (३) आत्मनिरीक्षण–परीक्षण वृत्ति (४) स्वावलंबन आणि श्रम याविषयीं प्रेम (५) बृहत्कुटुंब भावना व तत्संबंधींचा आचार (६) नातेवाइकांत परस्परांत पैशाचा व्यवहार केल्याचे अनुभव (७) कलाप्रेम (८) कौटुंबिक न्यायबुद्धि–हे दाखविणारे प्रसंग आले आहेत.

या खंडाची कालव्याप्ति १। वर्षांची आहे. पुढचे खंड काढण्याचा सुप्रसंग लाभला तर ते अधिक कालव्यासीचे ठेवून इतिहासदृष्टीनेंहि त्यांची निवड करावी लागेल असें वाटतें. अर्थात् हें सर्व वाचकांच्या गुणग्रहणावर अवलंबून.

या खंडाची सूची श्री. पांडुरंग गणेश देशपांडे, अमदाबाद यांनीं तत्परतेनें करून दिली, या त्यांच्या श्रमाबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

शेवटीं, पहिल्या खंडांत माझ्या लिखाणांत एके ठिकाणीं माझ्याकडून चुकीनें जी एक गैरमाहिती दिली गेली आहे ती येथें दुरुस्त करतों. श्री. दादासाहेबांना दुसऱ्या संबंधापासून पांच मुलगे झाले. त्यांपैकीं तिसरा अल्पवयांतच वारला व इतर चार मुलगे आज चांगले सुविद्य असून कर्ते-सवरते झाले आहेत. मागील लिखाणांत त्यांचे तीनच मुलगे हयात आहेत ही माहिती चुकीची दिली गेली होती. वस्तुस्थिति तशी नाहीं. या चुकीबद्दल दादासाहेब व त्यांच्या कुटुंबांतील मंडळी यांची मीं क्षमा मागितली आहे आणि ती त्यांनीं केली आहे.

पुणें ता. १८–१–५३ –भाऊ धर्माधिकारी

प्रास्ताविक

'कांहीं पाउलें' या नांवानें श्री. दादासाहेब मावळंकरांच्या दैनंदिनीचा पहिला भाग पूर्वीच प्रसिद्ध झाला आहे. आचार्य काकासाहेब कालेलकर यांनीं त्या भागास प्रस्तावना लिहिली आहे. दादासाहेबांच्या दैनंदिनीचे संपादक श्री. भाऊ धर्माधिकारी यांनींहि 'प्रारंभिक परिचय' लिहिला आहे. या दैनंदिनीचा दुसरा भाग छापला जात असतां त्या भागास मीं प्रस्तावना लिहावी असें प्रकाशकांनीं मला लिहिलें. त्यांचें पत्र वाचून मला थोडा अचंबा वाटला. दादासाहेब मावळंकर यांच्यासारख्या प्रथितयश देशभक्ताच्या दैनंदिनीला माझ्यासारखा साधारण माणूस काय प्रस्तावना लिहिणार? प्रस्तावना लिहिण्याचा माझा काय अधिकार? असा विचार माझ्या मनांत आला. आणि या दैनंदिनीसारख्या अगदीं खाजगी स्वरूपाच्या टिपणांना प्रस्तावनेची आवश्यकता तरी काय? 'मानवतेचे पाझर' या नांवानें अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या कारावासांत लिहिलेल्या दादासाहेबांच्या गोष्टी मीं नुकत्याच वाचल्या. त्या गुजराती भाषेंत 'मानवतानां झरणां' या नांवानें पूर्वीच प्रसिद्ध झाल्या होत्या. 'मानवतेचे पाझर' हा त्यांचा मराठी अनुवाद आहे. 'कांहीं पाउलें' या नांवानें क्रमशः प्रसिद्ध होत असलेली त्यांची दैनंदिनी वरील स्वरूपाची नाहीं! या दैनंदिनींत त्या पुस्तकाप्रमाणें साहित्य किंवा भाषासौंदर्य आढळणार नाहीं. साहित्यसेवा म्हणून ही दैनंदिनी लिहिलेली नाहीं. अंतर्मुख वृत्तीच्या प्रामाणिक माणसानें आपल्या दैनंदिन जीवनाचा साक्षेपानें ठेवलेला हा एक जमाखर्च आहे. कुमारावस्था संपून यौवनांत पदार्पण करतांना अनेक तरुण अंतर्मुख होऊन दैनंदिनी लिहूं लागतात. आपला आदर्श व प्रत्यक्ष जीवन यामध्यें असलेली तफावत दैनंदिनी लिहिण्यानें स्पष्ट होते व माणूस जागरूक राहातो. कामाचा एवढा प्रचंड व्याप पाठीशीं असतां दादासाहेबांनीं तरुणसुलभ व विकासशील वृत्तीनें नियमानें दैनंदिनी लिहावी ह्याचें आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाहीं. गांधीजींच्या निकटवर्ती सहकारी मंडळींमध्यें जो चोख

ग्रं. क्र. G.C.L.

व्यवहारीपणा व निरलस कार्यशीलता आदींचे तिचे या दैनंदिनीमध्यें दर्शन घडतें. अशी दैनंदिनी हजारों तरुणांनी आयुष्याच्या कांहीं काळांत लिहिलेली आहे, पण यशप्राप्तीनंतर फारच थोड्यांनीं ही सवय पुढें चालू ठेवली असेल.

राजकारण, विज्ञान, कला यांमध्यें यश मिळवलेल्या अनेक पाश्चात्यांनीं आपले दैनंदिन विचार कलमबंद करून प्रसिद्ध केले आहेत. पाश्चात्य साहित्यांत अशा वाङ्मयाचें खास दालन आपल्याला आढळेल. आपल्याकडे मात्र ही प्रथा विशेष रूढ झालेली नाहीं. पं. नेहरूंचें आत्मचरित्र दैनंदिनीच्या रूपांतच त्यांनीं कारावासांत लिहिलें. पण पुढें त्यांना दैनंदिनी लिहिण्यास फुरसतच मिळाली नाहीं. मराठी भाषेंत नांव घेण्यासारखी एकच दैनंदिनी माझ्या वाचनांत आली आहे, तीहि कारावासांतील करमणूक म्हणून नानासाहेब गोरे यांनीं लिहिलेली आहे. नानासाहेबांची लेखनशैली व साहित्यिक अभिरुचि त्या पुस्तकांत प्रकर्षानें व्यक्त झाल्यामुळेंच ती दैनंदिनी पाठ्यपुस्तक म्हणून विश्वविद्यालयांत नेमण्यांत आली आहे. राजकारणी पुरुषांच्या दैनंदिनीची उणीव त्यांच्या चाहात्यांनीं त्यांच्या आठवणी लिहून भरून काढण्याचा प्रयत्न आपल्याकडे केलेला दिसतो. लो. टिळकांच्या आख्याइका व आठवणी किंवा महादेवभाई, डॉ. सुशिला नायर, मिराबेन वगैरेंच्या दैनंदिनी विख्यात आहेत. मात्र कांहीं पाश्चात्य मुत्सद्दी व राजकारणी ज्या तऱ्हेची दैनंदिनी लिहितात तशी आपल्याकडे नाहींच म्हटलें तरी चालेल. मॉर्ले, मोर्ले, हार्डिंज, आंद्र जीड यांनीं लिहिलेल्या दैनंदिन टिपणांना इंग्रजी साहित्यांत व राजकीय वाङ्मयांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. आपल्याकडे कर्त्या माणसांना फुरसतच नसते. शक्तीबाहेर कामाचा व्याप त्यांच्या डोक्यावर येऊन पडतो. त्यांच्या अंतःकरणांतील प्रतिभा स्वीकृत कार्यांतच खर्ची पडते. त्यामुळें तिचे विविध उन्मेष दिसेनासे होतात.

१९२८ सालीं गुजरात कॉलेजचे प्रिन्सिपाल फिन्डले शिरास यांनीं विद्यार्थ्यांवर शस्त्र उचललें. राजकीय सभानिदर्शनांत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनीं बडतर्फ केलें. अमदाबाद कॉलेजमधील विद्यार्थ्यांनीं प्रिन्सिपाल-साहेबांविरुद्ध मोठी मोहीम केली. दादासाहेबांनीं विद्यार्थ्यांना पाठीशीं

घालून सहृदय साहाय्य केलें. ही एक घटना सोडली तर दादासाहेबांच्या दैनंदिनीच्या ह्या भागांत ऐतिहासिक असें कांहींच आढळत नाहीं. अंतर्मुख वृत्तीच्या माणसाचे खाजगी विचार हाच या दैनंदिनीचा विषय आहे. खऱ्या अर्थानें ती खाजगी स्वरूपाची आहे. पण दादासाहेब मावळंकर ही आतां व्यक्ति राहिली नसून एक संस्था असें स्वरूप त्यांना आलें आहे. राजकीय नेत्यांना खाजगी जीवन असतांच कामा नये असा लोकभ्रम रूढ झाला असल्यामुळें ही दैनंदिनी प्रसिद्ध करण्याचा आग्रह प्रकाशकांनीं धरला असावा व दादासाहेबांनीं त्यास निरुपायानें संमति दिली असावी.

दादासाहेब मावळंकर ही गुजराथमध्यें तरी एक चालती बोलती संस्थाच आहे. म. गांधी व सरदार पटेल यांच्या निकट व विश्वासू सहकारी मंडळींत त्यांची गणना होई. साबरमती आश्रमापासून तों गांधी स्मारक निधि समितीपर्यंत महत्त्वाच्या सर्व सार्वजनिक संस्थांचे दादासाहेब विश्वस्त किंवा कार्यवाह आहेत. गुजरातमध्यें क्वचितच अशी एकादी शैक्षणिक किंवा सार्वजनिक संस्था असेल कीं जिच्या विश्वस्त मंडळावर दादासाहेबांचें नांव प्रामुख्यानें झळकत असलेलें दिसणार नाहीं. गुजरात एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेसाठीं व नंतर दादासाहेबांनीं बजावलेली कामगिरी असाधारण आहे. गुजरात युनिव्हर्सिटी हें त्यांच्या व त्यांच्या सहकारी बांधवांच्या प्रयत्नांचेंच फळ आहे. स्वतंत्र हिंदुस्थानच्या पहिल्या लोकसभेचे दादासाहेब अध्यक्ष झाले यापेक्षां गांधी स्मारक निधि व कस्तुरबा निधि यांचे ते अध्यक्ष आहेत, हा त्यांचा अधिक मोठा गौरव आहे. ध्येयनिष्ठा व व्यवहार यांचें दादासाहेबांचे ठिकाणीं जें सहदर्शन होतें तें गांधीजींशिवाय इतरांत क्वचित्च दिसून येईल. "व्यवहार—चोख व्यवहार" हाच दादासाहेबांचा स्थायी भाव आहे. सार्वजनिक संस्था उभ्या करणें, कार्यप्रवण राखणें, त्यांच्या आर्थिक व्यवहारांवर जागरूकतेनें नजर ठेवणें, त्यांचे जमाखर्च काटेकोरपणें तपासणें हा त्यांचा स्वभाव बनला आहे. ज्या संस्थेच्या संचालक मंडळांत ते आहेत त्या संस्थांत लटपट, गोंधळ, अनागोंदी असणार नाहीं अशी जनतेची खात्री पटली आहे. संस्थाप्रतिपालक असें बिरुद कोणा महंतानें त्यांना दिलें तर तें सार्थ होईल. आपल्या दैनंदिनीची तारीख २३।११।२८ ची नोंद करतांना ते लिहितातः "आज कार्तिकी एकादशीची

रजा होती. सर्व वेळ वाकिली कामांतच गेला. धंद्याचें काम शक्यतितकें चोख करण्याचा प्रयत्न हेंच एकप्रकारें ईश्वरभजन. स्वे स्वे कर्मण्यभिरतः"— दादासाहेबांच्या ठिकाणीं असलेल्या कणखर व्यवहारवादाचें हें उत्तम उदाहरण आहे. एकाद्या वकिलानें किंवा डॉक्टरानें हातीं घेतलेलें काम चोखपणें बजावावें, त्यांत कोणतीहि कसूर करूं नये हें उघड आहे. पण आजच्या औद्योगिक युगांत जो पेशा आपण करतों त्याला गीतेच्या अर्थानें स्व–धर्म किंवा ईश्वरभजन कितपत म्हणतां येईल हा वादग्रस्त प्रश्न आहे. गांधीवादाच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या बारकाव्यांत न जातां व्यवहारबुद्धीनें त्यांचे स्थूल सिद्धान्त ठरवून चोख व काटेकोरपणें ते पार पाडणें असा त्यांचा पिंड आहे.

अनियमितपणा व टापटिपीचा अभाव आपल्या हाडीमाशीं खिळला आहे. दादासाहेबांना ह्या दुर्गुणांची मनस्वी चीड आहे. दैनंदिनींत जागोजाग ह्यासंबंधीं त्यांनीं आपली वेदना व्यक्त केली आहे. ता. ३।३।२९ च्या टिपणांत ते म्हणतात: "श्रीकृष्ण मंदिरांत मुलांचे नमस्कारांचे सामने होते. ते पाहावयास गेलों होतों. वेळ ७ वाजतांची असूनहि ७॥ पावेतों सुरवात नव्हती व एकंदर प्रकार शैथिल्याचा. जागेची झाडलोट केली नव्हती. रस्त्यांतून कचरा अतिशय. शेजारच्या घरच्या लग्नामुळें खरकट्या पत्रावळी वगैरे उडत असलेल्या. किती शोचनीय सामाजिक अस्तित्व. अथवा अस्तित्वाचा अभाव!" सेवादलाचे भाऊसाहेब रानडे किंवा महर्षि सेनापति बापट यांच्यामध्यें अस्वच्छता व अनियमितपणा यांच्याविषयीं अशीच पोट-तिडीक दिसून येते.

१९२९ सालीं अमदाबाद म्युनिसिपालटीच्या सभासदत्वाचा त्यांनीं दिलेला राजीनामा त्यांच्या निःस्पृहवृत्तीचा निदर्शक आहे. ता. १५-७-२९ च्या टिपणांत ते लिहितात: "सकाळीं वल्लभभाई पटेल आले होते. म्युनिसिपालटीच्या सभासदत्वाचा राजीनामा देण्याचें नक्कीच केलें. म्युनिसि-पालिटीचा कारभार फारच वाईट होत चालला आहे. शिकली सवरलेली मंडळीच म्युनिसिपालिटींत अप्पलपोटेपणा व स्वार्थ साधीत आहेत. हलकट-पणा, राग, द्वेष, स्वार्थ वगैरे दुर्गुणांनीं बजबजलेल्या वातावरणांत राहणें

शक्य नाहीं. शहराची सेवा होणें नाहीं. यापेक्षां बाहेर पडलेलें जास्त बरें. तेव्हां आम्हीं दोघांनींहि राजीनामे दिले." त्यांच्या रोजनिशींतील खालील नोंद मानसशास्त्राचे दृष्टीनें चिकित्सा करण्यासारखी आहे. ता. १९-१-२९ च्या टिपणांत ते म्हणतातः "कॉलेजच्या विद्यार्थ्यांची आज जंगी मिरवणूक निघाली होती. ती आमचे घरावरून गेली. माझे नांवानें जयघोष केला. मी मागाहून आल्यावर मला कळलें. हें कांहीं खरोखर बरोबर नाहीं. माझी जबाबदारी किती वाढविली!! अर्थात् मानसिक अवनति नच होऊं देणें याविषयीं सतत प्रयत्न करीनच."

श्री. दादासाहेब मावळंकर व साने गुरुजी स्वभावानें व वृत्तीनें भिन्न असून दादासाहेबांना गुरुजींच्याबद्दल नेहमीं नितांत आदर व स्नेह वाटत आला आहे. पंढरपूरच्या मंदिरांत हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून गुरुजींनीं केलेल्या उपोषणाचे वेळीं दादासाहेबच टक्करबाप्पांना घेऊन पंढरपूरला गेले व त्यांनीं यशस्वी मध्यस्थी केली. गुरुजींच्या स्मारकनिधीच्या कार्यांत त्यांचे चिरंजीव श्री. पुरुषोत्तम मावळंकर करीत असलेल्या कामांत दादासाहेबांचा सदैव पाठिंबा असे. स्मारकनिधीच्या कामानिमित्त मागील वर्षीं मी अमदाबादेस गेलों असतां झालेल्या सभेचें अध्यक्षस्थान दादासाहेबांनीं स्वीकारलें होतें. गुरुजींच्या कार्यांचा अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख करून आन्तर भारतीला त्यांनीं मनःपूर्वक पाठिंबा दिला. त्यावेळीं साबरमती आश्रम, गुजरात एज्युकेशन सोसायटीच्या विविध शिक्षण संस्था त्यांनीं बरोबर नेऊन मला दाखविल्या. या संस्थांसंबंधीं केवढी पवित्र व अभिमानाची भावना त्यांचे अंतःकरणांत वसत आहे हें मला पाहावयाला मिळालें. निरलसपणा, निःस्पृहता व चोख व्यवहारबुद्धि असेल तर कामाचे केवढे डोंगर एक मनुष्य उचलूं शकतो याचें तें प्रात्यक्षिकच होतें. ध्येयनिष्ठ तरुण मंडळी आपल्या प्रत्येक क्षणाचा जर हिशेब ठेवतील तर निष्फलतेमुळें निर्माण होत असलेली निष्क्रियता बऱ्याच प्रमाणांत कमी होऊं शकेल.

ता. १९–२–५३. –पु. ह. पटवर्धन

लेखकाचें हृद्गत

[पहिल्या खंडांतून उद्धृत]

॥ श्रीलक्ष्मीनृसिंहः प्रसन्नोऽस्तु ॥

सन १९२७ पासोन मी लिहीत असलेल्या दैनंदिनीं (रोजनिशीं) तील वेंचे " कांहीं पाउलें " या नांवानें प्रसिद्ध करण्याची योजना कोल्हापुरच्या महाराष्ट्र ग्रंथ भांडाराचे चालक श्री. गो. वा. कुलकर्णी यांनीं आंखली आहे, त्यांचा हा पहिला खंड आहे. या प्रकारचें प्रकाशन मराठी साहित्यांत बऱ्याच अंशीं नवीन तऱ्हेचें म्हणतां येईल. वाचकवर्गास हें कितपत उत्तेजनार्ह वाटतें तें या पहिल्या खंडाचें जें व जसें स्वागत होईल त्यावरून दिसून येईल.

मी दैनंदिनी लिहावयास सुरवात कां केली याचा खुलासा प्रथम वाचकांस देणें अवश्य आहे; आणि त्यानंतर तींतून उतारे प्रकाशित करणें योग्य किंवा आवश्यक कां मानलें तेंहि सांगणें मला जरूरीचें वाटतें.

दैनंदिनी लिहिणारा कोण, त्याची जनसेवा किती, समाजामध्यें त्याचा दर्जा, प्रसिद्धि व लोकप्रियता किती या गोष्टी प्रकाशकाच्या किंवा वाचकाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या वाटल्या तरी लिहिणाराच्या दृष्टीनें त्या गौणच आहेत. कारण आपल्या दैनंदिनीस कधींकाळीं प्रसिद्धि मिळेल किंवा पुढच्यास मार्गदर्शक म्हणून तिचा उपयोग होण्याचा संभव आहे या दृष्टीनें मीं माझी दैनंदिनी लिहिलेली नाहीं. तेव्हां ती मीं कां व कोणत्या दृष्टीनें लिहिण्यास सुरुवात केली व आज तिच्या प्रकाशनास मीं रुकार कां दिला हे प्रश्न स्वाभाविकच उद्भवतात.

मला लहानपणापासून मराठी वाचनाची गोडी आहे. जेव्हां जेव्हां मी मुंबईस जाई तेव्हां तेव्हां अभिजात वाङ्मयांत मोडतील अशीं नवीं प्रकाशनें

मी विकत घेऊन येत असे आणि इतर वेळ नसल्यामुळें बिछान्याच्या उशाशीं तीं सर्व ठेवीत असे. वकिलीचीं व इतर कामें आटोपून रात्रीं १–१।। वाजतां निजावयास जाई तेव्हां तीं पुस्तकें चाळीत असे व अशा प्रकारें मराठी वाचनाची तहान भागवीत असे.

याप्रमाणें क्रम चालूं असतां सन १९२७ सालीं कै. रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र चाळण्यांत आलें. त्यांत पुढील अर्थाचा एक विचार आढळला: "आयुष्याच्या मोलाच्या मानानें ज्याची कांहींच किंमत नाहीं अशा पैपैशाचा हिशोब आपण ठेवतों, पण अमूल्य अशा आयुष्याचा आपण कांहींच हिशोब ठेवीत नाहीं." गोष्ट मनाला पटली व दुसरेच दिवसापासून रोजनिशी लिहिण्यास सुरुवात केली.

प्रारंभीं दैनंदिनीचा उद्देश "वेळाचा–आयुष्याचा–हिशोब" एवढाच होता व आजपावेतोंहि तोच मुख्य उद्देश आहे. दिवसाचे २४ तासांतून किती वेळ सार्वजनिक हिताचे कामीं, किती वेळ धंद्यांत व कौटुंबिक कामांत आणि विश्रांति वगैरेंत गेला, तसेंच किती वेळ व्यर्थ गेला किंवा घालविला याचा आढावा रोज रात्रीं किंवा दुसरे दिवशीं सकाळीं दैनंदिनी लिहितांना काढावा हा हेतु. या मुख्य धोरणाच्या अनुषंगानें केलेल्या कामाचा निर्देश आला म्हणजे स्वाभाविकच त्याशीं संलग्न व्यक्तींचा उल्लेख व ओघानेंच कामाविषयीं व व्यक्तीविषयीं अनुकूल अगर प्रतिकूल अभिप्राय टांचणेंहि आलेंच. अर्थात् सर्वच वेळीं सर्व गोष्टी लिहिल्या किंवा अभिप्राय टांचले असें नाहीं. वेळ मिळेल त्याप्रमाणें कमी अधिक तपशीलवार लिहिणें होई. कित्येक वेळां विशिष्ट परिस्थितीचे कारणानें–उदाहरणार्थ, तुरुंगांत असतांना किंवा एकादी गुप्त वा फारच नाजूक घटना असली तर–स्पष्ट अथवा मोघमहि कांहीं लिहिणें इष्ट नव्हतें, नव्हे अनर्थावहहि झालें असतें. १९३० ते १९३४ च्या राष्ट्रीय लढ्याचे काळांत गुजरातेंतील कॉंग्रेसचे निरनिराळ्या कामासाठीं जमविलेले फंड व त्यांतून गुप्त कार्यकरांमार्फत सविनयभंगाच्या प्रत्यक्ष चळवळीसाठीं व त्या चळवळीचे आनुषंगिक कामासाठीं लागणारे पैसे मंजूर करून ते योग्य इसमांस योग्य ठिकाणीं गुप्तपणें पोंचविण्याचें काम माझेकडेच होतें. पैसेहि माझेमार्फतच " कोठें

तरी " ठेवलेले होते. पैसे माझेपाशीं आहेत व मी त्यांतून विनियोग करीत आहें असा सर्व अधिकाऱ्यांस पक्का संशय होता. पण त्यांचेपाशीं पुरावा नव्हता. या काळांतील बरींच प्रकरणें व घटना मनोरंजक आहेत, गुजराथेंतील स्वातंत्र्य लढ्याचे इतिहासांत महत्त्वाच्या व उद्‌बोधक आहेत; पण रोजनिशींत त्यांचा उल्लेख करणें म्हणजे माझ्याच लिखाणानें मींच सरकारास पुरावा देऊन पैसे जप्त करविण्याचा मूर्खपणा पदरी घेणें झालें असतें. याप्रकारें कांहीं बाबींचा उल्लेख रोजनिशींतून बुद्ध्या वगळलेला असला व जें लिहिलें आहे तें आयुष्यांतील प्रत्येक घटनेचें जरी संपूर्ण टांचण नसलें, तरी जें आहे तें पूर्ण सत्यच आहे, सत्यास सोडून विकृत स्वरूपांत दर्शन होईल असें कांहींहि लिहिलें नाहीं. कारण सत्यनिष्ठेकडे माझा जात्या ओढा, आणि रोजनिशी मी प्रकाशनासाठीं किंवा इतर कोणासाठीं लिहीत नव्हतों तर माझ्या स्वतःसाठीं स्वतःच्या अन्तःपरीक्षणा-साठीं, स्वतःचें चित्र स्वतःस कालांतरानेंहि दिसून आपल्या आयुष्याचा आढावा काढतां यावा यासाठीं लिहीत होतों. तेव्हां सत्यापलाप कां व कशासाठीं ? त्यापासून फायदा किंवा उपयोग काय ? आत्मवंचनेशिवाय त्यांतून काय निष्पन्न होणार ? व आत्मवंचना करावयाची तर मग रोजनिशी लिहिण्याची यातायात तरी कशाला ? या प्रकाराचे विचारामुळें व मजकूर प्रसिद्ध होईल अशी कल्पनाहि नसल्यामुळें रोजनिशीची भाषा स्वाभाविक व स्वरूप उघडपणाचें आहे.

दैनंदिनी लिहिण्यास सुरुवात केल्यावर व बरींच वर्षें ती नियमित लिहीत गेल्यावर मला स्वतःला तो उपक्रम फारच उपकारक वाटला, व आज तर मी अशा मताचा झालों आहें कीं शक्य तर समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें—लहान—थोर, स्त्री—पुरुष, प्रसिद्ध—अप्रसिद्ध, सार्वजनिक कार्यकर्ता, अधिकारी किंवा अगदीं सामान्य जीवन काढणारा, गरीब—श्रीमंत, कोणी कसाहि कां असेना प्रत्येकानें—दैनंदिनी लिहावी. इंग्रजी ग्रंथकार रिचर्ड किंग यानें आपल्या 'Some confessions of an Average Man' या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें " Every life is a Story, but most people die without that story all untold. " प्रत्येक जीवन म्हणजे सत्यकथा आहे,

समाजाच्या व मानसशास्त्राच्या अभ्यासाचें व इतिहासाचें साधन आहे, नवरसपरिपूर्ण असा रसाळ जिवन्त ग्रंथ आहे. मानवतेचें त्यांत दर्शन आहे.

पण व्यक्तिगत दैनंदिनीचें समाजासहि महत्त्व आहे या दृष्टीनेंहि मीं दैनंदिनी लिहिली नाहीं व तिचें प्रकाशन करण्यामध्येंहि तो मुद्दा मी स्वतः गौण मानतों. दैनंदिनी लिहिण्यामुळें लिहिणाऱ्या व्यक्तीच्या आत्मोन्नतीस मदत होते. मला त्यांत फायदे वाटतात ते पुढीलप्रमाणें:—

(१) आपल्या वेळेचा हिशोब राहातो. आयुष्याच्या क्षणाक्षणाचा उपयोग करण्याची वृत्ति आपोआप होते.

(२) या वृत्तींतूनच आयुष्याचें ध्येय काय याचा विचार होतो. आयुष्याचा उत्तम उपयोग म्हणजेच उत्तम जीवन असें वाटावयास लागून, केवळ स्वार्थ व ऐहिक लोभ यापेक्षां जनसेवा व पारमार्थिक लाभ यांकडे दृष्टि वळते. जीवनमूल्यांचे विचार येऊं लागतात. विचार व आचार—शुद्धि होऊं लागते व आपलें मुख जीवनध्येयाकडे वळतें; मन व दृष्टि आध्यात्मिक बाजूकडे वळतात.

(३) एक प्रकारचें आत्मपरीक्षण नित्य होत असतें. दिनप्रतिदिन निरनिराळ्या घटना व व्यक्ती याविषयींचे वेगवेगळ्या प्रसंगीं दर्शविलेले विचार किती बरोबर आहेत व किती चूक आहेत हें तुलनात्मक पहातां येतें—दिसतें. त्यामुळें मनाचा कल आत्यंतिक न राहातां समतोल (Judicial) राहातो. " मी नेहमींच बरोबर असतों. माझे हातून चूक होतच नाहीं " असा मिथ्याभिमान गळत जाऊन लिहिणारा विनम्र होतो, कारण त्याच्या चुका दुसरा कोणी दाखवीत नसून तोच स्वतः पहात असतो.

(४) आपल्या चुका दिसूं लागल्या कीं दुसऱ्यांच्या चुकांकडे पहाण्याचा दृष्टिकोण लगेच बदलतो. जास्त सहिष्णुता व उदारता येऊं लागते. गैरसमजास कमी थारा मिळतो. " माझ्याविषयीं दुसऱ्यांचा गैरसमज जर मला दिसतो व लोक गैरसमज कां करून घेतात याविषयीं मला उद्वेग व प्रसंगीं संतापहि येतो तर दुसऱ्यांविषयीं मी गैरसमज तर करून घेत नाहीं ना ? " असा विचार नेहेमीं जागृत राहातो. यामुळें दुसऱ्याविषयींची

वृत्ति उदार व आदराची राहाते. शरीरास जसा व्यायाम तसाच कांहींसा प्रकार मनाच्या वृत्तीच्या बाबतींत दैनंदिनीचा आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

वरीलप्रमाणें दैनंदिनी लिहीत होतों, तिचा जरी आत्मचरित्राचें साधन म्हणून उपयोग आहे, तरी पण तसें साधन म्हणूनहि कांहीं ती मीं लिहिलेली नाहीं किंवा लिहीत नाहीं. आत्मचरित्र लिहावें असा विचार सन १९३६–३७ चे सुमारास आला होता. पुढें कधीं आपल्या कुटुंबाचा पुढील इतिहास लिहिण्याची जर एकाद्या वंशजास इच्छा झाली तर निदान माझ्याविषयींची व मला ज्ञात असलेली माहिती त्याला संपूर्ण उपलब्ध व्हावी म्हणून ती सविस्तर टिपून ठेवण्याच्या केवळ कौटुंबिक हेतूनें प्रेरित होऊन मी प्रथम आत्मचरित्र लिहिणार होतों. पण १९४० सालीं श्री. वल्लभभाई व मी साबरमती तुरुंगांत एकच दिवस एकत्र असतांना, गुजरातेंतील " गांधीयुगा"चा एक सर्वांगीण इतिहास लिहिला गेला पाहिजे अशी वल्लभभाईंनीं बोलतां बोलतां सूचना केली, ती मला पूर्णपणें पटली व या इतिहासाशीं ज्यांचें जीवन संलग्न झालेलें आहे अशा व्यक्तींच्या आत्मचरित्रानें हा इतिहास अधिक सत्यप्रकाशक, मनोरंजक व उद्बोधक होईल असें मला वाटलें आणि त्या दृष्टीनें स्वतःचें चरित्र लिहिण्यांतील माझा पूर्वीचा संकुचित हेतु विशाल झाला. मीं त्याप्रमाणें आत्मचरित्र फुरसत मिळेल तसें लिहावयास घेतलें व तें १९२२ च्या काळापर्यंत कच्च्या स्वरूपांत पूर्ण करीत आणलें. पुढें अर्थात् वेळेच्या अभावीं तें काम तसेंच पडून राहिलें.

१९४७ मध्यें आत्मचरित्रासाठीं दैनंदिनी चाळल्यास त्यांतून कांहीं भाग उपयोगी होतील असें वाटल्यावरून त्या भागांच्या नकला करविण्यासाठीं दैनंदिनीवर मीं खुणा केल्या व कांहीं नकला करवूनहि घेतल्या. याचवेळीं, अमदाबादेस महाराष्ट्रीय मंडळींची ' महाराष्ट्र समाज ' म्हणून एक संस्था आहे, तिचें मुखपत्र ' समाज पत्रिका ' नांवाचें एक पाक्षिक आहे, त्यासाठीं मीं कांहीं तरी लिहावें असा त्या पत्राच्या संपादकांनीं आग्रह केला. मी नवें लिहिणार तरी काय ? व मला वेळ तरी कोठें होता ? " दैनंदिनींतील उतारे करविले आहेत, छापाल का ? वाचकांस कसे वाटतील, कितपत

आवडतील, कोण जाणे ? पण एका ' धडपडणाऱ्या ' व्यक्तीच्या जीवनांतील कांहीं प्रसंग व विचार पहावयास मिळतील, " असें मीं त्यांस म्हटलें. त्यांनीं ते उतारे घेऊन 'एका सेवकाच्या रोजनिशींतून' या मथळ्याखालीं छापण्यास सुरुवात केली. ज्यांनीं ते वाचले त्यांपैकीं मला ओळखणाऱ्या मंडळींनीं हा 'सेवक' कोण तें जाणलें व ज्या कांहीं वडील मंडळीस मुद्रितें पाठविलीं त्यांना ह्या प्रसिद्धीकरणाची कल्पना पसंत पडली व "एका लहानशा पाक्षिकांत सर्व कसें छापून होणार ? किती काळ जाणार ? स्वतंत्र पुस्तकरूपानेंच प्रसिद्ध करावें; मनोरंजक व उद्‌बोधकहि होतील" असें त्यांनीं सांगितलें. अर्थात् त्यांचें मत जरी प्रामाणिक आहे तरी त्यांना माझेविषयीं आपुलकी आहे म्हणून मी तें सर्वस्वीं ग्राह्य व निनचूक म्हणत नाहीं. तरी पण उतारे प्रसिद्ध करण्यांत अहंता किंवा औचित्यभंग नाहीं एवढें मात्र त्यांचे अभिप्रायावरून खास वाटलें.

उतारे प्रसिद्ध करावे, असें मनानें ठरविल्यावरहि पुढील काम बरेंच व महत्त्वाचें होतें. भाषेच्या दृष्टीनें त्यांत फेरफार करावयाचे नाहींत असें नक्की होतें; तरी पण त्या दिशेनेंहि थोडेंबहुत पहाणें आवश्यक होतें. कोणता भाग ठेवणें, कोणता भाग न ठेवणें, उतारा समजण्यासाठीं रोजनिशीचा कोणता संदर्भ–भाग आणखी घालणें, छापखान्यासाठीं हस्तलिखित तयार करणें, मुद्रितें तपासणें वगैरे अनेक कामें होतीं; तीं करण्यास तर दूरच पण त्यावर देखरेख ठेवून वरचेवर सूचना देण्यासहि मला इतर व्यवसायांमुळें वेळ मिळणें कठीण–अशक्यच. तेव्हां हें काम सर्वस्वीं श्री. कुलकर्णी यांचेकडेच दिलें. या श्रमास मर्मज्ञ व आपुलकी असणाऱ्या संपादकाची आवश्यकता होती. श्री. भाऊ धर्माधिकारी यांनीं यासाठीं सवड काढण्याचें स्वीकारल्यानें ह्या प्रकाशनाच्या पहिल्या भागाचें संकलन व संपादन त्यांनींच केलें आहे व मीं तें नजरेखालून घातलें आहे.

दैनंदिनींतील मजकुराची मांडणी कशी करावी हा एक विचार करण्यासारखा प्रश्न होता. विषयवार वर्गीकरण करून उतारे छापावे कीं ज्याप्रमाणें दिनानुक्रमें दैनंदिनी लिहिली गेली त्याप्रमाणें छापावी हा मुख्य प्रश्न होता. विषयवार छापण्यामध्यें एकाच विषयाविषयीं माहिती व विचार

एकत्रित मिळाले असते हें खरें, पण माहिती किंवा माझीं मतें वा विचार देणें हाच कांहीं केवळ या प्रकाशनाचा मुख्य हेतु नाहीं. कांहीं नवीन किंवा अमूल्य असें त्या दृष्टीनें यांत कांहींच नाहीं. परंतु एका सामान्य माणसाच्या, सार्वजनिक कार्यकर्त्याच्या कामाचा, मनाचा व विचारांचा विकास कसकसा होत गेला, वेळोवेळीं त्याला काय अनुभव आले, समकालीन कार्यकर्त्यांशीं तो कितपत व कसा समरस झाला किंवा झाला नसेल तर त्याला कां समरस होतां आलें नाहीं, सार्वजनिक कार्य, कुटुंबीय संबंध, धंदा वगैरे निरनिराळ्या क्षेत्रांतील जीवन एकाच सूत्रानें कसें बद्ध असतें, वगैरे अनेक गोष्टी दैनंदिनीच्या क्रमवार लिखाणावरूनच सुसंबद्धपणें समजून येण्यासारख्या असल्यामुळें तशीच मांडणी ठेवावयाचें ठरलें. यांत ही दैनंदिनी प्रकाशित करण्याचा हेतुहि साध्य होतो.

शेवटीं ज्या ज्या वडील व आप्तेष्ट मंडळींनीं या कामीं प्रोत्साहन दिलें व मदत केली त्यांत रियासतकार सरदेसाई आणि कोल्हापुरचे श्री. दादासाहेब सरदेसाई यांचे व प्रकाशनाचे कामीं सर्व भार श्री. गो. वा. कुलकर्णी व श्री. भाऊ धर्माधिकारी यांनीं उचलला याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

२०, अकबर रोड,
नवी दिल्ली.
ता. २५ माहे आगष्ट १९४८

गणेश वासुदेव मावळंकर

कांहीं पाउलें (खंड दुसरा)

सूचि

अखिल भारत चरखा संघ, ११३
अग्निहोत्री, श्रीधरपंत ४
अचानक आजार व त्यापासून दोन गोष्टींची जाणीव, १०९–११०
अन्तुकाका (गोडे) ६७
अध्यक्षांची मिरवणूक (लाहोर काँग्रेसच्या), १४३
अमदाबाद नागरिकांची सभा, ४०
अमानुल्ला, अमीर ९४
अमृतसर, १४३
अंबालाल साराभाई २१, ४८, ५६, ५७, ७१, ७५, ११४, ११६, १२५; यांचा शिक्षणाचे बाबतींत प्रश्न, १२२; यांच्याकडे नवीन कॉलेज बाबत चर्चा १२२; यांची म्युनिसिपल प्रकरणीं मी मध्यस्थी करण्याबाबत सूचना १२६
अय्यर (टाइम्सचे प्रतिनिधि) १४१
अलीभाई गफूरभाई १४२
अशोक मिल मजुरांचा झगडा, १६, १८, ७९;–चा संघ २१
आगरकर, २७
आग्रहाची चाल, ३८
आठले, विठूमामा (गोविलकर) ९०
आठवले, पार्वतीबाई ९५
आधुनिक तरुणांचा अव्यवस्थितपणा १०७
आधुनिक शिक्षणपद्धतीचे दुष्परिणाम ११६
आपसांतील पैशाचा व्यवहार ८, ६४, ७२
आयंगार, श्रीनिवास १
आषाढी–कार्तिकी एकादशीचें माहात्म्य १३६
आसामांत अतिवृष्टि १११
आसाम संकट निवारण फंड १०९;— फंडास मदत देण्याचा प्रश्न १०९
आळतेकर (स. खं.) ८७
इंग्रजी मालाचा बहिष्कार ८५
इमामसाहेब ७२
इंपीरियल बँकेच्या नोकरांचा संघ ३; –कामीं वल्लभभाईंचा सल्ला १०
उदीच्य ब्राह्मण स्वयंसेवक मंडळाची स्थापना ११७

उमेदवार वकीलांशीं स्पष्टोक्ति ९८
उर्दू शाळा ३५
एकादशीचा उपवास ७६
कमींत कमी प्रतिकाराचा मार्ग १·१७
कर्वे, प्रो. ११७; १२१
कस्तुरभाई, शेठ २, ४०, ४४, ५९, ५५, ५६, ६६, ८४, १०१, ११९, १२१, १४२;
काद्री, खान बहादुर ६०
कानेटकर,वामनराव २६, २८, १११
कानेटकर, प्रिन्सिपाल ९३, १२३
कानूगा, डॉ. ३८, ३९, ४४, ४६, ५३, ५९.
कार्लेकर १०७.
कार्लेकर सर्कसवाल्यांच कार्य ११०
कालेलकर, काकासाहेब ५६, ६९, ७२, १२८, १३७;
कुटुंब–एक प्रजासत्ताक राज्य १३९
कुटुंबाचा इतिहास ६५, ६७, ६९
कुटुंबाचा कर्ता त्याची वागणूक १४८
कुटुंबांतील संबंध व वकील १२०
कुंभार्ला घाटाचें सौंदर्य ८९
कृपलानी, आचार्य ४९, १४२.
केळकर, न. चिं. (तात्यासाहेब) ९१
काँग्रेस कार्यकारी मंडळाची बैठक १४५
काँग्रेस विषयविचारिणी समिति १४५
काँग्रेसमधील प्रदर्शन १४६
कॉलेजची प्रोफेसर मंडळी ३०
कोर्टांतील कालापव्यय ७९
कोल्हटकर (शिल्पकार) ६८
कोसंबी, धर्मानन्द १४
खादीचें श्रेष्ठत्व ८६
खादी प्रतिष्ठान ११३
खादीविषयीं सूक्ष्म चर्चा ७७
खादी संघाची बैठक ८७,–ची परिषद ९५
खेर सालिसिटर ६२
गजर ८०
गांधी, महात्मा, १, ११, १२, १३, ३२, ४६, ५०, ५१, ५५, ६७, ७९, ११३, ११९, १३८, १४१, १४२, १४७; ची तार ६३; ची विद्यार्थ्यांस पुष्टि ५३; चें नवजीवन ट्रस्ट. डीड बाबत पत्र १२३, १२४; चें ॲनी बेझंटच्या वाढदिवसानिमित्त भाषण ७; च्या हस्तें लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याचें अनावरण ६८; च्या हस्तें अमदाबाद म्युनिसिपल इमारतीवर राष्ट्रध्वज फडकवणें ६९; चे युरोप गमनाबाबत विचार ५५; चें भाषण ५८; चा गुजरात कॉलेज विद्यार्थी संघ.

प्रकरणीं सल्ला ५९; यांनीं सांगितलेली चाणाक्ष वैद्य व श्रीमंत रोग्याची गोष्ट १२१–२२; यांच्याशीं जमीन साऱ्या बाबत सरकारी धोरणाची चर्चा ११२–११३;
गांधी हीरकोत्सव १२८
गायकवाड, सयाजीराव ९५
गुजरात कॉलेज प्रकरण ३७, ३९
गुजरात कॉलेज विद्यार्थ्यांचा संप ३९, ४२–४३, ४५; संपाबाबत विद्यार्थ्यांची सभा ४३, जाहीरसभा व ठराव ४५–४६, ५८–सभेंत गांधीजींचें भाषण ५८, संपाबाबत सरकारी प्रेस नोट ६१
गुजरात विद्यापीठ १४;–विद्यापीठांत गांधी हीरकोत्सव समारंभ १२८,-यांत लेखकाचें भाषण १२८
गुजराती गीता छापण्याबाबत गांधीजींची महादेवभाईंशीं चर्चा ११३
गुरुका लंगर (अनसत्र) १४४
गुर्जर, दादासाहेब ५७
गॅलीलियो ११७
गैरसमज करून घेण्याची प्रवृत्ति १३१
गोखले, बाबूराव ९५
गोडबोले, प्रो. (बनारसचे) १००
गोडबोले, प्रो. म. शं. ६१, १०१
घरचे हिशोब ७८
घाणेकर बंधू ९३
चटर्जी ५४
चट्टोपाध्याय, कमलादेवी १३९
चंद्रिकासंमेलन १३०
चाणाक्ष वैद्य व श्रीमंत रोगी १२१-२२
चांदोरकर ६२
चिनुनाथ महादेव अस्पृश्यांना खुला करण्याचा प्रश्न १३८–३९
चिनुभाई, सर ११५, १३८; यांच्या बंगल्यावरील नाट्यप्रयोग ७६
चुंदरीगर वकील ९
छोटे महाराज, वे. शा. सं. (बाईंचे गुरु) १३७
जगतनारायण ११९
जन्माष्टमीचा उत्सव १२०
जमनादास द्वारकादास १४
जमेनीस, डॉ. ९२
जयकर, बॅ. २४, १३२; यांचें व्याख्यान, २५; यांचें हिंदुमहासभेच्या अधिवेशनाबाबत पत्र ११
जयंतीलाल अमृतलाल शेठ ६८
जयरामदास दौलतराम यांचे परदेशी मालाच्या बहिष्कारावर व्याख्यान ८५
जालियांवाला बाग १४३

जहांगीरराव ६७
जावळीचें उदाहरण ८६
जांभेकर, गजानन विठ्ठल ११०
जाहीर पत्रक, संपाबाबत ४९, ५०
जिनविजयजी, मुनि १
जिना, रा. ११९
जेजुरीकर, रा. ९६
जेम्स कलेक्टरचें 'प्रवासी बंगल्या' बाबत पत्र १०५
जैन जेवणावळ ६६
जॉन्सन, पूसीफूट ७२, ७३
जोशी, सर मोरोपंत १३
ज्ञातिविषयक संस्था ११८
झवेरी, कालिदास, २७, ४६
झवेरी (भाडेकरी) ८२
टंडन, पुरुषोत्तमदास १४२
टिळक, लोकमान्य २७; यांच्या पुतळ्याचा अनावरण विधि व म. गांधींचें भाषण ६८
ठक्कर, अमृतलाल (ठक्करबाप्पा) १०९, १२६, १२७, १२८, १३०; यांचा वकीली सोडण्याबद्दल आग्रहपूर्वक प्रश्न १२७, १२८
ठाकोर गोविंदलाल ४१
ठाकोर, बसुभाई ३८, ३९, ४३, ८०
डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचा दावा १०४
डेविस डिस्ट्रिक्ट जज ६५; यांजबरोबर हिन्दी राजकारणाची चर्चा व त्यांची नोकरी सोडून सेवा करण्याची इच्छा १२९
तपकीर हुंगण्याची संवय १३५
तळवळकर, डॉ. बापूसाहेब ४१, ४४, ११९
तेंडूलकर मास्तर ९२
तेलंग, न्यायमूर्ति २८
त्रिवेदी, रा. ३८
थियॉसॉफिकल सोसायटी-यूथ लॉजच्या वार्षिक समारंभांत भाषण ६
थोरोची उक्ति १२२
दादुभाई, रा. सा. ६४
दाराशा स्पिनिंग मास्तर १८
दामले, रा. ९६
दावर, प्रो. ७
दिवाण, जीवणलाल ३७
दिवाणजी, चैतन्यप्रसाद १०१,१०२
दिवेटिया, प्रो. ३८
देव, नानासाहेब ८७, ८८
देवधर, प्रो. यांचें 'आपले व पाश्चात्य खेळ व व्यायाम' वर भाषण ११९
देवरुख ३६
देशपांडे ११९
देशपांडे, वाग्भट ९३
देसाई, खंडुभाई ११, १२

देसाई, डॉ. चंदुलाल १४१
देसाई, नवीनचंद्र ५६
देसाई, भुलाभाई ॲडव्होकेट ४३, ४४, ४५
देसाई, महादेव ११२, ११३
देसाई, डॉ. हरिप्रसाद ३८, ४६, ६३
देसाई, हरिलाल ३, ३७. (पाहा पुढें हरिलाल)
देसाई मास्तर १०१
दौलतराम, अध्यक्ष ६८,९७
धंदा व लोकसेवा १४१
ध्रुव, प्रो. ३९
नटराजन ६२, ६७
नंदा, गुलझारीलाल ११, १२, १३, १६
'नमस्कार यज्ञ' वर प्रवचन १११ (पाहा सूर्यनमस्कार) नमस्काराचा व्यायाम ११९; चे सामने ३५, ७०
नरिमन १३९
नरोत्तमभाई शेठ ८
नवजीवन ट्रस्ट डीड १२३, १२४; चा दस्तैवज १३८
नवीन कॉलेज काढण्याचा प्रश्न २२; बद्दल चर्चा ६६, ९९, १०१, १०२, ११२, १२१;
नाणावटी, डॉ. ७
नायडू, सरोजिनी १३२
नियमितपणाचा अभाव ३८
निसर्गाचें दर्शन व त्याची आवड १३७
नीळकंठ, विद्याबाई ७८, १२७;
नृसिंह जयंति संमेलन (मावळंग्याचें) १६
नेहरू, जवाहरलाल ११३, १४६
नेहरू कमिटीचा रिपोर्ट १३;— रिपोर्टास पाठिंबा ७१
पंजाबी लोकांची विलासिता १४२, लोकांत स्त्रियांचें वर्चस्व १४२-४३
पटेल, डाह्याभाई ७७
पटेल मणिबहेन ११२
पटेल, वल्लभभाई १, २, ३, ४, १०, ११, १२, ५०, ५१, ५३, ५९, ६३, ६४, ६५, ७१, ७२, ७८, ८०, ८१, १०८, ११२, ११४, ११९, १२६, १२९, १३४, १४२, १४७; यांचा अमदाबाद म्युनिसिपालटींतून राजीनामा १०६; यांचें भाषण २७, २९–३०, ६३; यांच्याशीं चर्चा ९; विषयीं आरोप १३४; यांस मानपत्र २७, २९
पटेल, विठ्ठलभाई यांचा सल्ला १०८; यांना गुजरात क्रांत पार्टी १३८
पंडित, मालतीबाई १०९

पंडित, रा. ९२
परदेशी मालाचा बहिष्कार ८५–८६
परशुरामभाऊ सरकसवाल्यांची कामगिरी ११०
परांजपे, शि. म. ८७
परीक्षकांचें (युनिवर्सिटीच्या) वर्तन ८५
परीख, नरहरि १२८
परीख, रसिकलाल १०२, १२४
पहारा (पिकेटिंग) ची मर्यादा ४७
पाटील वकील ७३
पाठक, रामनारायण १०२, १२४
पारेख, छोटालाल ९६
पारेख, हीरालाल २७, ८२, १३४
पाल, बिपिनचन्द्र यांचें व्याख्यान व माझा समारोप ११८
पाश्चात्य खेळ व व्यायाम यांची विशेषता ११९–१२०
पाश्चात्य देश या विषयावर लेखकाचें व्याख्यान २
पुराणी, छोटुभाई १३५
पुरोहित स्वामी ७३
पैसेवाल्यांची संकुचित वृत्ति १३९
प्रचलित शिक्षणावर लेखकाचें व्याख्यान १२४–१२५
प्रान्तवार सुधारणेची जरूर ९३
प्रायश्चित्त, परदेशगमनाबद्दल ३, ४, १७, १९, २७, २८, २९
प्रोफेसर मंडळींची पामरता ९
फाटक, डॉ. ८७
फिरायला जाण्याची आवश्यकता १२१
फी–वाढीविरुद्ध युवक संघाची चळवळ ९७
बजाज, जमनालाल ८७, ८८
बद्धकोष्ठ ११०
बाई, ती. मातुःश्रीची प्रायश्चित्ताबाबत निकड ४, अभिप्राय १७, सूचना १९; ची गुरुपूजा १३७, १३८
बापू, चि. यास मार ३१
बाबा, कै. ३१; च्या आठवणी ७६
बाबूराव ३
बावडेकर, असिस्टंट जज्ज २
बँकर, शंकरलाल १८, १३४, १३५, १३६, १३७
बेझंट, ॲनी चा ८२ वा वाढ दिवस समारंभ ७
बोस, सुभाषचंद्र १३९
ब्राह्मणेतर पत्रें ८९
ब्रेलवी ५४
भंग्याची पगारवाढ ३३
भाऊबीज १२, २०
भालू, चि. चें पत्र ३५; यास पत्र ३४
भास्करराव ७४
भुलाभाई ४८

भृगुपुर ऋषि आश्रमाची मंडळी ११६
मंगलदास, शेठ ४२, ५१, ७३; व अस्पृश्यतानिवारण १३६
मजूर चळवळीचे संचालक ३३
मजूर संघाची चालक मंडळी ८,१२
मजूर महाजन व अशोक मिलचा झगडा ११, १३
मणीलाल कोठारी १२
मणीलाल चतुरभाई ११५
मथुरा गुरुकुलाची मंडळी ११५
मंदिरें हरिजनांसाठीं खुलीं करण्याची गोष्ट १३४, १३५, १३६
महाराष्ट्रांतील अन्नाची तूट ९३
महाराष्ट्रांत मराठी भाषिकांची दुर्दशा ८४
महाराष्ट्रीय मंडळ(पुणें)चें कार्य ९६
महाराष्ट्रीय विधवा, एक २०
महाराष्ट्रीयांची पीछेहाट ९५
महेता, रोहित ६२, ३३, ११८
महेता, डॉ. सुमंत १३३;—कडे नवीन कॉलेजबाबत चर्चा १०२
माणुसकीविहीन वागणूक, एक घटना ९०
मावळंकर, ग. वा. (लेखक)
मावळंकर, रा. ७०
मावळंग्याचा उत्सव ८४
मुंजे, डॉ. ११९
मुतालिक, सरदार ९२
मुनशी, ॲडवोकेट ४६, ४८
मुनशी, गोविंदभट ४, १७
मुंबईंतील दंगे ६२
मुली पाहण्याची चाल ३६, ८१
मेयो, लॉर्ड १०५
मेहेरअल्ली ६२, १३९
मोक्षाकर, पांडित २०
म्युनिसिपल (अमदाबाद म्युनिसिपालिटी) काम १, १५; विषयावर वादविवाद २४; अध्यक्षपदाचा प्रश्न ७१, ७५, ७७; अध्यक्षांची निवडणूक ८०
म्युनिसिपल एंजिनीयरचा प्रश्न ११४, ११६; बाबत म्युनिसिपालिटीच धोरण बेकायदेशीर ११६
म्युनिसिपालटीचा कारभार २१; ची स्थिति ९७, ११६, १२६; मधील अनिष्ट प्रकार १०६–०७
म्युनिसिपालटीवर राष्ट्रध्वज, गांधींच्या हस्तें ६९
म्युनिसिपालटींतून राजिनामा १०६
यंग इंडिया ५३
युरोपच्या अनुभवाविषयीं भाषण ३६
युवक परिषदेविषयीं अनुत्साह १३९
युवकसंघ १७; तर्फे स्वराज्याबाबत चर्चा १३१

येशूचें क्रुसिफिकेशन ११७
रंगूबाई २३
रणछोडलाल अमृतलाल, शेठ ६८, ८०, १३५
रफीउद्दीन अहंमद, मौल्वी (शिक्षण-मंत्री) ५९, ६७
राजेन्द्रप्रसाद, डॉ. ५९
रानडे, न्यायमूर्ति २८; ११७
रामनाम अखंड सप्ताह ७९
राष्ट्रीय संगीत मंडळाचा जलसा ५०
रिचर्ड्स्, मिस् ७०
रिपन, लॉर्ड १०५
लग्नपद्धति, आपली ९२
लजपतराय, लाला यांचा लोकसेवक संघ १४२
लाहोर कॉंग्रेस १४०; ला जाण्याची तयारी
लिंस्टर, मिस् १
लॉरी, मि. (डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन) ४३, ४४, ५९, ६०
ल्यूथर ११७
वकील, सर रुस्तुम १३२
वकील (नवीन) मंडळींतील गुणांचा अभाव ९६
वकीलाचें बेजबाबदार वर्तन १०४
वकीली व सार्वजनिक कार्य १०८
वकीलीबाबत एक मजेची घटना ११५
वाडीलाल (लल्लूभाई) व स्वदेशी ७०
वाणी–रजपूत, एका लग्नाची भानगड १०४
वायदे सांगण्याची पद्धत (पैशाच्या व्यवहारांत.) ९८
वासणा मकतमपूरच्या दरबाराचें अपील १०३
विद्याबाईंचें भाषण १२७
विद्यार्थी संप कमीटीच पत्रक ५३
विद्यार्थ्यांची मिरवणूक ९४, ५८; ची सभा ४८, ६१, ६३; सभेस महात्माजींची तार ६३
विधवांची स्थिति २०
विलायती ओव्हरकोट ३२
वृद्ध–तरुणी विवाह प्रकरणीं वकील-पत्रास इनकार ७३
वैद्य, चिंतामणराव ८७
वैद्यकीय मदत खेड्यांना देण्याबाबत विचार १३३
वैशंपायन, ग. रा. ११९
व्यवस्थितपणाचा अभाव १७
व्हाइसरॉयचा सुधारणांबाबत जाहीर-नामा १३२; ची गाडी बॉंबनें उडवण्याचा प्रयत्न १४१
'शक्ति' पत्रांत लेखकाविषयीं कुत्सित लेख ७४
शहादरा १४६

शांताबाई १२
शालीमार बाग १४५
शास्त्री, ना. ६७; यांचें अमदाबादेस आगमन व भाषण ६९
शाह, इनकम् टॅक्स् ऑफिसरद्वारा लेखकाचें अभिनंदन ५
शाह, लेडी रुक्मिणी २४
शाह, सर लल्लूभाई आशाराम लॉ कॉलेज २४; च्या तसबिरीचा अनावरण समारंभ २५
शिक्षणाबाबत लेखकाचे विचार ११६
शिखांची सेवेची कल्पना १४४
शिरास, फिंडले २५, ३७, ३८, ३९, ४३, ४६, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५५, ५७, ५९, ६०, ६१, ६२, ६७. चा हुकूम १७, १८; ची भेट व चर्चा १९, २२; चें सर्क्युलर ४०; चें म्हणणें ४१, ४२ याची खोटी हकीकत ५३
शिवदासानी, एच्. बी. ४१, ४२, ४३, ५८
शिवाजी–समर्थ भेट ८८
शिस्तीचा बाऊ ५७
शिस्तीचा सार्वत्रिक अभाव (आपल्या समाजांतील) ११४
शुद्धीची आवश्यकता ९४
शेवडे, बाळासाहेब ७६
श्रीधरभटजी २९
संकटनिवारण (गुजराथ) कमिटीची सभा १०९, १११; व आसामला मदत करण्याचा ठराव ११२
सचोटीची विरलता ८९
संत, रा. ७७
संत, नागनाथ ३८
संत, रामराव २८
सप्रे, प्रा. ९
सप्रे, ॲडीशनल जज ६५
सप्रे, कै. ८५
समाजसेवक परिषद बोलावण्याचा विचार ८२, ८३; परिषदेच्या कार्यकारी मंडळाची बैठक ११३; परिषदेची बैठक व ठराव १२६-२७
समाजसेवा मंडळाच्या कायकारिणी सभेची बठक १३०
समर्थ–शिवाजी भेट चर्चा ८८
संपाच्या (गुजरात कॉलेज विद्यार्थ्यांच्या) तडजोडीचा प्रश्न व अटी ४९,
संपाबाबत सरकारी प्रेसनोट व तिला उत्तर ६१

सरदेसाई, अनंतराव ८८; यांच्या सूचना ९०
सरदेसाई, गोविंद सखाराम (दादासाहेब) १६, ६५
सरदेसाई, गोविंद सखाराम (नानासाहेब) १६, ८४, ९१
सरदेसाई, दत्तोपंत ९१
सरदेसाई, डॉ. नरहर गोपाळ १६, ८४, ९१
सरदेसाई कुटुंब संमेलन ८१
साबरमतीचा पूर ११०
सामाजिक ऐक्याच्या भावनेचा अभाव ११६
सामाजिक जाणीव व दृष्टिबिंदूचा अभाव १५, ७०, १११
सामाजिक सेवाकार्याबाबत भाषण ११७
सामुदायिक प्रार्थना व संगीत १५
सायमन कमिशन १७, २२
सार्वजनिक द्रव्याचा व्यवहार १००
सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव ७०
'सिंहनाद' हस्तलिखित ३१
सुखदेव २३
सुधारकाचें वर्तन ११७
सुवर्ण मंदिर (अमृतसर) १४३,१४४
सूर्यनमस्कार १३५ (पाहा नमस्काराखालीं)
सेटलवाड, सर चिमनलाल ४१,४२, ४३, ४४, ४५, ४८, ४९, १३२
सेवा व शिस्तीवर लेखकाचा आग्रह ६
सौभाग्यवतीकरवीं दोन गोष्टींचा उपक्रम १०८; नें केलेली कान-उघाडणी १३१
स्त्रियांना बरोबर राखण्यापासून लाभ ८४
स्थानिक (स्वराज्य) संस्थांच्या बहिष्काराचा प्रश्न १४७
स्वदेशी वस्तूंना उत्तेजन देण्याबाबत रिपन वगैरेंच्या वेळची नीति १०५
स्वदेशीचा सरकारमार्फत प्रचार १०५
स्वयंपाकाचा प्रयोग २६
स्वराज्याबाबत युवक संघातर्फे चर्चा १३१
स्वरूपचंद कारकून ११५
स्वामीनारायण, प्रो. ३२, ५५, ६३
हरिलाल, दि. ब. २१, ५०, ५७, ६०, ६४, १०८; यांना संपाबाबत तार ४४ (पाहा देसाई हरिलाल देसाईभाई)
हरिश्चंद्र, राजा १००
हरी बेलीफ ३१
हर्षदलाल अमृतलाल, शेठ ६८

हार घालण्याची प्रथा ४०
'हिन्दु जीवन' पत्राच्या संपादकाचें ब्लॅकमेलिंग १०४
हिन्दु समाजाची हीन दशा १०३
हिन्दु महासभा ११
हिन्दु–मुसलमान तंट्याचें अपील १०२; कामीं जज्जाची पक्षपाती वृत्ति १०२–०३
हिन्दु–मुसलमान तेढ ९; झगडे ८५
हिन्दूंचें भागूबाई धोरण ९९
हिशोबाचें महत्त्व ७८
हुंड्याची चाल ८१
हैदराबादचे ज्योतिषी ९८; त्यांनीं वर्तवलेलें लेखकाचें भविष्य ९९
हॅंकॉक (आयरिश गृहस्थ) ८४

—*—

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

❀ प्रकाशन ❀

सौ. मालतीबाई दांडेकर

१ कथामालती २-०

२ विद्युत्‌रेखा १-१२

३ तेजस्विनी ५-०

४ अमोल आहेर ३-४

५ उद्यांची कन्या ३-०

६ कृष्णरजनी ५-०

७ लोकसाहित्याचें लेणें ६-०

८ कन्येस प्रेमभेट १-४

९ मातृमंदिर

वि. ज. सहस्रबुद्धे

१० पद्यमीमांसा १-८

११ दुहिता २-०

व्यं. रा. खंडाळीकर

१२ आघाडीवर २-०

गणपतराव बोडस

१३ झांशीची राणी १-८

कु. प्रेमा कंटक

१४ अग्नियान ३-०

श्री. रा. पोतनीस

१५ महागाई कां ? १-८

यदुनाथ थत्ते

१६ जीवनधर्म १-४

आय्. सी. शेख

१७ पाकिस्तानची छाया २-८

१८ गांधीवाद :

समाजवाद ३-०

माधवराव बागल

१९ कला आणि कलावंत ३-०

भाग २ रा

वि. अ. कुलकर्णी, एम्. ए.

२० मराठी काव्यसमीक्षा ६-०

ना. ल. व्हटकर

२१ अपराधी २-०

सौ. मालतीबाई चोळकर

२२ चित्रलेखा ३-८

टॉलस्टॉय

२३ सैतान २-०

डॉ. अष्टपुत्रे

२४ चारुमित्रा २-४

भाऊ धर्माधिकारी

२५ बदला बळी ३-०

खलील जिब्रान

२६ मानवतेचे राखणदार २-८

(बंडखोर आत्मे)

२७ सलमा २-८

सरदार प्रतापसिंग

२८ जोहार २-८

के. रा. पालकर

२९ शाळा व शारीरिक शिक्षण २-०

काकी कालेलकर

३० जीवन संस्कृति १-२,

अप्पासाहेब पटवर्धन

३१ सेवाधर्म २-०

कै. पंडित मुंडले

३२ कार्ल मार्क्स व त्याचें कार्य २-०

दादासाहेब मावळंकर

३३ कांहीं पाउलें २-८

३४ कांहीं पाऊलें खंड २ रा ३-०

३५ मानवतेचे पाझर २-८

महात्मा गांधी

३६ विद्यार्थ्यांशीं हितगूज २-०

३७ स्त्रियांशीं हितगूज २-८

पं. जवाहरलाल नेहरू

३८ आव्हान १-८

ग. आ. लाड

३९ ग्रामराज्य २-०

भारतन् कुमारप्पा

४० पुंजीवाद, समाजवाद कीं ग्रामवाद ? ५-०

नाणावटी आणि अंजेरिया

अनु. मो. स. श्रीखंडे

४१ हिंदी ग्रामीण जीवनाचा प्रश्न ७-०

स्वयंसेवक

४२ समाजमनाचा ध्येयतारा ५-०

ऑर्थर कोसलर

अनु. वसंतराव नारगोळकर

४३ भरदुपारच्या अंधारांत ६-०

आपटे गुरुजी

४४ भारताचा लाडका मुलगा १-८

रफ प्रत १-०

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

४५ आधार ४-८

४६ प्रतिपदा २-८

४७ सीमारेषा ५-०

आमचे सण

१ गुढी पाडवा ०- ८

२ वसंत गौरी ०- ४

३ सती सावित्री ०-१०

४ नागपंचमी ०- ६

५ हरितालिका ०- ८

६ मंगलमूर्ति ०- ८

७ सोन्याचा दसरा ०-५

८ तिळगूळ घ्या गोड बोला ०-५

९ महाशिवरात्र ०-५

१० होळी ०-५

११ नाताळ ०-८

इतर बालवाङ्मय

१ आमचे गांधीजी ०- ८

२ फुलराणी ०- ५

३ पोपटाचा डोळा ०-४

४ राया अथवा बालमूर्तिकार ०-७

दा. क्र. ७९२३

"कांहीं पाउलें"

(खंड दुसरा)

ता. ८–९–२८

आज सकाळीं अहमदाबादेस पोंचलों. सायंकाळीं सत्याग्रहाश्रमांत महात्मा गांधींस भेटलों. विलायतचे प्रवासांतील त्यांस सांगण्यासारखी हकीकत सांगितली; मिस् लेस्टरची भेट व ईस्ट एन्ड फिरणें, कॉंग्रेस कमिटीचे स्थापने-साठीं श्री. श्रीनिवास आयंगार* यांच्या अध्यक्षतेखालीं झालेली कॅक्सटन हॉलची सभा व तेथें प्रदर्शित केलेले माझे विचार–मुनि श्रीजीनविजयजी यांचे लंडनला परदेशी कापडाच्या व परदेशी तऱ्हेच्या पोषाखांत असणें–डब्लिन-मधील सहानुभूति–या मुख्य बाबी होत्या. कॅक्सटन हॉलमधील माझे विचार बरोबर होते व मी तेथील श्रोत्यांस खूपच स्पष्टोक्ति ऐकविली असें महात्माजी म्हणाले.

ता. १०–९–२८

सायंकाळीं म्युनिसिपल सभेंत गेलों होतों. सर्वांस तेथें भेटलों. तेथील आरडाओरडी, अव्यवस्था, व केवळ मच्छीबाजारसारखी अतिशयोक्ति शिवायहि परिस्थिति पाहून फारच वाईट वाटलें. अशा वातावरणांत राहून कांहींहि होणें शक्य आहे का? जर मी २४ घंटे म्युनिसिपल कामच करूं शकेन तर तेथें राहाण्यांत तात्पर्य–थोडा फुरसतीचा वेळ देणाऱ्याला काम करण्यास निराळें वातावरण पाहिजे. नाहीं तर तेथें राहाणें म्हणजे स्वतःचे वेळेचा अपव्यय व दुसऱ्यास येण्यास आडकाठी, असें वाटतें. तेव्हां विचार आला कीं आपण राजिनामा द्यावा व अंग काढावें. मुख्य कारण आपणास सर्व वेळ देतां येत नाहीं म्हणून. पण रा. वल्लभभाई परत आल्यावर विचार करावा असें मनाशीं ठरविलें आहे.

---

* हे कॉंग्रेसचे अध्यक्ष एक वर्षीं होते व मद्रासचे ॲडव्होकेट जनरलहि होते.

ता. १५–९–२८

रा. कस्तुरभाईंचें पत्र आलें. त्यांत श्री. वल्लभभाईंनीं बारडोली लढ्याचे वेळीं लिहिलेल्या हृदयस्पर्शी पत्राची नक्कल पाठविली आहे. कर्मयोगी झालेल्यांची भाषा किती जोमदार, हृदयस्पर्शी व थोडक्यांत असते याचा तो नमुना आहे. श्री. वल्लभभाईंच्या अगदीं जवळच्या स्नेह्यांपैकीं असण्याचा मान मला आहे याबद्दल मला अभिमान वाटतो. तो क्षम्यच आहे, नाहीं काय?

ता. १६–९–२८

तिसरे प्रहरीं ४॥ वाजतां तरुण भारत मंडळातर्फे "पाश्चात्य देश" या विषयावर चार शब्द बोलण्यास गेलों होतों. अध्यक्षस्थानीं रा. रा. बावडेकर (I. C. S.) असिस्टंट जज * हे होते. युरोपीय राष्ट्रांतून काय मुख्य दिसतें हें सांगतांना (१) राष्ट्रीय भावना व त्यामुळें स्वदेशी व्रताचरण आणि देशासाठीं प्राणत्यागापर्यंतची तयारी (२) सामाजिक राहाणीची भावना व त्यामुळें येणारें व्यक्तिस्वातंत्र्य-नियंत्रण (३) शिस्त (४) स्वच्छता, या मुद्यांचा उल्लेख केला. मी फक्त तीनच महिने होतों, त्यामुळें कोणत्याहि गोष्टीचा सूक्ष्म अभ्यास नाहीं. युरोपीय राष्ट्रांच्या दोषांकडे पहावयास मी गेलों नाहीं, या दोन गोष्टी सुरुवातीसच सूचनारूपानें सांगितल्या होत्या. तेथें जाऊन आपल्या स्वराज्याविषयीं जास्त आशा दिसूं लागली, तेथील माणसांत बुद्धिमत्ता किंवा इतर विकास आपल्यापेक्षां जास्त नाहीं, शिक्षण जास्त आहे हा मुद्दा मीं सांगितला होता. त्याला अध्यक्षांनीं Organisation (संघटना)ची पुस्ती जोडलीच व आपण कोणत्याहि तऱ्हेनें कमी नाहीं असें सांगितलें. त्यानंतर रा. ×× यांच्याशीं बोलणें झालें. त्यांना असें वाटलें कीं माझ्या भाषणानें तरुणांचा निरुत्साह होण्याचा संभव. मला हें पटत नाहीं व निरुत्साह कां व्हावा हें समजत नाहीं. तसें करण्याचा अथवा त्या दृष्टीनें सांगण्याचा माझा उद्देशहि नव्हता. तरुण मंडळीस फुलवून

* नंतर हे मुंबई हायकोर्टाचे एक न्यायाधीश झाले.

गोंजारून काम काढण्याचा त्यांचा स्वभाव व रोखठोक कोरडे ओढून आपले मंडळींची होतां होईल तों तोंडावर स्तुति न करण्याचा माझा स्वभाव. यामुळें कदाचित् तसें वाटलें असेल. तसा परिणाम खरोखरीच झाला असेल किंवा होईल तर दिलगिरीची गोष्ट आहे. पण मला वाटतें आमची तरुण मंडळी कणखर तपश्चर्या टाळण्यास निमित्तेंच पाहात असतात. त्यांपैकीं हेंहि एक असावें. तरी पण पुढील प्रसंगीं मी जास्त सावधान राहाणें जरूर आहे यांत शंका नाहीं. जाहीर बोलणें किती जबाबदारीचें त्याचा हा नमुनाच.

ता. १८-९-२८

आनंद मुक्कामीं "प्रायश्चित्त घेणार का?" असा प्रश्न रा. बाबूरावांनीं केला. प्रायश्चित्त घेण्यासारखें मीं कांहींच केलेलें नाहीं—मानसिक तर घेणेंच नाहीं—परंतु ती. मा. बाईंचे संतोषासाठीं घेण्याचें असेल तर मला त्याची अडचणहि नाहीं. पाश्चात्य देशास जाणाऱ्या मंडळींना तें अडचण-रूपें असूं नये एवढी मात्र खबरदारी घेण्याचा विचार आहे.

ता: २१-९-२८

या भेटींत दि. ब. हरिलाल देसाई व वल्लभभाई यांचा संबंध तुटला असें समजलें. मतभेद होते व राहातीलच. पण एकमेकांत असहकारिता उत्पन्न होणें इष्ट नाहीं. माझे हातून यांत काय होणार? पण रा. सा. स पत्र लिहिण्याचा विचार आहे. रा. वल्लभभाईंचे मनांत द्वेषवृत्ति असावी असें दिसलें नाहीं व वाटतहि नाहीं. रा. वल्लभभाई हे फारच झपाट्यानें महात्माजींचे पायरीवर चढत आहेत असें वाटलें.

ता. २२-९-२८

सायंकाळीं येथील इंपीरियल बँकेचे स्टाफची मंडळी आली होती. सदर बँकेच्या नोकरांचा संघ स्थापावयाचा आहे त्याचें अध्यक्षस्थान मीं स्वीकारावें अशी त्यांची इच्छा आहे. मी या कामास अनुभव व वेळ या

दोन्ही दृष्टींनीं योग्य नाहीं असें वाटत असल्यामुळें त्यांजला तसें सांगितलें, पण त्यांना तें न पटणेंच स्वाभाविक. रा. वल्लभभाईंचा विचार घेण्याचें मनाशीं ठरवून 'विचार करूं' असें त्यांना सांगितलें.

ता. २६-९-२८

प्रायश्चित्तांचे बाबतींत मीं कांहीं तरी विचार करावा अशी ती. मा. बाईंनीं दोन तीन दिवसांपूर्वी इच्छा दर्शविल्यामुळें वे. शा. सं. गोविंदभट मुन्शी यांजला घरीं बोलाविलें होतें. माझे मुद्दे मी त्यांजला पुढीलप्रमाणें सांगितले—(१) प्रायश्चित्त म्हणजे चित्तशुद्धि अथवा पश्चात्ताप अशा अर्थानें तें मी घेणें अशक्य आहें. मी कांहींहि गैर गोष्ट केली नाहीं. इतकेंच नव्हे तर आवश्यक गोष्टच केली. व होतां होईल तितक्यांनीं पाश्चात्य देशांत जाऊन यावें असें माझें मत आहे. प्रसंग आल्यास अथवा आणूनहि पुन्हां जावें अशी इच्छा आहे. तेव्हां या दृष्टीनें प्रायश्चित्त घेणें शक्यच नाहीं. (२) रूढी व समाजबंधन जबाबदार माणसानें तोडणें यांतहि जोखीम आहे. मातुःश्रींची इच्छा मीं प्रायश्चित्त घ्यावें अशी कांहीं कारणास्तव (विशेषतः श्राद्ध, पक्ष वगैरेस अडचण येऊं नये यासाठीं) आहे. समाजांतील जुन्या मतांच्या मंडळीशीं संबंध होतां होईल तों तुटूं नये अशीहि इच्छा आहे व विशेषतः ज्या गोष्टीनें ती. मातोश्रींचें मन दुखत असेल ती गोष्ट आपलें मत बाजूस गुंडाळून ठेवूनहि करूं नये अशी भावना आहे. या कारणामुळें प्रायश्चित्तविधि करण्यास अडचण नाहीं. पण तो मानसिक नसून केवळ बाह्य आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. अशा व्यावहारिक पेंचाचे परिस्थितींत ज्याप्रमाणें कायदा बदलेला नाहीं पण समाजाचे प्रगतीमुळें न्यायाधीश त्याचे वेगळे अर्थ करूं शकतात त्याप्रमाणें बाह्यतः प्रायश्चित्त पण तत्त्वतः कांहींच नाहीं अशा रीतीनें जर प्रायश्चित्तविधि होत असेल तर तो करावा. म्हणजे विधि व खर्चहि तांत्रिक. सव्वा पैशाची खडीसाखर व देवास नमस्कार—असें करण्यांत जुन्या नव्याची सांखळी कायम राहून सर्व कांहीं सुखासमाधानानें होईल. त्यांस अर्थातच हें पटणें कठीण होतें. कांहीं अंशीं त्यांचीं स्वतःचीं मतें व बरेच अंशीं इतर

वैदिक मंडळींची भीति. माझे शरमेसाठीं अथवा संबंधामुळें त्यांनीं स्वतःचे मर्जीविरुद्ध कोणतीहि गोष्ट करूं नये असें मीं त्यांना सुचविलें. नंतर दुपारीं जेवणाचे वेळीं ते रा. रा. श्रीधरपंत अग्निहोत्री यांस घेऊन आले होते. त्यावेळींहि हीच पुन्हां चर्चा होऊन जास्त असें सांगितलें कीं "प्रायश्चित्त घेतों" या म्हणण्यांतच मीं तर सर्वस्व सोडून दिलें. तेव्हां त्याचे तपशिलांत अमूक असावें, अशा रीतीनें असावें, इतका खर्च व्हावा, असा सर्व आग्रह त्यांनीं सोडून देणें वाजवी व सामाजिक दृष्टीनेंहि योग्य होईल. देशकाल परिस्थिति पाहतां आग्रह करणें इष्ट नाहीं व आग्रहच असेल तर मला प्रायश्चित्त घेणें नाहीं असें मीं सांगून टाकलें. "खास तुमचे-साठींच अपवाद म्हणून कांहीं तडजोड काढूं." असें रा. श्रीधरपंत म्हणाले. तसें नसावें असें मीं सांगितलें.

श्राद्धपक्ष म्हणजे पूर्वजांचें पुण्यस्मरण–गुणावलोकन यापेक्षां जास्त किंवा दुसरा अर्थ मी तरी करीत नाहीं. तरी पण ब्राह्मणभोजन हा जर मुख्य भाग मानला तरीसुद्धां त्यासाठीं होईल तो खर्च करून बडोद्याहून किंवा मुंबईहून मंडळीस बोलवावयाचें पण या बाबतींत ती. मा. बाईंची भावना दुखेल असें कांहींहि करावयाचें नाहीं असा निश्चय आहे. श्राद्धपक्षाची अडचण येत नसेल तर प्रायश्चित्ताविषयीं त्यांचा आग्रह असेल असें वाटत नाहीं. तितक्याउपरहि आग्रह असेल तर मग कसें करावयाचें तें पुढें ठरवितां येईल.

सायंकाळीं म्युनिसिपल सभा होती, पण गेलों नाहीं. रोज रोज सायंकाळीं सभा, व त्यांत शिव्यागाळी व सर्व सांवळागोंधळ, त्यामुळें जावेंसेंच वाटत नाहीं.

ता. २९–९–२८

इन्कम टॅक्स ऑफिसर रा. शाह यांस भेटलों. विलायतेची हकीकतहि निघाली होती. येथील वकील व डॉक्टर मंडळी स्वतःच्या उत्पन्नाचा आंकडा खरा दाखवीत नसून मीच काय तो एक अपवाद आहे, त्यामुळें माझ्या म्हणण्यावर त्यांचा विश्वास आहे अशा तऱ्हेचें त्यांनीं माझें अभि-नंदन केलें. चालू सालचा माझा फॉर्म ऑफिसकडून आला नाहीं तो

देण्यासाठीं मीच मागणी करून फॉर्म घेऊन आलों. मला वाटतें त्यामुळें त्यांचा ग्रहहि विशेष बरा झाला असेल. परंतु उत्पन्न न दाखविणें किंवा खोटें दाखविणें यांत काय तात्पर्य? कायद्यानें ज्या ज्या सवलती दिल्या असतील त्यांचा पूर्ण फायदा घेऊन कमींत कमी कर द्यावा लागेल असें करणें वेगळें व खोटें उत्पन्न दाखविणें हें वेगळें.

ता. ३०-९-२८

आज सायंकाळीं थिऑसॉफिकल सोसायटीचे—यूथ लॉजचे वार्षिक समारंभास गेलों होतों. अध्यक्षस्थान मीं स्वीकारावें अशी तरुण मंडळींची फारच इच्छा होती. तरुण मंडळीशीं परिचय कायम राहावा ही माझीहि इच्छा. तेव्हां मीं कबूल केलें होतें. मी वरोबर वेळेवर गेलों होतों, पण कामास थोडासा उशीर झाला. अध्यक्षांचें कांहीं भाषण असावें असा आग्रह होता म्हणून चार शब्द बोललों, पुढील मुद्दे होते:—(१) मी स्वतःला तरुण समजतों; व मनावरून जर वय नक्की करणें असेल तर मी ३० वर्षांचे आंतील वयाचा आहे, व युवकवर्गापैकीं एक आहें एवढीच माझी आजचे प्रसंगीं अध्यक्ष होण्याची योग्यता आहे. (२) अध्यक्षपद देऊन सेवा करण्याची संधि दिल्याबद्दल आभार. (३) तरुण मित्रांस चार अनुभवाच्या सूचना—सार्वजनिक बाबतींत व्यक्तिगत रागद्वेषाचें वारें शिरूं देऊं नका—सेवाबुद्धीनें कार्य करणारांमध्यें कितीहि मतभेद झाला तरीसुद्धां कलह होत नाहींत व संस्थांस नुकसान होत नाहीं— सेवाधर्म फार कठीण आहे. पुष्कळशा झगड्यांच्या मुळाशीं कीर्ति—लालसा असते ती काढून टाकून 'कर्मण्येवाऽधिकारस्ते' या बुद्धीनेंच काम चालविलें तर तंटे होण्यास वाव नाहीं. दुसऱ्यांचें कृत्य सद्धेतुपूर्वक असेल असंच गृहीत धरून चालावें. Do not attribute motives (असद्हेतूंचा आरोप कोणावरहि करूं नका). शिस्त व आज्ञाधारकपणा पाहिजे. संघटनेंत आपल्यावरचे अंमलदार असतील त्यांचे हुकूम पाळण्याची शिस्त पाहिजे—समाजांत या गोष्टी व दुसऱ्या सर्व चांगल्या गोष्टी बोलण्यानें नव्हे पण आपल्या आचरणानें पसरविल्या पाहिजेत.

ता. १–१०–२८

सायंकाळीं भगुभाईंचे वंड्यामध्यें श्रीमती ॲनी बेझंट यांच्या ८२ व्या वाढदिवसाचा उत्सव होता. महात्मा गांधी अध्यक्ष होते. डॉ. नानावटी व प्रो. दावर यांस, या सभेंत ती राजकीय स्वरूपाची असल्यानें बोलूं नका अशा अर्थाचीं पत्रें येथील कलेक्टराकडून गेलीं आहेत असें समजलें. प्रो. दावर बोलले नाहींत, पण डॉ. नानावटी मात्र बोलले. महात्मा गांधींनीं ज्या मुख्य गोष्टी सांगितल्या त्या येणेंप्रमाणें—(१) डॉ. बेझंट या उत्तम वक्त्या आहेत. कारण जी गोष्ट कळकळीनें त्यांना वाटते व त्या स्वतः आचरतात तीच त्या बोलतात. उत्तम वक्ता होण्यास शाळा नाहींत. (२) दीर्घायुषी व्हावें अशी प्रत्येकाची इच्छा असते. पण त्यासाठीं पाळावे लागणारे नियम कोणी पाळीत नाहींत ते त्या पाळतात. (३) दृढताद्दढतेची संवय लहानसहान गोष्टीपासून नसेल तर प्रसंगविशेषीं दृढता शक्य नाहीं. तेव्हां प्रत्येक बाबतींत त्याचें अनुकरण झालें पाहिजे. (४) साधेपणा (५) आत्म्याचे अमरत्वावर विश्वास असल्यामुळें इतकें वय झालें असतांहि आतां अमुक गोष्ट मी कशी करूं असें त्यांना वाटत नाहीं. त्याचप्रमाणें केव्हांहि मरण आलें तरी त्यासाठीं तयारी.

या रीतीनें अनुकरणीय गुणवर्णन झाल्यावर त्यांची मोठी कामगिरी म्हणजे धर्म व राजकारण यांचा पूल बांधला ही होय. धर्माचा पाया नाहीं असें राजकारण टिकणेंच नाहीं.

शेवटीं या गुणाचें आपण जितकें अनुकरण करूं तितकी आपण आजचे सभेपासून फलप्राप्ति केली. उगीच ऐकावयास येण्यापासून कांहींएक फायदा नाहीं.

ता. २–१०–२८

× × कडून उसनवार रकमेचें व्याज वेळेवर न आल्यामुळें करारा-प्रमाणें दागिने मी विकून टाकीन अशा अर्थाचा निरोप पाठविला होता. वर्षाअखेर एकदम पैसे देईन असा उत्तरीं निरोप आला. माझा त्यावर

विश्वास नाहीं व कराराप्रमाणें चाललेंच पाहिजे असें कळविलें आहे. आपापसांत मदत म्हणून जेथें जेथें आजपावेतों उसनवार पैसे दिले आहेत तेथें तेथें हाच अनुभव. सचोटी नाहीं इतकेंच नव्हे तर पैसे मागितल्याबद्दलहि राग. बाहेरच्या माणसाकडून जबर व्याजानें पैसे आणून त्यानें घरदार विकलें तरी चालतें पण आपल्या माणसानें कमी व्याजानें दिलेले पैसे आपण होऊन परत करावयाचे तर नाहींतच पण मागितल्यास रोष. आपसांत पैशाचा व्यवहार नसणें हाच उत्तम मार्ग.

डि. जज मि.....यांजला मी अजून भेटलों नाहीं याबद्दल त्यांना आश्चर्य वाटलें आहे. मुद्दाम नच भेटावें असें नाहीं. पण पूर्वीची ओळख नाहीं व अधिकारी वर्गांतील मंडळीपैकीं कित्येकांस आवडतें व कित्येकांस आवडत नाहीं असा प्रकार–शिवाय कित्येक जणांस खुशामत या स्वरूपानें ही गोष्ट दिसते व आवडते; यामुळें कोठेंहि न जाण्याचा माझा नियम असतो–त्यास अनुसरूनच आजपावेतों गेलों नाहीं. एकादें काम चालवून ओळख झाल्यावर जाणारच होतों. असो.

आज सकाळीं अरुण मिल्सचे स्टेट्युटरी सभेस गेलों होतों. तेथें शेठ नरोत्तमभाईंनीं मजूर संघाचे चालकांची हकीकत सांगितली. येन केन प्रकारेण मजूर संघाचें संख्याबल वाढवावें असें काम होत आहे. मिल मालकांचे सद्हेतूंचा विपर्यास करून–त्यांचें भेसूर चित्र काढून–मजुरांस बहकविणें ही सेवा नसून उलट हानि आहे. अशानें पुढेंमागें फार भयंकर परिणाम होण्याचाहि संभव आहे. अज्ञ जनता एकादे वेळीं मिल-एजंटाचे खुनापावेतोंहि जाईल. सत्य व अहिंसा या तत्त्वांचा तर अभावच स्पष्ट आहे. मजूर वर्गाची शिस्त बिघडेल. कामांत भलतेच अडथळे यावे अशा प्रकारचें धोरण चालूं ठेवणें मला तर इष्ट वाटत नाहीं.

ता. ५–१०–२८

आजहि पुष्कळ वेळ शेठ नरोत्तमभाईंबरोबर मजूर संघाचे धोरणाविषयींचे चर्चेंत गेला. मला वाटतें मजुरांची उन्नति हें ध्येय मिल मालकांनीं कायम ठेवून अंतर्व्यवस्थेंत मजूर संघाचे लोकांस हात घालूं देऊं

नये. मुख्य कारण हेंच कीं मजूर संघाचीं चालक माणसें सगळींच जशीं पाहिजेत तशीं नाहींत. विशाल दृष्टिबिंदु, जबाबदारीची जाणीव, मालकांचे स्थितिविषयीं सहानुभूतिपूर्वक व सरळपणें विचार करण्याची ताकद वगैरे गुणांचा अभाव आहे.

उद्यां सायंकाळीं प्रो. सप्रे यांचे भद्रेंत तरुण भारत मंडळातर्फे व्याख्यान ठेवलें आहे त्यासाठीं प्रो. .....हे नियोजित अध्यक्ष असलेमुळें त्यांजला भेटावयास ते आले होते. कॉलेजांतील प्रोफेसरांनीं कोणतेहि व्याख्यानास हजर राहाणें वगैरेची जबाबदारी त्यांचेवर आहे असें प्रिन्सिपाल साहेबांनीं सांगितल्यामुळें ते येण्यास कचरत होते. गुदस्तापावेतों कोणीहि प्रिन्सिपालास विचारण्यास जात नव्हतें व व्याख्यानास जात होते. गेल्या सालीं कोणी तरी विचारण्यास गेलें. तेव्हांपासून ही अडचण उभी झाली. स्वतः जाणून-बुजून स्वतंत्रता कमी करून घेणारे शिष्ट शिक्षक होण्यास कितीसे लायक आहेत? सर्वांनीं मिळून विचारावयास न जातां व्याख्यानास हजर राहाण्याचा परिपाठ पाडतां, येणें शक्य नाहीं काय? पण एवढें धैर्य कोठचें? धैर्य नसणें हा गुन्हा नाहीं. जित देशांत भीरुतेचेंच वातावरण असावयाचें. पण अशा लोकांस शिक्षक म्हणून ठेवून शेळपट नागरिक तयार करण्याचें काम यांना सोंपविण्यांत काय तात्पर्य?

ता. ७–१०–२८

आज सकाळीं रा. वल्लभभाईंकडे गेलों होतों. पुढील गोष्टींविषयीं बोलणें झालें:—(१) म्युनिसिपालिटींत पुढें काय धोरण ठेवावें?–राहावें कीं राजीनामा द्यावा व राहिल्यास कसें चालवें? (२) हिंदु मुसलमान तेढी-विषयीं रा. चुंदडीगर वकिलांचे सूचनेप्रमाणें अफवा पसरूं नयेत म्हणून हस्तपत्रक काढावें कीं काय? (३) इंपीरियल बँकेच्या नोकरांच्या संघाविषयीं वगैरे. म्युनिसिपल बाबतीविषयीं ८–१० जणांनीं रा. .....यांचेकडे रात्रौ जमावें असें ठरलें. हिंदु मुसलमान तेढीविषयीं संयुक्त हस्तपत्रक काढण्या-मुळें मुसलमान पुढारी, जे आंतून अशा दंग्यास चिथावणी देत असतात, ते आपला बचाव तयार करण्यासाठीं पुरावा उभा करतात एवढेंच;

त्यापासून त्यांना कायद्याच्या पकडींतून रक्षण मिळतें, पण दंगे ते थांबवीत नाहींत. तेव्हां अशा रीतीनें संयुक्त पत्रक काढण्यांत काय अर्थ? मलाहि तें पटलें. इंपीरियल बँकेच्या नोकरांविषयीं मागाहून विचार करण्याचें ठरलें.

हल्लीं जी मंडळी धांगडधिंगा घालीत आहेत ती मंडळी जोपावेतों आमची शुद्ध बुद्धि व प्रामाणिकपणाहि कबूल करीत नाहींत तोंपावेतों म्युनिसिपालिटींत कोणतेहि ठरावावर विरुद्ध बोलणें म्हणजे "आमचे विरुद्ध तुम्ही आहांत तेव्हां कामांत विघ्नें आणण्यासाठीं बोलतां" वगैरे म्हणावयाचेच व लोकांसहि सांगावयाचें कीं आम्हांस हे लोक काम कोठें करूं देतात? आमच्या विरोधावरच त्यांचें जीवन चाललें आहे. तेव्हां जर राहावयाचें तर मुळींच बोलावयाचें नाहीं. ज्या महत्त्वाचे बाबतींत बोलावयाचें त्यांत कोणीं तरी एकानें संयम ठेवून बोलावयाचें व एकंदर कारभार चालवितां येण्यास समोरच्या पक्षास पूर्ण मोकळीक द्यावयाची. काम उत्तम झालें तर इष्टच आहे न झालें तर लोकांसहि त्यांचे निर्भेळ कारभाराचा मासला समजेलच. रा. वल्लभभाईंची विचारसरणीहि माझेप्रमाणेंच जमली. तेव्हां वरील धोरणावर चालावयाचें असें सर्वांनीं ठरविलें. पुढारी श्री. वल्लभभाई–त्यांचे गैर हजेरींत सध्यां माझेवर बोजा टाकला आहे. मी रा. .....यांचें नांव म्हणत होतों. पण त्यांचेविषयीं शेठ ..... वगैरेंचे प्रतिकूल ग्रह असल्यामुळें माझेवरच हा बोजा आला. कसा काय पार पडतो तो पाहावा.

ता. ८–१०–२८

इंपीरियल बँकेच्या मंडळींच्या संघाविषयीं रा. वल्लभभाईंस विचारलें. त्यांच्या मतें संघ करूं नये. जेथें कामाच्या गाड्यांत खीळ घालून तो अडविणें शक्य नाहीं तेथें संघ करण्यांत कांहीं मंडळी विनाकारण "तक्षकाय स्वाहा" होतात. सर्वांनीं जरी त्या नोकऱ्या सोडल्या तरी जोंपावेतों त्या जागा भरण्यास इतर माणसें मिळूं शकतात व येण्यास तयार आहेत तोंपावेतों संघ करण्यापासून काय फायदा? सल्ला देणाराची जबाबदारी मात्र वाढते.

ता. १०–१०–२८

तिसऱ्या प्रहरीं आश्रमांत महात्माजींस भेटावयास गेलों होतों. आज त्यांचा जन्मदिवस होता व इतरहि गोष्टी बोलावयाच्या होत्या. त्यांपैकीं एक म्हणजे हिंदुमहासभेची बैठक येत्या हिंवाळ्यांत येथें भरविण्याविषयीं रा. जयकर यांचें मला पत्र आलें आहे. माझ्या मतें गुजराथेंत यासमयीं अशा तऱ्हेची चळवळ ठीक होणार नाहीं. हिंदुमहासभेनें हिंदु रचनात्मक संघटन करण्याची विशेष जरूर आहे. शारीरिक शिक्षण व अस्पृश्यता-निवारण या दोन गोष्टींची जरूर आहे. अर्थात् त्यासहि सभा-परिषदा वगैरेची जरूर आहे. पण सध्यांच त्यास वातावरण ठीक नाहीं. दंग्याचे समयीं सभेच्या हांकेस लोक जास्त ऐकतील हें खरें पण त्याचा तात्कालिक परिणाम दंग्यांतच होणार असें दिसतें. येथील परिस्थितीहि विशेष आहे. येथें हजारो मुसलमान जवळ जवळ हिंदूच आहेत. चढाईच्या चळवळीनें ते पक्के मुसलमान बनण्याचा संभव आहे. सध्यां येथें बैठक नसावी असेंच महात्माजींचेंहि मत आहे. दुसरी गोष्ट मजूर-महाजन व अशोक मिल्स यांचेमध्यें जो परस्पर झगडा चाललेला आहे त्याविषयीं; माझी स्वतःची स्थिति व माझे दृष्टीनें एकंदर परिस्थिति काय वाटतें ती सांगितली. महात्माजी, गुलझारीलाल* व मी यांनीं भेटावें असें ठरविलें आहे.

ता. १४–१०–२८

अशोक मिलचे मजूर महाजनच्या तंट्याच्या वाघतींत रा. गुलझारीलाल नंदा व खंडूभाई देसाई (मजूरमहाजनांचे चिटणीस वगैरे) यांचेसमवेत सत्याग्रहाश्रमांत महात्मा गांधींस भेटावयास गेलों होतों. श्री. वल्लभभाई पटेलहि तेथें आले होते. आम्ही महात्माजींशीं बोललों—(१) मिल मालकांविषयीं रा. गुलझारीलाल यांनीं फारच पूर्वग्रह करून घेतले आहेत; (२) त्यांची बोलण्याची रीत उपमर्दकारक होते. (३) मजुरांसमोर भाषणें करतांना मजूर मंडळाचे प्रतिनिधी स्वैर भाषा वापरतात; जर या

* हल्लीं हे पंचवार्षिक योजना समितीचे अध्यक्ष आहेत.

बाबतींत काळजीपूर्वक काम झालें तर परस्पर घर्षण कमी होईल. शेठ..... यांची इच्छा " मजूर महाजन " होऊं देण्याची नाहीं असें श्री. गुलझारी-लालांचें म्हणणें. शेवटीं महात्माजींनीं सांगितल्याप्रमाणें (१) मजूर ऑफिसचे सांगण्यावरून मिलचे कामदारांवरील केलेली फौजदारी फिर्याद उद्यां बिनशर्त परत घ्यावी, (२) रा. गुलझारीलाल यांनीं माझेकडे येऊन हकीगत सांगावी व अडचणी वाटल्या तर मला कळवावें, (३) शेठ..... विलायतेहून येईपावेतों शेवटच्या निकालाविषयीं खट पहावी, याप्रमाणें ठरलें.

आश्रमांतून श्री. वल्लभभाई, मणीलाल व मी बरोबर परत आलों. मजूर ऑफिसची मंडळी महात्माजींपुढें कशी नरम भाषा बोलतात व बाहेर कसे गरम असतात तें पहाण्यासारखें आहे. महात्माजींनाहि यांनीं कांहीं कमी त्रास दिला नाहीं. संकट निवारण कमिटी, म्युनिसिपाल्टिटी, प्रांतिक समिति यांचे व्यवहाराचे पुष्कळ बाबतींत महात्माजींकडे तक्रारी नेऊन वाटेल तें करण्यास मजूर ऑफिसनें कमी केलें नाहीं. पण त्यांचे बाबतीविषयीं रा. वल्लभभाई नेहेमीं चुप राहातात. ती मंडळी वल्लभभाईवर नेहेमीं व्यक्तिविषयक आरोप करतात तेव्हां महात्माजींस क्षुल्लक बाबतींत कोठें क्लेश द्या या समजुतीनें वल्लभभाई मोठें मन करून गय खातात त्याचा परिणाम ही मंडळी फार शेफारतात असा होतो.

ता. १५–१०–२८

भाऊबीजेसाठीं आनंद मुक्कामीं गेलों. रात्रौ ओवाळणींत मोत्याचीं कुडीं (किंमत अदमासें ३२५ रु.) दिलीं. मीं लंडनहून आणलेलें सोन्याचें घड्याळ चि. सौ. शांताबाईनें मला दिलें.

ता. १७–१०–२८

दुपारीं शेठ.....भेटले होते. मजूर महाजनचे माणसांविषयीं तक्रारी होत्या. सायंकाळीं म्यु.त गुलझारीलालहि मिलचे माणसांविषयीं तक्रार करीत होते. यांत शेवटपावेतों कशी तड लागते कोणास ठाऊक !

ता. १८-१०-२८

दुपारीं मजूर ऑफिसचे रा. गुलझारीलाल नंदा भेटले होते. अशोक मिलचे बाबतींत मजुरांच्या तंट्याचा निवाडा ते माझेवर सोपविणेस तयार आहेत. माझी परिस्थिति व मनोदशा मीं त्यांस सांगितली.—(१) मिल-विषयीं ममत्व (२) वकीलीमुळें कायद्यालाच धरून होणारा निर्णय ('लीगल कन्व्हिक्शन') आणि नीतिनियमांना धरून होणारा निर्णय (मॉरेल कन्व्हिक्शन) यांतील भेदभाव ठेवण्याची प्रवृत्ति (३) मिलचे अंतर्व्यवस्थेंत मिल-अधिकाऱ्यांची काय मनोदशा असते त्याचे ज्ञानाचा अभाव, वगैरे गोष्टींमुळें रा. गुलझारीलाल यांस माझे निकालानें संतोष मिळणें शक्य नाहीं असेंहि सूचन मीं केलें.

बोलतां बोलतां त्यांनीं नुकतीच जी फौजदारी फिर्याद (मजूरानें केलेली) केली होती ती कांहीं अंशीं अतिशयोक्तीची व कित्येक बाबतींत अगदीं खोटी होती असें माझें मत मीं दर्शविलें. माझें मत बरोबर असल्याचें त्यांनींहि प्रांजळपणें कबूल केलें. पण या प्रकाराची जबाबदारी आपल्या वकीलावर त्यांनीं ढकलली. मला वाटतें अशी ढकलाढकल करून चालणार नाहीं. महात्माजींस जर ही गोष्ट समजली तर काय वाटेल बरें! येन केन प्रकारेण ही चळवळ चालवावयाची असेल तर महात्माजी मध्यें पडतील असें वाटत नाहीं.

ता. १९-१०-२८

सकाळीं सर मोरोपंत जोशी माझेकडे भेटण्यास आले होते. औपचारिक बोलणें झालें. नंतर नेहरू कमिटीच्या रिपोर्टामुळें देशांत एकवाक्यता तरी झाली असा संतोष त्यांनीं प्रदर्शित केला. "सन १९२१ सालीं एक वर्षांत स्वराज्य मिळेल असें गांधींस खरोखरीच वाटत होतें काय?" असा मला त्यांनीं प्रश्न केला. उत्तर देणें कठीण होतें. मी महात्माजींचे अगदीं जवळ खरा, पण त्यांची अंतस्थ मनोदशा उत्तम पाहातां येईल इतका जवळ नाहीं. परंतु ज्या अटी महात्म्यांनीं ठेविल्या होत्या त्यावरून एक वर्षांत जवळ-जवळ पुष्कळ मिळवूं शकूं अशी त्यांना उमेद जरूर होती. "स्वराज्य?"

शब्दाची काय व्याख्या करतों त्यावर अवलंबून आहे. लोकांच्या मनोवृत्तींत पालट यालाच जर स्वराज्य म्हटलें तर तें जरूर मिळेल असें त्यांस वाटत होतें व त्यांनीं मिळविलेंहि. पण एका वर्षांत त्यांनीं युद्धाची भूमिका खरोखरच उत्तम केली. महात्माजींनीं व्हॉइसरॉयबरोबर कॉन्फरसला जाण्यास रा. जमनादास द्वारकादास वगैरे मंडळींनीं आग्रह केला. त्यावेळीं नाहीं म्हटलें होतें. व त्याचें कारण सरकारास निर्वाणीचा संदेश देण्याइतकी आपली शक्ति नाहीं असें त्यांचें मत होतें. यावरून 'स्वराज्य' म्हणजे इंग्रजांचे हातची सत्ता घेणें ही गोष्ट त्यांनीं साध्य केली नव्हती व त्यांचे दृष्टीनेंहि ती साध्य होण्याइतकी शक्ति आली नव्हती हें उघड होतें. असो. नंतर गुजराथ विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांस 'Career (भवितव्य) काय' असा प्रश्न होता. तेथें तर दृष्टिबिंदूच वेगळा. समाजासाठीं–देशासाठीं–स्वात्मार्पण हीच Career (उज्ज्वल भवितव्य) दुसरी काय असणार ?

ता. २३–१०–२८

सायंकाळीं सर्व महाराष्ट्रीय मंडळी सीमोल्लंघनासाठीं कांकरिया तलावाकडे सालाबादचे रिवाजाप्रमाणें गेली होती. या वर्षीं प्रो. धर्मानंद कोसंबी हे मुख्य वक्ते होते. तरुण मंडळींनीं शारीरिक खेळहि ठेवले होते. ते देशी होते हा त्यांतील विशेष. मला हा फरक फारच चांगला व जास्त महत्त्वाचा वाटला. प्रो. धर्मानंद यांनीं जे चार शब्द सांगितले तेहि मोठे मौल्यवान होते. बुद्ध–वाङ्मयांतील एक श्लोक घेऊन खरें धन कशांत आहे तें त्यांनीं सांगितलें. सोन्यारुप्याचें धन हें खरें धन नसून त्यांनीं सात गुण सांगितले तें खरें धन होय– (१) श्रद्धा–आत्मविश्वास, (२) शील (३) ह्री (४) त्याग (५) ज्ञान व आणखी दोन गुण. प्रोफेसर मजकुरांचे विचारांशीं माझ्या विचारांचें साम्य पाहून मला माझ्या विचारांविषयीं जास्त श्रद्धा व विश्वास वाटला.

रात्रौ घरीं येऊन सर्व वडील मंडळीस सोनें देऊन व नमस्कार करून आलों.

ता. २४–१०–२८

दुपारीं शेठ.....भेटले होते. म्युनिसिपल कामाचे बाबतीविषयीं बोलणें झालें. म्यु. चीफ ऑफिसरवर आमचा विश्वास नसल्यामुळें जोंपावेतों या माणसाचे हातीं सूत्रधारित्व आहे तोंपावेतों चांगले अधिकारी मिळणें शक्य नाहीं असें आमचें मत असल्याचें सांगितलें. शिवाय जोंपावेतों आमचे सद्हेतूविषयीं शेठ..... व इतर मंडळीस शंका आहे तोंपावेतों आम्ही कांहींहि बोललों तरी त्यांत उलटच अर्थ घेणार तेव्हां कांहींहि न बोलतां योग्य दिसेल त्यावर मत द्यावयाचें व नाहीं तर स्वस्थ बसावयाचें असेंच धोरण सध्यां तरी पत्करल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें सांगितलें.

ता. २५–१०–२८

सायंकाळीं मुलांचे खेळाचीं विलायतचीं पार्सलें दोन आलीं. तीं खोकीं उघडून खेळ बाहेर काढण्यांतच वेळ गेला. मुलांची तरी कोण गर्दी व घाई. सर्व वेळ सारखी गडबड करीत होतीं आणि आम्ही ओरडतच होतों. त्यांची उत्सुकता स्वाभाविक व योग्यच होती. सर्व सामान एकंदरीनें नीट आलें.

ता. २६–१०–२८

सामुदायिक प्रार्थना म्हणतांना लांब सूर–आलाप वैगेरे घेणें हा मला तर मूर्खपणा वाटतो. सर्वांस म्हणतां येण्यासारखी सोपी ठेकेदार चाल असली म्हणजे झालें. आलाप वैगेरे घेण्यांत मला वाटतें स्वतःचे संगीत–ज्ञानाच्या प्रदर्शनाची किंचितशी झांक असावी.

परवां चंद्रिकोत्सवांत 'त्राटिका' नाटकाचा प्रयोग मंडळी करणार आहेत. त्याची रंगीत तालीम होती. रात्रौ तालीम संपल्यावर मंडळी घरोघर जातांना अतिशय आरडाओरड, गडबड करीत होती. इतरांस आपण त्रास देत असूं ही भावनाच डोक्यांत शिरत नव्हती. सामाजिक दृष्टिबिंदूचा अभाव, दुसरें काय ?

ता. ३१-१०-२८

रा. गुल्झारीलाल नंदा यांनीं अशोक मिलच्चे मजुरांविषयींचे बाबतींत आठवण दिली. खरोखर मी काय करूं हेंच समजत नाहीं. इतकीं कामें चाकी आहेत कीं त्या सर्वांस पुरेसा वेळ कधीं होईल का ? पुष्कळसा वेळ फुकट जातो. परंतु त्याला माझा इलाजच नाहीं. दुसऱ्यांचे हातची गोष्ट तेथें निरुपाय. तरी पण हें काम शक्य तितक्या लौकर उरकण्याची व्यवस्था करणार आहे.

ता. ५-११-२८

डॉ. नरहर गोपाळ सरदेसाई (पुणें) द्वारकेस जात असतां वाटेंत उतरणार म्हणून पत्र आल्यमुळें सकाळीं त्यांस भेटण्यासाठीं गेलों होतों. सुदैवानें अगर दुर्दैवानें आजच कामांची विशेष गर्दी; त्यामुळें त्यांचेशीं बसून बोलण्यास स्वस्थपणें वेळच झाला नाहीं. तरी पण दुपारीं वेळांत वेळ काढून मावळंग्याचें येत्या नृसिंह जयंतीचें संमेलन व कुटुंबाचे इतिहासाचा दुसरा भाग यांविषयीं वाटाघाट करून प्रसिद्धीपत्र नक्की केलें. आतां तें कामशेत (रा. बा. गोविंद सखाराम ऊर्फ नानासाहेब सरदेसाई) व कोल्हापूर (श्री. गोविंद सखाराम ऊर्फ दादासाहेब सरदेसाई) मुक्कामीं पाठवून शेवटचें नक्की करावयाचें. प्रसिद्धीपत्र एव्हांपासूनच केलें म्हणजे पुढील उद्देश नेहमीं मंडळीचे डोळ्यापुढें उभा राहून कार्यास जास्त रंगरूप येईल अशी अपेक्षा आहे.

तिसरे प्रहरीं अशोक मिलमध्यें गेलों होतों. मजुर महाजनांचे तक्रारी-बाबतींत तपास सुरू केला. ५।७ बैठकी कराव्या लागतील असें वाटतें. आज मिलची आंतली स्थिति, कारागिरांची गैरहजेरी वगैरे पाहून एकास कांहीं प्रश्न विचारून विचारपूस केली. सवडीप्रमाणें या आठवड्यांत जितकें जाणें शक्य तितकें जाऊन तपास करणें आहे. रा. नंदा यांनीं विचारलें. मी आज गेलों होतों म्हणून सांगणें ठीक झालें. नाहीं तर माझ्या सद्हेतू-विषयीं त्यांस शंकाच आली असती. रात्र थोडी आणि सोंगें फार अशी त्रेधा आहे !

ता. ६–११–२८

काल रात्रौ मुंबईचे रा. ×× बॅरिस्टर आले. पाहुणेमंडळीविषयीं लिहिणें कदाचित् गैर वाटेल. पण स्वतःचे रोजनिशींत काय हरकत ? गृहस्थ रात्रौ आले. आमचीं सर्वांचीं जेवणेंखाणें आटोपून द्रौपदीची परात पालथी घातलेली. आधीं सूचना वगैरेचें नांव नाहीं. आमचेकडून सर्व व्यवस्था केली. पण पाहुण्यांचे दृष्टीनें जेथें आपण जातों तेथें मंडळीस कमींतकमी त्रास व्हावा अशी व्यवस्था ठेवण्याची भावना नसावी काय? पण हा प्रकार मुद्दाम होत नसून व्यवस्थितपणाच्या सर्वसामान्य अभावाचेंच हें एक उदाहरण. जेथें व्यक्तिशः व्यवस्थितपणा नाहीं तेथें सामाजिक व्यवस्था कशी येणार? या दृष्टीनें मला तर अशा प्रकारांची दिवसेंदिवस जास्तच निराशा वाटत आहे. शिक्षणाची आवश्यकता फार आहे. पुस्तकी नव्हे तर व्यवहार व शिस्त.

ता. १०–११–२८

प्रायश्चित्ताचे बाबतींत वे. मू. गोविंदभटजी विनाकारण चिकटपणा करीत आहेत. देशकालपरिस्थिति पाहून त्यांनीं थोडक्यांत तांत्रिक आटोपतें घेतलें पाहिजे असा ती. मा. बाईंनीं सकाळीं अभिप्राय दर्शविला. मी विशेष कांहीं बोललों नाहीं. ऐकून घेतलें.

ता. ११–११–२८

सकाळीं युवक संघाची मंडळी गुजरात कॉलेजचे प्रिन्सिपाल फिंडले शिरास यांनीं काढलेल्या हुकुमाचे बाबतींत उद्यां भरणाऱ्या सभेविषयीं मला भेटावयास आली होती. ता. १२ आक्टोबर रोजीं सायमन कमिशन मुंबईस उतरलें. त्या दिवशीं प्रीवियस व ज्यू. बी. ए. च्या परीक्षा होत्या. सुमारें १६५ विद्यार्थी परीक्षेस बसले नाहींत. प्रिन्सिपालसाहेबांनीं त्यांचे पालकांस पत्रें लिहून कळविलें कीं "तुमचा मुलगा कॉलेजची शिस्त पाळण्यास बांधला आहे. तो १२ ता. स गैरहजर राहिला, हें आपणांस माहीत

आहे कीं नाहीं? नसल्यास कां गैरहजर राहिला तें कळवावें. त्याची पुनः परीक्षा घेऊं व ३ रुपये दंड त्यानें द्यावा," वगैरे. गुजरात कॉलेजच्या प्रिन्सिपालचे या कृत्याबद्दल निषेध प्रदर्शित करण्यासाठीं सभा आहे. दंड घेऊं नये व दंड देण्याचा हुकूम रद्द होईपावेतों कॉलेजची फी देऊं नये आणि कॉलेजांत जाऊं नये असा ठराव विद्यार्थ्यांनीं दाखविला. मला तें बरोबर वाटलें नाहीं. दंड देऊं नये हें बरोबर आहे. पण कॉलेजांत येण्यास मज्जाव करण्याचा बोजा प्रिन्सिपालचे अंगावर टाकणेंऐवजीं आपण होऊन फी न देतां आपण आपले स्वतःवर कां ओढून घ्यावा? यामुळें मीं ठराव बदलून विचारासाठीं दिला. प्रिन्सिपालचें कृत्य म्हणजे पालकांचे हक्कावर गदा आहे व राजकीय आहे अशा अर्थाचाहि त्यांत मीं समावेश करून दिला. तो विद्यार्थ्यांनीं मान्य केला असें सायंकाळीं त्यांनीं मला कळविलें.

सायंकाळीं तिसरे प्रहरीं अशोक मिलमध्यें गेलों होतों. सायंकाळीं ६। वाजतां परत आलों. तपासाचे परिणामीं दाराशा स्पिनिंग मास्तर यांचेवरील फिर्याद खोटीच असल्याचें वाटलें.

रात्रौ रा. बँकर यांचेकडे गेलों होतों. तेथें मुंबईच्या कॉलेजांतील एक युरोपियन प्रोफेसर भेटले. गुजरात कॉलेजचे प्रिन्सिपालविषयीं गोष्ट निघाली. युवक संघाची मंडळी तेथेंहि भेटली. सदर युरोपियन प्रोफेसर व रा. बँकर यांनीं माझे मतास पुष्टि दिली, व शिवाय श्री. शिरास यांस भेटून कांहीं तडजोड निघाल्यास पहावी असेंहि सुचविलें. त्याप्रमाणें उद्यां रा. शिरास यांस भेटावयास जाणार आहे.

ता. १२–११–२८

सुमारें ११।।। वाजतां गुजरात कॉलेजचे प्रिन्सिपाल मि. शिरास यांचेकडे गेलों. त्यांचेशीं सुमारें तासभर त्यांनीं विद्यार्थ्यांचे पालकांस लिहिलेल्या पत्राविषयीं व दंडाविषयीं चर्चा केली. माझा मुख्य मुद्दा हाच होता कीं पालकांच्या हक्कांचें अतिक्रमण प्रिन्सिपाल करीत आहेत. शेवटीं त्यांनीं पुढील गोष्टी मान्य केल्या : (१) स्वतःच्या ठरावाचा फेरविचार करण्याचा आज सायंकाळचे सभेनें विचार केल्यास ते फेरविचार करण्याची शिफारस

सरकारास करतील, व (२) दरम्यान दंड वसुली करणार नाहींत. चर्चा फारच मोकळेपणाची व स्पष्ट झाली. त्यांच्या दंडाचा अर्थ म्हणजे पालकांच्या हक्कावर गदा आहे, विद्यार्थ्यांस शिस्त असावी, प्रत्यक्ष राजकारणांत त्यांनीं भाग घेऊं नये या गोष्टी मान्य केल्या तरी सुद्धां शिस्तीच्या बाबतींत प्रिन्सिपालाचे अधिकाराची मर्यादा कोठपावेतों, पालकांचे हक्क काय, प्रत्यक्ष राजकारण कोणतें वगैरे प्रश्न राहातातच. असे मुद्दे चर्चेंत निघाले.

सायंकाळीं प्रेमाभाई हॉलमध्यें असलेल्या सभेसाठीं जरा लौकरच गेलों. रा. शिरास यांचेबरोबर झालेल्या चर्चेंस अनुसरून ठराव होणें इष्ट असलेमुळें लौकर गेलों. दंडाबद्दलचा ठराव फेरविचारांत घ्यावा अशी प्रिन्सिपालास विनंति होती. दरम्यान विद्यार्थ्यांनीं कॉलेजची फी भरून दाखल व्हावें पण दंड भरूं नये अशी शिफारस होती. ठराव मांडण्याचें काम माझेकडे होतें.

ता. १३–११–२८

सकाळीं रा. शिरास यांस मी खासगी पत्र लिहून सभेचे ठरावाची हकीगत कळविली व आपले आश्वासनावरून ठराव करविला आहे तेव्हां आतां त्याचा अंमल करावा अशी विनंति केली आहे.

ता. १४–११–२८

माझे प्रायश्चित्ताच्या बाबतीचें नक्की होईपावेतों पक्ष करण्याऐवजीं निष्क्रय उदक सोडून ब्राह्मणांस दक्षिणा द्यावी असें ती. मा. बाईंनीं सुचविलें. जे ब्राह्मण प्रायचित्ताचे तपशीलाचा इतका आग्रह धरीत आहेत ते निष्क्रय घेण्यास कबूल होतील असें मला वाटत नव्हतें. तरी पण मी नाहीं म्हटलें नाहीं. शेवटीं माझे अपेक्षेप्रमाणेंच झालें. ब्राह्मणांनीं नाहीं म्हटलें. पण त्यामुळें ती. मा. बाईंची खात्री होऊन त्यांचे मनाचा कांटा माझेकडे जास्त जास्त झुकत चालला आहे एवढा मात्र फारच मोठा फायदा झाला आहे. ब्राह्मण घेणार नसतील तर नको. आपण दुसऱ्या कोणातरी ब्राह्मणांस किंवा धर्मादायांत देऊं असें त्यांनीं सांगितलें. मी तेंहि मान्य करून कांहीं जास्त

पैसे खर्च झाले तरी देऊन येथील रा. सा. महिपतराम अनाथाश्रमाचे मंडळीस एक दिवसाचें भोजन देण्याची सूचना केली. ती. मा. बाईंनीं ती पसंत केली आहे. आतां खर्च काय येतो त्यावर अवलंबून.

दुपारीं भाऊबीजेनिमित्त भोजनास × × कडे गेलों होतों. जेवणाची वेळ बरोबर ११ ची सांगून जेवणास १२। झाले, त्यामुळें परत येण्यासहि ३ वाजले. यामुळें कामाची व विश्रांतीचीहि फार गैरसोय झाली. पण माझ्या गैरसोयीची त्या मंडळीना कल्पनाहि नाहीं. सांगावयास गेलें तर उलट गैरसमज मात्र जास्त करून घ्यावयाची. तरी पण सवडीनें सांगेनच. हेंहि एक प्रचारकार्यच आहे व आक्षेप सहन करणें हा एक अपरिहार्य धर्मच आहे.

ता. १५–११–२८

सायंकाळीं महिपतराम रूपराय अनाथ आश्रमांत एक महाराष्ट्रीय विधवा बाईंस भेटावयास गेलों होतों. गरोदर राहिल्मुळें येथें आली असून बिचारी फारच खिन्न असते असें पंडित मोक्षाकर यांनीं सांगितल्यावरून मुद्दाम गेलों होतों. भेटून सहानुभूति दाखवावी व शक्य ती मदत करावी असा हेतु–आपद्ग्रस्तांस पुष्कळसें समाधान सहानुभूतीनेंच होत असतें; पण फुकटची सहानुभूतिहि दाखविण्याची समाजांत तत्परता नाहीं, मग पैशाची किंवा शरीरकष्टाची गोष्ट तर लांबच–हृदयच नाहींसें होत चाल्लें आहे कीं काय असें वाटूं लागतें व मन जितकें हताश होतें तितकाच त्वेषहि येतो. विधवांची समाजानें किती हीन स्थिति केली आहे ? लहान असो, मोठी असो–एकजात सर्वांस ब्रह्मचर्याचे व्रताची बळजबरीची दीक्षा देणें किती क्रूर व आत्मघातकी आहे ? प्रत्येकास हें समजत नाहीं असें नाहीं. बहिणी, मुली या सर्वांसच आहेत. पण काल्पनिक सामुदायिक भीति–व इतरांचे प्रसंगीं आपलेवर उद्यां तोच प्रसंग हें विसरून कुरघोडी करण्याची संवय. एकाद्या विधवेस पुरुषसंगाची इच्छा होऊन तिनें जर त्याप्रमाणें केलें तर मी त्या गोष्टीस तिचें "वांकडें पाऊल" म्हणावयास तयार नाहीं. पुनर्विवाहाची मोकळीक असून जर तिनें

परपुरुषांशीं व्यवहार ठेवला तर जरूर वांकडें पाऊल. पण जेथें समाज मारून मुटकून संन्यास देतो तेथें संन्याशाचे वाईट वर्तनाबद्दल संन्याशी जबाबदार नसून समाज जबाबदार आहे. अशा स्थितींत समाजाचें पाऊल वांकडें पडत आहे असें मी तर म्हणणार. अनाथाश्रमांतील बाई वैश्य जातीची सुमारे २० वर्षें वयाची आहे. तिला एका लुगड्याची जरूर असल्यामुळें तें पाठविण्याचें कबूल करून तिला भेटून समाधानाच्या चार गोष्टी सांगून परत आलों.

रात्रौ अशोक मिलचे मजूर संघाचे बाबतींत साक्षीपुरावा घेत बसलों होतों. मजूर मंडळी किती खोटें बोलतात! अतिशयोक्ति फारच व विनाकारण करून स्वतःची बाजू लंगडी मात्र करतात.

ता. १६–११–२८

सकाळचें वकिली ऑफिसचें काम आटोपून दि. ब. हरिलाल यांचे बंगल्यावर गेलों व तेथून त्यांच्या मोटारींतून दोन ठिकाणें हिंडलों. वाटेंत म्युनिसिपालिटीबद्दल चर्चा निघाली. म्युनिसिपालिटीचा कारभार सर्व फारच लटपटीचा व गोंधळाचा झाला आहे. रा. ×× हे जोंपावेतों आहेत तोंपावेतों काम होणें शक्यच नाहीं असा माझा अभिप्राय सांगितला. रा. अंबालाल यांनीं सरकारकडे अशी मागणी केल्याचें रावसाहेब म्हणाले कीं कमेटींतून काम करण्यास चांगलीं माणसें हवीं आहेत, तेव्हां मि. ×× चे रिकाम्या जागीं रा. ×× यांची सरकारनें नेमणूक करावी. सरकारनें ती कांहीं कारणास्तव मान्य केली नाहीं यावरून मी रा. सों. स सांगितलें कीं जर सरकारनियुक्त लोकांकडून म्यु. च्या कमिट्या चालावयाच्या असतील तर उत्तम मार्ग म्हणजे म्युनिसिपालिटी काढून एक कमिटी ऑफ मॅनेजमेंट नेमावी. प्रजाकीय सत्तेचा प्राण म्हणजे लोकनियुक्त सभासदांचे हातीं कारभार—हा प्राणच जर घेणें असेल तर कमिटी ऑफ मॅनेजमेंट (व्यवस्थापक समिति) काय वाईट?

ता. १७–११–२८

सायंकाळीं ५–३० वा. गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीचे ऑफिसांत एक लहान व खाजगी सभा कांहीं मित्रमंडळींची भरविली होती.

अमदाबादेस दुसरें एक कॉलेज असावें व तें स्वार्थत्यागाचे पायावर डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे धर्तीवर असावें असें आम्हांपैकीं पुष्कळांस वाटत असल्यामुळें त्या बाबतींत विचार करण्यासाठीं एकत्र जमलों होतों. हल्लींचे शिक्षणक्रमाचे कितीहि दोष असले तरीसुद्धां शिक्षणाचे बाबतींत निराळें राष्ट्रीय वातावरण असणारी संस्था पाहिजे आहे. शिक्षणाचा एकांगीपणा—शिक्षितांचा पंगुपणा—वैगेरे वैगेरे गोष्टी मान्य करूनहि गुजराथेंत स्वार्थत्यागी समाजसेवकांची पैदास होण्यासाठीं व सार्वजनिक कार्याचें केंद्र उत्पन्न होण्यासाठीं अशा संस्थेची जास्त आवश्यकता आहे असें वाटतें. व याच उद्देशानें काय करतां येणें शक्य आहे तें पाहण्यासाठीं एकत्र झालों होतों—सध्यां खाजगी रीतीनें आजीव सेवक गोळा करण्याचा प्रयत्न करून त्याबरोबरच जरूर तेवढे पैसे गोळा करण्याचीहि तजवीज व्हावी यासाठींहि विचार झाला. ४।५ गृहस्थ येण्यासारखे आहेत, त्यांजला कळवावें व आश्रयदाते व इतर सभासद गोळा करण्याची खटपट करून कमींत कमी रु. ५०,००० चीं वचनें मिळवावीं व एवढें कार्य झाल्यावर मग जाहीर रीतीनें योजना पुढें मांडावी असा विचार झाला. आमचीच स्वयंनिर्मित कमिटी केली. आतां या बाबतींत ज्यांना आवड असेल अशा मंडळीपुढें आमचे विचार मांडून सहकार व मदत मिळविण्याचा प्रयत्न करावयाचा.

ता. १९–११–२८

रा. फिंडले शिरास यांनीं बोलाघल्यावरून आज सकाळीं त्यांना भेटावयास गेलों होतों. कॉलेजांतील विद्यार्थ्यांविषयीं एक नोटीस काढण्याचा त्यांचा विचार होता त्याविषयीं बोलाविलें होतें. सुमारें एक तास चर्चा झाली—(१) विद्यार्थी राजकीय सभांस जातात (२) राजकीय चळवळींत प्रामुख्यानें भाग घेतात (३) युवकसंघ राजकीय भानगडींत पडून प्रिन्सिपालचे विरुद्ध विद्यार्थी बंड करतात (४) राजकीय पुढाऱ्यांकडे जाऊन कॉलेजचे बाबतींत चळवळ करतात, वैगेरे त्यांचे मुख्य कटाक्षाचे मुद्दे होते. टर्मिनल परीक्षेला सायमन कमिशनमुळें न बसलेल्या विद्यार्थ्यांस कशी शिक्षा करतां येईल याविषयीं त्यांची मोठी काळजी दिसली. या गोष्टींत जास्त चिघळाचिघळ

करण्यांत तात्पर्य नाहीं. तीन रुपये परीक्षेची फी घेऊं नये व सर्वांस परीक्षेस बसूं द्यावें, राजकीय चळवळींत पडतील त्यांस मुद्दाम शिक्षा दिल्यानें उलट परिणाम होतो. तेव्हां असल्या नैमित्तिक दोषांकडे दुर्लक्षच करावें, वगैरे माझे विचार मीं सांगितले व मोठें पोट आणि उदार मन ठेवून काम करण्यास आग्रहाची विनंति केली. परंतु पालथ्या घड्यावर मी पाणी टाकीत होतों असेंहि वाटत होतें. समंजसपणें ऐकेल असें वाटत नाहीं.

ता. २३–११–२८

आज कार्तिकी एकादशीची रजा होती. सर्व वेळ वकिली कामांतच गेला. धंद्याचें काम शक्य तितकें चोख करण्याचा प्रयत्न हेंच एक प्रकारें ईश्वर–भजन. "स्वे स्वे कर्मण्यभिरतः"

ता. २५–११–२८

आज श्रीकृष्णमंदिरांत गोकुळ अष्टमीनंतरचे जेवणास मला आमंत्रण होतें. गं. भा. रंगूबाईंस सांगितलें कीं मी प्रायश्चित्त घेतलें नसल्यामुळें कदाचित् कांहीं मंडळीस बरें न वाटण्याचा संभव आहे. "अशा मंडळींची मर्जी न मोडणें मला जमणार नाहीं" असें त्यांनीं सांगितलें. सर्वांनीं यावें अशी त्या बाईंनीं इच्छा दर्शविली. मी जाण्याचें कबूल केलें. काल रात्रौ रा. ×× मला येण्याविषयीं मुद्दाम सांगावयास आले होते. प्रायश्चित्ताचे बाबतींत हेकेखोरपणा काढून टाकला पाहिजे व होतां होईतों सरळ मार्ग काढण्याचा पायंडा घातला पाहिजे हा त्यांचा मुद्दा होता. त्याप्रमाणें मी आज गेलों होतों. सर्व मंडळी पंक्तीस होती. कोणीहि कांहींहि अडचण घेतली नाहीं. जसें काय कांहींच झालें नाहीं अशा रीतीनें सर्व प्रकार पार पडला. हें एक मोठेंच पाऊल पुढें पडलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

ता. २७–११–२८

काल रात्रींचे मिल मेळ्यास मी जाऊं शकलों नाहीं. अपिलाचें काम चालवयाचें होतें. त्यासाठीं माझेकडे रा. सुखदेव तिकीट ठेवून गेले; व

तैंहि रु. १० चें. मला खरोखरच या गोष्टीचा रागच आला. ज्या संस्था चांगलें काम करीत आहेत असें वाटतें त्यांस मी आपण होऊन मदत देतों. परंतु हा प्रश्न वेगळा—कोणतेहि संस्थेस नाटक किंवा अशा इतर खेळ करमणुकींनीं पैसे मिळविणें तर नाटकांचीं तिकिटें गळ्यांत बांधूं नये. कारण जी मंडळी नाटकाशिवायहि मदत करतात त्यांचेवर हा बोजा पडतो. त्यामुळें उलट त्यांचे खिशांतून पैसे जास्त जातात व संस्थेस कमी मिळतात. असें दुहेरी नुकसान कां? जे लोक एरव्हीं देत नाहींत त्यांचेकडून या रूपानें अनायासें पैसे मिळविण्यासाठीं हा प्रकार ठीक आहे. माझ्या या विचारामुळें व वेळहि नसल्यामुळें तिकीट प्रांतिक समितीस परत पाठविलें.

सायंकाळीं गुजरात क्लबांत म्युनिसिपल विषयावर वादविवाद निघाला. म्युनिसिपालिटीचा कारभार लोकनियुक्त सभासदांकडून चालवावा हा माझा मुद्दा होता. स्थानिक स्वराज्य याचा अर्थ हाच कीं व्यवहार सर्व लोकमता-प्रमाणें चालवयाचा—लोकमत बरोबर नसेल तर तें तसें करणें हा आपला धर्म आहे. पण तें आपलेकडे न वळवितां आपले मर्जीप्रमाणें कारभार चालविण्यांत तो कारभार जास्त उत्तम चालेल असें जरी असलें तरी त्यांत स्वराज्याचें बीज नाहीं व म्हणून तें इष्ट नाहीं हा मुख्य प्रतिपादित मुद्याचा रोख.

ता. २–१२–२८

गुजरात लॉ सोसायटीच्या सर लल्लुभाई शाहा लॉ कॉलेजांत लेडी रुक्मणी शाहा* यांनीं मरहूम न्या. शाहा यांची तसवीर नजर केली तीं खुली करण्याच्या समारंभासाठीं हायकोर्ट जज्जांस अगर डिस्ट्रिक्ट जज्जांस सांगावें असा प्रथम मॅनेजिंग कमेटींत बूट निघाला होता पण मीं विरोध केला. सरकारी नोकरीच्या कुंपणांतील मनुष्य विद्यार्थ्यांस मोकळेपणाच्या रानांतल्या काय गोष्टी सांगणार? हल्लींच्या तरुण पिढीस मार्गदर्शक व स्वतंत्र बोध देण्यास स्वतंत्र देशभक्त पुरुषच पाहिजे असें मला वाटत होतें. रा. जयकर यांनीं यावें अशी माझी इच्छा होती व त्यांनीं माझे विनंतीस मान दिल्यानें

* कै. लल्लूभाई शाह यांच्या पत्नी.

वर्ग ३ अ. क्र. ७३५२३ वि: मिलची
अनुक्रम २५ २५-२-७१
पृष्ठ १८८ सं. क्र.

ती साध्य झाली. रा. जयकरांचा माझेकडेच उतरण्याचा कार्यक्रम होता, पण रा. फिंडले शिरास साहेबांनीं स्वतःकडे त्यांनीं उतरावें असें आग्रहपूर्वक सांगितल्यामुळें त्यांचा मुक्काम रा. शिरासससाहेबांकडे ठेविला. सकाळीं स्टेशनवरहि शिरासससाहेब आले होते.

युवक संघातर्फे प्रार्थना समाजांत रा. जयकर यांचें व्याख्यान झालें. रा. जयकर यांची मी प्रथम श्रोतृसमाजास ओळख करून दिली, नंतर त्यांचें भाषण झालें. मला तर तें फारच आवडलें. त्यांनीं तरुण मंडळीपुढें दोन मुद्दे ठेवले: विद्यार्थीदशा म्हणजे नागरिकत्वाच्या पूर्वतयारीची व्यवस्था. पूर्वीचे विचाराप्रमाणें या दशेंत दोन गोष्टी शिकावयाच्या—(१) अभ्यास म्हणजे Slow and patient endeavour (मंदगतीनें व चिकाटीनें प्रयत्न), व (२) वैराग्य म्हणजे Regulation of impulses (ऊर्मीवर नियंत्रण). विद्यार्थ्यांनीं शरीरास व मनास तालीम दिली पाहिजे व मनोवृत्ति ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करणें शिकलें पाहिजे. सतत प्रयत्न कीर्तीची अभिलाषा न ठेवतां कार्यावर ममत्व ठेवून केला पाहिजे. अशा तऱ्हेच्या तरुणांची देशाला जरूर आहे. या मुद्द्यांविषयींचें सुश्राव्य भाषण सुमारें पाऊण तास झालें.

युवकसंघातर्फे या खेपेस बोलावयाचें रा. जयकर यांचे मनांत नव्हतें. शिरास व युवकसंघ यांची सध्यां कॉलेजच्या विद्यार्थ्यांबाबत घासाघीस चालू असल्यामुळें व रा. शिरासच्या घरीं ते उतरले असल्यामुळें आणि विद्यार्थ्यांनीं राजकारणाच्या चळवळींत पडूं नये असें त्यांचेंहि मत असल्यामुळें ते भाषण देण्यास नाखूष होते. शिरासचे बंगल्यावरून मोटारीनें येतांना 'वाद-विवादात्मक विषय (राजकीय चळवळींत विद्यार्थ्यांनीं कितपत पडावें) सोडून मी काय बोलूं?' असें ते विचारीत होते. मला उत्तर कांहींच सुचेना. तरी पण रा. जयकर यांचें जें भाषण झालें तें फारच सुंदर झालें.

सायंकाळीं ५॥ वा. लॉ कॉलेजमध्यें सर लल्लुभाई शाहा यांची तसबीर अनावरण करण्याचा समारंभ झाला. समाज चांगला होता.

रा. जयकरांचें सुमारें पाऊण तास सुश्राव्य व्याख्यान झालें. न्यायाधीश व वकील (बॅरिस्टर वगैरे सर्वच त्यांत आले) दोहोंसहि संबोधून भाषण होतें. सत्यान्वेषण हा कोर्टाचा मुख्य हेतु व त्यांत न्यायाधीश व वकील

दोघांचाहि सहकार पाहिजे. वकिलानें कुळाचे दृष्टीनें सत्य जें असेल तें पुढें मांडावयाचें व न्यायाधिशानें निर्विकार सत्य मांडावें. शांतपणा, अभ्यासूपणा पक्षपाताचा अभाव वगैरे सद्गुणांची जरूरी—स्वतंत्रपणा—हे सर्व गुण स्व. लल्लुभाईमध्यें होते. सरकारी नोकरींत देशसेवा होत नाहीं असा भ्रम आहे. हिंदु कायद्याची सुधारणा, समाज सुधारणा वगैरे बाबतींत त्यांनीं फारच मदत केली.

ता. ३–१२–२८

सकाळीं रा. वामनराव आले होते. माझे प्रायश्चित्तासंबंधीं रा. × × भेटूं इच्छितात असें म्हणाले. माझे मातुःश्रींचे मनःस्थितीकडे लक्ष देऊन प्रायश्चित्त घ्यावें असें त्यांचें म्हणणें. माझे मातुःश्रीसाठीं मी वाटेल तें करण्यास खरोखरीच तयार आहे. पण याविषयीं माझे मातुःश्रीस काय वाटतें हें मला जास्त माहीत कीं तिऱ्हाइतांस. मीं अगदीं कडकडीत जुन्या सोंवळेंपणानें प्रायश्चित्त घ्यावें असें ज्यांस वाटतें त्यांनीं खुशाल स्वतःचे नांवानें मला सांगावें. पण माझे मातुःश्रीचे नांवाचा बाऊ मला कां दाखवावा? आपलें म्हणणें दुसऱ्यावर लोटून चर्चा करणें बरोबर नाहीं.

रात्रौ सोमवारमुळें ती. मा. बाईस लौकर भोजन करावयाचें होतें. घरांत स्वयंपाकास बाई नाहीं (यात्रेस गेलेली); गुजराथी ब्राह्मण नाहीं (नोकरी सोडून गेलेला व नवा आलेला नाहीं); सौभाग्यवती अस्पर्श्य, या सर्वांमुळें आज एक अकल्पित योग आला. आपल्या खाण्यापुरता जाडाभरडा स्वयंपाक आला पाहिजे व शिकला पाहिजे त्याशिवाय शिक्षण झालें असें म्हणतां येत नाहीं असें पुष्कळ वर्षांपासून वाटत आहे. दोन दिवस केव्हां तरी स्वयंपाक करून पाहूं असें म्हणतां म्हणतां आज रात्रौ बाजरीच्या दशम्या करण्यास बसलों. थोडा वेळच काम केलें. बरें साधलें. चि. बाळ–बापू वगैरे मुलांस फारच कौतुक व मजा वाटली.

ता. ४–१२–२८

रात्रौ रा. कानेटकरांकडे रा. × × माझे प्रायश्चित्ताचे बाबतींत माझे विचार जाणण्यास आले होते. त्यांचेकडे सध्यां श्री विष्णुयाग चालूं

आहे. मी भोजनास यावें अशी त्यांची फारच इच्छा आहे. पण प्रायश्चित्ताचे प्रश्नाचा निकाल लागल्यौशिवाय तसें करणें त्यांस जड वाटतें. माझे सर्व विचार मीं सांगितले—(१) मानसिक प्रायश्चित्त मुळींच नाहीं. (२) त्यावर म्हणजे नुसत्या बाह्य विधीवर माझा विश्वास नाहीं. (३) परंतु जुन्या व नव्या मंडळींच्या विचारांचा सांधा किंवा मानसिक एकी राहावी म्हणून बाह्य विधीस हरकत नाहीं. (४) विधि अगदीं तांत्रिक असला पाहिजे. एक प्रकारची Legal fiction सारखीच स्थिति आहे.

ता. ५–१२–२८

रा. पोरख यांस (हिरालाल) गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीचे ऑफिसांत भेटलों. कॉलेज स्थापनेविषयीं जास्त चर्चा केली. कॉलेज काढण्याचे आधीं सार्वजनिक कामास तयार अशीं माणसें गोळा करून सेवा समाज काढला पाहिजे असें त्यांचें मत पडलें. याविषयीं मींहि विचार करून सांगेन असें म्हटलें. जनहिताचीं कामें करण्यासाठीं कार्यकर्त्या माणसांची परंपरा कशी कायम राहील हा मुख्य प्रश्न. शाळा व कॉलेजें वगैरे गौण व अनुषंगिक साधनें म्हणून उपयोग. त्या दृष्टीनें Servants of India Society (भारत सेवक समाजा)चे धर्तीवर प्रथम कामास सुरुवात झाली पाहिजे. लो. टिळक-आगरकर यांचे कामास कशी सुरुवात झाली? जसजसी जरूर वाटली तसतसा कामाचा व्याप वाढला. त्या धोरणानें पाऊल टाकावें असा विचार. अजून विचारमंथन होऊन काय तें पाहूं.

ता. ६–१२–२८

स्मोक न्युइसन्स कमिटीची सभा आटोपून डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डातर्फे श्री. वल्लभभाई पटेल यांस मानपत्र समर्पण करण्याचा समारंभ होता तेथें गेलों होतों. मी थोडा उशीरां पोंचलों. श्री. वल्लभभाईंचें भाषण चालू होतें. प्रथमचा भाग फारच सुंदर व निर्भीड झाला असें रा. कालीदास यांनीं तेथेंच सांगितलें. शेतकरी वर्गाची स्थिति, सरकारचें जमीन महसूल–वसुलीचें धोरण हे मुख्य मुद्दे होते. जमिनीच्या खंडावर महसूल ठरविणें

अन्याय्य आहे, शेतकऱ्याचे अंगमेहेनतीवर कर घेणें घातकी व अन्यायी आहे, कोणत्याहि देशांत कोठेंहि असा कर नाहीं, न्यायानें जें सरकारास देणें तें जरूर द्यावें पण अन्यायाची एक पैहि सरकार वसूल करूं लागेल तर विरोध करणें धर्म आहे, असें आनुषंगिक मुद्दे होते.

जेवण झाल्यावर रा. वामनरावांकडे गेलों होतों. रा. रामरावहि आले होते. प्रायश्चित्ताची गोष्ट. सुमारे ८५–१०० रु. पावेतों खर्च व होम वगैरे. अर्थात् यांत ज्या सामाजिक दृष्टीनें मी म्हणत होतों ती तर राहातच नाहीं. परंतु ती. मा. बाईंचे मनास मी प्रायश्चित्ताशिवाय राहिलों तर अतिशय क्लेश होणार. कांहींहि झालें तरी तो न होऊं देणें हा पुत्रधर्म, व याच मुख्य विचारानें व रा. रामरावजी आंदि स्वकीय जनांचे आग्रहामुळें व ममत्वामुळेंच देवाणघेवाण प्रकार करावयाचा हें आधींपासून ठरविलें होतें. तरी पण माझी मनोदशा स्पष्टपणें सांगून टाकली आहे. मला मानसिक पश्चात्ताप मुळींच नाहीं–असण्याचें कारण नाहीं. उलट प्रायश्चित्त म्हणजे दंभ आहे, व त्या दृष्टीनें समाजास सत्याचरणाचें वळण देण्याऐवजीं दंभाचें वळण मिळत आहे. तेव्हां माझे दृष्टीनें हा प्रश्न खरोखर प्रायश्चित्ताचा नसून ती. मातुःश्रीसंबंधीं माझा पुत्रधर्म काय आहे एवढीच काय ती विचाराची गोष्ट. माझे मनास जी गोष्ट पटत नाहीं–दंभ व खोटें आचरण करतों असें वाटतें (मानसिक पश्चात्ताप नसतां प्रायश्चित्तविधि म्हणजे केवळ दंभच नाहीं तर काय?)–ती पुत्रधर्म म्हणून कितपत करावी? पण यासहि लांब विचार नको. मातेसाठीं हा त्याग म्हणजे कांहींच नाहीं, व त्याग करणें हाच पुत्रधर्म, ही माझी विचारसरणी. न्या. तेलंग यांनीं ऑपरेशन करविलें असतें तर जगले असते असा वैद्यकीय अभिप्राय असतांहि केवळ पित्याचे आग्रहानें मरण पत्करलें. न्या. रानडे यांनीं द्वितीय विवाहाचे वेळीं लोकांचा शेणमार पत्करला, अशीं उदाहरणें आहेत ना? मग त्या मानानें मी त्याग असा कांहींच करत नाहीं. पण या बाबतींत मला वाटतें कीं माझा विरोध अगदींच वृथा नाहीं. लोकमत माझेकडे सहानुभूतीनें जरूर आहे. प्रायश्चित्ताविषयीं आग्रह करणाऱ्या व तेंहि स्वतः धर्माचरण न करतां धर्मशास्त्राच्या नांवानें

तर्कशास्त्र चालविणाऱ्या लोकांविषयीं समाजांत विरोधच झाला आहे. Line of least resistance (कमींतकमी प्रतिकाराचें धोरण) हा सुधारणेचा एक मार्ग व माझेसारख्या मनोवृत्तीच्या माणसास तोच जास्त पसंत आहे. लोकमत तयार करण्यासाठीं खटपट करावयाची—जितकें पुढें नेतां येईल तितकें न्यावयाचें—व जेथें सांखळी तुटेल असें वाटतें तेथें नमतें घ्यावयाचें हें धोरण, या प्रायश्चित्तांतहि हे मुद्दे कांहीं अंशीं साधलेच आहेत: (१) क्षौर नाहीं, (२) रु. १०० पेक्षां जास्त खर्च नाहीं, (३) संकल्पाशिवाय इतर कामासाठीं हजेरी नाहीं. (४) मानसिक पश्चात्ताप नाहीं, या गोष्टींचें उघड उच्चाटण. असो. उद्यांच हा औपचारिक विधि आटोपून टाकण्याचें ठरविलें आहे.

ता. ७–१२–२८

सकाळीं प्रायश्चित्तविधि झाला. श्रीधरभटजींनीं श्रीशंकराचार्यांस मीं पत्र लिहावें व माझी प्रायश्चित्त घेण्याची इच्छा आहे असें कळवावें असें सुचविलें. मीं माझी नाखुषी दर्शविली, व त्यांनींहि आग्रह केला नाहीं. प्रायश्चित्त संकल्पाचे वेळीं जरासा मतभेद झाला. केलेल्या पापाबद्दल-गेलेल्या किंवा त्रुटित ब्राह्मण्याबद्दल प्रायश्चित्त घेतों असें म्हणणें म्हणजे असत्य. पाप केलें अशी भावना नव्हती. ब्राह्मण्य जें विलायतेस जाण्यापूर्वीं होतें तेंच आतांहि आहे. पूर्वीहि ब्राह्मण्य केवळ जन्मामुळेंच, कर्मामुळें नव्हे. आतांहि तेंच. तेव्हां 'इतर जनांचे दृष्टीनें घडलेलें पाप व त्रुटित ब्राह्मण्य' अशी पुस्ती जोडून मीं संकल्प म्हटला. श्री. श्रीधरभटजींनीं अशी पुस्ती न जोडण्याविषयीं कळकळीनें सांगितलें पण माझा नाइलाज होता. पण त्यांनींहि आग्रह न धरतां कानाडोळा करून चालवून घेतलें. एकंदर खर्च रु. शंभर झाला. गोप्रदानाचे रुपयांपैकीं कांहीं रक्कम वाईस श्रीप्राज्ञ पाठशाळेस पाठवावी असा माझा विचार श्रीधरभटजींस सांगितला, त्यासहि त्यांनीं मान्यता दिली.

सायंकाळीं रेवडी बाजारांत वैद्यसभेतर्फे श्री. वल्लभभाई पटेल यांस मानपत्र होतें. वल्लभभाई सकाळींहि माझेकडे आले होते. तिसरे प्रहरीं मी

त्यांचेकडे गेलों व तेथूनच आम्ही मानपत्रसमारंभास बरोबर गेलों. तेथें श्री. वल्लभभाईंनीं शेतकऱ्यांच्या दीनदशेची हकीकत सांगितली. करांचा बोजा किती आहे व तो कसा वाढविण्यांत येत आहे तें दाखविलें. शेतकरीवर्ग भोळा व उदार आहे. त्यांचीं गाऱ्हाणीं व दुःखें पुढें आणणारा कोणी नसल्यामुळें ते हताश झालेले आहेत. सरकारी अधिकाऱ्यांनीं वाढत्या खर्चाचा पुरवठा करण्यासाठीं वाटेल त्या सबबीवर कर वाढविण्याचा प्रकार सुरू केलेला आहे. उ० विरमगांव शहरांत ब्रोअरिंग करून उत्तम पाणी आहे. शहरांत गिरण्या आहेत या सबबीवर सबंध तालुक्यांत वाढ! प्रत्येक रिपोर्टांत शेतकरी खोटे व सरकारी अंमलदार खरे असा शेरा. आंकडे धडधडीत खोटे व चुकीचे. पण पाहाणारा कोणी नाहीं. गौचर जमिनी नाहींशा केल्या. गवतासाठीं राखून ठेवलेल्या जमिनीवरील गवतहि आणेवारीच्या मोजणींत धरून पिकाची आणेवारी लावावयाची, वगैरे ढोबळ अन्यायाचे प्रकार चालू आहेत. शेतकरी पायमाल होत आहे, इत्यादि मुद्दे होते. हेंहि भाषण सुंदर व निर्भीड होतें.

सायंकाळीं गुजराथ क्लबमध्यें युनिवर्सिटी कमिशनचे सभासद आले होते. बरीच मंडळी आली होती. गुजराथ कॉलेजचे प्रोफेसर आले होते. एक-मेकांची ओळख करणें व औपचारिक कुशल प्रश्नोत्तरें याशिवाय कांहींहि विशेष झालें नाहीं. गुजराथ कॉलेजची प्रोफेसर मंडळी पाहून तर मला फारच वाईट वाटून निराशा वाटली. आम्हांस स्वराज्य हवें तर आम्ही आमची मनोदशा बदलली पाहिजे. आयुष्याचे प्रत्येक बाबतींत, आमचे राहाणी करणींत आपलेपणाची छाप पाहिजे. इतराचें उत्तम घ्यावें हें खरें. पण युरोपियन बाह्य अनुकरणांतच सर्व कांहीं आहे असें नाहीं. आमचा पेहेरवेश नाहीं, आमची भाषा नाहीं, वर्तनांत स्वातंत्र्य नाहीं असें नेभळट गुरु—केवळ स्वतःचे चरितार्थासाठीं नोकरी करणारे—आमचे तरुण पिढीस काय शिक्षण देणार? सर्वजण युरोपियन पेहेरावांत आलेले!! तरुण विद्यार्थ्यास काय हें उदाहरण? मला तर असें वाटलें कीं जर मला आतां शिक्षणमंत्र्याचें स्थान मिळेल तर परदेशी माल—कापड-परदेशी तऱ्हेनें घालून विद्यार्थ्यांपुढें येण्यास धजणाऱ्या प्रत्येकास एकदम बडतर्फीचा हुकूम सोडीन.

तरुण पिढीपुढें आपले आचरणानें असें उदाहरण घालण्याचा व गुरूंचे कोटींत मोडणाऱ्या व्यक्तींस यापेक्षां जास्त शिक्षा दिली नसती तर ती केवळ माझे मनाचे उदारपणामुळेंच. परदेशी पोषाख आवडला तर घालावा पण निदान देशी कापडाचा तरी असावा. व परदेशी पोषाखांतच सभ्यता आहे ही भावना नसावी. असो. ही तक्रार शिळीच आहे.

ता. ९–१२–२८

तरुण भारत मंडळाचे चिटणीसद्वय "सिंहनाद" हस्तलिखित मासिकाच्या छपाईसाठीं वर्गणी मागावयास आले होते. "सिंहनाद" हें हस्तलिखित मासिकांत उच्च असलें तरी छापण्याचे वगैरे पैसे खर्च करणें मला बरोबर वाटत नाहीं. त्यांतील अंतरंग अशा महत्त्वाचें नाहीं कीं ज्याचा प्रसार करणें जरूर आहे. असें सांगून तरुणांनीं नुसतें बोलणें किंवा लिहिणें यांवर भार कमी देऊन कृतीवर जास्त जोर देण्याची आवश्यकता असल्याचेंहि माझें मत मीं त्यांस सांगितलें. त्यांस कितपत रुचलें तें माहीत नाहीं पण निदान विचारांत घेण्यासारखी गोष्ट आहे एवढें तरी त्यांस वाटलें असावें असें दिसलें. त्यांनीं माझेशीं फारच सौजन्याचें व आदराचें धोरण ठेविलें होतें यांत शंका नाहीं.

ता. ११–१२–२८

राजापूर मुक्कामीं शाळेचे संमेलनास जाणेविषयीं विचार करतां करतां जाणें ठरविलें व त्याप्रमाणें राजापुरास तार केली व पत्रहि लिहिलें. त्यांस पत्र लिहीत असतां ती. कै. बाबा नदींत पडलेल्या प्रसंगाची आठवण झाली. त्यांचेसाठीं स्वतःचे प्राण जोखमींत घालणारा हरी वेलीफ याची आठवण झाली. कै. बाबांचें इतकें ताजें स्मरण २४ वर्षांनीं होऊन माझे डोळ्यांतून अश्रू वाहातील ही कल्पनाहि नव्हती. पण पत्र लिहितांना तसें झालें खरें– मनोवृत्ती कोणत्या वेळेस कशा उचंबळतात तें सांगणें कठीण.

ता. १३–१२–२८

दुपारीं चि. बापूनें अतिशय हट्ट व मस्ती केल्यामुळें त्याजवर खूप रागावून त्यास थोडा मार दिला. हा प्रश्न महत्त्वाचा आहे. मुलांस

शारीरिक शिक्षा करणें चुकीचें आहे खास. याविषयीं संदेह नाहीं. पण ती टाळण्यास जी सहनशक्ति व चिकाटी लागते तिचा अभाव. सहनशक्ति आहे असें वाटतें पण चिकाटी नाहीं, धीर नाहीं, इतर व्यवसायामुळें. शिवाय मोठी अडचण म्हणजे वातावरणाची. मी नसतांना इतर मंडळींचें जें दिवसांतून २३॥ तास वातावरण असतें, त्यांस माझा दृष्टिबिंदु किंवा मनोवृत्ति कोठें माहीत आहे, अथवा पटलेली आहे ?

ता. १४-१२-२८

मी विलायतेचा ओव्हरकोट येथें वापरल्यानें इतरांचे मनावर वाईट परिणाम होतो असें मंडळींनीं सांगितलें. अर्थात् माझे दृष्टीनें फक्त घेतलेली जिन्नस उगीच फेकूं नये या एकाच दृष्टीनें वापरीत आहे. विलायतीचा मला मोह मुळींच नाहीं. मंडळींस ही गोष्ट मान्य असूनहि इतरांचेसाठीं तो वापरूं नये असें म्हणणें मलाहि तें बरेच अंशीं खरें वाटतें. मंडळीस माझें सर्व अंतरंग बहिरंग काय माहीत ? तें वर दिसेल त्यावरूनच काय तें ठरविणार ?

ता. १५-१२-२८

रात्रौ प्रो. स्वामीनारायण भेटावयास आले होते. नवीन कॉलेज काढण्या-विषयींची बातमी त्यांनीं ऐकली त्यावरून माझे विचार जाणण्यासाठीं आले होते. कॉलेजचा विचार मनांत येण्यास काय कारणें झालीं त्याची हकीकत व माझी विचारसरणी सांगितली. ती अर्थातच त्यांस पटली नाहीं. गांधीजींनीं अमदाबादेंत किंवा देशांत राजकीय वातावरण नाहींसें केलें असें त्यांचें म्हणणें. शिक्षण-खादी-स्वदेशी-स्वभाषा-अंत्यजोद्धार वगैरे गोष्टी त्यांस केवळ सामाजिक वाटतात-पण जर समाज सुसंघटित नसेल तर शांतिमय किंवा अशांतिमय चळवळ जी जी ज्या ज्या कोणास करणें असेल ती कशी शक्य आहे ? सुसंघटित कार्याशिवाय बारडोली शक्य आहे काय ? नुसत्या सभा, भाषणें व ठराव करून स्वराज्य मिळेल असें वाटतें का ? शेवटच्या प्रश्नास

त्यांचेजवळ उत्तरच नव्हतें. तरी पण राजकीय चळवळ म्हणजे लांब ज़ीभ करून तिखट बोलणें व सभा ठराव वैगेरे बाह्य देखावा करणें अशीच पुष्कळांची समजूत दिसते. आमचे मंडळीस (मी व माझे कांहीं मित्र) ही गोष्ट पटत नाहीं. तेव्हां ज्यास ज्या दिशेनें योग्य वाटेल त्यानें त्या दिशेनें प्रयत्न करावा. परस्पर टीका व विरोध करण्यांत काय तात्पर्य ? देश अफाट आहे. कार्यक्षेत्रहि विशाल आहे. प्रत्येक कार्याची कांहींतरी उपयुक्तताहि आहेच आहे. मग आपसांत वादविवादांत वेळ व शक्ति कां घालवावी ? शेवटच्या युक्तिवादास त्यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं.

ता. १६-१२-२८

आज भद्रेंत नळास पाणी येत नसल्यानें सर्वांची फारच त्रेधा झाली. सर्व घरची लहानथोर मंडळी व विशेषतः बायकामंडळी स्नानास नदीवर लोटली होती. याप्रमाणें सर्वांस सूर्यदर्शन, उघडी हवा, व्यायाम वैगेरे आपोआप मिळालेला पाहून पाणी जर महिनाभर म्युनिसिपालिटी बंद ठेवील तर उपकारच होतील असें वाटलें.

ता. १७-१२-२८

आज सायंकाळीं म्युनिसिपल सभेस गेलों होतों. थोडा वेळ बसलों. भंग्यांचे पगार वाढविण्याची योजना आली होती. पगार वाढवावे असें मलाहि वाटतें. मी सॅनिटरी कमिटीचा पूर्वी अध्यक्ष होतों त्यावेळींहि अशीच सूचना केली होती. परंतु मजूर महाजननें पुढाकार घेऊन दर वाढविण्याची खटपट करण्याचें तत्त्व निदान म्युनिसिपालिटीसारख्या संस्थेविषयीं तरी मला बरोबर वाटलें नाहीं.

ज्या लोकांच्या हातीं सध्यां मजुरांच्या चळवळीचीं सूत्रें आहेत ते खालचे लोक फारच चढेल व अेरावी करणारे व सत्तालोलुप आहेत. अशांचे हातीं हें कोलित दिल्यासारखेंच होणार आहे. बाकी भंग्यांचा पगार वाढविणें योग्य आहे यांत शंका नाहीं. त्यामुळें पगार वाढवावा असेंच मत मीं दिलें असतें पण चर्चा लांबल्यामुळें मी परत लौकर घरीं येण्यास निघालों.

ता. २०-१२-२८

रा. × × सकाळीं भेटले होते. त्यांचे वोलण्यावरून मी चि. भालू यास लिहिलेल्या पत्राचा फारच गैरसमज झाला असें समजलें. त्यांची किंवा × × मंडळींची मानहानि करावी असा माझा मुळींच उद्देश नव्हता. त्यांस मुद्दाम खोंचून किंवा टोमणा मारण्याचे उद्देशानें वोलावें किंवा त्यांची आर्थिक स्थिति वरी नसल्यानें माझा वरचढपणा दाखवावा किंवा तोरा मिळवावा असाहि माझा उद्देश मुळींच नव्हता. माझा उद्देश एकच. तो म्हणजे परस्परांचे व्यवहारांत व विशेषतः आपापसांत पैशाचे देवघेवींत व एकंदर व्यवहारांत पत असणें अवश्य. तरी पण त्यांचे एकंदर सांगणेंवरून माझे कृतीचा व लिहिण्याचा अर्थ दुसरा होऊं शकतो असें दिसलें व त्याबद्दल मला खरोखर पश्चात्ताप वाटत आहे.

तत्त्वाविषयीं मतभेद असतां तर × × मंडळीचा रोष सहन करणें क्रमप्राप्तच होतें. पण तत्त्वाचा विरोध नाहीं. तेव्हां इतर जी छाप गैरसमजामुळें त्यांचेवर पडली त्यास मी कांहीं अंशीं तरी कारणीभूत झालों व त्याबद्दल पश्चात्ताप करणें आवश्यक आणि तो लिहिलेल्या चिठ्ठीचा जो अर्थ चि. भालूनें केला तो माझे मनांतहि नसल्यामुळें व तो अर्थ काढतां येईल असें वातावरण असल्यामुळें अहेतुक पाप झालें त्याचें क्षालन करणें योग्य. त्यासाठीं बिनशर्त माफी मागणारें पत्र पाठविण्याचें ठरविलें. आज कोर्टांत केस चालवितांनासुद्धां मधून मधून हे विचार माझे मनांत येऊन अस्वस्थ होत होतों. मनास शांतता मिळविण्याचा एकच मार्ग कीं जी चूक झाली असें वाटेल ती कबूल करावयाची. ज्यास दुखविलें गेलें त्याचेजवळ कबूल करावयाचें—याप्रमाणें ठरवून सायंकाळीं जाणार होतों. पण वेळ न मिळालेमुळें उद्यां सकाळीं चिटी लिहिण्याचें ठरविलें आहे. रा. × × चें म्हणणें कीं त्यांची–मुलांची–मी माफी मागणें जरूर नाहीं—योग्यहि नाहीं–पण हा प्रश्न मी मुलांचे दृष्टीनें पाहातच नाहीं. माझें चुकीचें प्रायश्चित्त मी करणें व माझे मनाचे शांतीसाठीं झालेली चूक कबूल करणार. शिवाय झालेली चूक कबूल करण्याचे संवयींतच खरोखर आपला उद्धार आहे असें मुलांचें मनावर जर ठसविणें असेल तर तें प्रत्यक्ष उदाहरणानेंच शक्य आहे.

ता. २१–१२–२८

रा. × × यांनीं चि. भालूचें पत्र मला आणून दिलें. त्यांत त्यानें स्वतःचे गैरसमजानें माझे मनास दुःख दिल्याबद्दल दिलगिरी दर्शविली आहे. रा. × × शीं झालेल्या वादविवादानें झालेली ही सफाई आहे. यांत चि. भालूचा थोरपणाच आहे.

आज रात्रौ गुजरात मेलनें राजापुरास शाळेच्या संमेलनासाठीं जावयास निघालों. चि. भालू बरोबर येत आहे. शाळेच्या संमेलनाचा कार्यक्रम आज पत्रानें मिळाला. त्यांत "अध्यक्षां"ची मिरवणूक ठेवली आहे. ही कशाला ? बंद ठेवण्याविषयीं विनंति करणार आहे.

ता. २३–१२–२८

आज सकाळीं ११ वाजतां राजापुरीं पोंचलों. तेथें शाळेचे मास्तर, विद्यार्थी वगैरे मंडळी स्वागतास आली होती. बँड ठेवला होता. हार वगैरे घालून मिरवणूक काढण्याचा विचार कळला. मी तर गांगरूनच गेलों. शेवटीं मंडळीबरोबरच शाळेपावेतों बँडचे वादनासह चालत चालत मिरवणूकवजा गेलों. आज संमेलनाचा कार्यक्रम नव्हता.

ता. २५–१२–२८

आज संमेलनाचा मुख्य दिवस. सकाळीं शाळेंत सर्वांचा फोटो व नमस्कारांचे सामने झाले. नमस्काराचा प्रचार सार्वत्रिक होत आहे ही खरोखर फारच समाधानाची गोष्ट वाटली. फोटोचे वेळीं मला घालणेस हार दिला पण मला तो घालणें ठीक वाटलें नाहीं.

संमेलनाचा कार्यक्रम आटोपण्यास जरा उशीरच झाला. तरी पण श्रीविठ्ठल-मंदिराचे व्यवस्थापकांनीं पानसुपारीस बोलावलें होतें तेथें सर्वजणांसह गेलों.

श्रीविठ्ठलमंदिरीं जातांयेतां मुसलमानांची नवीन उर्दू शाळा दिसली. हिंदुत्वाचे दृष्टीनें वाईट वाटलें. आमचेच भाऊबंद आम्हांपासून प्रथम चुकीनें किंवा जबरीनें दूर गेले व आमचे गाढवपणानें आम्हांस परकी

झाले–विरोधी झाले. त्यांना जवळ करण्याच्या ऐवजीं दूर नेण्याचे प्रयत्न होत आहेत तरी पण आमचे डोळे अजून उघडत नाहींत!

ता. २६–१२–२८

आज देवरुख मुक्कामीं पोंचलों.

रात्रौ श्रीविष्टलमंदिरांत माझ्या युरोपच्या अनुभवाविषयीं भाषण ठेवलें होतें. नवीन मुद्दे हे मांडले: (१) युरोपीय राष्ट्रांना शिव्या देऊन कांहीं आपला उद्धार नाहीं. तर आपले दोष समजून घेऊन ते घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. (२) अशक्तांचें ब्रह्मज्ञान त्याज्य असून सशक्त होऊन क्षमा, शांति वगैरे गुणांचें आचरण करण्यांत जास्त पुरुषार्थ आहे.

ता. २७–१२–२८

दुपारीं देवरुख मुक्कामीं रा. ×× मास्तर व रा. ×× यांना सार्वजनिक पैसे खासगी पेढ्यांतून न ठेवण्याविषयीं व हिशेब चोख असूं देण्याविषयीं मित्रत्वाची सूचना केली. त्यांनींहि मोठ्या प्रेमानें माझें म्हणणें ऐकून घेऊन तशी खबरदारी घेण्याविषयीं तत्पर राहूं असें सांगितलें.

ता. २८–१२–२८

आज सकाळीं ६॥ वाजण्याचे सुमारास राजापूर-देवरुख प्रवास आटोपून मुंबई बंदरावर आलों.

दुपारीं भोजनोत्तर रा. ×× यांची मुलगी रा. ×× यांचे मुलासाठीं पहावयाची होती तिला पाहाण्यास गेलों होतों. मुली पहाणें मला कसेसेंच वाटतें. या चालींत मुलीच्या मनोवृत्तीचा कांहींच विचार केला जात नाहीं. किती तरी जणांनीं पहावी व नाहीं म्हणावें. रोज परीक्षा ठेवावी व नापास करावें असें केल्यास मुलीस काय बरें होत राहील? पुष्कळ मुलींचे शरीरावरहि परिणाम दिसतोच, पण मन कसें होत असेल तें "जावें त्यांच्या वंशा तेव्हां कळे." पण जर पाहाणें काढून टाकलें तरी दुसरा उपाय काय?

मला वाटतें मित्रांनीं मुलीचें यथार्थ व खरें वर्णन द्यावें व वर्णनावरून बहुतेक आपण पसंत करूं असें वाटलें तरच पाहावी. किंवा मुलीला आपणांस पाहावयास येत आहेत हें समजून देतां पाहावी, हा उत्तम मार्ग. या बाबतींत सुधारणा अवश्य पाहिजे खरी. कशी हा मोठाच प्रश्न ! असो. मला तर मुलगी बरी वाटली–सुदृढ शरीर व चांगल्या कुटुंबांतील, हेच दोन मुख्य गुण. चेहेरा व इंग्रजी भाषेची माहिती हे गौण मुद्दे. पण या बाबतींत माझें मत निरुपयोगी. लग्न ज्यास करावयाचें त्याचे हे विचार असले पाहिजेत.

तेथून दि. ब. हरीलाल देसाई यांचेकडे गेलों. बराच वेळ बसलों होतों. बऱ्याच विषयांवर गप्पा झाल्या. म्युनिसिपल कमेटींत Cumulative Voting (एकाच उमेदवारास सर्व मतें देण्याची पद्धति) असूं नये असें माझें मत सांगितलें. त्यांसहि पटल्यासारखें वाटलें. अल्पसंख्याकांची काय वाट ? हा प्रश्न. पण अल्पसंख्याकांचे लोक लायक असले तर सर्वजण त्यांनाच निवडून देतात. पार्शी लोकांस आम्ही निवडून देत नाहीं काय ? म्युनिसिपालिटी अधिकारी नेमते त्यांवर कांहीं अंकुश असावा असें वाटतें. पण तो कसा हा अडचणीचा प्रश्न. सरकारनें हात घालावा हें मलाहि पसंत नाहीं. जे सभासद वाटेल तसे वागतात त्यांचेविषयीं सरकारांत पाहिजे त्यास अर्ज करतां यावा अशा धोरणाची सुधारणा म्युनिसिपल कायद्यांत करण्याचा आपला विचार दि. ब. नीं दर्शविला. तो कांहीं वाईट नाहीं. सभासदांवर अप्रत्यक्ष जरब राहील.

ता. २९–१२–२८

आज सकाळीं अमदाबादेस दाखल झालों. रा. जीवणलाल दिवाण मास्तर भेटले, त्यांचेकडोन गुजरात कॉलेजचे प्रिन्सिपालसाहेबांनीं विद्यार्थ्यांकडोन ३ रु. परीक्षेची फी या नांवाखालीं दंड वसूल करण्याची चालविलेली तजवीज कळली. नंतर ते माझेकडे भेटावयास आले तेव्हां मी फिंडले शिरास यांस पत्र पाठवावें असा माझा अभिप्राय त्यांस सांगितला. माझ्याशीं झालेल्या तडजोडीविरुद्ध हें वर्तन होत आहे व जर विद्यार्थी माझेकडे सल्ला विचारण्यासाठीं आले तर फी घेऊं नये असाच माझा अभिप्राय मी

देईन असेंहि मीं लिहिलें. या परीक्षेस न बसणाऱ्या विद्यार्थ्यांस वार्षिक परीक्षेस बसण्याची मनाई करण्याचा प्रिन्सिपाल यांस अधिकार नाहीं असाहि मजकूर पत्रीं घातला. सायंकाळीं रा. बाळूभाई ठाकोर, डॉ. कानुगा, डॉ. हरीप्रसाद यांस पत्राचा मसुदा दाखविला, त्या सर्वांनीं पसंत केला आहे. हें पत्र उद्यां पाठवून देईन.

ता. ३०–१२–२८

दुपारीं रा. नागनाथ संत यांचेकडे त्यांचे मातुःश्रींनीं काशीयात्रेनंतर केलेल्या मावंद्यास गेलों होतों. जेवणाची वेळ बरोबर १२ वाजतांची असें निक्षून सांगितल्यावरून गेलों होतों तरी पण शेवटीं व्हावयाचें तसेंच झालें. सुरवातीस १ वाजला व आटोपण्यास २ झाले. याचा अर्थ एवढाच कीं वेळ खरोखर फुकट गेला. धड कामहि नाहीं व धड विश्रांतिहि नाहीं. दर वेळीं सामाजिक समारंभास जावें अशी उत्कट इच्छा असतांहि अशा प्रकारानें नाइलाज होतो. जेवणांत आग्रह हा होताच–मला विशेष केला नाहीं तरी पण थोडा तरी झालाच. मीं मात्र आग्रहानें वाढलेले जिन्नस तसेच ठेवून दिले. पुढचे वेळीं आग्रह होऊं नये हा मुद्दा–एकदां शरमेनें खालें कीं दर वेळीं तोच प्रकार व्हावयाचा, व ही समाजांतील सर्वस्वीं अयोग्य पद्धति जावयाचीहि नाहीं. माझें करणें कदाचित् हेकेखोरपणाचें कांहीं जणांस वाटलें असेल पण त्याला माझा नाइलाज आहे.

ता. ३१–१२–२८

सकाळीं रा. त्रिवेदी यांचे चिरंजीव विलायतेहून डॉक्टर होऊन आले त्यांस भेटण्यासाठीं मित्रमंडळीस चहापाणी होतें. तेथें गुजरात कॉलेजचे प्रिन्सिपाल रा. फिंडले शिरास यांचेविषयीं गोष्ट निघाली होती. तात्पर्य हेंच निघालें कीं सर्वजण बोलावयास तयार पण पुढाकार घेऊन सहन करावयास कोणीच तयार नाहीं.

ता. १–१–२९

रा. दिवेटिया (गुजरात कॉलेजचे प्रोफेसर) भेटले. विद्यार्थ्यांनीं निदान रा. फिंडले शिरास मुंबईहून परत येईपावेतों कांहींहि भानगड करूं नये

अशी त्यांची इच्छा होती. ती त्यांची इच्छा स्वाभाविकच होती. मलाहि फिंडले शिरासबरोबर भांडावयाचेंच किंवा कांहीं तरी चळवळ करावयाचीच असें नाहीं. पण त्यांनीं जें राष्ट्रीयत्वास विरोधी असें धोरण घेतलें आहे त्याचा निषेध हा जरूर झालाच पाहिजे.

ता. २–१–२९

गुजरात कॉलेजांतील विद्यार्थी उद्यां कॉलेजांत संप पाडणार आहेत असें कळलें. त्यांनीं शिरास येईपावेतों तसें करूं नये अशी प्रो. ध्रुव यांनीं आग्रहाची सूचना सांगितल्यावरून रा. बाळूभाई ठाकोर यांचेकडे खास निरोप पाठविला.

ता. ३–१–२९

गुजरात कॉलेजचे विद्यार्थ्यांनीं आज संप पुकारला. आज संप करणें योग्य नव्हतें. फिंडले शिरास यांचे उत्तराची वाट पहाणें व नंतरहि कॉलेजांत येत नाहीं असें न ठरवितां परीक्षेस बसावयास जावयाचें व फी मात्र द्यावयाची नाहीं, असा कार्यक्रम माझे मतें योग्य होता. पण विद्यार्थ्यांनीं संपच पुकारला. मला याबद्दलहि विशेष वाईट वाटत नाहीं. प्रिन्सिपालचें निंद्य वर्तन व इतर प्रोफेसरांचें स्वार्थी शेळपट वर्तन पाहातां विद्यार्थ्यांचा बाणेदारपणा फारच आशाजनक. तरुणांच्या ह्या गुणास खऱ्या स्वराज्यांत किती उत्तम वळण देतां आलें असतें! त्या ऐवजीं हल्लींच्या सोंपीव असलेल्या खात्यांतहि तरुणांची गळचेपी करण्याचे निंद्य प्रयत्नच चालूं आहेत. विद्यार्थ्यांनीं उद्यां पुनः हजर होऊन प्रि. शिरास आल्यावर काय तें करावें अशी प्रो. ध्रुव यांची सूचना कळविली. मी त्यासाठीं मुद्दाम खाडीया क्लबांत डॉ. कानुगा वगैरे मंडळीस भेटावयास गेलों. विद्यार्थी आतां ऐकणार नाहींत व त्यांचा उत्साहभंग आतां करूं नये असें वाटलें. तेव्हां आतां कांहींहि करून आपण मध्यें न पडतां विद्यार्थी विचारावयास येतील त्यावेळीं काय तें सांगावयाचें असें ठरलें. त्यांनीं जें पाऊल टाकलें तें तडीस नेणेंच योग्य असेंहि वाटतें. प्रिन्सिपालाचे मूर्खपणानें व हलकटपणानेंच या

गोष्टी विकोपास गेल्या आहेत, त्याचाच नैसर्गिक परिणाम म्हणजे आतांचा संप आहे.

ता. ५–१–२९

सायंकाळीं गुजरात कॉलेजचे विद्यार्थी आले होते. अहमदाबादचे शहरवासियांची सभा भरवावी व प्रिन्सिपॉलच्या वर्तनाचा निषेध करावा अशी इच्छा प्रदर्शित केली. माझे विचार मीं सांगितलें. 'संप करणें ठीक नव्हतें. परंतु आतां केला तर तो खूपच टिकवा. स्वमान सांभाळणें, ऐक्य ठेवणें व सामाजिक उन्नतीसाठीं व स्वातंत्र्यासाठीं लढणें या गोष्टीचें शिक्षण तुम्हांस या संपापासून मिळत आहे यापेक्षां जास्त चांगलें शिक्षण कोणतें? शहरवासियांतर्फे सभा बोलावून जर सर्व एकमत झालें तर उपयोग? नाहीं तर त्यापेक्षां न बोलावणें चांगलें,' असें सांगितलें. विद्यार्थ्यांनीं ठरावाचा मसुदा मागितला तोहि करून दिला. (१) प्रिन्सिपॉलचें वर्तन अरेरावीपणाचें (Arbitrary) व व्यक्तिस्वातंत्र्यास जाचक असें आहे. (२) वार्षिक परीक्षेस बसूं न देण्यामध्यें वर्तन गैरकायदा आहे. (३) आणि तें पूर्वीच्या तडजोडीच्या विरुद्ध आहे. असें मत प्रदर्शित करून शेवटीं सरक्युलर बिनशर्त परत घेणें व दंड कोणत्याहि स्वरूपांत न घेणें अशी हमी अधिकाऱ्यांनीं दिली पाहिजे; अशी मागणी व विद्यार्थ्यांचे संपास नैतिक पाठिंबा—या स्वरूपाच्या ठरावाचा मसुदा मीं तयार करून दिला आहे.

ता. ६–१–२९

सकाळीं गुजरात मेलनें शेठ कस्तुरभाई सर्व मंडळीसह युरोपचा प्रवास आटोपून परत येत असल्यामुळें त्यांस स्टेशनवर भेटावयास गेलों होतों. इतरहि बरीच मंडळी आली होती. हारतुरे वगैरे घेऊन मी गेलों नव्हतों. मला तें बरोबर वाटत नाहीं. अर्थात् सन्मान करण्याचा तो एक प्रकार आहे खरा. पण त्यांत कांहीं अंशीं तरी खुशामतीचा भाग येतोच असें वाटतें. पुष्पगुच्छ अर्पण करणें ठीक. पण कोणतेहि प्रसंगीं कोणाहि मानवी प्राण्यास हार घालणें मला तर अत्यंत कठीण वाटतें. महात्मा गांधींस हार घालण्यास मला कोणीं सांगितलें तरीसुद्धां कसेसेंच वाटेल असें वाटतें.

दिवसाचा सर्व वेळ उद्यांचे केसचे तयारींत सर चिमनलाल सेटलवाड व रा. गोविंदलाल ठाकोर यांचेबरोबरच गेला. सर चिमनलाल यांस भेटावयास डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन (मुंबई इलाख्याचे शिक्षणाधिकारी) आले होते. बहुधा गुजरात कॉलेजच्या संपाचा विषय असावा. विद्यार्थीहि आले होते, पण भेट झाली नाहीं. आम्ही कामांतच होतों. मी सर चिमनलालशीं संपाचे बाबतींत कांहींहि बोललों नाहीं. विषय निघाल्यास बोलावें असें ठरविलें आहे. शिवाय सर चिमनलाल हे विद्यार्थ्यांस पाठिंबा देतील कीं उलट खरडपट्टी काढतील हाहि प्रश्नच आहे. ते कायदा आणि सुव्यवस्थेची वेळीं अवेळीं तळी उचलून धरणारे ना !

ता. ८–१–२९

गुजरात कॉलेजच्या बाबतींत डॉ. वापूसाहेब तळवलकर सकाळीं भेटले. पालकांनीं कांहीं तरी केलें पाहिजे हा मुद्दा. विद्यार्थ्यांना पाठिंबा देणें हा धर्म याविषयीं मला शंका नाहीं. त्यानंतर विद्यार्थीमंडळी भेटली होती. सायंकाळीं या बाबतींत विचार करण्यासाठीं प्रो. ×× कडे जावयाचें ठरविलें होतें. विद्यार्थीमंडळी जाहीर सभेसाठीं उत्सुक होती. रा. शिवदासानी (H. B.)* यांच्याशीं 'प्रथम सल्लामसलत करावी असें ठरल्यामुळें आम्ही सर्वजण माझे येथेंच सायंकाळीं भेटलों. वरिष्ठ अधिकाऱ्यांस तारा पाठवाव्या वगैरे त्यांच्या सूचना होत्या. मला त्या अव्यवहार्य वाटल्या. वरिष्ठ अधिकारी इतके बेदिक्कत झाले आहेत कीं नुसत्या तारा व पत्रें यांनीं त्यांचे सदसद्विचारबुद्धीस पाझर फुटेल असें वाटत नाहीं. कांहीं तरी झणझणीत अंजन पडल्याशिवाय दादच घ्यावयाची नाहीं अशीच वहिवाट झालेली. संप हें उत्तमच अंजन आहे. मीं रा. शिवदासानींस एक उपाय सांगितला. शिरासचें म्हणणें कीं फी म्हणजे दंड नाहीं तर परीक्षेचा खर्च आहे, तर मी तो देण्यास तयार आहें. विद्यार्थ्यांस परीक्षेस बसूं द्यावें, खर्च मी देईन. रा. शिवदासानी यांना

* हे I. C. S. होते. यांनीं बारडोली लढ्यांत नौकरीचा राजीनामा दिला. ते मुंबई नगरपालिकेंत डेप्युटी कमिशनर होते.

व इतर मंडळींना ही सूचना बरी वाटली. त्यामुळें शिवदासानी तसेच शिरासकडे गेले व त्याचेशीं खलबत करून आले. त्यानें याप्रमाणें पैसे घेण्याचें कबूल तर केलें पण नोटिशींत " Fees having been paid " (फी दिली गेल्यामुळें) अशी भाषा लिहिण्याचें सांगितलें. मला अर्थात् तें बरें वाटलें नाहीं. " Expenses for Exam. having been provided for " (परीक्षेचा खर्च दिला गेल्यामुळें) किंवा " Fees (Expenses for exam.) having been paid " (फी–म्हणजे परीक्षेचा खर्च दिला गेल्यामुळें) अशी भाषा मीं सुचविली आहे. शिरास यानें अजून नक्की कांहींच कबूल केलें नाहीं. रा. शिवदासानींस उद्यां १० वाजतां ते काय तें सांगणार आहेत. शिरास ही गोष्ट कबूल करील असें वाटत नाहीं.

रात्रौ विद्यार्थी आले होते. त्यांजला मी रा. शिवदासांनी मार्फत सुचविलेली तोड योग्य वाटली नाहीं. खर्च झाला तरी काय म्हणून द्यावा, अशी त्यांची विचारसरणी व तीच बरोबर आहे यांतहि मला शंका नाहीं. पण विद्यार्थ्यांचा संप किती दिवस टिकेल याविषयीं साशंक असल्मुळें माझी तडजोड होती. ती दौर्बल्यामुळें तर खरीच, पण शिरास यांचें खरें स्वरूप दाखवावें हाहि उद्देश खराच.

ता. ९–१–२९

विद्यार्थ्यांचे बाबतींत आज दुपारीं सर चिमनलाल सेटलवाड यांचेशीं बोलण्याचा प्रसंग आला. रविवारपासून आम्ही केससाठीं रोज तासचे तास एकत्र जमतों, पण आपण होऊन त्यांचेशीं हा विषय काढावयाचा नाहीं असें मीं ठरविलें होतें. त्यांचे शिस्तीविषयींचें, ' कायदा आणि सुव्यवस्था ' विषयींचे विचार मला माहीत असल्मुळें त्यांचेशीं गोष्ट काढून उगीच विरुद्ध अभिप्राय घेणें शहाणपणाचें नाहीं, अशा समजुतीनेंच मीं गोष्ट आजपावेतों काढली नव्हती. दुपारीं चहाचे वेळीं शेठ मंगळदासकडे आम्ही गेलों असतां प्रसंग आला. संधि साधून मीं सर्व हकीगत सांगितली. त्यांचीं मतें जरी कांहींहि असलीं तरी पण, ' ह्या गोष्टीचा उलगडा झाला पाहिजे, प्रिन्सिपालचें वर्तन Tackless (तारतम्यशून्य) आहे, फी घेतां कामा नये, पण

विद्यार्थ्यांनीं दिलगिरी वगैरे दर्शवून प्रिन्सिपालचा मान ठेवला पाहिजे' वगैरे विचार त्यांनीं सांगितलें, आणि स्वतः खटपट करतील असेंहि बोलले. त्यांचे विचार कांहींहि असले तरीसुद्धां कॉलेजांतील मुलांविषयींचा आपलेपणा त्यांचे एकंदर मनोदर्शेत दिसत होता यांत शंका नाहीं.

सर सेटल्वाड मध्यस्थी करणार असल्यामुळें आज सायंकाळचे जाहीर सभेंत अध्यक्ष होऊन सभा फक्त लांबणीवर टाकावयाचाच ठराव मांडला. सभेंत सर्व विद्यार्थीच आलेले होते. मीं चार शब्द सांगितले. त्यांतील मुद्देः—(१) गुरु व विद्यार्थी यांचा संबंध परस्पर प्रेमाचा असण्याऐवजीं हल्लींच्या प्रिन्सिपालनीं दंडुकेशाही चालविल्याबद्दल वाईट वाटतें. (२) त्यांस विरोध करणें हा धर्म. (३) त्यासाठीं एकादें वर्ष गेलें तरी हरकत नाहीं. (४) एक वर्ष पदवी उशीरां मिळविल्यानें नुकसान नाहीं. (५) कॉलेजांत स्वाभिमानशून्य राहून पुस्तकी ज्ञान मिळविण्यापेक्षां कॉलेजबाहेर राहून स्वार्थत्यागपूर्वक व एकजूट करून स्वमान संभाळण्याचें शिक्षण—एकपरीनें राष्ट्रीय शिक्षण—संपानें मिळत आहे तें जास्त चांगलें. (६) वडीलमंडळी तडजोड करण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांत व्यत्यय येऊं नये म्हणून संध्याकाळीं ठराव न करतां सभा लांबणीवर टाकणें बरें.

सभा आटोपल्यावर रा. शिवदासानीकडे रिफॉर्म क्लबांत गेलों होतों. सकाळीं ते शिरासकडे जाण्यापूर्वीं माझेकडे आले होते. मीहि रा. बाळूभाई ठाकोर यांची व विद्यार्थ्यांची सल्ला घेऊन नोटिशींत "Expenses for exam. having been provided for" अथवा "Fees (expenses for exam.)" याप्रमाणें भाषा असली पाहिजे असा आग्रह त्यांस सांगितला. ते शिरासला भेटून आले व शिरास मुळीं पैसे बाहेरून घेण्यासच तयार नाहीं व तडजोड होणें शक्य नाहीं असें त्यांनीं सांगितलें. अनायासेंच अडचण गेली. सायंकाळीं ते व मी मिळून रा. भुलाभाई देसाई ॲडव्होकेट यांचेकडे जावें असें ठरलें होतें व त्यामुळें रिफॉर्म क्लबांत गेलों होतों. आम्ही दोघे रा. भुलाभाईंस भेटून तिघेजण मिळून सर चिमनलाल यांस भेटलों. डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मि. लॉरी यांस भेटावें असें सर चिमनलाल यांनीं सांगितलेवरून मी व रा. भुलाभाई पुनः परत गेलों. मी

मोटरमध्येंच बसलों होतों, रा. भुलाभाई रा. लॉरीस भेटून आले. एकंदर त्याचे हातून फारशी मदत होईल असें दिसलें नाहीं. सरकारचे हुकुमाप्रमाणें या गोष्टी होत असल्याचें कळलें.

ता. १०–१–२९

सकाळीं डॉ. कानुगा व डॉ. तळवलकर भेटले होते. दि. व. हरीलाल देसाई यांजला कॉलेजची हकीकत कळवावी व या बाबतींत आतां सगळीकडे लोकमतास चालना द्यावी असें वाटलें. त्याप्रमाणें मी आज सकाळीं दि. व. हरीलाल यांस एक लांब तार (जिचा खर्च अदमासें १० रु. आला) पाठविली व सविस्तर हकीकतीचें पत्रहि लिहिलें.

ता. ११–१–२९

सायंकाळीं सर चिमनलालजवळ पुन्हां कॉलेजची गोष्ट निघाली होती. रात्रौ शेठ कस्तुरभाईकडे जेवावयास गेलों होतों. सर चिमनलाल व भुलाभाईहि होते. त्यावेळींहि तो विषय निघाला होता. चर्चेंत आमचे मुद्दे पुढीलप्रमाणें होते. (१) पालकांचा मुलांचे बाबतींत हक्क काय? एकाद्या पालकानें जर आपल्या विद्यार्थ्यांस गैरहजर राहून सायमन कमिशनचा बहिष्कार करण्यासाठीं परीक्षेस बसूं नको असें सांगितलें तर ज्या पेपरांस तो बसला नाहीं त्यांत फार तर नापास समजावा. पण दंड करण्याचा प्रिन्सिपॉलला अधिकार नाहीं असें माझें म्हणणें. पालक झाला तरीसुद्धां त्यानें असें सांगतां कामा नये व प्रिन्सिपॉल सांगेल तसेंच केलें पाहिजे असें सर चिमनलालचें म्हणणें. याचा सरळ अर्थ सरकारी कॉलेजांत मुलें पाठविलीं म्हणजे पितृत्वहि सोंपविलें जातें असा आहे. मला ही स्थिति असह्य वाटते. (२) शिस्त. शिस्त मलाहि हवी. पण शिस्तीच्या नांवाखालीं स्वतंत्रता व स्वमान हे जर पुढील पिढीचे चिरडले जात असतील व त्यांना केवळ अधिकाऱ्यांचे न्यायी–अन्यायी, वाजवी–गैरवाजवी हुकूम मान्य करणारी यंत्रेंच बनवावयाचीं असतील तर तशा शिस्तीपेक्षां मला शिस्तीचा अभावच पत्करतो. Choice of two evils (दोन अनिष्टांत पसंती करावयाची)

जर आहे तर शिस्तीचा अभाव हें मला कमी evil (अनिष्ट) वाटते. सर चिमनलाल अर्थातच विरुद्ध मताचे होते. (३) बाहेरच्या मंडळींनीं कॉलेजचे अंतर्व्यवस्थेंत ढवळाढवळ करणें ठीक नव्हे—मला या प्रकारचा पूर्व पक्ष करणाराचे मनोदशेची कींव येते. "बाहेरचे" (Outsiders) कोण? मी कॉलेजचा माजी विद्यार्थि, येथील रहिवासी, विद्यार्थ्यांच्या हाडामांसाचा, त्यांची माझी जन्मभूमि—समाज—आकांक्षा—धर्म—आचार-विचार—भाषा सर्व कांहीं एक. त्यांचेपैकीं पुष्कळ माझ्या ओळखीचे—संबंधी. तरी मी बाहेरचा व ५००० मैलांवरून आमचा पैसा केवळ पगारखाऊ म्हणून घेण्यास येणारा परकी मनुष्य हा कॉलेजचे अंतर्व्यवस्थेस संपूर्ण विश्वसनीय! इतका कीं त्याचे गैरकारभारांत मतभेद प्रदर्शित करण्याचीहि आम्हांस मुभा असूं नये!! कां? तर त्यामुळें विद्यार्थ्यांस बेशिस्तीचें उत्तेजन मिळतें!!! किती केविलवाणी मनोदशा!! पण सर चिमनलाल यांची ही मनोदशा होती. (४) विद्यार्थी व गुरु यांचा संबंध परस्पर सहानुभूतीचा व प्रेमाचा असावा या बाबतींत सर चिमनलाल यांचें आमचें मतैक्य होतें. व प्रिन्सिपालचे बेअक्कलपणाविषयींहि ते संमत होते. (५) प्रिन्सिपालचे कृतींत शिक्षणाचा पान्हा नसून राज्य करण्याची प्रवृत्ति दिसते. रा. भुलाभाईंनीं माझ्या म्हणण्याच्या मथितार्थास दुजोराच दिला.

ता. १३–१–२९

आजचे स्थानिक वर्तमानपत्रांत अर्थातच महत्त्वाचा विषय म्हणजे गुजरात कॉलेज मधील विद्यार्थ्यांचा संप. "शक्ति" पत्रानें या बाबतींत फारच गचाळ व बेजबाबदार लेख लिहिला आहे. लेखकाच्या क्षुद्र मनोवृत्तीचें प्रदर्शनच आहे. अशीं पत्रें नसलेलीं बरीं.

सायंकाळीं प्रेमाभाई हॉलमध्यें शहरवासीयांची सभा गुजरात कॉलेजचे विद्यार्थ्यांचे बाबतींत होती. मी जाणार होतोंच इतक्यांत विद्यार्थ्यांपैकीं मंडळी बोलावयास आली. सभास्थानीं पुष्कळ मंडळी जमली होती. पण ठराव वगैरे कांहींच लिहिलेले नव्हते. मी ४।५ दिवसांपूर्वी दिलेला मसुदाहि कोणीं आणला नव्हता. शेवटीं तेथेंच बसून ठराव लिहून काढला. त्याचे मुद्दे:—

(१) प्रिन्सिपालचे वचनभंगाबद्दल निषेध. (२) दंडाबद्दल निषेध (३) परीक्षेस बसण्याची पण दंड न देण्याची विद्यार्थ्यांस सल्ला. (४) कॉलेजच्या अध्यापकाचे ठिकाणीं सहानुभूतीचा व प्रेमाचा अभाव असल्याबद्दल दिलगिरी. (५) खोट्या इभ्रतीस अधिकाऱ्यांनीं बळी पडूं नये असा इषारा; सभेपुढें ठराव मींच मांडला. ठराव व भाषण दोन्ही इंग्रजींत होतीं. डॉ. कानुगा अध्यक्ष होते. गुजरात विद्यापीठाचे श्री. कृपलानीहि चार शब्द बोलले.

ता. १४–१–२९

सायंकाळीं रा. कालीदास वकील गुजरात कॉलेजचे विद्यार्थ्यांचे संपाविषयीं बोलावयास आले होते. त्यांचे मुलाचेसाठीं प्रिन्सिपाल शिरास यांजला नोटीस देण्याचा विचार कायम केला आहे.

ता. १५–१–२९

गुजरात कॉलेजची विद्यार्थ्यांची परीक्षा होती परंतु विद्यार्थी कोणीहि परीक्षेस बसले नाहींत. मुंबईचे ॲड्व्होकेट श्री. मुनशी हे शिरास यांस भेटावयास गेले होते पण त्यांनीं तडजोड करण्याच्या अटी सांगितल्या त्या समाधानकारक नव्हत्या. महात्माजींसहि त्या तशा वाटल्या नाहींत. माझा अभिप्राय तसाच पडला होता तो मीं विद्यार्थ्यांस सांगितला.

सायंकाळीं संसारा सुधारा हॉलमध्यें विद्यार्थ्यांची सभा होती तीस गेलों होतों. रा. मुन्शी ॲडव्होकेट आले होते. डॉ. कानुगा अध्यक्ष होते. डॉ. हरीप्रसाद मुन्शी व मी बोललों. माझे मुद्देः—(१) चिकाटी व ऐक्य ठेविल्याबद्दल अभिनंदन. (२) संपाचे चळवळींत शिस्त व संघटना यांची जरूर. (३) शेवटीं विजय मिळविणें तर बाहेरचे मदतीची अपेक्षा ठेवूं नये. (४) स्वार्थत्यागाचें व्यावहारिक शिक्षणच मिळत आहे. (५) शांतता व विनय संभाळण्याची आवश्यकता. (६) नेटानें संप चालूं ठेवून यशप्राप्ति मिळविणें. सभा संपल्यानंतर मागाहून विद्यार्थी चर्चा करण्यासहि आले होते. नेटानें उभे राहाण्याची सल्ला मीं तर त्यांस दिली.

ता. १६–१–२९

सायंकाळीं कॉलेजचे विद्यार्थ्यांची नदीचे रेतींत सभा होती त्यास गेलों होतों. विद्यार्थ्यांस उपदेशाचे चार शब्द सांगण्यास सांगितल्यावरून बोललों. इंग्रजींतच बोलावें असा विद्यार्थ्यांनीं आग्रह केल्यामुळें मी बोललों तर खरा, पण मातृभाषेंत बोलण्याविषयींची आवश्यकताहि थोडक्यांत सांगितली. तडजोडीविषयीं अगदीं आतुर राहूं नका. त्या मनोवृत्तींत कमकुवतपणा आहे असें सांगितलें.

ता. १७–१–२९

कोर्टाचें काम आटोपल्यावर सायंकाळीं विद्यार्थ्यांचे सभेस गेलों होतों. आज कॉलेजांत विद्यार्थ्यांनीं पहारा (पिकेटिंग) केला त्याविषयीं प्रश्न निघाला. Picketing हें मला अन्यायी वाटत नाहीं पण विद्यार्थ्यांनीं निजून राहून लोकांस न जाऊं देणें किंवा हात धरून अडविणें बरोबर नाहीं. या बाबतींत समजावणी (Persuation) कोठें संपते व अडथळा (Interference) कोठें सुरूं होतो हें सांगणें कठीण आहे. प्रिन्सिपालनें त्याविषयीं नोटीस काढली आहे. तीविषयीं मला वरील आशयाचेंच सांगितलें. Loitering (वाटेंत गमत राहाणें) करूं नये पण एके ठिकाणीं उभें राहावयास प्रत्यवाय असूं नये. कॉलेजचें कांपाऊंड अथवा इमारतींत कसें वागावें हा अंतर्व्यवस्थेचा प्रश्न असल्यामुळें विद्यार्थ्यांनीं त्या बाबतींत प्रिन्सिपालचे हुकूम मान्य केले पाहिजेत असें सांगितलें. दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न असा निघाला होता कीं कांहीं द्वितीय वर्षाचे विद्यार्थी आहेत त्यांनीं युनिवर्सिटी परीक्षेस बसूं नये असा विद्यार्थ्यांचा आग्रह आहे. हा आग्रह मला बरोबर वाटत नाहीं. तंटा युनिवर्सिटीशीं नाहीं पण प्रिन्सिपालशीं आहे. कॉलेजमध्यें त्या विद्यार्थ्यांनीं जाऊं नये एवढेंच त्यांच्यापाशीं मागणें रास्त आहे. संपाचे वेळीं असे प्रश्न काढून दुही करणें इष्ट नाहीं. विद्यार्थ्यांना हें सांगणें पटलें असें एकंदर वाटलें.

ता. १८-१-२९

कोर्टांतील काम आटोपल्यावर सायंकाळीं नदीचे रेतींतील विद्यार्थ्यांचे सभेस गेलों होतों. मीं कांहींतरी बोललेंच पाहिजे व तेंहि इंग्रजींतच असा विद्यार्थ्यांचा आग्रह असतो. मी गेल्याबरोबर टाळ्या वाजवून माझें स्वागत करतात व एकंदरींत बराच मान देतात व प्रेमहि दाखवितात. मला त्यामुळें मात्र फारच संकोच वाटतो व माझी नैतिक अवनति तर होणार नाहीं ना, असेंहि वाटतें. मी बोलतों तें स्वस्थपणें ऐकून घेतात व तें त्यांना आवडतेंहि पण त्यांतच माझी अधोगति होण्याचा संभव आहे. वाचाळपांडित्य करण्याची चटक लागण्याचा संभव आहे व मी कोणीतरी पुढारी अशी भावना अजाणता होण्याचीहि भीति आहे. अर्थात् माझेकडून मी तसें न होऊं देण्याचा प्रयत्न करीनच. पण मला तरी फारच भीति वाटूं लागली आहे. असो. शिवाय विद्यार्थ्यांस मला वाटते ती प्रामाणिक सल्ला देण्यापलीकडे मी काय करीत आहें ? पण तरुण, उत्साही निर्मळ मनें पाहून एकप्रकारें जसा आनंद वाटतो तसें दुःखहि होतें. अशीं माणसें व तरुण पिढी आपल्या देशांत व समाजांत असतांहि आमची काय ही स्थिति ! कारण आजहि वडील म्हणून म्हणविणारी मंडळी पाय मागें ओढणारी ! आमच्यांतच चारित्र्य नाहीं. विद्यार्थी कोणत्याहि देशांतल्या विद्यार्थ्याप्रमाणेंच नीतिमान, भावनामय व बुद्धिमान आहेत. पण या संपानें ठीक शिक्षण मिळत आहे.

घरीं आलेवर प्रोफेसर मंडळी भेटली. प्रिन्सिपाल फारच जोरांत आहे असें कळलें. मुलांचें वर्ष फुकट जाऊं नये ही या मंडळींची इच्छा. पण आमचे दृष्टीनें यांत तत्त्वाचा जो प्रश्न आहे त्या मानानें वर्षाची कांहींएक किंमत नाहीं. शेवटीं आम्ही सर्व प्रयत्न करीत आहोंत याची त्यांस खात्री करून देऊन त्यांचे सहानुभूतीविषयीं आभार मानून रात्रौ शेठ अंबालाल साराभाईकडे जेवणास गेलों. सर चिमनलाल, भुलाभाई, मुनशी इ. मंडळी होती. भोजनोत्तर कॉलेजच्या गोष्टी निघाल्या. भुलाभाई जे प्रयत्न तडजोडीचे करीत होते त्यांसहि विद्यार्थ्यांची संमति दिसली नाहीं. फिंडले शिरासचेविषयीं मला अविश्वास, रोष व कटु भावना

आहे असा सर चिमनलाल यांचा मजवर आरोप होता. तो खराहि आहे व म्हणूनच माझे विचार बाजूला ठेवूनहि मी चर्चा करण्यास तयार होतों, व केलीहि. पण त्यांचा व माझा दृष्टिबिंदु फारच वेगवेगळा आहे त्यास इलाज नाहीं.

ता. १९–१–२९

कॉलेजच्या विद्यार्थीवर्गाची आज जंगी मिरवणूक निघाली होती. ती आमचे घरावरून नेली. कांहीं वेळ घरासमोर ते थांबले व प्रेमदर्शक म्हणून माझे नांवानें जयघोष केला. मी मागाहून आल्यावर मला कळलें. हें कांहीं खरोखर बरोबर नाहीं. माझी जबाबदारी किती वाढविली!! अर्थात् मानसिक अवनति नच होऊं देणें याविषयीं मी सतत प्रयत्न करीनच. पण असें होणें माझे किंवा विद्यार्थ्यांचे दृष्टीनें बरोबर नाहीं एवढें खास.

दुपारीं विद्यार्थी आले होते. प्रिन्सिपालसाहेब तडजोड करण्यासाठीं सर्व कांहीं गोष्टी कबूल करावयास तयार आहेत. त्याचा मसुदा पाहिजे होता. दुपारचे सुटींत मीं तो करून दिला. अटी पुढीलप्रमाणें :

(१) कोणाहि विद्यार्थ्यांची रागास किंवा द्वेषास आहुति द्यावयाची नाहीं. (२) परीक्षा पाहिजे तर द्यावी पण फी नाहीं. (३) टर्ममध्यें खुटणारे दिवस द्यावे. या अटी मान्य असल्या तर प्रिन्सिपालसाहेबांनीं त्यावर सही करून द्यावी म्हणजे मग प्रीवियसचे विद्यार्थ्यांचा लेखी अर्ज त्यांस विद्यार्थ्यांनीं देऊन परीक्षा घेण्याची मोकळीक ठेवावी. या बाबतींत विद्यार्थ्यांची सभा सायंकाळीं झालेवर संप कमिटीची सभा माझे येथें भरली होती त्यांतहि हें धोरण मंजूर झालें.

संध्याकाळचे सभेंत गेलों होतों. विद्यार्थ्यांस निश्चय कायम ठेवावयास पुनः प्रोत्साहन दिलें. विद्यार्थ्यांत फाटाफूट करण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे हें सांगण्यास कु. × × व कु. × × या आल्या होत्या.

शिरासचे बाबतींत माझें जाहीर पत्रक लिहिण्यास आज बसलों होतों. रात्रौ उशीर न करण्याचा निश्चय असलेमुळें दहा वाजतांच काम आटोपून निजावयास गेलों.

ता. २०–१–२९

आज सकाळीं ९॥ चे सुमारास दि. ब. हरीलाल देसाईभाई यांचेकडे गेलों होतों. गुजरात कॉलेजविषयीं खूप चर्चा झाली. शिक्षणखातें हें खरोखर लोकमतास जबाबदार नाहीं असा माझा आरोप–जो मनुष्य खोटें बोलणारा व विश्वसनीय नाहीं असें व्हाइस चॅन्सेलर, प्रधान, शिक्षणमंत्री वैगेरे सर्वांचें मत, त्याला कॉलेजच्या मुख्याध्यापकाचे हुद्यावरून काढतां येत नाहीं तें खातें बेजबाबदार नाहीं तर काय?

राष्ट्रीय संगीत मंडळीचे जलशास आज विशेष महत्त्व होतें. इनामें वांटण्याचा समारंभ होता व शिवाय गुजरात कॉलेजचे विद्यार्थ्यांसाठीं खास कार्यक्रम होता. मला अध्यक्ष नेमण्यांत आलें होतें. माझे भाषणांत मीं सांगितलेलें मुद्दे:— (१) शिक्षणक्रमांत संगीताचें फार महत्त्व आहे. (२) जसें खेळ पाहिजेत तसें संगीतहि पाहिजे. (३) त्यामुळें आयुष्यांत, खासगी राहणींत किंवा सामाजिक जीवनांत एकतानतेची संवय लागते ती अत्यंत जरूरीची आहे.

रात्रौ भोजन आटोपून तसाच सत्याग्रहाश्रमांत गेलों. महात्माजींस सर्व हकीकत निवेदन केली. त्यांचें मौन होतें. त्यांनीं एकंदर प्रकारास व आमचे चळवळीस संमति दर्शविली.

शिरास यानें तडजोडीच्या अटी कबूल न केल्यामुळें माझें जाहीर पत्रक उद्यां छापून सगळीकडे पाठविण्याचें ठरविलें.

ता. २१–१–२९

काल तयार केलेलें जाहीर पत्रक (इंग्रजी) छापावयास देऊन तें शिक्षणमंत्री, शिक्षणाधिकारी, चॅन्सेलर, व्हाइस चॅन्सेलर यांचेकडे पाठविलें.

आज शाळांतील सर्व विद्यार्थ्यांनीं सहानुभूतीचा संप केला होता. म्युनिसिपालिटीची सभाहि त्याच कारणामुळें बंद ठेवण्यांत आली होती. संध्याकाळीं नदीतीरावर सभा झाली. श्रीवल्लभभाईंचें भाषण झालें. मी मात्र कांहींच बोललों नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर
दा. क्र. ५१३ दि: ...
वर्ग नं. ... दि: ...

शिरास विद्यार्थ्यांजवळ तडजोडीच्या अटी मागत असलेमुळें दुपारीं एक मसुदा करून दिला होता. पुनः फेरविचार करण्यासाठीं माझे घरीं सायंकाळीं संप कमिटीची सभा भरवून त्यांत ठरलेला मसुदा दिला. त्या अटींवर शिरास यानें तडजोड केली तर ठीक. नाहीं तर जें होईल तें होईल. झगडा चालूंच ठेवावयाचा असें ठरलें.

रात्रौ शेठ मंगळदास कॉलेजचे बाबतींत स्वतः मध्यस्थी करण्यास तयार असल्याचें सांगण्यांत आलें होतें. त्यांचें तडजोडीचें धोरण मला तर योग्य वाटलें नाहीं. म. गांधी जें कांहीं सांगतील तें करण्यास विद्यार्थी तयार होतील असें मीं त्यास सांगितलें व त्याबरोबरच असेंहि सांगितलें कीं यांत त्यांनीं न पडावें हेंच बरें. तंट्याचें रहस्य आतां निराळें आहे. प्रश्न केवळ शिक्षणविषयक राहिला नसून त्यास राजकारणाचें स्वरूप आलें आहे असेंहि सांगितलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क्र. ५९२३

ता. २२-१-२९

शेठ मंगळदास सकाळीं ९॥ चे सुमारास आले व महात्माजींच्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं शर्ती रा. शिरासनें कबूल करीत आहेत तेव्हां आतां तडजोडीस काय अडचण, असें म्हणाले. मीहि संमति दर्शविली कीं महात्माजी जें कांहीं म्हणतील तें कबूल आहे. पण त्यांस सर्व हकीकत कळवून व त्यांचें म्हणणें जसेंच्या तसेंच विद्यार्थ्यांस कळविण्यास मी तयार आहें, माझे स्वतःचे जबाबदारीवर एक अक्षरहि बोलण्यास तयार नाहीं, असें मीं सांगितलें. मी व ते बरोबर निघालों व प्रथम कॉलेजांत जाऊन विद्यार्थ्यांस हकीकत सांगितली कीं शेटसाहेब व मी म. गांधीजीकडे जात आहोंत. जें कांहीं महात्माजी सांगतील तें ऐकण्यास तुम्ही तयार असलें पाहिजे. माफी मागणें, दंड भरणें वगैरेसुद्धां जरी महात्माजींनीं सांगितलें तरी तें केलें पाहिजे. विद्यार्थ्यांनीं रुकार दिल्यावरून मग आम्ही पुढें गेलों. महात्माजी भोजनास बसले होते. तेथेंच चर्चा झाली. आजपावेतोंची हकीकत व पत्रव्यवहार अथवा शर्तींची चर्चा सांगितली. शेठ मंगळदास यांना आलेलें शिरासचें पत्र महात्माजींस त्यांनीं दाखविलें. महात्माजींनीं लगेच निर्णय

दिला कीं शिरास याचे पत्रावरून तडजोड होईल असें दिसत नाहीं. दंड वसूल करणें व मागाहून विद्यार्थ्यांस शिक्षा करणें या दोन गोष्टींविषयीं तो जोंपावेतों कबूल करीत नाहीं तोंपावेतों तडजोडीच्या चर्चेसहि जागा नाहीं. शेटसाहेबांस महात्माजींनीं सल्ला दिली कीं शिरास यास पत्र लिहावें कीं "तुमचे पत्रावरून पाहातां तडजोड होण्यासारखें दिसत नाहीं तेव्हां मी मध्यें पडत नाहीं." शेटसाहेबांनीं पत्र तर लिहिलें पण त्यांचे मतें जें योग्य तें लिहिलें. सायंकाळींहि शेटसाहेब पुनः शिरासकडे जाऊन तासचेतास खर्च करून आले होते. त्यांतहि फी म्हणून रु. ३ शेट मंगळदास यांनीं वसूल करून भरावे अशी अट होती. ती कशी मान्य होणार? त्यांना या एकंदर झगड्याचें रहस्यच समजलें नाहीं. तक्रार ३ रु. ची किंवा एक वर्षाविषयींची नसून, शिक्षणखात्याचा एक मुख्य आम्हांस राज्यशासनाप्रमाणें दंडूं पाहातो, आमच्या राष्ट्रीय भावना तुडवितो व आमच्या तरुण पिढीनें हांजी हांजी करावी अशी अपेक्षा करतो, त्यास विरोध करणें हा मुख्य प्रश्न आहे. आज शेटसाहेब मुंबईस जात आहेत तेथें जमल्यास तडजोडीची खटपट करावी अशी त्यांची इच्छा असल्याचें कळल्यावरून तसें न करण्याविषयीं त्यांस आग्रहपूर्वक सांगितलें आहे, व तें त्यांनीं मान्य केलें आहे.

ता. २३–१–२९

आमचेकडून दिलेल्या अटींचा विचार करण्यासाठीं प्रि. शिरास यांनीं विद्यार्थी–सभासदांस बोलावलें होतें. त्यांची चर्चा पांच तास चालूं होती. चर्चेचे परिणामीं आमच्या सर्व अटी मान्य केल्या पण टर्मचे दिवस पूर्ण करण्यासाठीं जरूर लागल्यास युनिवर्सिटीस शिफारस करण्याचें त्यांनीं नाकारलें. या बाबतींत रात्रौ संप कमिटीचे बैठकींत विचार होऊन पुढील-प्रमाणें ठरलें: (१) जरूर पडल्यास युनिवर्सिटीस शिफारस करण्याचें लेखी कबूल करीपावेतों तह होणें शक्य नाहीं, (२) तडजोड झालेवर त्यांचें व संपाचें स्मारक म्हणून एक फंड करावा अशी प्रिन्सिपालची सूचना होती. त्या फंडांत माजी विद्यार्थ्यांनासुद्धां पैसे भरण्याची मोकळीक असावी. अर्थातच

या स्मारकाचा तडजोडीशीं कांहींएक संबंध नाहीं. सलोखा–उत्सव हा सलोख्यानंतर करावयाचा.

ता. २४–१–२९

काल विद्यार्थ्यांशीं प्रि. शिरास यानें जी चर्चा केली त्याचा विपर्यास करून खोटी हकीकत त्यानें सरकारांत कळविली असल्याचें समजलें. त्यानें पुढील तीन मुद्दे खोटे कळविले असें कळलें: (१) विद्यार्थी नुकसानी म्हणून रु. ७०० द्यावयास तयार आहेत. (स्मारक फंडाचे गोष्टीचा हा विपर्यास). (२) अमुक विद्यार्थ्यांस पुढील वर्षीं कॉलेजांत न घेण्याची परवानगी (म्हणजे कोणासहि शिक्षा करणार नाहीं या वचनाचा भंग). (३) मावळंकर हे गांधींच्या सल्ल्यानें यास राजकीय स्वरूप देत आहेत. (स्वतः राजकीय स्वरूप झांकून शिक्षण–शिस्तीचे नांवाखालीं धुमाकूळ घालण्याचा प्रयत्न करून तो न साधल्यामुळें सरकारची सहानुभूति मिळविण्यासाठीं विपर्यास).

वरीलप्रमाणें बातमी कळल्यामुळें लगेच कमिटीतर्फे एक जाहीर पत्रक काढून तें प्रसिद्ध करण्याची जरूर वाटली व त्यामुळें प्रथम तें काम हातीं घेतलें. कमिटीचें पत्रक असोशिएटेड् प्रेसमार्फत मुंबईस वर्तमानपत्रांस रवाना केलें.

दुपारीं मी व डॉ. कानुगा आश्रमांत महात्माजींस भेटण्यास गेलों होतों. त्यांनीं आजचे 'यंग इंडियां'त अग्रलेख लिहून पुष्टि दिलीच आहे पण मुंबईचे पत्रकारांनीं ही चळवळ घेतली पाहिजे त्यासाठीं त्यांस कळविण्यास गेलों होतों. सर्व हकीकत सांगावी व सल्ला घ्यावी हाहि हेतु. त्यांना वेळ अगदींच नव्हता. तेव्हां पांचच मिनिटांत सर्व हकीकत सांगितली. आम्ही जें करीत आहोंत तें बरोबर असल्याचें त्यांनीं सांगितलें.

तिसरे प्रहरीं कौन्सिलचे सर्व मेंबरांस व इतरांसहि कॉलेजचे परिस्थिती-विषयीं पत्रें लिहिलीं.

सायंकाळीं नदीचे रेतींत सभा झाली. मीं फक्त कमिटीचें स्टेटमेंट वाचून दाखविलें. स. वल्लभभाईंनीं सुंदर भाषण केलें.

त्यानंतर माझे येथें कमिटीचे सभासद गोळा झाले. युनिवर्सिटीला टर्म देण्यासाठीं शिफारस करण्याचें प्रिन्सिपालास सांगणें योग्य नाहीं असें माझें मत, तरी पण त्यांना सांगावें असा कांहीं विद्यार्थ्यांचा अभिप्राय होता. त्या-विषयीं चर्चा करावयाची होती. भोळे विचारे. अजूनहि त्या प्रिन्सिपालच्चे शब्दावर विश्वास ठेवतात. विद्यार्थ्यांचा विश्वास असल्यास माझी हरकत नाहीं पण विश्वास ठेवण्याची सल्ला देण्यास मी तयार नाहीं असें सांगितलें.

ता. २५–१–२९

सकाळीं ९ वा. स्टेशनवर गेलों होतों. मुंबई कायदे कौन्सिलचे सभासद स्पेशल गाडीनें सिंध प्रांतीं सक्कर बराज पाहावयास गेले होते. ते ९-४०वा. स्पेशालनें मुंबईस जात असलेमुळें गुजरात कॉलेजचे बाबतींत जमल्यास त्यांस भेटून कौन्सिलमार्फत तजवीज करावी म्हणून गेलों होतों. तेथें गुजरातचे सर्व सभासद भेटले. क्रॉनिकलचे रा. ब्रेलवी, अ. प्रे. चे चटर्जी व इंडियन डेली मेलचे उपसंपादक अशी सर्व मंडळी भेटली. सर्वांस एकंदर तंट्याची हकीगत समजावून सांगितली. ही बाबत वर्तमानपत्रांत उचलून धरूं असें त्यांनीं आश्वासन दिलें. कौन्सिलचे सभासदहि खूप चळवळ करूं असें म्हणाले. सर्व हकीगत त्यांस थोड्या वेळांत सांगणें शक्य नसल्यामुळें त्यांचेबरोबरच स्पेशलमधून नडियादपावेतों गेलों होतों.

कौन्सिलचे सभासदांनीं काय करावें याविषयीं चर्चा झाली. गव्हर्नराकडे डेप्युटेशन न्यावें अशी एक सूचना होती. पण तें बरोबर नाहीं असें सर्वानुमतें ठरलें. एक तर गव्हर्नर "शिक्षणमंत्री तुमचेच आहेत" असें म्हणून नामानिराळे होतील आणि खोंचतील व दुसरें म्हणजे एकादा प्रधान वाईट असला तरी जोंपावेतों तो लोकनियुक्तांपैकीं आहे तोंपावेतों त्याचेवर गव्हर्नरचें दडपण टाकण्याची वहिवाट आपण होऊन पाडूं नये. कौन्सिलचे सभासदांनीं शिक्षणमंत्र्यास मध्यें पडण्याविषयीं तार दिली. विद्यार्थ्यांचें हित व मान जाणार नाहीं अशी तडजोड करण्याविषयीं तार करून त्याप्रमाणें पत्रहि पाठविणार आहेत आणि शेवटीं शिक्षणमंत्री यांनीं नच ऐकलें तर त्यांचेवर निंदाव्यंजक ठराव कौन्सिलांत आणतील. ज्यांस

गव्हर्नरचे खासगी मुलाखतीचा योग येईल ते खासगी रीतीनेंहि बोलतीलच. शिक्षणमंत्री म्हणजे युरोपियन सेक्रेटरींच्या हातांतील बाहुलेंच आहेत, व शिरास यांनीं प्रथमपासून प्रत्येक गोष्टींत त्यांचा शिक्कामोर्तब मिळवून काम केलें असल्यामुळें अडचण विशेष आहे. असो.

दुपारीं घरीं येऊन थोडें धंद्याचें काम करून सायंकाळीं शेट कस्तुरभाईं-बरोबर आश्रमांत गेलों. महात्माजींस सर्व हकीकत निवेदन केली. त्यांसहि कौन्सिलचे सभासदांचें वर्तन व धोरण बरोबर वाटलें. निंदाव्यंजक ठराव पास होवो वा न होवो तो आणलाच पाहिजे असें म्हणाले.

इतर गोष्टीहि झाल्या. त्यांमध्यें (१) महात्माजींचे आत्मचरित्राचा हक्क लंडनचे मॅकमिलन कंपनीस दिल्याबद्दल शेट कस्तुरभाई यांनीं असंतोष प्रदर्शित केला. याला महात्माजींनीं दिलेला खुलासा मला तर पटला नाहीं. (२) महात्माजींच्या युरोप-गमनाविषयींचे विचार पटले. युरोपांत त्यांच्या अहिंसात्मक विचारांस अनुकूल वातावरण नाहीं व शिवाय कॉंग्रेसमध्यें इतका प्रमुख भाग घेतल्यानंतर हिंदुस्थानांतच राहाणें जरूर आहे.

घरीं आल्यानंतर कॉलेज ॲडव्हायजरी कमिटीस आजची सर्व हकीगत निवेदन केली.

ता. २६-१-२९

सायंकाळचे नदीकांठचे सभेंत गेलों. प्रो. स्वामीनारायण यांनीं कौन्सिलां-तील शिरासविषयींचीं प्रश्नोत्तरें वाचलीं. असा हलकटपणा करणारा प्रिन्सिपाल व त्यास सांवरणारें सरकार या दोघांचाहि वीट आला. वाईट वाटलें. सरकारच्या खऱ्या कर्तव्याविषयीं किती अज्ञान! जी चुकी सर्व जगाला दिसते तिच्या बाबतींत स्वतःचे डोळे मिटल्यासारखे केल्यानें सरकारची इभ्रत कशी राहाणार? एकंदर प्रकार फारच निर्लज्जपणाचा. सरकार जर अशा धोरणावरच चालवावयाचें असेल तर त्यास वठणीवर आणण्याचा प्रत्येक विचारी पुरुषाचा धर्मच आहे. समाजाची घडी बिघडवावयाची नसेल—खरोखर कायदा आणि सुव्यवस्था यांचें पालन करावयाचें असेल—तर 'सरकार' या नांवाखालीं काम करणाऱ्या माणसांच्या डोक्यांतून 'इभ्रती'च्या

अशा कल्पना गेल्या पाहिजेत. जोंपावेतों लोकहित संभाळणें हीच खरी इभ्रत, चुक्या करणाऱ्या अंमलदारांच्या गैरवर्तनाची लपवालपव न करतां त्याचे कान उपटणें व लोकांस आपले विश्वासांत घेणें हीच इभ्रत अशी भावना नाहीं तोंपावेतों कायदा-सुव्यवस्थेच्या नांवाखालीं हल्लींचे सत्ताधिकारी कायदा-सुव्यवस्थेच्या पायाचा नाशच करीत आहेत यांत मला तर शिरासच्या उदाहरणावरून शंका वाटत नाहीं! किती शोचनीय स्थिति? सर्व लोकमत—प्रधानासुद्धां या माणसाचें विरुद्ध असतां 'इभ्रती'करितां लोकमत लाथाडून त्यास कायम ठेवणें! कुजलेल्या मनःस्थितीची कमाल झाली!!!

मीहि सभेंत चार शब्द बोललों. झगड्यास निराळें स्वरूप आल्याचें सांगितलें. सरकार जर अशा माणसास पाठिंबा देतें तर त्या सरकारासहि आपण कितपत पाठिंबा दिला पाहिजे हाहि प्रश्नच आहे, असें सांगितलें.

रात्रौ सहज गप्पा मारण्यासाठीं शेठ कस्तुरभाई लालभाई यांचेकडे गेलों होतों. नवें कॉलेज काढण्याविषयीं सूतोवाच करून ठेवलें आहे. त्यांस अजून ती गोष्ट पटली नाहीं. पटविण्याची घाईहि नाहीं.

ता. २७-१-२९

आज सकाळीं रा. नवीनचंद्र देसाई व हिरालाल मेहेता हे वकीलद्वय कॉलेजचे संबंधांत आले होते. जाहीर सभा बोलवावी कीं नाहीं हा चर्चेचा विषय होता. शेठ अंबालाल साराभाई यांचे मतें सभा न बोलावतां सर्व गुजराततर्फे सरकारास निवेदन (अर्ज) द्यावें; सभेंत जोराचीं भाषणें होणार, त्यापासून सरकार चिडणार वगैरे. मला वाटतें सौम्य व नेमस्त शब्दांत ठराव लिहून भाषणांकडे लक्ष न देतां सभा भरविणें जरूर आहे. भाषणें नियंत्रित करण्याचा प्रयत्न तर करावाच. पण सभेमुळें दृश्य सहानुभूति मिळून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल. सर्व गुजरात—निवेदन तर करावेंच.

प्रेमाभाई हॉलमध्यें राष्ट्रीय संगीत मंडळाचा जलसा होता. रा. काकासाहेब कालेलकर अध्यक्ष होते. मला जावयास उशीर झाला. मीं चार शब्द बोलावे हा आग्रह. विद्यार्थी तर जमलेच होते. मी गेलों असतां टाळ्या वाजवितात त्यामुळें मी फारच घाबरतों! हें योग्य नाहीं. मी कांहींच करीत नाहीं—

केलें नाहीं—अशा रीतीनें देव्हारे माजविण्यांत विद्यार्थ्यांची व माझी अवनति आहे असें मला प्रामाणिकपणें वाटतें. इंग्रजींत मीं बोलावें हा मोठा मोह. हेंहि योग्य नाहीं असें मीं विद्यार्थ्यांस स्पष्ट सांगितलें. घेतलेल्या कार्यांत आतां शेवटपर्यंत झगडा हा उपदेश केला.

ता. २८–१–२९

आज मुंबई मुक्कामीं दाखल झालों.

सकाळीं दि. ब. हरीलाल देसाईभाई* कडे गेलों होतों. कॉलेजच्याच गोष्टी. शिरास सरकारांत कसे रिपोर्ट करतो हें सहजच समजलें. खोट्या व कलुषित गोष्टी लिहावयास त्यास कांहींच दिक्कत वाटत नाहीं. मला त्यानें "arch-extremist" (कट्टर जहाल) ही पदवी दिली आहे. "जसा स्वतः आहे तसा इतरांस पाहातो" याशिवाय दुसरें काय? बाकी मलाहि वाटतें कीं माझे विचार लेच्चेपेच्चे नाहींत. पण विचारांतहि स्वातंत्र्य व सच्चाई असूं नये अशी अपेक्षा करणाऱ्यास काय नांव द्यावें?

रात्रौ रा. रा. दादासाहेब गुर्जर हे मुक्कामावर भेटावयास आले होते. ते एल्एल्. बी. झाल्यानें आतां पुढील धोरणाविषयीं चर्चा झाली. कोल्हापुरीं राहून वकिली करूं नये असा माझा अभिप्राय मीं सांगितला.

ता. ३०–१–२९

आज सकाळीं अमदाबादेस दाखल झालों. शेट अंबालाल भेटले. कॉलेजविषयीं बोलणें झालें. सर्वांस शिस्तीचा बाऊ वाटतो. मलाहि शिस्त पाहिजे आहे. पण शिस्त म्हणजे काय? वाटेल त्या रीतीनें माणसांनीं यंत्राप्रमाणें किंवा जनावराप्रमाणें "जी हां" करणें म्हणजे शिस्त कीं काय? शिस्त जर विद्यार्थी खरोखर मोडत असतील तर त्याची सर्व जबाबदारी अधिकाऱ्यांवर आहे. विद्यार्थ्यांचें व जनतेचें म्हणणें ऐकावयाचें नाहीं,

* अमदाबादचे एक विख्यात वकील होते. सार्वजनिक कार्यांत पुढाकार घेत. त्यागी व तडफी होते. यावेळीं मुंबई सरकारचे प्रधान होते.

न्याय करावयाचा नाहीं व शेवटीं म्हणावयाचें कीं शिस्त मोडते याचा अर्थ काय ?

दुपारीं कॉलेजचे विद्यार्थ्यांनीं जंगी मिरवणूक काढली होती. तींत कांहीं प्रकार मला योग्य वाटले नाहींत. " Down with British Imperialism " (ब्रिटिश साम्राज्यशाहीचा निषेध असो), अशा कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निषेधपर घोषणा, तसेंच माझ्या नांवाची घोषणा, हीं त्यांत नको होतीं. अशानें कार्य बिघडतें मात्र. सध्यांचा दृष्टिबिंदु मुख्यतः शिक्षण–विषय हा. अर्थात् त्याला मूलभूत राजकीय स्वरूप आहेच. असो. माझें नांव त्यांत प्रामुख्यानें स्तुतीस येत असलेमुळें तर मला जास्त संकोच वाटतो. मला वाटतें माझी कार्यक्षमता त्यामुळें कमी होते. मानसिक अधःपाताचीहि फार भीति आहे.

सायंकाळीं नदीचे रेतींत सभा झाली. म. गांधी अध्यक्ष व मुख्य वक्ते होते. श्रोतृसमाज फारच होता. महात्माजींनीं विद्यार्थ्यांस त्यांच्या लढ्याचें स्वरूप समजावून देऊन कांहीं तरी निश्चित रचनात्मक कार्यक्रम–(१) परदेशी कापडाचा बहिष्कार, (२) खादीप्रचार, (३) दारुबंदी वगैरे–अंगावर घेण्यास सांगितलें.

शिक्षणमंत्र्यांची रा. शिवदासानी यांस तार आलेली ती त्यांनीं मजकडे पाठविली. शिक्षणमंत्र्यांस मी आपण होऊन भेटावयास जाणें योग्य होणार नाहीं, त्यांनीं इच्छा दर्शविल्यास जाण्याची माझी तयारी आहे असें रा. शिवदासानींस कळविलें.

ता. ३१–१–२९

रा. शिवदासानी यांचे शिक्षणमंत्री यांचेशीं झालेल्या बोलण्यावरून तिऱ्हाइतानें किंवा विद्यार्थ्यांनीं परीक्षेचे खर्चाचे पैसे दिल्यास तडजोड शक्य आहे, त्यांनाहि ही अट सयुक्तिक वाटते असें सांगितलें. ते सांगत होते त्या धर्तीवर खर्च देण्याचें विद्यार्थी कबूल करतील असें वाटत नसल्याचेंहि सांगितलें. परंतु या बाबतींत विद्यार्थी, कमिटीचे सभासद, म. गांधी वगैरे सर्वांची भेट घेऊन मग काय तें मी सांगूं शकेन असें कळविलें.

वेळ थोडा व पुष्कळ मंडळीस भेटावयाचें त्यामुळें शेट कस्तुरभाईकडोन मोटार मागविली व प्रथम विद्यार्थ्यांचे पुढाऱ्यांस भेटलों. त्यांना तर ही अट नकोच आहे, एवढेंच नव्हे तर S. M. G. (Shiras must Go शिरास हांकलला पाहिजे) याशिवाय आतां कांहींहि शक्य नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. डॉ. कानुगांचें तसेंच मत पडलें. तेथून सत्याग्रहाश्रमांत (आतां उद्योगमंदिर) महात्माजींस भेटलों. त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें. (अ) शिक्षणमंत्र्यास भेटण्यास हरकत नाहीं, व (ब) मागण्या पुढीलप्रमाणें कराव्यातः—(१) शिरास प्रिन्सिपॉल ठेवूं नये. ही हमी लेखी हवी. पाहिजे तर ती जाहीर करूं नये. पण खासगी ठेवावी. (२) परीक्षा घेणेचें झाली तर फी, खर्च वगैरे कांहीं नाहीं. (३) कोणाहि विद्यार्थ्यांस दंडूं नये. (४) सर्वांस टर्म मिळाली पाहिजे. (५) सरकार जर तिऱ्हाइतांकडून खर्चाचे पैसे घेऊं म्हणेल तर त्यास घेऊं द्यावे. मात्र आपण म्हणजे विद्यार्थी देणार नाहींत एवढें स्पष्ट असावें.

आश्रमांतून दोन विद्यार्थी पुढाऱ्यांकडे व श्री. वल्लभभाईकडे गेलों. त्यांना सर्व हकीकत व महात्माजींची सल्ला सांगितली. सर्वांनीं त्यासच रुकार दिला. वल्लभभाईंनीं तर विशेष सांगितलें कीं शिक्षणमंत्री यांचेशीं जें बोलणें किंवा करार होतील त्याची हकिगत एक तर कोणीहि बोलूं नये अथवा दोघांनीं संमत असें स्टेटमेंट करावें असें ठरवून मग काय तें बोलणें करावें.

सरकिट हाऊसमध्यें गेलों. तेथें शिक्षण प्रधान मौ. रफिउद्दीन अहंमद यांचेबरोबर डायरेक्टर मि. लॉरीहि होते. एकंदर प्रकाराचा रोख प्रथम मला दबवून कांहीं तरी निष्पन्न होतें कीं काय हा पहावयाचा होता. माझेशीं रा. शिरास यांनीं काय तडजोड केली हा विषय काढला. सरकारचे संमतीवर सर्व अवलंबून होते हा मुद्दा. म्हणजे कांहींहि कबूलत नव्हतीच किंवा जी झाली ती सरकारचे संमतीवर अवलंबून असें भासविण्याचा प्रयत्न होता. सरकारची संमति औपचारिकच होती व समजुतीप्रमाणें आम्ही वागलों हेंहि दाखविलें. जर सरकारनें संमति दिली नाहीं तर त्याप्रमाणें रा. शिरास यांनीं मला लगेच कळविणें हा त्यांचा धर्म होता असें मीं सांगितलें. तेव्हां तो शिष्टाचाराचा भंग (Breach of Courtesy) असल्याचें रा. लॉरी यानें

कबूल केलें. प्रधानांनीं मागण्या काय म्हणून विचारतां "सरकार काय म्हणतें तें सांगा" असा आग्रह मीं केला. परंतु त्यांस कांहींच उत्तर देतां न आल्यामुळें मीं माझें म्हणणें पुढीलप्रमाणें मांडलें: (१) परीक्षा पाहिजे तर घ्यावी. (२) त्यास फी वगैरे कांहीं नाहीं. (३) कोणाहि विद्यार्थ्यास दंडूं नये. (४) टर्म घ्यावी. (५) शिरासाहेब प्रिन्सिपाल असतां कामा नये. शेवटचे अटीचे बाबतींत मी बोलत असतांनाच मि. लॉरी मध्येंच बोलले कीं "प्रधानसाहेबांस असें वचन देतां येणार नाहीं." प्रधानसाहेब म्हणत होते कीं मी या गोष्टीचा (Departmentally) विचार करीन. शेवटीं प्रधानसाहेब व लॉरीसाहेब यांनीं विचारविनिमयाबद्दल आमचे आभार मानून या गोष्टींचा काळजीपूर्वक विचार करण्याचें औपचारिक वचन बोलून आमची भेट संपली.

ता. २–२–२९

आज सकाळीं गुजरात कॉलेजचे बाबतींत खा. ब. काद्री भेटावयास आले होते. कांहीं तरी समाधानकारक निकाल लागावा म्हणून दि. ब. हरीलाल देसाई यांनीं त्यांना मुद्दाम, शिक्षणमंत्री येथें असल्याचें कळल्याबरोबर, पाठविलें. पण ते अगोदरच निघून गेले होते. विद्यार्थ्यांच्या सर्व अटी मान्य कराव्या व त्यांस दिलगिरी प्रदर्शित करण्यास सांगावें अशी रा. हरीलाल-भाईंची शिक्षणमंत्र्यांस सूचना होती, असें खा. ब. काद्री यांचे भेटींत समजलें. माझेशीं ही गोष्ट बोलण्यास शिक्षणमंत्र्यास छाती झाली नाहीं कीं योग्य वाटलें नाहीं? कांहींहि असो! बोलले नाहींत ही गोष्ट खरी. खा. ब. काद्री यांस सर्व हकीगत इत्थंभूत सांगून टाकली. सामोपचाराचा एकहि प्रसंग आम्ही वांया दवडला नाहीं व आतां जी परिस्थिति आली आहे तीस अधिकारी सर्व प्रकारें जबाबदार आहेत अशी खात्री करून दिली आहे. आपल्याला कांहीं तोड सुचत नाहीं असें खा. ब. म्हणाले.

ता. ३–२–२९

सकाळीं कॉलेजचे विद्यार्थी भेटावयास आले होते. कॉलेजचें काम घेतल्यापासून कोणीहि विद्यार्थी आल्यास त्यास इतर कामें बाजूला ठेवून मी

भेट देत असतों. ते विचारे इतका त्याग करीत आहेत. त्यांस सहानुभूति दाखविणें हा प्रथम धर्म आहे.

नवीन कॉलेज काढावयाचें झाल्यास लागणाऱ्या पूर्वतयारीची माहिती मागविण्याविषयीं पुण्यास प्रो. म. शं. गोडबोले यांस पत्र लिहिलें.

ता. ५–२–२९

सायंकाळीं संसारसुधारा हॉलमध्यें विद्यार्थ्यांच्या सभेस गेलों होतों. आजचे सभेंत गुजराथींत बोल्लों. मुद्दे पुढीलप्रमाणें:–(१) सेकंड इयर विद्यार्थ्यांस शिरास यांचेकडून सर्टिफिकेट घेणें जरूर असेल तर त्यांनीं परीक्षेस बसूं नये. (२) प्रश्नांचें महत्त्वाचें स्वरूप पाहून त्या मानानें त्यागाची विद्यार्थ्यांनीं विशेष तयारी ठेविली पाहिजे. (२) शांति, विनय व सभ्यता घालवूं नये. ४) प्रत्येकानें आत्मबलावर दृढता ठेवावी. इतर करतात म्हणून करणें व इतर सोडतात म्हणून सोडणें योग्य नाहीं.

ता. ७–२–२९

आज सकाळचे वर्तमानपत्रांतून गुजरात कॉलेजचे बाबतींत सरकारनें काढलेली प्रेसनोट पाहिली. प्रेसनोटमध्यें, सरकारनें ता. २२–१२–२८ची प्रिन्सिपालची नोटीस रद्द केली आहे व परीक्षा घेणार नाहीं असें ठरविलें आहे; नोटिशीविषयीं गैरसमज झाला आहे व केला आहे आणि विद्यार्थ्यांचे मनांत कांहीं तरी भरविण्यांत आलें आहे वगैरे लिहिलेलें आहे. एकंदर प्रकार किळसवाणा आहे. सरकारची इभ्रत अशा चाळ्यांनीं कशी वाढणार? खोट्यास खऱ्याचें स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यानें कोणीच फसत नाहीं तर उलट सरकारचें घाणेरडें स्वरूप व्यक्त होऊन प्रतिष्ठा कमी होते. असो. या प्रेसनोटला उत्तर द्यावयाचें त्याचा मसुदा करावयास बसलों. वर्तमानपत्रांचे प्रतिनिधींस थोडक्यांत अभिप्राय सांगितला: (१) प्रेसनोट समाधानकारक नाहीं; (२) विद्यार्थ्यांस कांहीं दंड करण्यांत येणार नाहीं याची हमी नाहीं; (३) टर्मबद्दलची गोष्ट नाहीं. तेव्हां या प्रेसनोटमुळें संप कसा मोडणार?

ता. ८–२–२९

आज सकाळीं मुंबईस दाखल झालों.

मुंबईत प्रथम पठाणाविरुद्ध दंगे व नंतर त्याला मिळालेलें हिंदु मुसलमान दंग्याचें स्वरूप, यामुळें आज स्वस्थता नाहीं. जो तो भीतींत आहे. सुरक्षितता वाटत नाहीं. मोठ्या रस्त्यावर भय नाहीं पण गल्लीकुचींतून एकट्यानें जाऊं नका असें जो तो सांगतो.

दुपारीं रा. खेर सॉलिसिटर यांचे ऑफिसांत गेलों होतों. रा. मेहेरअली तेथें भेटले. गुजरात कॉलेजची हकीगत सांगितली. दंड न करणें व टर्म भरणें या दोन गोष्टींचा खुलासा झाल्याशिवाय संप मोडतां येत नाहीं असें सांगितलें. येथील सभा उद्यां ठरवावी असें ठरलें.

तेथून सेक्रेटेरीयटमध्यें दि. व. हरीलाल देसाई यांस भेटावयास गेलों. शिक्षणमंत्र्यांची व त्यांची भेटहि झालेली नाहीं. जमल्यास गांठ घेऊन दोन मुद्यांचा निर्णय करण्यास कळविलें आणि सुमारे दोहोंचें सुमारास युनिवर्सिटींत जाऊन तेथून नवा युनिवर्सिटी ॲक्ट व मतदारांची यादी घेऊन हायकोर्टांत गेलों.

नंतर इंडियन डेली मेल ऑफिसांत रा. नटराजन् यांस भेटलों. ते घरीं जाण्यास निघाले होते. "प्रेसनोटमध्यें सर्व कांहीं समाविष्ट आहे. शिक्षण-मंत्र्यांनीं जें केलें तें एकाद्या हिंदु शिक्षणमंत्र्यानेंहि केलें नसतें. शिरास आतां संपूर्ण बदलला आहे," असें त्यांनीं सांगितलें. मला तर वाटतें कीं रा. नटराजन् स्वतः फारच स्वच्छ असल्यामुळें शिरासवर विश्वास ठेवतात. शिरास पुनः असला मूर्खपणा किंवा पाजीपणा करण्याची छाती करणार नाहीं असें वाटतें, पण त्याचें हृदय पालटलें असें वाटत नाहीं.

अमदाबादेहून टेलिफोन आला त्यावरून शिरास यानें कॉलेजांत नोटीस लावून दोन बाबतींचा खुलासा केल्याचें समजलें. कांहीं वेळानें चि. नानाची (चांदोरकर) तारहि आली. आतां कांहीं विशेष राहिलें नाहीं असें वाटतें.

ता. ९–२–२९

सायंकाळीं रा. रोहित मेहेता यांची तार आली कीं शिरास यानें जी नोटीस लाविली तिचा विचार सल्लासमितीनें करून विद्यार्थ्यांनीं आतां

सोमवारपासून कॉलेजांत जावें असें ठरविलें. एक मोठी चिंता दूर झाली व शिरावर घेतलेलें महत्त्वाचें व जबाबदारीचें कार्य यशस्वी रीतीनें पार पडलें ही परमेश्वराची मोठीच कृपा. आतां पुढें हा शिरास विद्यार्थ्यांना त्रास न देवो म्हणजे झालें.

ता. ११–२–२९

आज सकाळीं अमदाबादेस दाखल झालों. सकाळीं रा. वल्लभभाई पटेल व रोहित मेहेता भेटावयास आले होते. गुजरात कॉलेजांत आजपासून विद्यार्थी दाखल होणार. तेव्हां त्यांनीं कसें वर्तावें हें त्यांस सांगणें आवश्यक होतें. म्हणून रा. वल्लभभाई व मी असे दोघेजण पावणे अकरा वाजतां कॉलेजसमोर टिळक छात्रालयांत गेलों. विद्यार्थी व विद्यार्थिनी सर्व तेथें जमले असतां श्री. वल्लभभाईंनीं थोडक्यांत उपदेश केला–"विजयानें उन्मत्त न होतां उलट जास्त विनम्र व्हा, विद्यार्थीबंधूंशीं प्रेमानें वागा" हा मुख्य धागा.

सायंकाळीं नदीचे रेतींत विद्यार्थ्यांची सभा झाली. ही सभा शेवटचीच. प्रथम रोहित मेहेता यांनीं अभिनंदनपर तारा आलेल्या वाचून दाखविल्या. त्यांत महात्माजीकडोन आलेली तार होती. तींत माझा निराळा नामनिर्देश केला होता. असो. नंतर डॉ. हरिप्रसाद यांचें थोडक्यांत भाषण झालें. त्यानंतर मी बोललों–गुजरातींतच बोललों. मतलब पुढीलप्रमाणें: "विजय प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदन, पण त्याबरोबरच जास्त जबाबदारी येत आहे. म्हणून विनयानें वागलें पाहिजे, सहिष्णुता दाखविली पाहिजे, सच्छिष्य बनलें पाहिजे. माझ्याकडून सेवा करून घेतल्याबद्दल आभार." यानंतर कांहीं मंडळी बोलली. त्यांत प्रो. स्वामी नारायण बोलले. त्यांना आमचा उपदेश आवडला नाहीं. 'जशास तसें' हें धोरण असावें असें सांगून "ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्" हें गीतावाक्य त्यांनीं आधारास घेतलें! सर्वांत मागाहून रा. वल्लभभाई बोलले. ते फारच सुंदर, भारदस्त व पथ्यकर बोलले. मुद्दे बहुतेक मीं सांगितले तेच पण भाषा प्रौढ

च मांडणी माझेपेक्षां निदान शतपटीनें उत्तम. शेवटीं "वंदे मातरम्" गाऊन सभा विसर्जन झाली.

सभेनंतर कांहीं विद्यार्थी माझ्याकडे आले होते. तरुण मंडळीस रोज महिनाभर भेटण्याचा योग येत असल्यामुळें एक प्रकारें त्यांचा उत्साह वाढत असे तो आजपासून नाहींसा होणार. सहृदय व निर्मळ मनाच्या युवकांची भेट दुर्मिळ होणार याचें साहजिकच वाईट वाटलें.

ता. १४-२-२९

सकाळीं रा. वल्लभभाई पटेल भेटावयास आले होते. खास काम नव्हतें, एरवींच सामान्य गोष्टी. गुजरात डि. लो. बोर्डातर्फे मुंबई युनिव्हर्सिटींत सेनेटर म्हणून उमेदवारी करण्याची दि. ब. हरीलाल यांनीं मला सूचना केली होती. तिचा रा. वल्लभभाईंबरोबर विचार करतां एकंदरींत उमेदवारी न करणेंच बरें असें ठरविलें. कारणें— (१) जो वेळ त्यांत जाईल त्या प्रमाणांत कार्यनिष्पत्ति नाहीं. (२) डि. लो. बोर्डाची रचना अशी कांहीं आहे कीं त्यांत स्वतंत्रपणें विचार करून मत देणारे फारसे नाहींत. त्यामुळें रा. सा. दादुभाई यांचे पुतण्यासच जास्त मतें पडण्याचा संभव आहे तेव्हां खटपट फार पडेल. इतकी खटपट करण्याचें प्रयोजन नाहीं.

ता, १६-२-२९

रा. × × यांचेकडोन येणें असलेल्या रकमेविषयीं त्यांना पत्र लिहून आठवण दिली. मला वाटतें आपसांत व्यवहार नसावाच. मला उगीच त्रास होतो. त्यांना वेळेवर पैसे वसूल देणें होत नाहीं व मनास घर्षण मात्र विनाकारण होते.

परवां मीं डिस्ट्रिक्ट कोर्टास एक अर्ज केला. एका अज्ञान मुलाचें (१४ वर्षें वय) लग्न १३ वर्षांचे मुलीशीं करण्याची पालकानें परवानगी मागितली. मुलाचे बापानें मरणापूर्वी लग्न ठरविलें होतें. आईहि मेली. त्यास आज १०।१२ वर्षें झालीं. ज्या जातींतील मुलगी तींत यापूर्वी किती तरी वर्षें

लग्न झालें पाहिजे होतें; पण आतां तर लांबणीवर टाकणें म्हणजे जवळ जघळ जातीबाहेर रहाण्याचा प्रसंग. मुलगा कोंवळा आहे. त्यानें स्त्रीसंग करूं नये या एकाच मुद्यावर रा. सप्रे (ॲसिस्टंट जज) यांनीं लग्नास मंजुरी दिली नाहीं. त्यावर माझा अर्ज डि. जज्जांकडे. माझा मुद्दाः— (१) सुधारणा इष्ट खरी पण ती बळजोरीनें लादूं नये. (२) अंतरींची ऊर्मि येऊन झालेली सुधारणा हीच खरी, वगैरे. यावर रा. डेविस साहेबांनीं फारच मजेदार हुकूम केला. त्यांनीं असें म्हटलें आहे कीं " ज्या विद्वान् वकिलांनीं हा अर्ज लिहिला ते असें म्हणणाऱ्या पक्षाचे आहेत कीं सरकार लोकांची इच्छा असतांनासुद्धां सुधारणा करीत नाहीं. पण हें खरें आहे काय ? या अर्जावरून तरी तसें वाटत नाहीं...एकादे वेळीं संभाषणांत जास्त खुलासा होईल. "

ता. १८–२–२९

दुपारीं जेवणाचे वेळीं शेट × × मिलचे कामासाठीं आले होते. म्युनिसिपालिटीची गोष्ट काढली. चीफ ऑफिसरचे कामाविषयीं आपल्याला अतिशय असंतोष असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्यांनीं अध्यक्षांस पत्र लिहिलें आहे. पण आतां त्याविषयीं पश्चात्ताप करून काय उपयोग? अध्यक्षांनीं आपल्या घराच्या बाबतींत जें वर्तन केलें तें माहीत आहे काय असें मीं शेटजींस विचारलें. ' माहीत आहे, परंतु सार्वजनिक कार्यांत बहुतेक माणसें अशींच असतात ' असें त्यांनीं मत ठोकलें. रा. वल्लभ-भाईंचेविषयीं असें म्हणतां येणार नाहीं असें मीं सांगितलें. तेव्हां ' कांहीं गोष्टी तुम्हांला माहीत नाहींत ' असें त्यांनीं दर्शविलें. इतका कलुषित ग्रह विचारपूस केल्याशिवाय जेथें आहे तेथें सांगून काय उपयोग ? पण कालांतरानें तोहि जाईलच. असो.

कुटुंबाची हकीगत कोल्हापुरीं रा. रा. गोविंदरावदादांस (सरदेसाई) पाठ-विण्यासाठीं लिहिण्यास सुरुवात केली आहे. जसें व जितकें काम होईल तें खरें.*

* मावळंकर सरदेसाई घराण्याचा इतिहास लिहिण्याचें काम त्यावेळीं चालू होतें. या इतिहासाचे तीन खंड प्रसिद्ध झाले आहेत.

ता. १९–२–२९

सकाळीं कांहीं वेळ नवीन कॉलेजाविषयीं किती खर्च येईल, विद्यार्थी किती येतील वगैरे अंदाज काढण्यासाठीं बसलों व एकंदर माहितीपत्रक तयार करविलें. अदमासें सहा लाख रुपये पाहिजेत असें दिसतें. माणसें असलीं तर पैसे येतील याविषयीं शंका वाटत नाहीं. पहावें कसें काय गाडें चालतें तें.

सायंकाळचे म्युनिसिपल सभेस हजर राहावयाचें सांगण्यासाठीं रा. ×× आले होते. रा. ×× यांनीं माती घेतली त्याच्या चौकशीच्या कागदांतून त्यांचें स्टेटमेंटच पार उडालें. म्युनिसिपालिटींतून महत्त्वाचे कागद नाहींसे होतात ही अतिशय दुःखदायक गोष्ट आहे. कारभार किती अवनत दशेस पोचला आहे त्याचें हें उदाहरण आहे.

ता. २१–२–२९

भद्रेंत टिळक नांवाचे गृहस्थ सरकारी नौकरींत आहेत. त्यांचे सुमारें १५-१६ वर्षांचे मुलास एक दिवस ताप येऊन आज सकाळीं देवाज्ञा झाली. फारच वाईट प्रसंग. स्मशानयात्रेस गेलों होतों. सप्तर्षी स्मशानांत पोहोंचवून लगेच परत फिरलों. कोणाहि मृताच्या स्मशानयात्रेस गेलें पाहिजे. सहानुभूतीचा हा मुख्य प्रश्न आहे. मला वाटतें कीं कोणत्याहि ज्ञातींतील मृत असो, सर्वांनीं जावें. अशा प्रकारें बंधुभाव जास्त वाढेल.

शेट कस्तुरभाई लालभाई यांच्या पुतण्याचें सोमवारीं लग्न आहे त्यासाठींची जेवणावळ आज होती. " पाटे बेसवुं " म्हणजे ज्ञातींतील मंडळी जेवणास येतील त्यावेळीं पाहावयास गांवांतील संभावीत गृहस्थांस बोलावण्याची चाल आहे. त्याप्रमाणें मी दुपारीं गेलों होतों. तेथें शेटनीं आग्रह केल्यामुळें पुनः सायंकाळींहि जेवणास गेलों होतों. मला जावयास जरा उशीर झाला. पण एका अर्थीं तेंहि बरेंच झालें. जेवणावळींत एका एका ताटांत दोघे दोघे याप्रमाणें जैन मंडळी बसत होती. मला तें कसेसेंच वाटलें. पण त्यांच्या येथें हा प्रकार सामान्यच.

ता. २२–२–२९

रात्रौ कौटुंबिक हकीगत लिहिण्याचें काम पुढें चालू केलें. सुमारें १ तास-भर लिहवीत होतों. लेखक चि. अंतुकाका.

ता. २४–२–२९

कुटुंबाचे इतिहासाचें काम सकाळीं केस कापवीत बसलें असतां चालू ठेवलें.

आज घरीं श्रीसत्यनारायण–पूजा होती. मी व सौभाग्यवती दोघांनीं मिळून पूजा केली. मंडळीस वेळ ७॥ ची दिली, परंतु पोथी वगैरे होऊन प्रसादाची वेळ होईंपावेतों अदमासें ८। झाले. तेव्हां वेळ देण्यांत चूकच झाली.

ता. २५–२–२९

गुजरात कॉलेजचे बाबतींत शिक्षणमंत्र्यास मीं कांहीं तरी पत्र लिहावें असा 'इंडियन डेली मेल' पत्राचे संपादक श्री. नटराजन् यांचा सल्ला होता. आज त्याप्रमाणें शिक्षणमंत्री श्री. मौल्वी रफीउद्दीन अहमद यांस पत्र लिहिलें आहे. शिरास यांस दुसरीकडे कोठें तरी नेमावें अशी सूचना त्यांत केलीच आहे.

कुटुंबीय हकीगत पुढें थोडीशी लिहविली.

ता. २६–२–२९

सायंकाळीं रा. जहांगीर राव यांचेबरोबर आश्रमांत महात्माजींस भेटावयास गेलों होतों. गुजरात कॉलेजचे संपाचे शेवटानंतर भेटीचा योग आला नव्हता. त्यामुळें एरव्हींच भेटावयास गेलों होतों. मी मौ. रफीउद्दीन अहमद यांस पत्र लिहिलें तें सांगितलें. त्यांनीं बरोबर केलें असा स्वतःचा अभिप्राय दिला. परवां ना. शास्त्री येणार आहेत त्यांस उतरून घ्यावयासाठीं शहर-वासियांनीं स्टेशनवर जावें, त्यांस पुष्कळ मान द्यावा वगैरे महात्माजींनीं सांगितलें.

रात्रौ शेट रणछोडलाल अमृतलाल व त्याचे बंधु शेट हर्षदलाल अमृतलाल सल्ला विचारण्यासाठीं आले होते. त्यांचे बंधु शेट जयंतीलाल अमृतलाल यांचेशीं इस्टेटीचे वांटपाविषयीं तक्रार आहे. भावाभावांत सल्ला देण्याचे प्रसंग मोठे कठीण. नातलगांत खरोखर तेढ आली असतां वकिलांचें काम फारच दुर्दैवी–प्रत्येकाचा स्वार्थ जतन करण्यास मदत करावयाची, तेव्हां हें परस्परांत वितुष्ट आणणें नाहीं तर काय? स्वार्थत्याग करून होतां होईल तों भांडूं नये अशी मी सल्ला देतों. पण हा व्यक्तिशः विचार झाला. याचा अर्थ अशी सल्ला देतांना मी वकील नसून एक नागरिक असतों. वकिलांनीं फी न घेतां काम करावें असा रोमन लोकांचे वेळचा नियम किंवा वैद्यांनीं वेतन घेऊं नये हा आपलेकडील नियम किती महत्त्वाचा व दूरदर्शी होता, त्याचें महत्त्व अशा वेळीं समजतें.

ता. २८–२–२९

लो. टिळकांचा पुतळा व्हिक्टोरिया बागेंत म्युनिसिपालिटीनें बसविला आहे तो अनावृत करण्याचें काम म. गांधींचे हस्तें सकाळीं ९ वाजतां झालें त्या समारंभास गेलों होतों. बरीच मंडळी आली होती. पुतळा रा. कोल्हटकर नांवच्या बडोद्याच्या शिल्पकारांनीं केलेला आहे. ब्रॉंझ धातूचा आहे. एकंदर खर्च रु. १५००० आला. म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष रा. दौलतराम यांनीं भाषण केल्यावर रा. कोल्हटकरांनीं चार शब्द सांगितले. कलाकारांस उत्तेजन देणें आवश्यक असून कलेची परीक्षा पैशांनीं होणें शक्य नाहीं. कलेच्या कामाचीं एस्टिमेटें करतां येत नाहींत हा त्यांचा मुख्य मुद्दा.

त्यानंतर महात्माजी बोलले–लोकमान्यांचे गुणवर्णनांत त्यांचा साधेपणा व त्या साधेपणाची हिंदुस्थानसारख्या गरीब देशांत आवश्यकता हा मुख्य मुद्दा होता. एक समय असा होता कीं सरकारी मदत घेणाऱ्या सार्वजनिक लायब्ऱ्यांतूनहि लोकमान्यांचा फोटो ठेवणें म्हणजे राजद्रोह होता. आतां व्हिक्टोरिया बागेंत म्युनिसिपालिटीसारखी स्थानिक स्वराज्य संस्था पुतळा करूं शकते हें बदललेल्या मनूचें लक्षण आहे. हा पुतळा म्हणजे मूर्तिपूजा नव्हे हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे या आशयाचें भाषण करून पुतळा अनावृत केला.

म्यु. बागेंतील समारंभ आटोपून लगेच महात्माजींचे हस्तें म्यु.वर राष्ट्रीय ध्वज फडकविण्याचा विधि म्यु.च्या गांधी हॉलमध्यें व्हावयाचा होता, तेथें गेलों.

राष्ट्रीय ध्वजाची कल्पना त्यांनीं तेथें सांगितली. त्यांतील तीन रंगांपैकीं लाल रंग हा हिंदूंचा द्योतक आहे; हिरवा मुसल्मानांचा व पांढरा रंग इतर सर्वांचा. ज्यास जें लिहिणें म्हणजे आपली छाप करणें ती त्यानें पांढऱ्या रंगावर करावी. पारशी, क्रिस्ती, यहुदी वगैरेंचा निदर्शक असा तो रंग आहे. तिन्ही रंग एकत्र म्हणजे सर्व वर्णांच्या ऐक्याचा भाव. त्यावर चरखा आहे तो हेंच दाखवितो कीं सामान्य जनतेचें हित हाच मुख्य लक्ष्यबिंदु. चरख्याच्या द्वाराच उद्यम व अहिंसा यांचा प्रचार व्हावयाचा. हा ध्वज चढविणें म्हणजे तो कायम ठेवण्याची जबाबदारी म्युनिसिपालिटी घेत आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ध्वज म्हणजे एक फडकें, त्यास महत्त्व नाहीं. पण त्याच्या पाठीमागें जी भावना आहे त्या भावनेचें महत्त्व आहे. याप्रमाणें मुद्दे मांडून महात्माजींनीं ध्वज फडकविण्याचा विधि केला व आम्ही सर्व परत आलों.

भोजनोत्तर लगेच स्टेशनवर नेक नामदार श्रीनिवास शास्त्री दिल्लीहून येणार असलेमुळें त्यांस घ्यावयास गेलों होतों. बरीच मोठी मंडळी स्टेशनवर आली होती. रा. शास्त्री यांस बरोबर घेऊन सत्याग्रहाश्रमा(उद्योगमंदिरा)-पावेतों गेलों होतों. वाटेंत व्हिक्टोरिया बागेंत उतरून लोकमान्यांचा पुतळा पाहिला. चांगलासा साधला नाहीं असें त्यांचें मत पडलें. पुढें जातांना गुजरात विद्यापीठामध्यें उतरून विद्यार्थ्यांस आशीर्वाद दिला. येथें रा. शास्त्री यांचा सत्कार जुन्या तऱ्हेनें कुंकू व अक्षतांनीं केला व हार सुताचा घातला. मला हा विधि बरा वाटला. रा. काकासाहेब कालेल्करांनीं विद्यापीठाविषयीं थोडक्यांत हकीगत सांगितली.

सायंकाळीं ६॥ वा. नदीचे रेतींत पुलाजवळ रा. शास्त्री यांचें महात्मा गांधींचे अध्यक्षतेखालीं भाषण झालें. दक्षिण आफ्रिकेंतील त्यांचे कामगिरीविषयीं बोलले. इंग्रजी भाषा, उच्चार, आवाजाचें माधुर्य वगैरे बाह्य गुण चांगलेच होते, पण मला तें भाषण फारच फिक्कें वाटलें. इतकेंच नव्हे तर कांहीं अंशीं आवडलेंहि नाहीं. आत्मश्लाघाच त्यांत भरलेली दिसली.

रा. शास्त्री गुजरात मेलनें मुंबईस रवाना झालें.

ता. २–३–२९

रात्रौ कुटुंबीय हकीगत थोडी पुढें लिहिली. आज लिहिण्याचें काम सौभाग्यवतीनें केलें.

ता. ३–३–२९

श्रीकृष्णमंदिरांत मुलांचे नमस्कारांचे सामने होते ते पहावयास गेलों होतों. वेळ ७ वाजतांची असूनहि ७॥ पावेतों सुरुवात नव्हती व एकंदर प्रकार शैथिल्याचा. जागेची झाडलोट केली नव्हती. रस्त्यांतून कचरा अतिशय. शेजारच्या घरच्या लग्नामुळें खरकट्या पत्रावळी वगैरे उडत असलेल्या. किती शोचनीय सामाजिक अस्तित्व–अथवा सामाजिक अस्तित्वाचा अभावच म्हणावयाचा !

ता. ६–३–२९

सकाळीं बडोद्याचे रा. × × येथील म्युनिसिपालिटींत नौकरीसाठीं केलेल्या अर्जासंबंधांत सभासदांस भेटावयास आले होते. या म्युनिसिपालिटींत चांगल्या मनुष्यानें नोकरीस येऊं नये हें त्यास त्याचे व्यक्तिशः हिताचे दृष्टीनें सांगावें लागतें–याचा अर्थ आमचे स्वराज्याचे नालायकीची कबुली नव्हे काय ? मला तर ही स्थिति अत्यंत लाजिरवाणी वाटते. पण याला उपाय काय ?

ता. ८–३–२९

आज विलायतचें टपाल लिहिलें. मिस् रिचर्डस्, रा. मावळंकर यांना पत्रें लिहिलीं. पापड व सांडगे यांचें एक पार्सल रा. मावळंकरांकडे पाठविलें.

ढालचे पोळेंतील रा. वाडीलाल हे विलायतेस जात आहेत. त्यांजला केवळ हिंदी पद्धतीचे व देशीच कापडाचे कपडे घेऊन जाण्याचा आग्रह केला. युरोपियन कपडे असल्याशिवाय कांहीं व्यापारी कंपन्या आपणास दाद देणार नाहींत असा त्यांचा समज दिसतो. किती वेडेपणा हा ! आम्ही

हिंदी आहोंत हें त्यांस इतर गोष्टींवरून ओळखतां येणार नाहीं काय? असो. मी तर आग्रह केलाच आहे.

ता. ९–३–२९

रा. वल्लभभाई पटेल सकाळीं आले होते. म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षपदाविषयीं रा. अंबालालशेट यांनीं गोष्टी काढल्या होत्या त्याविषयीं बोलणें झालें. रा. ×× हे अध्यक्षपदासाठीं उमेदवार आहेत. रा. अंबालाल यांस तें पसंत नाहीं. रा. ×× हे सरकारनियुक्त सभासद, तेव्हां आम्हांस तर असे अध्यक्ष पसंत असणें शक्यच नाहीं. लोकनियुक्तांमध्यें लायक असे कोणीच नसून फक्त मीच (मावळंकर) काय तो योग्य आहे असें शेट अंबालाल यांचें मत. पण मी अध्यक्षपद कसें घेणार? श्री. ×× सारखा मनुष्य चीफ ऑफिसर असतांना तर तें शक्यच नाहीं. आणि पुरेसा वेळ नाहीं हें तर खरेंच. सरकारनियुक्तांपैकीं कोणी अध्यक्ष झाल्यास आपण म्युनिसिपालिटींतून राजीनामा द्यावा अशी सूचना करण्यासाठीं मी मंडळींस भेटावयास गेलों होतों.

ता. १०–३–२९

आज राष्ट्रीय सभेचे ठरावाप्रमाणें राष्ट्रीय दिवस पाळावयाचा, त्यासाठीं सायंकाळीं पांच वाजतां मिरवणूक होती. नंतर आजच्या सभेंत नेहरू रिपोर्टास पाठिंबा देण्याचा ठराव मीं मांडावा अशी रा. वल्लभभाईंची आज्ञा झाली. प्रसंग फार कठीण, पण हुकूम पाळणें हाच धर्म. मीं तो ठराव मांडला. फार बोललों नाहींच. शक्यच नव्हतें. अध्यक्ष रा. वल्लभभाई बोललेच होते. माझे मुद्दे दोन मीं मांडले:—(१) हिंदुस्थानास कशी राज्यव्यवस्था हवी याचा विचार करणें फार गहन आहे. सर्वांनीं विचार करणें शक्यच नाहीं. तेव्हां पुढाऱ्यांवर विश्वास ठेवला पाहिजे व सर्वांनीं जी पद्धति मान्य केली ती आपणहि केलीच पाहिजे. (२) आपल्या स्वराज्याची योजना आपण करणें हेंच खरें स्वयंनिर्णयाचें तत्त्व. आमचें स्वराज्य कसें असावें हें ठरविण्याचा सायमनसाहेबांस किंवा इतर कोणासहि

हक्क नाहीं. तेव्हां ज्या योजनेस आपण पाठिंबा देत आहोंत ती आपली आपण घडविलेली आहे हा मुख्य विशेष.

याप्रमाणें मी बोलल्यावर रा. इमामसाहेब बाबाझीर व रा. काकासाहेब कालेलकर यांनीं मला पुष्टि दिली व रा. वल्लभभाईंचा समारोप होऊन सभेचें काम संपलें. या सभेंत एक मुसल्मान दारू पिऊन वाटेल तें बडबडत आला होता. त्याला कोणी तरी मुद्दाम सभेच्या कामास विक्षेप करण्यासाठीं पाठविला असावा अशी कल्पना आहे.

ता. ११–३–२९

रा. ×× यांस त्यांचेकडे येणें असलेल्या रकमेविषयीं पत्र लिहिलें. वायद्यावर वायदे करावयाचे व एकहि पाळावयाचा नाहीं! अशानें व्यवहार कसा होणार? बरें. आपसांत व्यवहार केला कीं तयारी अशी पाहिजे कीं मागितल्याबरोबर वाटेल तिकडून आणून दिले पाहिजेत. व्यवहार पतीवर चालत असतो. मला जर माझे पैसे अडीअडचणीचे वेळीं मिळतील अशी खात्री असेल तर चिंताहि नको व व्याजहि कमी चालेल. पण ते मिळणार नाहींत असाच भरंवसा उलट वाढत चालला तर कितीहि व्याज दिलें व मला जरी जरूर नसली तरी पैसे टेवावे असें वाटणारहि नाहीं.

मला वाटतें माझा प्रयोग झाला हा पुरे झाला. पैशाचा व्यवहार एक पैचाहि–उसनवारीचा–बंद करण्याचाच मीं निश्चय केला. दिलगिरीची गोष्ट! समाजाची किती वाईट स्थिति!!! आम्ही पोष्ट ऑफिस सेव्हिंग बँकेंत पैसे ३ टक्के व्याजानें टेवतों–माझे अशोक, सरसरपूर व अरुण मिलमध्यें ४५ हजारांवर पैसे आहेत, पण आमचे नातलगांस रु. ५ हजारसुद्धां उसनवार देण्याची सोय नाहीं! पण हा दोष कोणाचा? माझे विचार किती स्पष्टपणें रा. ×× यांस सांगितले आहेत! हा दोष माझा खासच नव्हे असें माझें मन मला सांगतें. जेथें जेथें हा प्रयोग मीं केला तेथें तेथें यश आलें नाहीं. असो. समाजांतील ही दुर्दैवी कहाणी आहे!

प्रेमाभाई हॉलमध्यें अमेरिकेचे प्रख्यात मद्यपाननिषेधप्रवर्तक 'पुसीफूट जॉन्सन' यांचें श्री. वल्लभभाईंच्या अध्यक्षतेखालीं भाषण होतें त्यास गेलों.

होतों. श्रोते मंडळीस त्यांचें भाषण समजलें असावें असें दिसलें नाहीं दारूबंदीचे कायदे निरुपयोगी ठरले, कारण चोरून दारू पिणें अजून नष्ट होत नाहीं या आक्षेपास त्यांनीं उत्तम उत्तर दिलें—चोऱ्या, दरवडे वगैरे थांबले आहेत का? मग त्याविरुद्ध कायदे कशाला? ते कां बंद करीत नाहींत?

ता. १३-३-२९

आज दुपारीं कोर्टांत रा. पाटील वकील यांचेबरोबर श्रीमान् पुरोहित-स्वामी भेटले. देशी तत्त्वज्ञानाचा प्रचार युरोपांत करण्यासाठीं व तद्द्वारा हिंदुस्थानास फायदा करून देण्यासाठीं युरोपांत जाण्याचा स्वामींचा विचार आहे. स्वामींच्या एकंदर बोलण्याची माझ्यावर फारशी छाप पडली नाहीं. त्यांचें म्हणणें मला पटलें नाहीं.

सायंकाळीं शेट मंगळदास यांचेकडे रा. पुसीफूट जॉन्सन यांस पार्टी होती त्यासाठीं गेलों होतों. बरीच मंडळी आली होती. डॉ. ×× आले होते. हा इसम इतका नीच व हलकट आहे कीं आतां यास सामान्य सौजन्यदर्शक सलामसुद्धां द्यावयाचा नाहीं असें मीं ठरविलें आहे. सरकारी खुशामत व आपल्या लोकांस शिव्या, स्वराज्यद्वेष, स्वार्थ, अनीति वगैरेनीं भरपूर अशा माणसांस आपण सौजन्यानें मोठेपणा राहूं देतों ही चूक आहे. त्यांना लोकमताच्या कडकपणाची चुणूक दाखविली पाहिजे. त्याशिवाय अशी मंडळी वठणीवर येणें अथवा अशा पंक्तींत नवी मंडळी जाण्याचें थांबणें शक्य नाहीं. गुजरात कॉलेजच्या संपाचे बाबतींत म्युनिसिपालिटीविरुद्ध यानें 'टाइम्स'मध्यें लिहिलेल्या लेखाबद्दल माफी मागितली, तरीसुद्धां अजून मागाहून घाणेरडे लेख हा लिहीतच आहे! अशा निर्लज्ज माणसास सौजन्य कशाचें?

येथें ओसवाल जैन ज्ञातींत एक वृद्ध-तरुणी-विवाह (१५ वर्षांचे मुलीस तिचे आईबाप ५३ वर्षांचे वरास देत आहेत) व्हावयाचा होता. तेव्हां ज्ञातींतील तरुण मंडळींनीं डिस्ट्रिक्ट कोर्टास 'गार्डिअन अँड वॉर्ड अॅक्ट' प्रमाणें अर्ज करून मनाई हुकूम मिळविला आहे. त्याविरुद्ध मला वकीलपत्र

देण्यास वृद्ध नवरदेवाचे बंधु आले होते. केस उद्यां चालावयाची. पैसे खूप देण्यास तयार झाले असते, पण अशी समाजविघातक व अनीतिकारक गोष्ट घडविण्यास वकील या नात्यानें हजर राहूनसुद्धां कारणीभूत होण्याचें मीं साफ नाकारलें. जो पैसा देईल त्याचें म्हणणें, स्वतःचा विचार बाजूला ठेवून कोर्टापुढें मांडावयाचें, असा वकिलीचा अर्थ नाहीं असेंहि त्यांना सांगितलें व अशा लग्नापासून परावृत्त होण्याचा उपदेश केला. अर्थात् उपदेशाची काय बोळवण होणार तें माहीतच आहे व मला तसा अधिकारहि नाहीं. पण माझें कर्तव्य मीं केलें, इतकेंच.

ता. १५–३–२९

सायंकाळीं घरीं येऊन नंतर रा. रा. भास्करराव यांचेकडे समाचारास गेलों होतों. तेथें पुष्कळ गप्पागोष्टी निघाल्या. सार्वजनिक कार्यांत काम करणारी मंडळी कमी झाली. कोणीहि कामें प्रामाणिकपणें व खंत ठेवून करीत नाहीं. माझा स्वतःचा तो विचार आहे असें रा. भास्करराव यांस मीं सांगितलें. त्यांनीं हंसत हंसत वचन मागितलें व मींहि विनोदांत वचन दिलें आहे. पण तें पाळावयाचेंच अशा बुद्धीनें दिलें आहे. तें पार पाडण्यास परमेश्वर शक्ति देवो.

१७–३–२९

आजच्या 'शक्ति' पत्रांत माझेविषयीं एक अतिशय कुत्सित स्फुट आलें आहे. म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष मी होणार अशी लेखकाची समजूत. ती ठाम गृहीत धरून माझे कांहीं विचारावर टीका. माझ्या ज्या विचारावर टीका ते पुढीलप्रमाणें:—स्वराज्य अथवा लोकसत्ताक राज्य याचा अर्थ सुराज्य असा नसून जसें–वेडेंवाकडें राज्य–असेल तसें तें सुराज्य असेल तर दुधांत साखर–पण लोकमतनिदर्शन हा जर प्रजासत्ताक राज्याचा प्राण तर प्रत्येक बाबतींत लोकनियुक्त सभासदच कार्यकारी मंडळांत पाहिजेत. अशा स्थितींत म्युनिसिपालिटीचे अधिकारी–अध्यक्ष, उपाध्यक्ष, निरनिराळ्या कमेट्यांचे अध्यक्ष सर्व लोकनियुक्तच हवेत–हा आमचा आग्रह सन १९१९

पासून. तेव्हां जर एकादा सरकारनियुक्त सभासद अध्यक्षपदासाठीं उमेदवारी करीत असेल तर त्यास (तो लायक असेल तर) प्रथम विनंति कीं " आपण लोकांतर्फे निवडून यावें, आपणांस जागा देण्याविषयीं मी माझे जागेचा राजिनामा देऊन आपले निवडणुकीसाठीं खटपट करण्यासहि तयार आहे. " त्यांनीं ऐकलें तर उत्तमच; व नच ऐकलें तर सरकारनियुक्तास—इतर दृष्टीनें कितीहि लायक तो असला तरीसुद्धां—बाजूस ठेवून लोकनियुक्तासच पसंत करणें क्रमप्राप्त आहे. लोकांचा प्रतिनिधि ही एकच गोष्ट स्वराज्याचे दृष्टिबिंदूनें इतकी महत्त्वाची आहे कीं इतर गुणावगुणांकडे त्या मानानें कमी महत्त्व दिलें जावें. अर्थात् एकादा लोकनियुक्त अनीतिमान, लुच्चा असेल तर त्यास मत देणार नाहीं. पण अशा स्थितींत सरकारनियुक्तासहि मत देणार नाहीं. कोणासहि मत न देतां तटस्थ किंवा सरकारनियुक्ताचेविरुद्ध व लोकनियुक्ताचे वेळीं तटस्थ अथवा विरुद्ध मत देणार. असो. ही माझी विचारसरणी. तिचा विपर्यास करून " शक्ती "तील लेखकानें शिंतोडे उडविले आहेत व माझे विचारसरणीस " स्वार्थी दांभिकता " असें नांव दिलें आहे. यांत स्वार्थ तो कुठें आहे व दांभिकता ती कशी आहे हें समजणें कठीण आहे. लेखकाचे मतें मला अध्यक्ष व्हावयाचें आहे व म्हणून लोकनियुक्तासच मत दिलें पाहिजे अशी विचारसरणी मी मांडीत आहें. वस्तुस्थिति तशी नाहीं. एवढेंच नव्हें तर यदाकदाचित् अध्यक्ष होण्याचे मनांत घेतलेंच तर मला त्यांत यश येईलच यांत मला तर शंका वाटत नाहीं. शेठ अंबालाल भाईंचीहि इच्छा मी अध्यक्ष व्हावें अशी आहे. पण मला तें स्वतःलाच करणें नाहीं, कारणें दोनः—(१) मला स्वतःला तितका वेळ नाहीं. वकिली व अध्यक्षपणा दोन्ही एकाच वेळेला शक्य नाहीं. सर्व वेळ त्यांतच दिला पाहिजे. (२) जोपावेतों ×× सारखा मनुष्य आहे किंवा भगत यानें आपला स्वभाव व मनोदशा पालटलेली नाहीं तोंपावेतों माझ्यासारख्याचें त्याच्याशीं जमणें शक्य नाहीं. असो. पण बिचाऱ्या 'शक्ती'च्या लेखकास हें काय माहीत ? किती क्षुद्र मनोदशा ! आमचे लोकमताचे पुढारी होऊं पाहाणारे किती क्षुद्र व व्यक्तिशः

राग–द्वेषाचे दृष्टीनें पाहाणारे ! सुदैवानें लोकांत यांचा बडेजाव नाहीं व लोक केवळ कार्यदृष्टीनेंच पाहात आहेत !

शाहीबागेंत सर चिनुभाईंच्या शांतिकुंज बंगल्यांत साहित्यसभेतर्फेचे नाट्यप्रयोग, नृत्य वगैरे कार्यक्रमास गेलों होतों. प्रयोग फारच चांगले झाले. शुद्ध अभिनय, नृत्य, रंगभूमीवरील साधेपणा. परंतु औचित्य, लाइट वगैरे सर्व उत्तम होतें. मोठमोठ्या कुटुंबांतील मंडळींनीं ललितकलांस याप्रमाणें उत्तेजन देणें व सामान्य जनतेस त्याचें दर्शन करविणें खरोखर योग्य आहे. कलेचा दर्जा वाढतो व हल्लीं हलकट लोकांच्या हातीं कला असल्यामुळें तिला जो एक हलकटपणाचा मुलामा आलेला आहे तोहि नाहींसा होतो.

ता. २१–३–२९

आज एकादशीचा उपवास होता. फराळ करूनच उपवास–! एकादशी व इतर दिवसांचे उपवासांचा किती विपर्यास झाला आहे ! कडकडीत उपोषण केलें तर तें योग्य. पण उपासाचे पदार्थ इतके करतात–संख्येनें, तऱ्हेनें व चवीलाहि–कीं त्याचा खरोखर अर्थ म्हणजे निराळ्या तऱ्हेनें, चमचमीत खाणें, खाण्याचा जो दिवस, तो उपासाचा दिवस ! उपासाच्या पदार्थांनीं भरलेलें ताट पुढें आलें म्हणजे मला कायद्यांतील Equity follows the law या म्हणीची आठवण होते. उपास also follows मेजवानी. चटण्या, लोणची, पापड, आमटी, खिचडी, पुऱ्या, कडबोळीं, चकल्या, भजीं, भाजी वगैरे पदार्थ जो जो एरव्हीं होतो तो तो प्रत्येक उपवासाचे यादींत आहेच !

ता. २९–३–२९

रा. रा. बाळासाहेब शेवडे यांना कै. बाबांच्या कांहीं आठवणी लिहिण्यास सांगितलें होतें. त्या त्यांनीं आज पूर्ण करून दिल्या. स्वभावचित्र दाखविणाऱ्या कांहीं गोष्टी दिल्या आहेत. त्यांतील ती. बाबांचे व माझे विचार किती तंतोतंत जुळतात ! मी समज येऊन त्याचेशीं विचारविनिमय करूं शकेन इतक्या मोठ्या वयाचा होईपावेतों ते जर असते तर परमेश्वराची ती

केवढी कृपा झाली असती ! पण ईश्वरानें त्यांचें पुत्रत्व दिलें आहे हें काय थोडें आहे ? असो.

ता. ३१–३–२९

सायंकाळीं रा. डाह्याभाई पटेल धोळक्याहून आले होते. संकटनिवारण कमिटीचे फंडांतून त्यांना धोळका तालुक्यांत इतर कामासाठीं पैसे पाहिजेत. तशी मदत करतां येत नाहीं असें मीं सांगितलें. त्यांस पसंत पडलें नाहीं पण ज्या कामासाठीं लोकांनीं पैसे दिले त्या कामाव्यतिरिक्त इतर कामास पैसे कसे वापरावे ? तसें करणें म्हणजे विश्वासघातच आहे. पण दुर्दैवानें सार्वजनिक कार्यकर्त्यांत याची जाणीव असावी तशी नाहीं.

ता. २–४–२९

आज सकाळीं रा. संत भेटले. आफ्रिकेची हकीकत विचारली. त्या वाजूस प्रवासास जावें असें वाटतें. देशोदेशीं फिरून सर्व जग पाहावें अशी दिवसेंदिवस लालसा वाटूं लागली आहे. पण आधीं हिंदुस्थान व महाराष्ट्र पाहिलें पाहिजे यांत शंका नाहीं.

ता. ६–४–२९

सायंकाळीं गुजरात क्लबांत जेवणासाठीं मी व सौभाग्यवती गेलों होतों. स्त्रियांनीं अशा ठिकाणीं येऊन मिसळलंच पाहिजे असें वाटतें. निदान मीं तरी थोडी थोडी सुरुवात केली आहे.

ता. ७–४–२९

रा. ×× सकाळीं आलेले होते. म्युनिसिपालिटीचे अध्यक्षपदासाठीं ते उमेदवार आहेत. एकप्रकारें धृष्टता तर खरीच. पण त्यांत गैर तरी काय आहे ? लोकनियुक्त आहेत. एल्एल्. बी. आहेत. श्री. ×× जर योग्य तर ते कमी कां ? नवेपणा हा कांहीं गुन्हा नाहीं. पूर्वी जे अध्यक्ष झाले ते प्रथम तरी नवीनच होते कीं नाहीं ? परंतु हल्लींचा म्यु. तील

प्रकार फारच किळसवाणा झालेला होता. रा. ×× यांस विरोध करण्यासाठीं त्यांची मोटरकार म्यु. पंपिंग स्टेशनवर रिपेर करण्यासाठीं होती त्या बाबतींत रा. ×× (चालूं म्यु. अध्यक्ष) यांनीं रातोरात जाऊन स्टेटमेंटें घेतलीं. हेतु लोकसेवा नव्हे तर एकमेकांचीं बिंगें बाहेर काढून हलकेपणाचें प्रदर्शन. धुळवडीचाच हा प्रकार झालेला आहे. श्री. वल्लभभाईंस नांवें ठेवणाऱ्या लोकांचें खरें स्वरूप प्रगट होत आहे यांत शंका नाहीं. लोकांस वाईट राज्यामुळें त्रास होईल हें खरें. पण स्थानिक स्वराज्याची प्रगति अशामुळेंच होईल. रा. ×× हे अध्यक्ष लायक आहेत असें पुष्कळांचें म्हणणें. ते सरकारनियुक्त आहेत हा मोठाच दोष. पण तसे नसते तरी जास्त लायक कोणत्या दृष्टीनें ? वकिलींत त्यांनीं त्यांचें शीलाचें जें आविष्करण केलें आहे त्यावरून स्पष्ट नाहीं काय ? मला तर कमी अकलेचा पण जास्त नेकीचा व खऱ्या शीलाचा मनुष्य जास्त पसंत आहे. व त्या दृष्टीनें रा. ××कमी आहे काय ? पण या बाबतींत मी मत देणार नसून जर सरकारनियुक्त अध्यक्ष निवडला गेला तर राजिनामा देण्याचा मीं निश्चय केला आहे.

ता. ९-४-२९

आज सकाळीं कोर्टांत विशेष काम नसल्यामुळें घरचे हिशेब लिहीत बसलों होतों. पक्के हिशेब लिहिण्याचें काम फारच मागें पडलें आहे तें कसेंहि करून पूर्ण केलेंच पाहिजे. या उन्हाळ्याचे सुट्टीचा उपयोग या कामींच करणें प्राप्त आहे.

म्युनिसिपल अध्यक्षपदासाठीं श्रीमती ×× बाई उमेदवारी करणार असें वाटत आहे. त्या जरी झाल्या तरी सरकारनियुक्तच. त्यामुळें मन जरा कचरतें. अर्थात् स्त्रीजातीविषयींचा जो स्वाभाविक आदर त्यास कितपत नमतें घ्यावें हाच प्रश्न. अध्यक्षपदास त्या योग्य आहेत असें वाटत नाहीं. एक रा. वल्लभभाईशिवाय खरोखर योग्य असा कोणीच नाहीं. तरी पण अजून मीं निश्चय केला नाहीं. श्री. ×× बाई योग्य नाहींत म्हणजे केवळ कामाच्या दृष्टीनें. त्यांस तें झेपणार नाहीं. बाकी शिक्षण, शील, चारित्र्य

वगैरे इतर सर्वगुणमंडित त्या आहेत, इतकेंच नव्हे तर त्यांचा नंबर सर्व सभासदांत फारच वर लागेल यांत शंका नाहीं. आणि त्या जर सरकार-नियुक्त नसत्या तर डोळे मिटून मीं त्यांना मत दिलें असतें.

ता. १२-४-२९

आज सकाळचा वेळ कोर्टांत जवळ जवळ फुकट गेला. आपली सर्वांची काम करण्याची पद्धत अशी कांहीं विलक्षण आहे कीं, वेळाची किंमत कोणासच नाहीं. काम नसून फुरसत नाहीं. प्रत्येक जण जर वेळेवर आपापलें काम करील तर किती तरी वेळ वांचेल. जास्त काम करतां येईल-निदान विश्रांति तरी किंवा इतर वाचन तरी होईल. पण दुर्दैवानें याची जाणीव शिकलेले म्हणविणाऱ्या लोकांतहि नाहीं.

दुपारीं, सायंकाळीं व रात्रीं अशोक मिल व मजुर महाजन यांचेमधील मजुरांविषयींचें तंट्याचा निर्णय लिहिला. सुमारे साडेचार तास लागले. या निर्णयानें कदाचित् मजूर महाजन मंडळीस असेंहि वाटेल कीं माझी दृष्टि मिलमालकांचे संबंधामुळें दूषित आहे. पण मला तसें वाटत नाहीं. महाजनाचें कृत्य चुकीचें आहे असें मला वाटलें व तेंच मीं प्रामाणिकपणें म्हटलें आहे. Everything is fair in love and war (प्रेमाच्या आणि युद्धाच्या बाबतींत सर्व कांहीं बरेंच असतें) या तत्त्वावर महाजन जर वागूं इच्छित असेल तर कांहींच म्हणणें नाहीं, पण महात्माजींच्या सल्ल्याप्रमाणें जर सत्य व अहिंसा या दोन तत्त्वांविषयीं महाजनचे चालकांस खरोखर अंतःकरण-पूर्वक आस्था वाटत असेल तर मात्र खोटी केस करतां कामा नये. माझें मत मीं निर्भीडपणें मांडलें आहे. आतां यावर जो काय कटाक्ष मजूर महाजन करील तो खरा! उद्यां ते फैसले मिलकडे व महाजनकडे पाठवावयाचे आहेत.

दुपारीं आत्मकथेचा कांहीं भाग पुढें चालूं ठेविला.

ता. १३-४-२९

स्नानास मुलांसह नदीवर गेलों होतों. परत येतांना श्रीमारुतीमंदिरांत रामनाम अखंड सप्ताह चालला आहे तेथें पांच मिनिटें जाऊन नामाचा जप करून आलों. यंदा एकदांहि तासाचा पाहारा ठेवणें झालें नाहीं.

ता. १३–४–२९

सायंकाळीं रा. ×× चें म्युनिसिपालिटींतून निमंत्रण आलें. त्यावरून. सभेस गेलों. नाहीं तरी जाणारच होतों. बोलावण्यास त्यांनीं रा. गज्जर' यांची मोटर पाठविली. पण त्यांतून न जातां मी शेठ रणछोडलाल भाईंचे बरोबरच त्यांचे मोटारींतून गेलों. सभेंत गेल्यावर एकंदर प्रकार जरी नवीन नाहीं तरी पण पाहून वाईट वाटलें. व्यक्तिगत रागद्वेषाचा पूर वाहात होता व त्यांत म्युनिसिपल हित अगदीं बुडून गेलें होतें. मीं मत द्यावें असा रा. ×× चा फारच आग्रह–मत देणें अगदीं गैर आहे–दोन्ही सरकार-नियुक्त उमेदवार–त्यांत आपण मध्यें पडण्याचें कारण नाहीं असें मन सांगें व दुसरीकडे रा. ×× व ×× चा ओढा. पण अशा स्थितींत फार वेळ राहावें लागलें नाहीं. माझा निश्चय झालाच होता व मतनोंदणींत श्रीमती ×× यांस मत देतील असें वाटत होतें. त्यांपैकीं ४।५ जणांनीं मत देण्याचें नाकारल्यामुळें रा. ×× यांनींहि आग्रह सोडला. या वाबतींत रा. ×× वगैरे मंडळींनीं म्युनिसिपल तात्पुरते हिताचे दृष्टीनें खूप प्रयत्न केला हें खरें; पण तत्त्व सोडलें व ही मोठीच चूक केली आहे असें मला तर वाटतें. सभेंतून घरीं परत आल्यावर मीं सभासदत्वाचा राजिनामा देण्याचा विचार ठरवून त्याचा मसुदाहि लिहिला आहे. मथितार्थ हाच:–(१) काम करण्यासारखें वातावरण नाहीं. व्यक्तिगत रागद्वेष आहे. (२) प्रजाकीय तत्त्व नष्ट करून सरकारनियुक्त अध्यक्ष निवडला. (३) अशा स्थितींत मला निवडणाऱ्या मतदारांस स्वत:चा दुसरा प्रतिनिधि निवडण्याची संधि दिली पाहिजे. रा. वल्लभभाई उद्यां येणार आहेत. ते आले म्हणजे त्यांचेशीं सल्लामसलत करून काय तें शेवटचें नक्की ठरवूं.

ता. १४–४–२९

सायंकाळीं रा. वल्लभभाईंकडे गेलों होतों. रा. बलुभाई वगैरे मंडळी होती. मी राजिनामा सध्यां देऊं नये असें ठरलें. श्रीमती विद्याबेहेन यांना मत देण्यांत मंडळींनीं चूकच केली असें रा. वल्लभभाईंनींहि सांगितलें. त्या मंडळीस आतां सरकारनियुक्त सभासद अध्यक्ष झाल्यामुळें राजिनामा देतां

येत नाहीं व मी एकट्यानेंच राजिनामा देण्यांत त्यांची वाईट स्थिति होते असें म्हणणें पडलें व म्हणूनच मीं सध्यां राजिनामा देऊं नये असें ठरलें. मला हें गौणच वाटतें. पण रा. वल्लभभाई राजिनामा देणार नाहींत. मंडळी-चरोबर राहाणेंच योग्य. तेव्हां स्वस्थ बसणें गैर होणार नाहीं, अशा समजुतीनें राजिनामा देण्याचें तहकूब ठेविलें आहे.

ता. १७-४-२९

दुपारीं सरदेसाई (कुटुंब) संमेलन व श्रीनृसिंहजयंतिउत्सवासाठीं कोंकणांत निरनिराळ्या मंडळीस पत्रें लिहिलीं.

यंदाच्या उन्हाळ्यांत पुण्यास राहण्यासाठीं जावयाचें ठरविल्यामुळें तेथें डेक्कन जिमखाना कॉलनीमध्यें जागा ठेविली आहे. घरची सर्व मंडळी आज रोजीं पुण्यास रवाना झालीं.

ता. १९-४-२९

कै. रा. सा. ×× यांचें कुटुंब व कन्या येथील आय्. सी. एस्. रा. ×× यांना पहाण्यासाठीं व स्वतःला दाखविण्यासाठीं आली आहे.

मुलगी मुंबई युनिव्हर्सिटीची B. A. आहे. मला तर बरी दिसली. परंतु हा प्रश्न वेगळा. आमचे समाजांत हल्लीं स्थळें मिळेनाशीं झालीं याचा अर्थ काय ? मुलगे हल्लीं होतच नाहींत कीं काय ? याचा खरोखरी अर्थ मुलगे हल्लीं होत नाहींत असें नसून आर्थिक परिस्थिति खालावत चालली व सुखी कुटुंबें नाहींशीं होत चाललीं असा आहे. याला सामाजिक संघटनेनें उपाय झाले पाहिजेत. पण तसें कोण करतो ? जो तो आपापल्यापुरता पाहातो आहे व हुंडा व इतर घातुक चालींस या रीतीनें व अगतिक स्थितीमुळें व्यक्तिशः बळी पडत आहे !! मी हे विचार वादविवादांत मांडीत असतो. काय उपयोग होईल तो खरा. निदान माझेशीं सर्वांचें मतैक्य तरी दिसतें. बीज (विचारक्रांतीचें) तरी पेरलें जात आहे. प्रत्यक्ष कृति घडेल असाहि काळ येईल. असो. समाजांत अशा कितीतरी चाली आहेत कीं ज्याविषयीं विचारक्रांतीची जरूर आहे.

रा. झेवरी यांची बदली झालेमुळें कागदपत्र वगैरे कचरा त्यांनीं काढण्याचा उपक्रम सुरूं करून आज दोन दिवस तो कचरा त्यांचे नोकर वाटेल तसा हमामांत फेंकतात. परिणाम हा झाला आहे कीं सर्व रस्त्यांत जिकडे-तिकडे कागदाचे तुकडेच तुकडे पसरलेले आहेत. किती ओंगळ व गबाळ दिसतें. म्युनिसिपालिटी काय करणार? रोज सकाळीं भंगी झाडून साफ करून जातात पण लोकांनीं सामुदायिक गलिच्छपणाचें जसें कांहीं व्रतच घेतलें आहे त्याप्रमाणें वर्तन करतात. रस्त्यांत किंवा आपले रहाण्याचे खोलीबाहेर सार्वजनिक ठिकाणीं कचरा टाकणें म्हणजे कांहीं तरी वाईट गोष्ट आहे याची जाणीवच समाजांतील शिकलेल्या म्हणविणाऱ्या लोकांतहि नाहीं. अशा अनेक गोष्टींनीं समाज बजबजलेला आहे.

सायंकाळीं शेठ रणछोडलाल यांचेबरोबर शारदामंदिरांत गेलों. मॉंटेसरी पद्धति पाहून आनंद वाटला. आपल्या शिक्षणांत किंवा कुटुंबांत मुलांची मनोदशा समजून घेऊन त्यांची नैसर्गिक वाढ करण्याचा प्रयासच नाहीं. युरोपांतील शाळांच्या मुलांचे हातचीं साधीं चित्रें, आकृत्या, विणकाम वगैरे सुंदर होतें.

ता. २०-४-२९

श्रीमती ×× मातापुत्री यांचे निरोपावरून मुलीस पहाण्यासहि येण्याचें रा. ×× आय्. सी. एस्. यांनीं नाकारलें. त्यांनीं नाहीं म्हटलें हा त्यांचा दोष नसून तारुण्यांतील सहज वृत्तीचा आहे. आपण कांहीं चूक करीत आहोंत अशी त्यांस कल्पनाहि नव्हती व ती नजरेस आणल्याबरोबर त्यांनीं यावयाचें कबूल केलें हा खरोखर त्यांचा चांगुलपणा. असो. लग्नाचे बाबतींत मुलीच्या मानसिक स्थितीचा कोणीच विचार करीत नाहीं ही किती शोचनीय गोष्ट!

सायंकाळीं प्रेमाभाई हॉलमध्यें रा. पारेख यांनीं कांहीं मंडळींची सभा बोलाविली होती. समाजसेवेंत काम करणाऱ्या मंडळीस बोलावून परस्परांच्या अडचणी समजून घेण्याची व विचारविनिमय होण्याची संधि मिळाली म्हणून समाजसेवकांची परिषद बोलवावी असा विचार ठरला. त्यापासून

फायदे आहेतच. चिटणीसांपैकीं मी एक आहें. मला तर वेळ नाहीं, पण रा. पारेख यांचा आग्रह.

ता. २७-४-२९

सायंकाळीं गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीचे ऑफिसांत सोशियल वर्कर्स कॉन्फरन्सचें कार्यकारी मंडळाची सभा होती. परिषदेस "मुंबई समाज-सेवकांची परिषद" असें नांव द्यावें अशी सूचना मुंबईचे सोशियल कॉन्फरन्सचे चिटणीसांची होती. त्याचा विचार करावयाचा होता. आम्हांस तें पसंत वाटलें नाहीं त्यामुळें तसें करण्याचें आम्हीं नाकारलें. आम्हांस परिषद केवळ दाखविण्यासाठीं नको. पण काम करणारीं माणसें आहेत त्यांच्या अडचणी काय काय आहेत, त्या कितपत दूर करतां येतील वगैरे बाबींचा काम करणाऱ्या मंडळींत परस्पर परिचय व विचारविनिमय हवा आहे. त्यामुळें वरचा डामडौल कमी करावयाचा असून विवेचनात्मक परिषद भरावयाची आहे अशा अर्थाचें पत्र मुंबईस पाठविण्याचें ठरलें. व त्याचा मसुदा करण्याचें माझेकडेच आलें.

ता. ३०-४-२९

उन्हाळ्याची रजा पुण्यास घालविण्यासाठीं जावयाचें म्हणून आज निघालों. रात्रौ बडोद्यास उतरलों.

ता. २-५-२९

आज सकाळीं दादरवर येऊन व थोडा वेळ थांबून पुणे एक्स्प्रेसनें पुढें निघालों. कांहीं वेळ गाडी चालू झाल्याबरोबर मनांत विचार येऊं लागले: महाराष्ट्रांतील गाडीचा प्रदेश—पण सर्व स्टेशनवर इंग्रजी—पेहराव इंग्रजी—मराठी माणसांचा मागमूस नाहीं अशी स्थिति. मराठी माणसें म्हणजे फक्त मजूर वर्गांतलीं. बहुतेक दुसऱ्या वर्गांत भरणा पारशी—ॲग्लो इंडियन वगैरे लोकांचा. हिंदुत्वाचे दृष्टीनें तर विचारावयासच नको. असा सुंदर प्रदेश

पण तेथें मराठी बोलणाऱ्यांची काडीइतकीहि सत्ता नाहीं. साधा व्यवहार व सर्व जाहिरातीसुद्धां इंग्रजी. बरें, मराठी बोलणारे शिष्ट वर्गांचे लोक जी भाषा बोलत ती ऐकली म्हणजे अंगावर शहारेच येत. सर्व भाषा अतिशय इंग्रजीमिश्रित. एकहि शुद्ध वाक्य नाहीं. आम्हांस संवय नसल्यामुळें अशी दुर्दशा झाली तें खरें. पण याची जाणीवहि नाहीं याचेंच वाईट वाटतें. दोषाबद्दल फारसें नाहीं, कारण जाणीव झाली तर तो जाईलच. दुपारीं १॥ चे सुमारास घरीं पोचलों.

ता. ४–५–२९

दुपारीं कामशेतहून रा. रा. नानासाहेब सरदेसाई व डॉ. सरदेसाई भेटावयास आले होते. मुख्य विषय मावळंग्याचा उत्सव. एकंदर मंडळीचा जमाव बरा होईल असें वाटतें. सौभाग्यवतीस नेण्याचा माझा विचार दर्शविला. स्त्रियांस फार त्रास होतो तेव्हां न नेलेलें बरें असें त्यांचें म्हणणें पडलें. मलाहि तें एका अर्थीं बरें वाटतें. पण पुन्हां असें वाटतें कीं स्त्रियांनीं आपलेबरोबर नेहमीं राहिल्यास त्यांच्या व आपल्या मनोदशा, आकांक्षा एक होत जातील व संसारास मदत तर खरीच, पण समाजाची प्रगति त्यानेंच होईल.

सायंकाळीं सौभाग्यवतीस विचारतां येण्याची तिनें मर्जी दर्शविली.

ता. ११–५–२९

शेट कस्तुरभाई जिनीवा मुक्कामीं आंतरराष्ट्रीय मजूर परिषदस मालकांचे प्रतिनिधि म्हणून जात असलेमुळें त्यांस पोंचविण्यासाठीं मुंबईस आलों. मोल स्टेशनवर त्यांचा निरोप घेऊन लगेच पुणें मेलनें परतलों. गाडींत 'हॅकॉक' नांवाचा एक आयरिशमन बरोबर होता. प्रचलित गोष्टी निघाल्या. एकंदर हिंदुस्थानची सध्यां स्थिति किती विपरीत व निसर्ग-विरुद्ध आहे याबद्दलचे माझे विचार मीं सांगितले. त्यानेंहि तें मान्य केलें. स्वराज्य हें आम्हांस कोणी दिल्यानें मिळणारी वस्तु नाहीं, तें आम्हांस घेतलेंच पाहिजे, हाहि माझा एक मुद्दा होता तोहि त्यास पटला. हिंदु—

मुसलमानांचे झगडे वैगेरे जरी सध्यां वाईट दिसणाऱ्या गोष्टी असल्या तरी त्यांतून शेवटीं सुपरिणामच उत्पन्न होतील असा माझा विश्वास सांगितला. राष्ट्रीय दृष्टीनें ऐक्य तर होईलच, पण शिवाय हिंदुत्वाचे दृष्टीनें शुद्धीकरण, संघटन व अस्पृश्यतानिवारण हें होणारच.

ता. १२–५–२९

आज दुपारीं कै. सप्रे यांचे चिरंजीव व पुतणे भेटले होते. दोघेहि तरुण ग्रॅज्युएट आहेत. गोष्टी इकडच्या तिकडच्या बोलतांना युनिव्हर्सिटींतील कांहीं परीक्षक परीक्षा घेतांना विद्यार्थ्यांवर तोंड सोडतात व ओरडतात असें ऐकलें. अर्थात् ही गोष्ट खरी असेल तर दुर्दैव! किती शोचनीय प्रकार! स्वमान म्हणजे काय याची ज्यांनीं दुसऱ्यांना कृति दाखवावयाची त्यांचेकडोनच हा गुन्हा. म्हणजे कमालच झाली. हा प्रश्न जाहीर चर्चेकरितां पुढें आणला पाहिजे.

ता. १२–५–२९

सायंकाळीं वसंत व्याख्यानमालेंतील रा. जयरामदास दौलतराम यांचें व्याख्यान ऐकण्यास गेलों होतों. परदेशी मालाचा बहिष्कार हा विषय होता. कॉंग्रेसनें जो बहिष्काराचा ठराव पास केला आहे त्यावर भाषण प्रचारक या नात्यानें केलें. मला भाषण आवडलें. मुद्देसूद असून पाल्हाळीक नव्हतें. इंग्रजी मालाचाच बहिष्कार करावा असें म्हणणाऱ्यांस त्यांनीं उत्तम उत्तर दिलें. एकंदर इंग्रजी माल १२० कोटींचा येतो. त्यापैकीं सुमारें ५० कोटी रुपयांचें कापड व बाकी इतर किरकोळ. आतां इतर माल काय येतो? त्यांत २५ कोटींचा लोखंडी माल, रेल्वे सामान वैगेरे व बाकी इतर मोटारी, प्रयोगाचीं शस्त्रें वैगेरे. हा दरेक प्रकारचा माल सुमारें २।३ कोटी रुपयांचा. अशा चारपांच वस्तु व इतर १ कोटीचे आंतच. २५ कोटींची आयात सरकार करतें. व इतर आयात श्रीमंत, कारखानदार व इतर सामान्य लोक करतात. ती सर्व थांबविणें अशक्य. बहुतांशीं थांबविणेंहि अशक्य. काम करणारे थोडे. पैसेहि थोडे. तेव्हां त्या बहिष्कारांत पैसा व माणसें यांचा

उपयोग करणें बरोबर नाहीं. सामान्य जनता जें रोज वापरतें असें कापड घेतलें तर परिणामकारक चळवळ करतां येईल. व इंग्रजी व्यापारास चांगलाच चिमटाहि घेतां येईल. पुन्हां कांहीं लोकांचें म्हणणें कीं इंग्रजी कापडाचाच बहिष्कार करावा. पण हेंहि चूक आहे. परदेशी कापडाचे बहिष्कारांत इंग्रजी कापडाचा बहिष्कार आलाच. पण तेवढ्यानें पूर्ण होत नाहीं. आपणांस स्व–राज्य हवें. स्व–तंत्र हवें. तर आपण आपले पायावर उभें राहिलें पाहिजे. केवळ इंग्रजी बहिष्कार म्हणजे इतर विदेशी कापड घेणें असेल तर त्या बहिष्काराचा काय उपयोग? जपानकडे पहा. हिंदुस्तानांतील गिरणीवाल्यांनीं त्यांस प्रथम शिकविलें. सन १९०० सालांत जपानहून हिंदुस्थानांत आयात २६ हजार वारांची होती. सन १९१३ सालीं ती ९० लाखावर गेली व सन १९२८ सालीं ३३ कोटीवर झाली. जर वेळींच आपण सावध राहिलों नाहीं तर हा राक्षस आपणांस गडप करणार.

नंतर खादीचे श्रेष्ठत्वाविषयीं त्यांनीं सांगितलें. भांडवलाचे दृष्टीनें प्रथम विचार केला. शें. ९० टक्के लोक खेड्यांतून राहणारे–त्यांना ४ महिने धंद्याशिवाय बसावें लागतें. सामान्य मोजणीनें अशांची संख्या ११ कोटी येते. आज एकंदर ३०० गिरण्या आहेत. त्यांचें भांडवल ५० कोटी रुपये आहे व त्यांत ३,८०,००० लोक कामास आहेत. या हिशेबानें ११ कोटी लोकांस काम देण्यास किती भांडवल पाहिजे? अखिल भारत चरखा संघानें सुमारें १७ लाख रुपये खादीप्रचारार्थ दिले आहेत ते खेड्यांतूनच पसरलेले आहेत. त्यामुळें सुमारें एक लाख लोकांस उपजीविका मिळते. या दृष्टीनें खादी घेणें इष्ट आहे. शिवाय खादी हें गरीब वर्गाचें द्योतक आहे. खादी-उत्पत्ति व प्रचार यानें संघटनाकार्य होत आहे वगैरेहि त्यांनीं सांगितलें,

शेवटीं जुनी जुनी तीच तीच चळवळ नको, कंटाळा आला, अशा आक्षेपांस त्यांनीं चांगलेंच सणसणीत उत्तर दिलें. रोज रोज तोच तो भात खाण्यास आपण कंटाळतों का? वकील लोक रोज रोज तोच तो कायदा वाचण्यास व बोलावयास कंटाळतात का? डॉक्टर लोक रोज तोच तोच रोग पुन्हां पुन्हां चिकित्सा करण्यास कंटाळतात का? शिक्षक लोक तोच तो

विषय पुन्हां पुन्हां शिकविण्यास कंटाळतात का ? तेव्हां ही शिळी गोष्ट आहे असें म्हणून कसें चालेल ?

ता. १५–५–२९

आज टिळक स्मारक मंदिरांत खादी संघाची बैठक असल्याचें रा. बाळू-काका कानिटकरांनीं परवां सांगितलें होतें. म्हणून आज मुद्दाम सकाळीं गेलों होतों. कामास वेळेवरच्च (८ वा.) सुरुवात झाली असली पाहिजे. मी ८–२० ला पोहोंचलों त्यावेळीं रा. नानासाहेब देव यांचें भाषण चालू होतें. रा. आळतेकर (कऱ्हाड), रा. ब. चिंतामणराव वैद्य, प्रो. शि. म. परांजपे, डॉ. फाटक वगैरे मंडळी होती. श्री. जमनालाल बजाज हेहि आले होते. कोणाशीं बोलण्या वगैरेचा योग आलाच नाहीं.

मंडळी एकंदर कळकळीची दिसली. माझेवर छाप बरी पडली. शुष्क किंवा मुद्द्यास सोडून वादविवाद किंवा चर्चा झाली नाहीं. खादीनेंच दारिद्र्यांतून सुटका होणार व शेतकऱ्यांना साहाय्यक धंदा म्हणून खादी आवश्यक आहे; परदेशी मालाचा बहिष्कार करण्याचाहि उपदेश आहे. परंतु तो गौण असल्याचें चर्चेंत स्पष्ट झालें. ती चर्चा जरा सूक्ष्म झाली. प्रथम मला वाटलें कीं उगीच चर्चा करून शब्दांचा कीस होण्याचें लक्षण दिसतें. पण मागाहून माझी चूक माझे लक्षांत आली. खादीकार्य हें कायम महत्त्वाचें व दारिद्र्यनिवारणार्थ असल्यानें बहिष्काराचें साधन म्हणून वापरा-वयाचें नसून बहिष्कार असो वा नसो खादीकार्य चालूं ठेवलेंच पाहिजे असा कटाक्ष होता व माझे मतें तो बरोबरहि होता. असो. एकंदर जनतेंत खादीचा प्रचार होत आहे, लोकांस खादीप्रेम आहे, खादीद्वारें काम कर-णाऱ्या माणसांचा खेड्यांतील माणसाशीं प्रत्यक्ष परिचय येऊन त्यामुळें परस्पर विश्वास व आपलेपणा वाढतो, वगैरे स्वतःचे प्रत्येकाचे अनुभव प्रत्येक कार्यकर्त्यानें सांगितले. सर्वांस मुख्य अडचण खादी कशी खपेल ही नसून मागणीस पुरवठा कमी पडेल ही अडचण वाटत होती. म्हणून खादीची पैदास वाढविण्याकडे लक्ष देऊन त्या बाबतींत काय करावें याची चर्चा झाली.

रा. जमनालाल यांनीं पुढील मुद्दे सांगितले: (१) जेथें कापूस होतो (२) जेथें लोकांस मजूरी पुरेशी मिळत नांहीं अशा ठिकाणींच पैदास वाढूं शकेल.

उद्यां मावळंग्यास जावयास निघावयाचें असल्यामुळें टपाल वैगरे सर्व दुपारीं आटोपून भारत इतिहास संशोधक मंडळांत जावयास निघालों. वाटेंत रा. अनंतराव सरदेसायांकडे गेलों होतों. त्यांना मावळंग्यास येण्याची फार इच्छा होती. परंतु शरीरप्रकृतीमुळें इलाज नव्हता. त्यांनीं कांहीं सूचना संमेलनांत करण्यासाठीं केल्या आहेत. (१) देवळाची डागडुजी. (२) वार्षिक उत्सवाची व्यवस्था आणि (३) गरीब कुटुंबीयांस मदत करण्यासाठीं फंड वगैरे.

भारत इतिहास संशोधक मंडळांत जाण्याचें मुख्य कारण रा. नानासाहेब देव हे तेथें कांहीं चर्चा करणार होते. ही चर्चा मोठी ऐकण्यासारखी झाली. श्रीसमर्थ व शिवाजीमहाराज यांची भेट प्रथम शके १५९४ त झाली असें प्रतिपादन करणाऱ्या पक्षाविरुद्ध स्वतःचीं कांहीं भौगोलिक अनुमानें रा. रा. नानासाहेब देव यांनीं सांगितली. शिवथर घळींत समर्थ राहात होते. वर्षानुवर्षें श्रीशिवरायांपासून १० मैलाच्या आंत राहात असतां शिवरायांस त्यांची माहितीहि नसावी किंवा भेटहि नसावी हें शक्यच नाहीं असा त्यांनीं स्वतःचा अभिप्राय सांगितला. सभेंत आलेली मंडळी ऐतिहासिक हकीकती, पत्रें वगैरेंत तरबेज होती असें दिसलें. या अभ्यासाविषयीं आदर व कौतुक वाटलें. परंतु बखरींतील प्रत्येक गोष्ट शंकित नजरेनेंच कां पहावी? समर्थप्रताप, हनुमंतस्वामींची बखर वैगरेंतील चमत्कार प्रकरणें पाहिजेत तर नका मानूं! पण झालेल्या गोष्टींच्या तारखासुद्धां कां मानूं नयेत? त्यावर अनुमानें कशाला? असो. मला तर हा प्रकार म्हणजे फाजील चिकित्सक बुद्धीचें अजीर्ण वाटलें.

ता. १६-५-२९

आज सकाळीं घराहून ७॥ वा. सर्वांचा निरोप घेऊन सौभाग्यवती व चि. अण्णू वगैरे मंडळीसह निघालों. वाटेंत सुमारें ११ वा. सातारा १७ मैलांवर असतांना मोटारीच्या पुढच्या चाकांची कमान तुटली व गाडी सैरावैरा

वांकडी तिकडी होऊं लागली. उलटून पडावयाची पण श्रीनरहरीकृपा. कशी-बशी थांबली. रिपेर करून अर्ध्या तासानें पुढें चालूं झाली. दुरुस्ती वेताचीच होती. सुमारें १२॥ वा. साताऱ्यास पोंचलों. तेथून १ वाजतां निघालों तो कऱ्हाडास २॥ वाजतां पोचलों. तेथून चिपळूणची मोटार सर्व भरलेली त्याच वेळीं सुटली. तरी पण आमचेसाठीं मोटार दुसरी दिली. पुणेकरांनीं अगोदर तार देऊन सर्व व्यवस्था करतों असें सांगितलें असूनहि शेवटीं कांहींच वर्दी दिली नव्हती. आम्ही मुलाचे सोयीसाठीं एक सीट (एकंदर ६) चे जास्त पैसे दिले असतांहि त्यानें चिपळूण सर्व्हिसचे माणसास ५ सीटचेच पैसे दिले ! अशी ही सचोटी व काम करण्याची तऱ्हा ! अशा स्थितींतूनच स्वराज्याचा रस्ता काढावयाचा.

कऱ्हाडला २ तास मुक्काम मोटार एजंटाचे दुकानावरच होता. गृहस्थ पक्का ब्राह्मणेतर—म्हणजे ब्रह्मद्वेष्टा—दिसला. पण मूर्ख नसून मुत्सद्दी अथवा धूर्त अंग्लो इंडियनी वळणाचा वाटला. त्यानें आमची सर्व सोय उत्तम करून दिली. तेथें सर्व वर्तमानपत्रें दिसलीं. केसरी, चित्रमय जगत् पासून तों "सातारा" व इतर ब्राह्मणेतर पक्षाचीं पत्रें. ब्राह्मणेतर पत्रें पहाण्यास त्यामुळें संधि आली. वाचून वाईट वाटलें. जर लेखक अज्ञ असतील तर कींव केली पाहिजे. पण जाणून जर विपर्यास करीत असतील तर देश व समाजद्रोहाचें हें पाप कोठें धुणार कोणास ठाऊक !! पण याबरोबरच ब्राह्मणांनीं आपली जबाबदारी ओळखली पाहिजे व ब्राह्मण्य आचरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे स्वार्थी लोकांचा स्वार्थ आपोआपच कालांतरानें उघड दिसेल.

कऱ्हाडहून ५ वा. निघालों ते रात्रौ सुमारें ८॥ वा. चिपळुणास पोचलों. घाटमाथ्यावरच सायंकाळ झाली. तो कुंभार्ली घाट उतरतांना संध्याकाळचा व समोरचा देखावा फारच रम्य होता. निसर्गाचें स्वरूप भव्य व गंभीर होतें. हा देखावा पहाण्यासाठीं मुद्दाम येत राहावें व डोळ्यांचें पारणें फेडावें असें वाटलें. चिपळुणास मुक्काम तेथील एक व्यापारी रा. ×× यांचे दुकानींच होता. प्रवासांत अडचणी कशा येतात व चालढकल कशी करावी लागते याची सौभाग्यवतीस ही तालीम मिळाली म्हणावयाची.

ता. १७–५–२९

आज सकाळीं स्पेशल मोटार करून चिपळुणाहून निघून सुमारें ८॥ वा. माखजनास पोचलों. रा. विठुमामा आठल्ये (गोविलकर) हे भेटले. ते येथें दोन दिवसांपूर्वींच आलेले असून मावळंगें देवळाकडील उत्सवाची जुळवाजुळव त्यांनीं सुरू केलीच होती. सकाळीं चहापाणी वगैरे आटोपून मी रा. विठुमामांबरोबर वर गेलों. व्यवस्थेची हकीगत समजावून घेतली व ज्या ज्या कांहीं सूचना करणें त्या केल्या व परत भोजनास खालीं आलों.

ता. १९–५–२९

आज रात्रौ कीर्तनास बसूं शकलों नाहीं. डाव्या पायाचा गुडघा फारच दुखूं लागला म्हणून खालींच खुर्चीवर बसून कीर्तन ऐकत होतों. खुर्चीवर बसलों असतां एक क्षुल्लक गोष्ट दिसली. दिसण्यांत क्षुल्लक पण आपले सामाजिक मनोवृत्तीची द्योतक–कामासाठीं गडी असतात त्यांचीं लहान मुलें (७।८ वर्षांचीं) दोन होतीं. खरोखर म्हणजे रात्रीं आमचेबरोबर त्यांस जेवावयास घालावयाचें. पण तसें न होतां त्यांस मागाहून झोंपेंतून उठवून मग जेवावयास बसविलें. उठविणाऱ्या गड्यानेंहि माणुसकी दाखवून उठविलें नाहीं. ओरडून व मुलगा हांका मारून उठेना तेव्हां जरा जोरानें एकदम चपराक मारून उठविलें. मला वाटतें गडीमाणसांस प्रेमाची वागणूक असते खरी पण त्यांत कांहीं अंशीं गुलामासारखा भास होतो. मला हें सर्व कसेसेंच वाटलें.

ता. २१–५–२९

आज उत्सवाचा मुख्य दिवस. एकंदरींत उत्सवास व संमेलनास प्रथमच्या अपेक्षेपेक्षां बराच चांगला रंग चढला.

सर्व मंडळींचीं स्नानें वगैरे आटोपल्यावर जेवणाचेपूर्वीं संमेलनाचे कार्यास सुरुवात झाली. अध्यक्ष नेमणें वगैरे औपचारिक विधि न करतांच सुरुवात केली. रा. अनंत रामचंद्र सरदेसाई यांच्या सूचना मंडळींत वाचून त्यावरहि

चर्चा झाली. (१) देवळाचा जीर्णोद्धार (२) वार्षिक उत्सवाची व्यवस्था (३) कुटुंबांतील गरीब होतकरू विद्यार्थ्यांस आर्थिक मदत—या गोष्टींचा विचार केला. आमचें (रा. नानासाहेब, मी व डॉक्टर) मत असें पडलें कीं प्रथम पुस्तकछपाई, उत्सवखर्च वैगेरे हातांत घेतलेलीं कामें पार पाडलीं पाहिजेत, देवळाचा जीर्णोद्धार झाला पाहिजे व इतर गोष्टी पैशाचे सवडी-प्रमाणें करावयाच्या. आर्थिक मदत फारशी कुटुंबीय मंडळीकडून होईल अशी आशा दिसत नाहीं. कोंकणची मंडळी मानानें मोठी पण स्थिति हलाखीची व बाहेरच्या मंडळींत प्रदीप्त भावनेचीं डोकीं दोन चार. या दोनचारांनीं किती बोजा उचलावा? असो. संमेलनास आलेल्यांची यादी केली व वरील बाबतींत ठराव केले.

ता. २२–५–२९

स्नानादि विधी आटोपून पुनः कालच्याप्रमाणेंच संमेलनाच्या कार्यास सुरुवात झाली. उत्सवाच्या खर्चाचे वगैरे सर्व हिशेब तयार केले. या सालीं एकंदर खर्च रु. ४१० झाला. जमलेल्या सरदेसाई मंडळीनीं आपापले आंकडे टाकले. जी कांहीं तूट येईल ती भरून काढावी असा मी अगोदरच निश्चय केला होता. पण रा. नानासाहेब सरदेसाई (बडोदेकर) यांस व इतरांस असें वाटलें कीं जर मीं एव्हांच पैसे दिले तर बाकीची हजर नसलेली मंडळी कांहींच देणार नाहींत. तेव्हां गैरहजर मंडळीकडून थोडथोडे मिळून सुमारें १०० रु. वसुली करावी. ती होईल असें वाटल्यावरून रा. नाना-साहेबांचे सल्ल्याप्रमाणें माझ्या वर्गणीचा मी ७५ आंकडा घातला, व निर-निराळ्या ठिकाणच्या गृहस्थांस पत्रें लिहून टाकलीं.

भोजनोत्तर संमेलनाचें बैठकीस पुनः सुरुवात झाली. थोडेंच पण महत्त्वाचें काम उरलें होतें, आणि तें म्हणजे देवळाचा जीर्णोद्धार हें. त्याविषयीं काल रा. दत्तोपंत सरदेसाई यांस एक अंदाज तयार करण्यास सांगितलें होतें. अदमासें ६०० रु. असा अंदाज त्यांनीं सांगितला.

ता. २३–५–२९

आज सकाळीं ८ वा. स्पेशल मोटारीनें परतलों. देवरुखास उतरलों. सौभाग्यवतीस जुनी मराठी शाळा, रघुपतीचें देवालय वैगेरे दाखवीत फिरत फिरत माळावर आमच्या जुन्या राहात्या घरीं जाऊन सर्व सौभाग्यवतीस दाखविलें. येथें आज राजेवाडीहून रा. तेंडुलकर मास्तर मुद्दाम आले होते. मी देवरुखास १८९८ चे सुमारास शाळेंत असतां सदर तेंडुलकर हे हेड्मास्तर होते. देवरूखचे शाळेस अमदाबादकर मंडळीकडून कांहीं तरी मदत मिळवून द्यावी अशी गोष्ट रा. पंडित यांनीं काढली. त्यांना स्वतःस तें फारसें योग्य वाटत नव्हतें, पण मंडळीचा आग्रह असें दिसलें. वास्तविक ही शाळा म्हणजे स्थानिक उपयोगाची; यास बाहेरच्या मंडळींनीं कां मदत द्यावी? स्थानिक गरजा स्थानिक लोकांनींच भागविल्या पाहिजेत या तत्त्वाचा अवलंब केल्याशिवाय सार्वत्रिक सार्वजनिक कार्यें कशीं होणार? मला जें कांहीं देणें तें मी देईनच. पण अमदाबादकर श्रीमंतांसहि या कारणास्तव विनंति करणें मला होणार नाहीं असें मीं सांगितलें व तें त्यांनाहि पटलें.

ता. २४–५–२९

देवरुखहून १०॥ वा. निघून आंबेघाटाचे मार्गानें सायंकाळीं ५ वा. कोल्हापुरास पोचलों. नंतर अंबाबाईच्या दर्शनास जाऊन येऊन डॉ. जमेनीसकडे गेलों होतों. तेथें मुलीचे लग्नपद्धतीविषयीं बोलण्यांत गोष्ट निघाली: (१) वराची पसंती करतांना वराविषयीं मुलीचें काय मत आहे त्याची अगदीं हल्लीं विचारपूस करीत नाहींत. अत्यंत कुरूप अशा वरासहि सुस्वरूप स्त्री असावी असें वाटतें; तर प्रत्येक मुलीसहि कुरूप नवरा आवडत नसावा ही साधी मनोदशाहि विचारांत हल्लीं कोणी घेत नाहीं (२) नुसत्या रंगरूपाकडेच न पाहतां कुळाकडेहि पाहणें जरूर आहे. वरील दोन मुद्दे आम्हा दोघांसहि संमत होते.

ता. २५–५–२९

कोल्हापुराहून सकाळीं ८। वा. निघून सुमारें १२। वा. सातारा मुक्कामीं पोचलों. सायंकाळीं फिरत फिरत सरदार मुतालिक यांची वाटेंतच गांठ

पडल्यानें त्यांचेकडे गेलों होतों. प्रचलित विषयावर बोलणें झालें. महाराष्ट्राचे मानानें गुजराथेंत जास्त जागृति व कार्यक्षमता आहे, महाराष्ट्रांत वाचाळता विशेष दिसते अशा अर्थाचा अभिप्राय मी बोलल्यें. त्यांस तो खोडतां आला नाहीं.

ता. २६–५–२९

आज सकाळीं रा. वाग्भट देशपांडे यांचेकडे रा. घाणेकर बंधूंची ओळख झाली. "तोंडाची वटवट नको. देशासाठीं जें कांहीं करणें तुम्हांस शक्य असेल तें करा" या माझ्या अभिप्रायाशीं त्यांचे तंतोतंत जुळते अभिप्राय पाहून बरें वाटलें. विनम्र पण कर्तृत्ववान् अशा त्या दोघां पुरुषांस पाहून आनंद वाटला.

ता. २७–५–२९

पहाटे ५॥ वा. मोटार सोडण्याचें मोटारवाल्यानें कबूल केलें होतें. पण ५॥ वा. तो आलाच नाहीं. पॅसेंजरांची गडबड म्हणून एकदांची ६॥ वा. मोटर निघून निर्विघ्नपणें ९॥॥ वा. पुण्यास पोचलों.

ता. ३०–५–२९

सायंकाळीं फर्ग्युसन कॉलेजांत (आवारांत) फिरावयास गेलों होतों प्रि. कानेटकरांची भेट झाली. महाराष्ट्रीय तरुण पिढी दिवसेंदिवस कमकुवत होत चालली आहे असें दुःखानें म्हणाले. देशाचे उन्नतीस प्रयत्न प्रांतवार परिस्थिति पाहून झाले पाहिजेत. महाराष्ट्रास बारा महिने पोटापुरतें पुरेल इतकें पिकत नाहीं, तेव्हां त्याची पूर्तता करण्यासाठीं बाहेरून महाराष्ट्रीयांस कांहीं तरी मिळवितां येईल अशा प्रकारचें शिक्षण पाहिजे. केवळ मराठी भाषेचें किंवा तद्द्वारांच शिक्षण दिलें तर परप्रांतीय लोकांस उपयोगी पडून द्रव्यार्जन महाराष्ट्रीय कसे करूं शकतील? अर्थात् हाहि विचारणीय दृष्टिबिंदू आहे.

ता. ३१–५–२९

आज पहाटे मुंबईस पोचलों. नंतर ताजमहाल हॉटेलमध्येंच लंच घेतला व सायंकाळीं ५।।। वाजेपावेतों तेथेंच होतों. आमचेच मजल्यावर अफगाणिस्तानचे माजी अमीर अमानुल्ला हे उतरले असल्यामुळें जिन्यावरचे बाजूस २।४ पठाण व बाहेर रस्त्यावर कांहीं मुसलमान जमलेले असत. मधून मधून "अल्ला हो अकबर" "अल्ला हो तकदीर" ओरडत होते. येथील पूर्वीच्या हिंदु पण हल्लीं मुसलमान झालेल्यांनीं आम्हांस परके लेखावे व अफगाणिस्तानचे अमीरास आपला मानावा हा केवढा दैवदुर्विपाक!! एकंदर अशा सर्वांची शुद्धी झाली पाहिजे, नाहीं तर हिंदीत्वाची राष्ट्रीय भावना ही धर्मभावनेपेक्षां जास्त बलवत्तर वाटली पाहिजे.

ता. ५–६–२९

सकाळीं रा. ×× यांनीं स्वतःचे विषयींची बरीच हकीगत सांगितली. अविभक्त कुटुंबांत कर्त्या पुरुषानें मन उदार ठेवल्याशिवाय सर्वांस सुख होणें नाहीं. त्यांच्या चिरंजिवांची तशी वृत्ति नसल्यामुळें पैशांचे बाबतींत साहजिकच तेढ उत्पन्न होते. पण यांत कर्त्या पुरुषांविषयीं इतरांचाहि गैरसमज असतोच. मनानें एक गोष्ट घेतली कीं इतर गोष्टी मग कलुषित दिसतात.

ता. ६–६–२९

सकाळीं पुणें खर्चाचे हिशेब पहावयास घेतले. मी जातांना येथें आणखी किती रु. दिले पाहिजेत हें पहाण्यासाठीं किती शिल्लक व किती खर्च तें पहाण्याचे हेतूनें मागितले. बघतों तों सर्वच ब्रह्मघोटाळा. ती. वाईजवळील ठेविलेल्या रकमेपैकीं किती शिल्लक हें कोणीच काढलेलें नाहीं. रोजची शिल्लक मिळवलेली नाहीं. किती तरी हिशेब पुस्तकांत लिहिल्याशिवाय तोंडीच ठेविलेला–तोहि पूर्ण नाहीं अशी अनवस्था. हिशेबाचे महत्त्व रोज कान किटतील इतकें सांगितलें असतांहि ही अव्यवस्था. एकंदर वर्तनांत

टापटीप, चौकसपणा, धोरण, वगैरे गुण एका हिशेब लिहिण्याचे संवयीमुळें येतात. इतकें महत्त्व सांगितलें असतांहि पुन्हां हिशेब नसावे याला काय म्हणावें ? अर्थात्च मी मग हिशेब पहात बसलों. शिल्लक वगैरे जमविली. खुटणारी रक्कमहि हिशेब लिहिणाराचे खातीं लिहिली. पुष्कळच रागें भरलों. जो उपयोग होईल तो खरा. सकाळचा सर्व वेळ यांत गेला. तरी पण आतां तरी हिशेबाचें महत्त्व निदान माझेसाठीं तरी जर किंचित् जास्त पटलें तरीसुद्धां वरीच मिळविली म्हणावयाची.

तिसरे प्रहरीं जवळच असलेल्या नाथीबाई ठाकरसी महिला पाठशाळेची इमारत वगैरे पहावयास सर्वजण गेलों. श्रीमती पार्वतीबाई आठवले तेथें होत्या त्यांनीं सर्व दाखविलें. सामान्यतः पाठशाळेचा अभ्यास पूर्ण करून पदवी मिळवीपर्यंत मुली राहात नाहींत असा अनुभव सांगितला. दरम्यान लग्नें होतात व मग अभ्यास थांबतो. 'ज्यांचीं लग्नें जमत नाहींत अशा कुरूप मुलीच बहुधा पदवीपर्यंत पोचतात' असें त्या विनोदानें म्हणाल्या.

ता. ८–६–२९

केसरी कचेरींत गेलों. तेथें रा. बाबूराव गोखले यांस मागाहून भेटलों. श्री. तात्यासाहेब केळकरांजवळ इतस्ततः गोष्टींत "महाराष्ट्रीयांची पिछेहाट" हा विषय निघाला होता. हिंदुस्तान सरकारांत सर्व मोठमोठाल्या जागा बंगाली, मद्रासी यांनीं भरलेल्या. महाराष्ट्रीयांची वर्णी कधीं लागत नाहीं असा त्यांना श्रीमंत सयाजीराव गायकवाडांनींहि एकदां प्रश्न विचारला असें सांगितलें. "बडोद्यांत जर आपणालाहि महाराष्ट्रीय दिवाण मिळूं शकत नाहींत तर हिंदुस्तान सरकाराविषयीं आम्ही तरी काय सांगावें ?" असें महाराजांस उत्तर दिल्याचें त्यांनीं सांगितलें.

ता. ९–६–२९

ता. १५ मे रोजीं खादी संघाची परिषद् झाली. त्यावेळीं खादीचे उत्पन्नाविषयीं प्रश्न निघाला होता. यंत्राचें कापड येण्यापूर्वी लोक काय कापड वापरीत होते, कापूस कोठें होतो, मजूरी कोठें कमी मिळते वगैरे

ऐतिहासिक मिश्र आर्थिक व प्राथमिक पहाणीची जरूरी वाटते. ही माझी कल्पना पटत असल्यास तसा निबंध लिहिण्यास किंवा लिहीत असल्यास प्रसिद्ध करण्यास रु. ५० ते १०० देण्याची माझी तयारी असल्याचें मीं सांगितलें. अर्थातच माझें नांव प्रसिद्ध करूं नये व कल्पनेची चर्चा मंडळींत व्हावी. असें झाल्यानें प्रयोगांत जे पैसे जातात ते वांचतील, असें सांगितलें. सर्वांस या प्रकारच्या चौकशीची अत्यंत जरूर वाटली.

ता. १०–६–२९

महाराष्ट्रीय मंडळाचे चिटणीस रा. दामले व सभासद रा. जेजूरीकर सकाळीं मुद्दाम आले होते. त्यांचे निमंत्रणावरून आजच सायंकाळीं मंडळाची व्यायामशाळा पहाण्यास मुलांस व सौभाग्यवतीस घेऊन गेलों होतों. कुस्ती, लेज़ीम, मल्लखांब, बार वगैरे कसरतीचे प्रकार व संघव्यायामहि पाहिला. मला संस्था आवडली. त्यांचे अहवाल पाहिले व त्यांतील त्यांचे व माझे विचार पुष्कळच जमले: (१) शारीरिक शिक्षण हें शिक्षणाचें आवश्यक अंग आहे. (२) उद्देश Experts बनविण्याचा नसून शारीरिक आरोग्य व सुदृढतेचें सरासरी मान वाढविण्याचा आहे. (३) स्त्रियांचे आरोग्या-विषयींहि मंडळ विचार करीत आहे, वगैरे मुख्य मुख्य व महत्त्वाच्या बाबींतील विचार जमले.

ता. १२–६–२९

सकाळीं रा. छोटालाल पारेख सबजज्जसाहेब भेटावयास आले होते. अमदावादच्या गप्पा झाल्या. वकीलवर्गांत नवीन दाखल होणाऱ्या मंडळींत कामाचा उत्साह व मेहनत दिसत नाहीं, रीतभात सभ्यतेची किंवा विनयाची नसते असा अनुभव सांगत होते. माझाहि अनुभव तोच आहे. नवीन पिढीचे मंडळींत या गुणाचा अभाव कां होत आहे याचा तपास करून तो सुधारण्याचे वेळींच प्रयत्न होणें जरूर आहे.

ता. १६-६-२९

सकाळीं अमदाबादेस दाखल झालों. घरीं स्वराज्यच आहे. ब्राह्मण आजारी, दुसरें कोणी नाहीं. तेव्हां हातानेंच करावयाची पाळी यावयाची. पण ब्राह्मणानें आपला कोणी नातलग ठेवला आहे. खाणावळींतून ताट आणविलें. आजचा दिवस तर गेला. स्वयंपाक हातानें करून जेवण्यांत त्रास किंवा कमीपणा वाटत नाहीं. पण वेळ कसा आणावयाचा हाच मुख्य प्रश्न.

शाळेंतील फीवाढीचा इतिहास ऐकला. फीवाढीविरुद्ध चळवळ करणारांनीं कसकसे प्रकार केले तें कळलें. युवकसंघाचे सभासदांस गुजरात कॉलेजांतील संपाचा एक प्रकारें मद चढ़लेला दिसतो. ज्याप्रमाणें त्या चळवळींत यश आलें त्याप्रमाणें येथेंहि येईल अशी अपेक्षा होती. तेथें जरी लढाई विद्यार्थ्यांच्या त्यागावरच होती, तरी पण ॲडव्हायसरी कमेटीला कांहीं तरी श्रेय आहेच. आम्हां स्वतःस त्यांचें श्रेय नको आहे, पण केवळ निःपक्षपात दृष्टीनें सत्य सांगावयाचें म्हणजे लढाई जरी शिपाई लढतात तरी पण सेनापतीचे अकलेवर पुष्कळसें अवलंबून असतें.

ता. १७-६-२९

वाटेंत रा. दौलतराम यांनीं मी म्युनिसिपालिटींत अगदींच तटस्थ असतों अशाबद्दल पृच्छा केली. मतभेद असोत पण जोंपावेतों आमचे शुद्ध हेतू-विषयींहि मुद्दाम विपर्यास करण्यांत येत आहे तोंपावेतों तटस्थ राहून विरोधी मतवाल्यास आपल्या मताप्रमाणें कारभार करण्याची संधि देणें हेंच जास्त बरें असें मीं सांगितलें. राजिनामा देण्याचा माझा विचार असलेचे सांगितलें. "हल्लीं म्युनिसिपालिटींत कारस्थानाशिवाय दुसरें कांहींच चालत नाहीं व तुम्हीं राजिनामा दिला तर तुमचे जागीं कारस्थानी मनुष्य येईल" असें दौलतराम यांनीं सांगितलें; एकूण कारस्थानेंच चाललीं आहेत व तें इष्ट नाहीं हें त्यांनाहि कबूल आहे. पण जाहीरपणें कबूल करण्याइतका सरळपणा किंवा लोकहिताची कळकळ कोठें आहे ?

ता. २०–६–२९

सकाळीं रा. ×× भेटले. त्यांचेशीं स्पष्ट बोलणें झालें. रा. ×× यांनीं माझेकडेच वकिलीसाठीं यावें पण माझ्या स्वभावाचे दोष मीं सांगितले ते लक्ष्यांत ठेवावे : (१) जी मंडळी मला आपली वाटतात त्यांच्या बारीकशा चुकाहि मला खपत नाहींत व त्यामुळें मी त्यांना पुष्कळदां कडक असें बोलतों म्हणून भाषेकडे लक्ष न देतां मुद्दा व उद्देश यांकडे लक्ष द्यावें. (२) अंगावर घेतलेलें काम चौकस रीतीनें पार पाडलें पाहिजे अशी माझी अपेक्षा असते. त्यांत कसेंतरी करून वेठ काढली म्हणजे झालें असें मला आवडत नाहीं; (३) वक्तशीरपणा पाहिजे, वगैरे बाबी सांगितल्या. गैर-समजास पुढें जागा नको.

रा. ×× यांस पैशाविषयीं ता. १६ रोजीं पत्र लिहिलें होतें त्यांत 'पैशाचे व्यवहारांत एकहि वायदा त्यांचेकडोन पाळला गेला नाहीं, मला आतां तो व्यवहार नको व कबुलीप्रमाणें पैसे पाठवावे' अशा आशयाचें मीं लिहिलें होतें. त्याचें उत्तर आज आलें आहे. "मी व्यवस्थेंत आहें, लवकरच येणार तेव्हां समक्ष बोलेन, मला अत्यंत काळजी आहे" वगैरे. किती उडवाउडवीचें हें उत्तर. मला तर या गोष्टीचा वीट आला आहे. आमचे समाजांत माणसें इतकीं गैरदानतीचीं व लोंचट कां झालीं? शक्ति नसेल तर स्पष्ट सांगावें. उसनवार घेऊंच नये, आणि प्राणहि अर्पून सचोटी ठेवावी, इतकें शील असावयास पाहिजे तें कां वरें गेलें? मला माझ्या पैशाविषयीं तर जरूर वाटतेंच पण एक प्रकारें त्यापेक्षांहि जास्त उद्वेग या गोष्टीचा वाटतो. ज्यानें ज्यानें म्हणून उसनवार पैसे घेतले त्याचेविषयीं हाच अनुभव. आतां अगदीं नियम केला आहे कीं एक पैहि मित्र किंवा नातेवाईक यांस उसनवार द्यावयाची नाहीं. पण मग असें वाटतें कीं समाज किंवा सोयरे या दृष्टीनें ही अविश्वासाची स्थिति अत्यंत शोचनीय नाहीं काय? पण या दृष्टीनें मी अनुभव घेऊन निराश झालों आहें!

ता. २५–६–२९

सायंकाळीं हैद्राबादचे एक ज्योतिषी आले होते. बडया बडया मंडळींच्या चिटया होत्या. ही मंडळी चिठ्या कां लिहून देतात, हेंच समजत नाहीं.

मला तर अशाचा कंटाळा वाटतो. ज्योतिषीबुवांनीं माझी पत्रिका पाहून एकंदर पुढील भविष्य वर्तविलें आहे. (१) आयुष्य ७५ वर्षें (२) मरण-समयीं ३ पुत्र व २ कन्या हयात. (३) ४८ वर्षें वयास होईपावेतों उत्तम काल जाईल. पैसा, लौकिक वगैरे. (४) वयाचीं ४८ ते ५३ वर्षें वाईट. द्रव्यहानि, प्राणहानि, चिंता वगैरे. (५) स्त्रीची तब्यत नेहमीं नरमच राहील. (६) मातृसुख पुष्कळ वर्षें. (७) ४२–४३ वे वर्षीं राजयोग (काय तो कोणास ठाऊक) (८) ४४–४५ वे वर्षीं समुद्रयान. (९) एकंदर आपले ज्ञातीपेक्षां व नातलगांपेक्षां इतरांत मानमान्यता वगैरे विशेष. (१०) मागाहून संन्यासयोग. धार्मिक किंवा सार्वजनिक कामाचे मनाचे कलामुळें. येणें-प्रमाणें वर्तविलें आहे. यांपैकीं जें जें खरें ठरेल तें खरें.

सायंकाळीं गुजरात क्लबमध्यें गेलों होतों. तेथें नवीन कॉलेज काढण्या-विषयींची चर्चा निघाली. यंदा अहमदाबादेंतील रहिवाशांस गुजरात कॉलेजांत प्रवेश मिळत नाहीं. सुमारें ३ मुलांस पहिले वर्षाचे वर्गांत नाहीं म्हटलें म्हणून हा प्रश्न उभा झाला. "नुसतें Arts चें कॉलेज काढून काय करावयाचें. धंदेशिक्षणाचें पाहिजे. वैद्यकीय किंवा एंजिनीअरिंग. शेतकी." असा एक पक्ष होता. पण शेवटीं कांहींनीं तरी स्वीकारलें कीं सामान्य शिक्षण म्हणून जरूरच आहे. पण सगळे मला म्हणत होते कीं या बाबतींत मीं पुढाकार घेतला पाहिजे. माणसांची इतकी टंचाई कां? मलाहि जरूर वाटते. पण मी एकटा किती कामें अंगावर घेणार?

ता. २६–६–२९

डिस्ट्रिक्ट कोर्टांत जमालपुरामधील एका मुसलमान मुलाचे खुनाबद्दल पकडलेल्या हिंदूंचा जामीन अर्ज होता. हिंदुमुसलमान झगडयांत हिंदूच्या अनास्थेचें व भागूबाईपणाचें धोरण पाहून फार वाईट वाटतें. एकेवेळीं असेंहि वाटतें कीं इतक्या अनास्थापूर्ण, स्वार्थी व भागूबाई जातीस जगण्याचा तरी काय हक्क आहे? ज्ञाति व धर्म-रक्षणासाठीं प्राण वेंचण्यास नव्हे तर जे सहन करतात त्यांचेविषयीं उघड सहानुभूति दर्शविण्याइतकेंहि तेज ज्या प्राण्यांत नाहीं ते जगून तरी काय उपयोग? जमालपूरमध्यें अगदीं

निर्दोष लोक पकडले गेले आहेत पण कदाचित् एकादा कमी अधिक दोषी असला तरीसुद्धां न्यायकोर्टांत त्याचा बचाव करणें हा धर्मच आहे. त्यांना इतर हिंदूनीं पैशाची मदत करून सहानुभूति दाखवूं नये याचा अर्थ काय? या गोष्टींची प्रसिद्धि किंवा जाहीर खबर देण्याची जरूरी नाहीं पण गाजावाजा न करतां पैसे गोळा करण्याची अत्यंत जरूरी आहे. याप्रमाणें मीं मंडळीस सांगितलें व माझेकडोनहि मी कांहीं जें देणे तें देईन असेंहि सांगितलें.

ता. २९-६-२९

"नडियादचे रा. ×× कडोन घेणें असलेल्या दुष्काळ कमिटीच्या रकमे-विषयीं नडियादेस जप्ती करण्याकरितां कारकून पाठविण्याची तजवीज करून त्याप्रमाणें वकील रा. ×× यांना पत्र लिहिलें. या माणसाकडून कमेटीची रक्कम आज कित्येक वर्षे येत नसून नडियादचे सार्वजनिक काम करणारे लोक या बाबतींत मदत करीत नाहींत. रा. ×× तलाठी व रा. शहा प्रथम "वसूली करवून देऊं; तुम्ही दावा करूं नका." सांगत होते. पुढें दावा करण्याची पाळी आली.' दावा झाला. हुकूमनामा मिळविला. पण बजा-वणींतहि मदत करीत नाहींत उलट "त्या माणसास तुम्ही त्रास कां देतां?" असें सांगून त्याला सोडून देण्याची शिफारस करतात. याला काय म्हणावें? आमची नीतिमत्ता किती खालावत गेली आहे पहा. सार्वजनिक पैसे घेणाराला सांगत नाहींत. कीं "वाटेल तें कर पण पैसे दे" व मला मात्र शिफारशी! स्वतःचा शब्द खरा करण्यासाठीं अगदीं निर्धन व परतंत्रताहि सेवणारा राजा हरिश्चंद्र हिंदुस्तानांतच झाला काय? अशी शंका येते. हल्लींच्या आमच्या मंडळींतील शब्दांची किंमत पहातां ही शंका येते.

ता. १-७-२९

काशी हिंदु विद्यापिठांतील श्री. गोडबोले आले आहेत असें सकाळीं कळलें. त्यांना सायंकाळीं महाराष्ट्र-समाजांत येण्याची विनंति केल्यावरून आले होते. जर्मनींतील प्रोफेसर कसें शिक्षण देतात तें त्यांनीं सांगितलें.

६७३४२३
अनुक्रम ...१०१..... वि: .....१२५.....
२५-२-५९

विद्यार्थ्यांस स्वतः मेहनत करून ज्ञान कसें मिळवावें तें शिकवितात. स्वतःचे पायावर उभे राहातां येईल असें करतात. जर्मन लोक काम अतिशय करणारे–व्यवस्थित करणारे–बारीकसारीक गोष्टींचाहि पिच्छा पुरविणारे असें त्यांनीं सांगितलें.

रा. देसाई मास्तर यांचे चिरंजीव आजपासून माझेकडे वकिलीकाम शिकण्यास येऊं लागले. आतां माझेकडे कितीतरी तरुण मित्र येऊं लागले आहेत. अर्थात् प्रत्येकानें प्रत्यक्ष आर्थिक फायद्याची किती अपेक्षा ठेवावी अथवा मुळींच ठेवूं नये हें मीं प्रथमपासूनच स्पष्ट सांगितलें आहे. धंद्यांत प्रामाणिकपणा व काळजीपूर्वक काम हे गुण पाहिजेत. इतर सर्व कांहीं त्या-मागून येते, असें मी प्रत्येकास सांगत असें. सत्यवचनिलोभीपणा, मधुर भाषण वगैरे तर हवेंच.

मराठा एज्युकेशनल सोसायटीचे ग्रंथालय
दा. क्र. ७६२३

ता. ४–७–२९

सकाळीं श्री. चैतन्यप्रसाद दिवाणजी आले होते. येथें एक दुसरें कॉलेज काढण्याविषयींचा विचार झाला पाहिजे असें त्यांचें म्हणणें पडलें. मीहि त्यांस संमत असल्यानें नवीन कॉलेज (Arts) काढण्याविषयींच्या माझ्या खटपटीची हकिकत त्यांस निवेदन केली. पूर्वीपासून कल्पना होतीच. हल्लीं गुजरात कॉलेजांत योग्य वातावरण नाहीं. उत्तम नागरिक तयार होण्यास आदर्श शिक्षक पाहिजेत. पण जेथें शिक्षकच सर्व परदेशी कापड, परदेशी तऱ्हेचा पेहेरवेश, कसें तरी करून मासिक वेतन चालू रहावें म्हणून नोकरी संभाळण्या-करितां भीतिग्रस्त वृत्तींनें रहाणारे तेथें विद्यार्थ्यांस काय शिक्षण मिळणार ? असो. तात्पर्य कीं राष्ट्रीय वातावरण ज्यांत राहील असें कॉलेज अत्यंत जरूर आहे. लोकसेवेसाठीं लोक नवीन मिळत नाहींत. त्यांस तरुणपणींच गोडी लावून सेवेकडे खेचणेसाठीं कॉलेज पाहिजे या कल्पनेस गुजरात कॉलेज संपानें चालना जास्त मिळाली. मीं आंकडे–अंदाज वगैरे प्रो. गोडबोले (सर परशुरामभाऊ कॉलेज पुणें) यांचेकडून मिळवून शेट कस्तुरभाईंकडे दिले आहेत. व त्यांनीं जर पुढाकार घेऊन मोठी वर्गणी दिली तर अल्पाव-काशांत कॉलेज सिद्ध होईल, नाहीं तर कालांतर लागेल याप्रमाणें हकीकत

सांगितली. गुजरात विद्यापीठांतून रा. रामनारायण पाठक, रसिकलाल परीख हे निघाले आहेत. ते या कल्पनेस मिळतील. डॉ. सुमंतहि येथें आहेत. तेव्हां सर्वांनीं भेटून याविषयीं चर्चा करावी अशी रा. दिवाणजींनीं सूचना केल्यावरून सायंकाळीं ६॥ चे सुमारास ब्रह्मक्षत्रिय सोसायटींतील डॉ. सुमंत यांचे बंगल्यांत सर्व भेटलों. डॉ. सुमंत, रा. रामनारायण पाठक, रा. रसिकलाल परीख, रा. चैतन्यप्रसाद दिवाणजी व मी. कॉलेजविषयीं खूप चर्चा केली. धोरण काय असावें व कसें पुढें जावें याचाहि विचार केला. पुढीलप्रमाणें सामान्य धोरण सर्वांस मान्य झालें:— (१) कॉलेजांत संपूर्ण राष्ट्रीय वातावरण असावें. (२) युनिव्हर्सिटीस जोडलेलें असावें. स्वतंत्र रीतीनें असणें उत्तम, पण त्यांत विद्यार्थी येत नसल्यामुळें जास्त संख्या यावी यासाठीं मुंबई युनिव्हर्सिटीची मान्यता हवी. (३) कॉलेजांतील काम करणाऱ्या मंडळींनीं कॉलेजांतील अध्यापन हीच मुख्य बाब ठेवून कार्य केलें पाहिजे, निरनिराळे हेलकावे खात काम उपयोगी नाहीं. (४) प्रत्येक अध्यापकास पूर्ण विचारस्वातंत्र्य हवें. पण सक्रिय राजकारणांत त्यानें पडूं नये. तसाच प्रसंग येईल तेव्हां सर्वजण ठरवितील तेंच खरें. (५) स्वतःचीं तत्त्वें जर शाबूत रहात असतील तर सरकारी ग्रँट घेण्यास हरकत नाहीं. (६) कॉलेज काढण्यासाठीं एक संस्था असावी व तिच्या अंतर्गत कॉलेज असावें. (७) देशी भाषेंतून शिक्षण हें ध्येय असावें. व या बीजांतून एक स्वतंत्र गुजरात विद्यापीठ (युनिव्हर्सिटी) उत्पन्न होईल असें मनांत तरी असावें. येणेप्रमाणें ठोकळ मुद्दे झाले. Arts कॉलेज नसावें असा एक पक्ष गांवांत आहे. पण सामान्य शिक्षण म्हणून जरूर आहे असें एकमत आमचें तरी होतें.

ता. ५–७–२९

आज कोर्टांत हिंदुमुसलमान तंट्याचें एक अपील चालवावयाचें होतें. येथील सतर्घी आऱ्यावरील हिंदु स्मशानभूमीच्या एका भागांत मुसलमानांनीं कबजा केला. जमीन सरकारची. हिंदु लोकांनीं जमीन कबजांत घेण्याचा दावा केला. जमिनीची मालकी नसल्यामुळें जरी मुसलमान मागाहून आले

व शिरजोरीनें राहिले असें खालच्चे कोर्टानें ठरविलें, तरी पण कब्जा देतां येत नाहीं म्हणून दावा रद्द केला. त्यावर अपील होतें. डिस्ट्रिक्ट जज्जांचा मुसलमानांकडे कल झुकता. मला हें माहीत. तेव्हां त्यानें कांहींतरी पूर्व-ग्रहानें लिहूं नये म्हणून मी जपूनच होतों. तरी पण एकंदर रोख मुसलमानांचें म्हणणें जास्त ग्राह्य इकडे. हिंदूंच्या समाधी तेथें कित्येक वर्षें असल्या तरी-सुद्धां त्यांची माहिती सरकारास नाहीं असें तो अनुमान काढतो व एका हिंदू बावानें त्या जमिनीविषयीं सरकारावर दावा केला त्याची मात्र सर्व हिंदु-मात्रास माहिती होती किंवा असली पाहिजे अशी विचारसरणी दर्शवितो. मला तर या उघड उघड पक्षपाती विचारसरणीची चीडच आली. पण—पण उपयोग काय ?

या इंग्रज किंवा परकी अधिकाऱ्याचा कल हिंदूंच्या विरुद्ध कां ? तर मुसलमानांस खूष करण्यासाठीं. खूष कां करावयाचें ? तर मुसलमान लष्करी वाण्याचे, अतएव वेळीं अवेळीं शरीररक्षणास उपयोगी. हिंदु नेभळट. शिवाय आमच्यांत फूट पाडण्यासाठीं मुसलमानांस चढवावयाचें हें तर आहेच. मला जितका त्वेष वाटला तितकें वाईटहि वाटलें कीं आमचे देशांत आमची काय ही स्थिति ! आमचा धर्महि आम्हांस पाळतां येत नाहीं. ज्यानें वाटेल त्यानें झिडकारावें व कुरघोडी करावी इतकी हीन दशा हिंदु समाजास आलेली ! जास्त दुःख हें कीं याची जाणीवहि नाहीं. आम्ही आपले वैयक्तिक स्वार्थांत गढलेलों !!! पण या निराशेंतहि भविष्याची आशा उज्ज्वल आहे. हिंदुमुसलमान तंट्यामुळें एकंदर हिंदुत्वास फायदाच आहे. आमची एकी जास्त वाढेल व तेजोहीनता कमी होईलच.

ता. ६–७–२९

आज दुपारीं कलेक्टरचे पर्सनल असिस्टंट यांचेकडे वासणा मकतम-पूरचे इनामदारांचें अपील होतें. उलट बाजूनें रा. ×× वकील होते. कागद वाचल्याशिवायच आलेले होते. शिवाय अगदीं उघड उघड कागदोपत्रीं असलेल्या गोष्टीहि कबूल करीत नव्हते. पक्षकाराचें अग्राह्य व मूर्खपणाचें बोलणें कोर्टापुढें ठेवीत होते. मला तर अगदीं या प्रकाराची किळस आली.

वकील या नात्यानें आम्ही सारासारविचार करावयास नको काय? पक्षकार स्वार्थानें वाटेल तें बरळतं सांगूं लागला तर आम्ही म्हणजे त्याचे फोनोग्राफ कीं काय? गृहस्थानें उगीचच्या उगीच वेळहि पुष्कळ घेतला. परत येतांना सांगूं लागले कीं "जर मी कांहीं बोललों नसतों तर कारभाऱ्यानें इनामदारास माझे विरुद्ध रिपोर्ट केला असता." मी म्हणतों "केला असता" पण त्यांत काय झालें? कदाचित् पक्षकारानें आपली दुसरी केसहि दिली नसती. पण त्यामुळें आपला स्वतःचा अधःपात करून घ्यावयाचा कीं काय? तरी आम्ही शिक्षित समजले जाणारे लोक!

ता. ७–७–२९

मांडवीच्या पोळेंतील एका वाण्यानें रजपूत बाईशीं लग्न केलें. ती वाणी आहे असें समजून केलें. वाण्याचें वय ५०, मुलीचें वय १५–१६. लग्नास रु. चार हजार दिले. याबद्दल 'हिंदू जीवन' पत्रानें खूप लिहिलें आहे. वृद्ध–तरुणी विवाह या दृष्टीनें, पैसे देण्याचे दृष्टीनें गर्ह्य यांत शंका नाहीं. पंण या संपादकानें वाण्यापाशीं पैसे मागितले व 'पैसे दिले तर सर्व दाबून टाकीन, नाहीं तर छापीन' अशी धमकीहि दिली होती. मीं सल्ला दिली कीं अशी लांच देण्याचें कांहीं एक कारण नाहीं. अखेर मजकूर प्रसिद्ध केला. ते सल्ला विचारण्यास आले होते. कांहीं एक न करतां स्वस्थ बसावें, असाच सल्ला अर्थात् दिला. या प्रकारांत वाईट वाटतें तें असें कीं सार्वजनिक हित साधण्यासाठीं म्हणून वृत्तपत्र काढून शेवटीं स्वतःचे पोळीवर तूप ओढण्या-साठीं धंदा हे लोक करतात. हिंदुस्थानांतील सामान्य प्रजेस वाटेल त्यानें फसवावें अशी स्थिति झाली आहे! जूट व आपलेपणा नाहीं. सामाजिक नीतिहि नाहीं.

ता. ९–७–२९

आज येथील डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचा एक दावा आहे. त्यांत कागद पहात होतों. सन १८६३ सालीं ठराव करून सन १८६४ सालीं मुंबई सरकारनें लोकल फंड कमिट्या काढल्या व १८६९ सालीं पहिला कायदा

केला. मुख्य उद्देश "प्रवासी (डाक) बंगले" वगैरेसाठीं हिंदुस्थान सरकारजवळ पैसे नव्हते, तेव्हां स्थानिक करवसुली करून करण्याचें हें आंतवट्ट्याचें काम लोकांवर सोपविण्याचा प्रयत्न केला. स्थानिक अधिकारी व मुंबई सरकार विरुद्ध होतें असें पुढें दिलेल्या जेम्स कलेक्टरच्या पत्रावरून दिसतें:—

मि. जेम्स, कलेक्टर अहमदाबाद यांचें ता. २९ जून १८८८ चें नं. ३६३ चें मुंबई सरकारास पाठविलेलें पत्र महत्त्वाचें आहे. त्यांत पुढील मनोरंजक हकीकत आहे:—

(प्रथम बंगल्यांविषयीं अनुदार धोरण सरकारनें आपले १२–४–८८ चे ठरावांत घेऊन जागा सरकारी म्हणण्याचा प्रयत्न केला याबद्दल दोष देऊन नंतर पुढील हकीकत आहे. सदर सरकारी ठरावामुळें पत्र लिहिलें आहे):—

"For many years, the development of the resources of India has been an object with all Governments...from the time of Lord Mayo and Lord Ripon. It cannot be forgotten how during Lord Ripon's viceroylty, the duty of encouraging local manufactures was forced upon all officers of Govt., till not even an English inkstand or a penholder could be purchased, if such things can be purchased locally. Ahmedabad possesses many specially artistic and highly attractive local manufactures, wood carving, carpentry, shield, Kinkhab, dyed and printed cotton stuffs and others..."

नंतर पुढें मग पत्रांत "पुष्कळ अमेरिकन लोक येथें प्रवासास येतात व आले पाहिजेत. ते आले तर माल खरीद करून अमदाबादच्या या कारीगिरीस उत्तेजन देतील व म्हणून तरी चांगला "प्रवासी बंगला हॉटेलवजा" ठेविला पाहिजे वगैरे मजकूर आहे. स्वदेशीचा इतका प्रचार सरकारनें केला असतां मागाहून 'स्वदेशी म्हणजे राजद्रोह' केव्हां झाला?

ता. १३–७–२९

शेठ ×× व त्यांचे चिरंजीव यांचें अलिकडे जमत नाहीं. त्या बाबतींत सल्ला विचारण्यासाठीं श्रीमती ×× आल्या होत्या. घरोघर मातीच्या चुली.

चापलेकांत किंवा भावाभावांचे वितुष्टांत सल्ला देण्याचा प्रसंग येणें म्हणजे खरोखर दुर्दैवच–उच्च भावनांवर आघात करून त्यांचे कायदेशीर हक्कांचेंच तेवढें आविष्करण होतें व कुटुंबासाठीं त्याग करण्याची भावना नाहींशी होते. पण !— पण याला काय इलाज ?

ता. १५–७–२९

सकाळीं रा. वल्लभभाई पटेल आले होते. म्युनिसिपालिटीच्या सभासदत्वाचा राजिनामा देण्याचे नक्कीच केलें. म्यु. चा कारभार फार फारच वाईट होत चालला आहे. शिकली सवरलेली मंडळीच म्युनिसिपालिटींत अप्पलपोटेपणा व स्वार्थ साधीत आहेत. हलकटपणा, राग, द्वेष, स्वार्थ वगैरे दुर्गुणांनीं बजबजलेल्या वातावरणांत राहाणें शक्य नाहीं. शहराची सेवा होणें नाहीं. त्यापेक्षां बाहेर पडलेलें जास्त बरें. तेव्हां आम्ही दोघांनींहि राजिनामे दिले.

ता. १६–७–२९

"मी म्युनिसिपालिटींतून राजिनामा कां दिला ?" हा प्रश्न आज पुष्कळ जणांनीं विचारला. उत्तर उघडच आहे. कारणें पुढीलप्रमाणें:—

(१) [अ] सभासदांमध्यें नीति उरली नाहीं–शहराचें हित न पाहतां केवळ स्वार्थ–पक्षभेद व वैयक्तिक रागद्वेष. उदाहरणार्थ ×× अध्यक्ष. पण त्यांनीं आपल्या मुलीच्या घराची गॅलरी कायद्याविरुद्ध केलेली ठेवण्यासाठीं रस्ता खोदावा व येणेंप्रमाणें १२ फुटांपेक्षां जास्त उंचीवर गॅलरी आहे असें ठरविण्याचा प्रयत्न करावा; [ब] रा. ×× यांनीं आपल्या कारखान्याची माती तिन्हाइताच्या नांवें कॉन्ट्रॅक्ट करून म्युनिसिपालिटीस विकावी व सभासदांनीं कानाडोळा करावा; [क] प्रत्येक कमेटींतून नेमले जाणारे रा. ×× यांजला तर फौजदारी कोर्टानें गुन्हेगार ठरवून शिक्षा केलीच आहे. अपिलांत काय होतें तें पहावें; [ड] हें तर राहोच पण नुकतेंच ×× ऑफिसरनें एका सुपरवायझरच्चे मुस्कटांत भर रस्त्यावर लगावली. त्याचा गवगवा झाला. त्यानें राजिनामा दिला. अशी चव्हाट्यावर झालेली गोष्ट, झालीच नाहीं असें म्हणण्याची धृष्टता ×× ऑफिसरनें करावी व त्यास

शिकल्या सवरलेल्या म्हटल्या जाणाऱ्या सभासदांनीं पाठिंबा द्यावा यापेक्षां आणखी अनीतिकारक मनोदशेची कोणती गोष्ट ?

(२) लोकशाहीचें तत्त्व लाथाडलें जातच होतें, पण त्याचा अध्यक्षाचे नेमणुकीचे बाबतींत तर कडेलोटच झाला. प्रत्येक ठिकाणीं सरकारनियुक्त सभासद ! अशा स्थितींत राहून तरी काय करावयाचें ?

(३) आर्थिक दृष्टीनेंहि कारभार असा चालला आहे कीं कोणासहि त्याची पर्वा नाहीं. कामें होत नाहींत.

(४) एंजीनियरिंग खातें मुख्य, पण तेथें कोणीहि जबाबदार माणसें राहिलीं नाहींत. वॉटरवर्क्स व गटर यांचे व्यवस्थेंत बजबजपुरी माजलेली. या दोहोंचीहि स्थिति भयंकर होणार असें दिसत आहे. याचे जबाबदारींत अंशतः तरी भागीदार होण्याची इच्छा नाहीं.

(५) रा. ×× जोंपावेतों चीफ ऑफिसर आहे तोपावेतों कांहींहि होणें शक्य नाहीं. मनुष्य अतिशय कारस्थानी, मिजासी, द्वेषभावपूर्ण. कागद-पत्रांचे फायलांतून वाटेल तो कागद काढून टाकणें हें तर अगदीं त्याचे हातचा मळ. तेव्हां म्यु. नोकरांतहि तीच नीति. अशा कारभाराची जबाबदारी अंशतःहि नको.

(६) या सर्व गोष्टींना विरोध करून सुधारणा करण्याचा प्रयत्न करणें. परंतु बोर्डांतल्या शहाण्या व शिकल्यासमजणाऱ्या लोकांत विचार व सहकार करण्याची बुद्धि नाहीं; तेव्हां राहणें म्हणजे कांहीं कार्य न होतां कालक्षेप करणें आहे. गाढवांचा गोंधळ व लाथांचा सुकाळ असा प्रकार चालू आहे. तेव्हां बाहेर पडून निदान जनतेस तरी त्यांच्या निर्भेळ कारभाराचें दर्शन झालें पाहिजे !

रा. कार्लेकर आज सायंकाळीं धांगध्रा येथें परत गेले. हल्लींचे तरुण पिढीचे अव्यवस्थितपणाचा उत्तम नमुनाच होता. घराचे बाहेर जाणें तें सांगावयाचें नाहीं. वेळेवर जेवणखाणास उपस्थित व्हावयाचें नाहीं. गृहस्थ परीक्षेची वेळहि चुकला—वगैरे. शिक्षण या शब्दाचा अर्थ हल्लीं आपण भलताच समजूं लागलों आहोंत.

ता. १७–७–२९

दुपारीं १२ चे सुमारास रा. रा. वल्लभभाई पटेल यांचेकडे गेलों. ना. विठ्ठलभाई पटेल आले आहेत त्यांना भेटण्यासाठीं गेलों. त्यांची तब्येतहि बरी नाहीं. मीं कौन्सिलांत जावें व प्रधानकी मिळविण्याचा प्रयत्न करावा अशी त्यांची सूचना आहे. प्रधान होऊन कांहीं करणें शक्य आहे काय? याला त्यांचें उत्तर कीं "राजिनामा खिशांत ठेवून गेलें तर कांहीं तरी होणें शक्य आहे." अर्थातच जोंपावेतों रा. सा. हरिलाल आहेत तोंपावेतों त्यांचे माझे व्यक्तिगत संबंध पहातां मी अमदाबाद शहरातर्फे कौन्सिलांत जाणें कठीण आहे.

ता. १८–७–२९

सायंकाळीं बाहेर फिरावयास न जातां रा. रा. वल्लभभाईकडे रा. रा. विठ्ठलभाई पटेल यांस भेटण्यास गेलों होतों. मीं वकिली सोडून देऊन कौन्सिलांत प्रवेश करावा अशी पुन्हां त्यांनीं शिफारस केली. कौन्सिलांत व बाहेर काम करणाऱ्या मंडळींचा सहकार पाहिजे, पक्षापक्षी नाहींशी झाली पाहिजे, या दिशेनें कौन्सिलप्रवेश करून काम करणारी मंडळी हवी आहेत, तेव्हां त्यांनीं विशेष आग्रह केला. मींहि माझी अडचण सांगितली. वकिली अगदींच सोडावयास मी आज तयार नाहीं. तरी पण काम करण्यास तयार आहें. पण मुख्य अडचण म्हणजे माझा व रा. हरिलाल देसाई यांचा निकट परिचय असल्यामुळें त्यांचेशीं चढाओढ करून कौन्सिलांत जाणें शक्य नाहीं. मी अमदाबाद शहरातर्फे जाणार, तेहि त्याच शहराचे प्रतिनिधि. तेव्हां ही मोठीच अडचण आहे.

ता. १९–७–२९

आजचा दिवस एका दृष्टीनें फारच महत्त्वाचा. कित्येक दिवस चर्चा करतां करतां आज सौभाग्यवतीकडून दोन दिवसांचा उपक्रम करविला. (१) सकाळीं थोडा व्यायाम–आंतड्याची कसरत–दंड बैठका, १२ नमस्कार.

(२) श्रीमती माल्तीबाई पंडित यांचेमार्फत इंग्रजी भाषेच्या व इतर शिक्षणास आरंभ. आतां या गोष्टी जितके दिवस नियमित चाल्तील त्या खऱ्या. दुसरीपेक्षां पहिलीची जास्त भीति आहे. मुख्य अडचण म्हणजे काल्पनिक भीति. घरांतील माणसें व समाजांतील मंडळी टीका करतील ही. पण भल्तीच भीति काय उपयोगी ? समाजांत दुर्दैवानें आरोग्याच्या बाबतींत खालावलेल्या स्थितीचा कोण विचार करीत आहे ? स्त्रियांची शरीरयष्टि किती शोचनीय ! पुरुषांस ताकद नाहीं मग स्त्रियांस कोण पुसतो ? इतर अडचणी म्हणजे घरच्या कामकाजांत वेळ कसा काढावयाचा वगैरे. पण माझे मतें त्या गौण आहेत. असो. उपक्रम तर झाला.

सायंसाळीं संकटनिवारण कमिटीची सभा होती. शिल्की फंडांतून आसाम संकटनिवारण फंडास रु. २५००० पावेतों श्री. अमृतलाल ठक्कर यांचेमार्फत खर्चासाठीं पाठवावे–दात्यांचीं संमति घेऊन पाठवावे अशी सूचना होती. पुष्कळ वेळ भवती न भवती झाल्यावर रु. १५००० पावेतों पाठविण्याची शिफारस करण्याचें ठरलें. यांतहि येथील कांहीं श्रीमंत मंडळींची मनोदशा दिसून आली. पैसे येथेंच व्याजी लावावे, कदाचित् पुढेंमागें येथें कांहीं आपत्ति आली तर उपयोग होईल इत्यादि. म्हणजे अर्थ हा कीं पुढें पैसे द्यावयास नको. हा स्वार्थ.

ता. २२–७–२९

तिसरे प्रहरीं कोर्टांत तब्येत बरी नाहीं असें वाटलें. रात्रीं सुमारें १० चे सुमारास एनिमा घेतला. ताप उतरल्यासारखा झाला. पण सुमारें ११ पासून पुढें जास्त जास्त जीव घाबरा होऊं लागला. एके स्थितींत स्वस्थ पडून राहातां येईना अशी स्थिति झाली. मला तर इतकें असह्य झालें कीं रडूंच येऊं लागलें. नंतर आल्याचा रस घेतला, मात्रा घेतली. शेजारच्या मंडळींना व डॉक्टरना बोलावणें पाठविलें. डॉक्टर येईपावेतों डोकें व पोट चोळल्यानें बराच आराम झाला. २–२॥ नंतर मला झोप लागली.

रात्रीचे या प्रकारांत माझा जीव जोखमींत आहे असें मला बिलकूल वाटलें नव्हतें व तसें कांहीं नव्हतेंहि असें डॉक्टरांनींहि सांगितलें. पण मला

मात्र दोन गोष्टींची जास्त जाणीव झाली: (१) देहाचें क्षणभंगुरत्व व (२) त्यामुळें जनसेवा वगैरे जे आपले विचार आहेत ते अंमलांत आणणें लांबणीवर टाकतां कामा नये.

या दुखण्यास निमित्तकारण तात्कालिक म्हणजे बद्धकोष्ठ. पण तेवढ्यानें याची उपपत्ति लागत नाहीं. वकिलींत आज कित्येक वर्षें एकसारखे मानसिक श्रम पडत आहेत त्याचाहि परिणाम आहे. शरीरांतील इंद्रियांत कांहीं फरक झालेला नाहीं, पण त्यांचे सामर्थ्यांत झाला आहे असें डॉक्टरांचें म्हणणें. तेव्हां ही निसर्गाची पहिली सूचना आहे कीं मानसिक त्रास कमी झाला पाहिजे. शक्य ती खटपट अर्थातच करावयाची. यश देणें परमेश्वराधीन अथवा निश्चयाचे बळावर.

ता. २७–७–२९

आज भोजनोत्तर माडीवर बसलों होतों. सौभाग्यवती अस्पृश्य असल्यामुळें बोलतच बसली होती. इतक्यांत नदीस पाणी आलेचा आवाज ऐकूं येऊं लागला. मीं विचारलें कीं "आवाज पाण्यासारखाच वाटतो का?" पण कोणास तें पटेना. परंतु रस्त्यावर लगेच मंडळींची धांवाधांव दिसूं लागली. त्यावरून नदीस एकदम पूर आल्याचें समजलें. पहाण्यास लगेच गेलों. सुमारें १० मिनिटांत पाणी आलें असें समजलें. दुथडी भरून नदी चालली होती. पाण्यास जोर पुष्कळ होता. एकदम पाणी आल्यामुळें धोबी, छिपे वगैरे नदींत काम करणारे मंडळींत पुष्कळ प्राणहानि झाली असें ऐकलें. कपडे वगैरे गोळा करण्यांत गुंतलेली मंडळी वाहून गेली. मला तर तें ऐकतांच अश्रु येऊं लागले. निसर्गापुढें मनुष्य किती क्षुद्र आहे! सन १८७५ सालीं असा पूर आला होता व माणसें वाहवलीं. त्यावेळीं फौजदार रा. गजानन विठ्ठल जांभेकर होते. त्यांनीं तशा पुरांत उड्या टाकून माणसें वांचविलीं. आजचे प्रसंगींहि परशुराम भाऊ व कार्लेकर सर्कसवाले मंडळींनीं बरीच मदत केली.

ता. २८–७–२९

प्रवचन नांवानें माझें बोलणें जाहीर केल्यामुळें व्यासपीठावर बसावें लागलें. मला तर तें कसेंसेच वाटलें. उपदेशकाराची भूमिका खरोखर अत्यंत कठीण आहे. आचरण हवें, त्याशिवाय उपदेशास अधिकार नाहीं. तरी पण समाजांत हें एक सोंग शिरलें आहे कीं वाटेल त्यानें उपदेश करावा. मंडळींचे प्रेमाचे आग्रहामुळें बसलों इतकेंच. विषय "नमस्कारयज्ञ" हा होता. सुरुवातीस उपदेशाचा अधिकार नाहीं याची मला जाणीव असल्याचें सांगून नंतर "यज्ञ" शब्दांतील त्यागाचे कल्पनेवर विवेचन केलें. स्वार्थासाठीं हा त्याग जरी असला तरी केवळ धर्म समजून, केवळ निष्काम वृत्तीनें यज्ञ करण्यांत विशेष बहार आहे. सामाजिक यज्ञ या भावनेनें नमस्कार-यज्ञास सुरुवात झाली असल्यामुळें तर त्यास विशेष महत्त्व आहे. आपलेकडे सामाजिक भावनेचा लोप होत चालला आहे. पाश्चात्यांत किंवा इतर धर्मियांत सामाजिक भावनेस प्रधानपद आहे. आपलेकडे व्यक्तिगत भावनाच फार जोरांत आहे. यामुळें आपल्यांत सामाजिक विस्कळितपणा फार आहे व त्यामुळेंच धार्मिक, आर्थिक, राजकीय वगैरे प्रत्येक दिशेनें हिंदुसमाजाची पिछेहाटच होत आहे. अशा काळीं अशा तऱ्हेचा सामाजिक यज्ञ–सामाजिक भावना उद्दीपन करणारा यज्ञ महत्त्वाचा आहे. अशा रीतीनें सुमारें अर्धा तास बोलून शेवटीं प्रार्थनेंतील "स्वदेशभूत्यै तनुं अर्पयामः" या ओळीकडे तरुणांनीं लक्ष विशेष द्यावें असें सांगून समारोप केला.

यज्ञाची ही भावना अंमलांत आणावयास संधि लगेच मिळाली. पाणी मुळींच नसल्यामुळें सर्व मंडळी शेजारी रा. कानेटकरांकडे विहिरीवर आंघोळीस गेली व तेथून पाणी घरीं आणीत होती. माझेसाठीं पाणी घरीं आणलें, पण मींच तें 'नको' म्हटलें. मीहि तेथें आंघोळीस गेलों व एक बादलीभर पाणी माझे वांट्याचें घेऊन आलों. कुटुंबांतील मंडळींतहि परस्पर साहाय्य व यज्ञ ही भावना उत्पन्न व्हावयास नको काय?

सायंकाळीं ६॥ वाजतां संकटनिवारण फंडाचे सभेस गेलों होतों. आसामकडे अतिवृष्टीमुळें आलेल्या आपत्तिनिवारणासाठीं रु. १५००० द्यावयाचे सूचनेचा विचार करावयाचा होता. विशेष मंडळी आली नव्हती

फक्त सातजण होतों. ३३०० लोकांपैकीं विरोधात्मक कोणाकडूनहि पत्र आलें नाहीं. उलट आठजणांनीं पसंती दर्शविली. तरी पण शेठ ×× यांचा 'कुत्र्याचें शेपूट वांकडें' या म्हणीप्रमाणें विरोध होताच. मला तर हा विरोध कोतेपणाचा व कुत्सित वाटला. गुजरातचे पैसे गुजरात बाहेर कां जावे हा एक मुद्दा. गेले तर काय बिघडलें? सुदैवानें गुजरात सधन आहे म्हणूनच कोणीहि म्हटलें तरी मागणार. "असेंच धन राहो व सत्कार्यासाठीं दिलें जावो" अशी प्रार्थना करण्याऐवजीं बाहेर कां पाठवावें अशी क्षुल्लक च कोती भावना काय म्हणून? शिवाय गुजरात सर्व व्यापार हिंदुस्थानांत करून सर्व देशांतून पैसा मिळवीत नाहीं काय? या दृष्टीनें सर्व देशाचा गुजरातवर हक्क आहे. वगैरे दृष्टींनीं आसाम फंडास रु. १५ हजार पाठविणें गैर नाहीं. परंतु शेठ ×× वगैरे मंडळी एकीकडे "तत्त्वावर" विरोध करीत, दुसरे बाजूनें उलट सांगत. तत्त्व म्हणजे ज्या कामासाठीं पैसे गोळा केले त्याच कामासाठीं वापरणें. पण लगेच असेंहि सांगत कीं गुजरातेंत पैशाची किती जरूर आहे? म्हणजे जर दुसऱ्या कामीं पैसे वापरावयाचे तर मग आसाम गुजरातबाहेर आहे त्यामुळें कां फरक करतां? पण या सर्व विरोधाचे मुळाशीं भावना श्री. वल्लभभाईविषयींचे व्यक्तिगत द्वेषाची किंवा इर्षेची आहे. खादी टोपीवाल्यास विरोध करावयाचा हें मुख्य. रा. वल्लभभाईंचे व माझे खटपटीमुळें लोकांनीं पैसे देणेचें कबूल केलें आहे असें ते म्हणाले. मग मी त्यांस यथास्थित स्पष्ट बोललों–त्या फंडांत आम्हींहि आमचे शक्तीप्रमाणें पैसे दिले आहेत. तेव्हां आम्हांस आमचें मत सांगावयाचा अधिकार नाहीं काय? असो. शेवटीं त्यांचें मत विरुद्ध पडून बाकीच्या मतांनीं आम्ही आमची शिफारस कायम केली.

ता. ३१–७–२९

दुपारीं रा. वल्लभभाई, मणीबेहेन, महादेव देसाई व मी असे चौघेजण बरोबर आश्रमांत महात्माजींकडे गेलों होतों. जमीन महसुलांचे बाबतींतील सरकारी धोरणाविषयीं रा. वल्लभभाईंचा पत्रव्यवहार सरकारशीं चालू आहे त्या बाबतींत त्यांना चर्चा करावयाची होती. सरकार पत्रव्यवहार करून

आतां पुन्हां पगडी फिरवूं पहात आहे. ज्या तालुक्यांची फेरतपासणी झाली तेथें तर नवीन दराप्रमाणेंच महसूल घेऊं अशी सरकारची मनोदशा दिसूं लागली आहे. राष्ट्रीय सभेचे प्रमुख महात्माजींनीं व्हावें अशाविषयीं बंगाल प्रांतिक समितीच्या तारा आज आल्या आहेत त्याविषयींहि बोलणें झालें. परंतु जवाहरलाल नेहरूच योग्य आहेत असें महात्माजींनीं आजच यंग इंडियांत लिहिलें आहे. तेव्हां ते (महात्माजी) अध्यक्ष होण्याचा प्रश्नच राहात नाहीं. नंतर गुजराती गीता (भाषांतर) छापण्याविषयीं मनोरंजक चर्चा रा. महादेव देसाई व महात्माजी यांच्यामध्यें झाली. गीतेचें मूळ संस्कृत छापावें कीं काय हा मुद्दा. छापावें असें महादेवचें म्हणणें. गीतेचा अर्थ करणें म्हणजे शब्दाचे अर्थाचा कीस काढणारें पांडित्य नको पण आपण जो अर्थ समजतो त्याप्रमाणें आचरण करणें. सबब त्यास अनुसरूनच गुजराती गीतेंत अर्थ दिला आहे व इतर कांहींहि अर्थ निघणें शक्य असलें तरी गीतेचा एकच अर्थ होतो तो अमुक–व तोच अर्थ खरा अशी मांडणी लोकांपुढें करणें हा उद्देश. शिवाय मध्येंमध्यें संस्कृत छापल्यानें सरळ वाचनास अडचण होते. जास्त मजकूर छापल्यानें पुस्तक महाग होतें. संस्कृतज्ञ लोक फार कमी–केवळ संस्कृतांत वेडेवांकडें वाचण्यांत पुण्य आहे ही रूढ चुकीची कल्पना काढली पाहिजे. गीतेचें पुण्य केवळ वाचण्यांत नाहीं पण आचरण्यांत आहे ही भावना झाली पाहिजे. वगैरे वगैरे महात्माजींचे मुद्दे होते. मला खादीप्रतिष्ठानचे बाबतींत अखिल भारत चरखा संघानें दिलेल्या लोनचे बाबतींत बोलावयाचें होतें. तेंहि बोलणें झालें.

ता. १–८–२९

सायंकाळीं गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीचे ऑफिसांत समाजसेवक परिषदेच्या कार्यकारी मंडळाची बैठक झाली. त्यास गेलों होतों. परिषदेच्या तारखा २७, २८ ऑगष्ट नक्की केल्या. वेळ पण नक्की केली.

ता. २–८–२९

दुपारीं जेवावयास बसलों असतां शेठ अंबालाल साराभाई आले होते. म्युनिसिपल बाबीविषयीं बोलणें झालें. म्यु. एंजिनिअर राजीनामा देऊन जात आहे त्यासंबंधांत मतभेद आहेत. त्यास एकदम काढावा हा एक भाग व त्यावरच्च मतभेद. नवीन एंजिनिअर आणून त्यास एका कमिटीचे देखरेखीखालीं काम सांगावें अशी त्यांची सूचना. कमिटीची रचना मला फारशी योग्य वाटली नाहीं. सरकारनियुक्तांचेंच बंड.

ता. ३–८–२९

कालच्या म्युनिसिपल सभेंत एंजिनिअरला काढावा असें बहुमतानें ठरलें, व त्यावरोबरच्च एक कमिटी नेमून तिच्या देखरेखीखालीं नवा एंजिनिअर जास्त पगारावर आणावा असेंहि ठरलें. अपेक्षेप्रमाणें झगडा होऊन शेवटीं एंजिनिअर यांनीं आज कोर्टांत दावा दाखल केला. म्युनिसिपालिटीचे बाबतींत वरचेवर अलिकडे कोर्टांत प्रकरणें जाणें किती लाजिरवाणी गोष्ट! पण इतकी कळकळ कोणाला आहे? रात्रौ रा. वल्लभभाई भेटले होते. याच्च गोष्टी झाल्या. 'तुका म्हणे उगे राहावें, जें जें होईल तें तें पहावें.'

ता. ४–८–२९

वेळ जरी बरोबर ५ वाजतांची होती तरी फोटोस ६ वाजले. मी मात्र घरून सर्व कामें टाकून विरमगांवाहून आलेले एका गृहस्थासहि वेळ नाहीं म्हणून सांगून धांवत वेळेवर पोहोंचण्यासाठीं गेलों.. बरोबर ५ चे आधीं २ मिनिटें पोहोंचलों. अर्थात् माझें काम मीं केलें. हा सामाजिक दुर्गुणच. जमलेली मंडळी कोण आरडाओरड करीत होती! पत्ते खेळणारी मंडळी उठली ती पत्ते तसेच गोळा केल्याशिवाय उठली. म्हणजे पावलोपावलीं शिस्तीचा अभाव दिसत होता. चार मंडळी एकत्र झालीं म्हणजे कांहीं तरी नियम, शिस्त पाहिजे याची जाणीव असावी असें बिलकूल दिसलें नाहीं.

ता. ५–८–२९

आज एक वकिली बाबतींत हकीकत घडली ती अशी—एक गृहस्थ गेले ४।५ दिवस माझ्या मागें लागला आहे कीं त्याचेतर्फे मीं वकीलपत्र घ्यावें. तो एका खटल्यांत प्रतिवादी आहे. त्याची हकीकत थोडक्यांतच होती ती ऐकली. कायदाहि पाहिला. त्याचा बचाव कायदेशीरहि नाहीं व न्यायास अनुसरून नाहीं. म्हणून त्यानें स्वरुपचंद कारकुनाजवळ दिलेले फीचे रुपये १०० त्याला परत करण्यास सांगून 'माझे वकीलपत्राची जरूर नाहीं पण विरुद्ध बाजूच्या वकिलांस भेटून आपसांत तडजोड करावयास मदत करतों.' असें सांगितलें व त्याप्रमाणें रा. मणिलाल चतुरभाई यांस भेटलोंहि व त्यांनींहि 'आपले पक्षकारास बोलावून तडजोड करण्याची खटपट करतों' असें सांगितलें. इतकें झालें तरी सुद्धां 'मी उद्यां वकीलपत्र दाखल करतों' असें या गृहस्थाचें आग्रहाचें सांगणें आहे. आतां काय करावें हा प्रश्न आला. मला तर या केसमध्यें खरोखर हजर होणें नाहीं. वकील लोक पैशाचे लोभानें भांडणें लावतात असा एक आक्षेप कांहींजण नेहमीं करतात. असा सरसहा आरोप करणें किती वृथा आहे!

आज रात्रौ 'रसतरंगिणीं'तून मराठी कवींचे निवडक वेचे वाचीत बसलों होतों. फारच आनंद वाटला. वाङ्मयरसाचा आस्वाद घेण्याची अतिशय इच्छा असतांहि रोजच्या चक्रांतून मोकळेपणा मिळेल तेव्हां ना!

ता. १०–८–२९

मथुरा गुरुकुलाची मंडळी सकाळीं माझेकडे आली होती. सर चिनुभाईस मीं चार शब्द सांगावे व वर्गणी देववावी अशी मागणी होती. मला तर या शिफारशीचा अत्यंत कंटाळा आहे. खरोखर इतकीं चांगलीं कामें चालूं आहेत कीं जर माझेजवळ पैसे असते तर सर्वांनाच उदारपणानें दिले असते. पण गरजा इतक्या आहेत कीं एक काय पण शंभर सर चिनुभाई अगदीं निष्कांचन बनून सर्वस्व देशास अर्पण केलें तरी 'दर्यामें खसखस!' तरी पण त्यांना सांगून पाहीन असें मंडळींस सांगितलें आहे.

ता. ११–८–२९

रा. अंबालाल यांनीं जेवावयास सांगितलें होतें पण आज जमणार नाहीं असें सांगून निरोप घेतला. म्युनिसिपल परिस्थितीविषयीं त्यांनीं गोष्ट काढली. म्यु. एंजिनियरच्या बाबतींतील धोरण गैरकायदा आहे हें त्यांनीं कबूल केलें पण त्यांत सभासदांची वैयक्तिक जवाबदारी (personal liability) आहे ती कबूल करण्यास आपण तयार आहोंत असें म्हणाले. माझें म्हणणें मीं त्यांस सांगितलें कीं हा प्रश्न केवळ वैयक्तिक जबाबदारीचा नाहीं, तत्त्वाचा आहे. म्यु. एंजिनियर, चीफ ऑफिसर व हेल्थ ऑफिसर यांस कायद्याचें रक्षण आहे. $\frac{2}{3}$ बहुमताचे अभावीं त्यास काढण्याचा ठराव झाला असें समजून त्या ठरावाचा अंमल करणें म्हणजे कायद्याचा भंगच आहे. हें धोरण एकंदरींत बरोबर नाहीं. पुढें जाचक होईल तेव्हां याचा विचार झाला पाहिजे असें मीं सांगितलें. म्युनिसिपालिटींत इतकीं वाईट पूर्वींचीं उदाहरणें (precedents) आहेत त्यांत हें एक आणखी, एवढेंच अंबालाल यांचें उत्तर.

ता. १५–८–२९

येथें भृगुपुर ऋषिआश्रमाचे प्रचारक आले आहेत त्यांच्या कीर्तनाचा सप्ताह सुरू आहे. शेवटच्या दिवशीं अध्यक्ष मला व्हावयाचें होतें. कीर्तन-विषय ' आधुनिक शिक्षणपद्धतीचे दुष्परिणाम ' हा मुख्य होता.

शेवटीं माझे भाषणांत मीं पुढीलप्रमाणें सांगितलें. (१) हिंदू समाज विस्कळीत आहे. सामाजिक ऐक्याची भावना नाहीं ती आली पाहिजे. (२) जो तो व्यक्तीपुरतें हित पहात असतो. समाजाचे हितांतच व्यक्तीच्या स्वतःच्या हिताचा अंतर्भाव आहे ही जाणीव नसल्यानें परकीयांचे संघ हल्ले करूं लागले त्याचा प्रतिकार आपण करूं शकलों नाहीं. इ. स. ११०० पासून मुसलमानांच्या स्वाऱ्या झाल्या तेव्हांपासूनचा हा इतिहास आहे. त्याचा परिणाम म्हणजे हिंदु समाजाची धार्मिक, आर्थिक, राजकीय वगैरे प्रत्येक बाबतींत पिछेहाट होत चालली आहे. (३) स्वदेशी, स्वधर्म व स्वभाषा ही

त्रयी व त्यांचा पाया " शरीरमाद्यं खलु सर्व साधनम् " या न्यायानें उत्तम शरीर. (४) पण शिक्षण म्हणजे केवळ शाळेंतील नव्हें तर सर्व ठिकाणीं मिळत असतें तें. मोठीं माणसें कशीं वागतात तें लहान मुलें पहात असतात. तेव्हां ज्या तऱ्हेची पुढील प्रजा झाली पाहिजे असें वाटतें—त्या तऱ्हेनें आदर्श नागरीक बनण्याच्या दृष्टीनें वागण्याचा आपल्यावर बोजा आहे हें प्रत्येकानें लक्षांत ठेवलें पाहिजे.

ता. १८-८-२९

सायंकाळीं उदीच्य ब्राह्मण स्वयंसेवक मंडळाच्या स्थापनेचा समारंभ होता. अध्यक्ष होण्याचें मीं कबूल केलें होतें. त्याप्रमाणें बरोबर ५ वा. मी दाखल झालों. समारंभ ४ वा. असें जाहीर केलें होतें पण नक्की वेळ ५ वाजतांची होती. ज्ञातीच्या मंडळींची संवय ठरविलेल्या वेळेच्या नंतर १ तासानें येण्याची असल्यामुळें अशी वेळ ठेविली होती असें मला सांगण्यांत आलें होतें. ही संवय वाईटच. मी ५ वाजतां कां आलों हें सांगण्याची मला मोकळीक असली पाहिजे अशा अटीवरच मीं तें मान्य केलें होतें. तरुण मंडळीचे परिचयांत राहणें माझ्या आयुष्यांतील ठरविलेल्या पुढील सेवा-धर्मास जरूर असल्यामुळें अशा प्रसंगीं अध्यक्ष होण्याच्या विनंतीस नाहीं म्हणतां येत नाहीं.

शेवटीं मी बोललों. त्यांतील मुद्दे—(१) (अ) कमींत कमी प्रतिकाराचा मार्ग, उदा० न्या. रानडे वगैरे, (ब) जें जें वाटतें तें तें करावयाचें, ज्ञातीची पर्वा ठेवावयाची नाहीं. उदा० प्रो. कर्वे, (२) पण या दोन्ही प्रकारांत ज्ञातिविषयक प्रेम ओतप्रोत असतेंच. सुधारकांचा ज्ञातीशीं वरवर दिसणारा विरोध हा विरोध नाहीं. (३) दोन्ही प्रकारांत सुधारक हे ज्ञातीचा सर्व जुलूम सहन करतात व शेवटीं समाजास आपल्या बाजूस वळवून घेतात. येशूचें क्रुसिफिकेशन किंवा गॅलिलिओ, ल्युथर यांचा छळ हेंच दाखवितो कीं खऱ्या सुधारकास सहन केल्याशिवाय सुटका नाहीं. (४) व्यक्तिगत रागद्वेष नसेल तर कितीहि मतभेद होईना का—त्यापासून नुकसान नाहीं. जर व्यक्तिगत भांडणें असतील तर मात्र त्यांत अवनतीच आहे.

(५) विशाल दृष्टि असली तर ज्ञातिविषयक संस्थांना विरोध करण्याचें कारण नाहीं. एकाद्या लहान गटाची सुधारणा झाली तर देशास फायदाच आहे. पण जर विशालत्व नसेल व ज्ञातिनिष्ठ गट कूपमंडुकाप्रमाणेंच सामान्य हितांत आपले हिताचा समावेश करून न घेतां केवळ आपलेंच विरोधी हित पहात असतील तर तें मात्र इष्ट नाहीं. (६) समाजास चारित्र्याची जरूर आहे. बोलणें पुष्कळ झालें. तेव्हां बोलण्याप्रमाणेंच चालणें हें अत्यंत आवश्यक आहे. सेवाधर्म फार कठीण आहे. स्वयंसेवकांनीं कृतीवर कटाक्ष ठेविला पाहिजे.

ता. १९-८-२९

आज सायंकाळीं भारतभुवन थिएटरांत प्रख्यात देशभक्त बिपिनचंद्र पाल यांचें व्याख्यान युवक-संघातर्फे ठेवलें होतें. मीं अध्यक्ष व्हावें अशी श्री. रोहित मेहता वगैरे मंडळींनीं फारच आग्रहाची विनंति केली. दुसरें कोणी नसल्यामुळें मलाच अध्यक्षपद घेणें भाग पडलें. वेळेवरच गेलों. अमदावादेंतील सर्व सुसंस्कृत मंडळी आली होती. त्यामुळें मला जरा घाबरेपणा वाटला. श्री. पालबाबूंनीं प्रथम आपलेविषयींची हकीकत सांगून नंतर काँग्रेसच्या सुरुवातीपासूनची हकीकत सांगितली. शेवटीं हिंदुलोकांत आपसांतील भांडणें, दंभ, वगैरेमुळें लोकमत कमकुवत झालें असून सरकार बलवत्तर झालें आहे असें सांगितलें. स्वार्थ सोडून, भांडणें टाकून, रचनात्मक कार्यक्रम करा असा उपदेश केला. अध्यक्ष या नात्यानें मी प्रथम त्यांचे आभार मानून थोड्याशा मतभेदाबद्दल क्षमा मागितली व सांगितलें कीं "आम्ही मागाहून जन्मलेले लोक-आम्हांस पूर्वीची माहिती नाहीं. पण निदान गुजरातेंत तरी रचनात्मक कार्यक्रम होत आहे व लोकमत प्रबळ होत आहे-" असें सांगून सन १९१७-१८ चे खेडा सत्याग्रहापासून तों बारडोली सत्याग्रहापर्यंत लोकमताचा कसकसा विजय होत गेला तें सांगितलें व आम्हां नवीन पिढीमध्यें जबर आशावाद असल्याचें सांगितलें.

ता. २१–८–२९

दिल्लीहून डॉ. मुंजे येथें आज रोजीं येणार असल्याची तार आली होती, म्हणून जेवणखाण आटोपून स्टेशनवर गेलों. बाबू राजेंद्रप्रसाद आश्रमांतून डॉ. मुंजे यांस घेण्यास आले होते. डॉ. मुंजे यांचेबरोबर श्री. जगत्नारायण व दुसरे देशपांडे नांवाचे गृहस्थ होते. भद्रेंतून माझेबरोबर रा. वैशंपायनहि आले होते. रात्रौ मुक्काम माझेकडेच करून नंतर सकाळीं महात्माजींकडे जावें असें ठरलें. हिंदुमुसलमान एकी किंवा तडजोड याविषयीं महात्मा गांधी व रा. जिना यांचें जें संभाषण गेले आठवड्यांत मुंबईस झालें त्याविषयीं व महात्माजींनीं आतां या विषयांत कितपत पडावें याविषयींहि विचारविनिमय व स्वतःचें हिंदुमहासभेचे अध्यक्ष या नात्यानें मत सांगण्यास डॉक्टरसाहेब मुद्दाम आले आहेत.

ता. २४–८–२९

दुपारीं शेट कस्तुरभाई यांजला आलेलें रा. रा. वल्लभभाईंचें पत्र त्यांनीं दाखविलें. अमदाबादकर मंडळी विनाकारण अतिशय टीका करीत असल्यामुळें आपण अमदाबाद सोडून जात असल्याचें त्यांनीं त्यांत लिहिलें होतें. असें झाल्यास फारच वाईट असें शेट कस्तुरभाईंचें मत पडलें व तें बरोबर आहे.

ता. २५–८–२९

सकाळीं श्रीकृष्णमंदिरांत गुजरात कॉलेजचे प्रो. देवधर यांचें व्याख्यान होतें. "आपले व पाश्चात्य खेळ व व्यायाम" हा विषय होता. अध्यक्ष मी होतों. नियोजित अध्यक्ष डॉ. तळवलकर सुरतेस जरूरीचे कामासाठीं गेले असल्यानें रा. वैशंपायन यांनीं मला आग्रह केला व म्हणून मी गेलों होतों. नमस्काराचा व्यायाम शरीरसंवर्धनास चांगला असला तरी एकांगी आहे. प्रतिपक्षास चीत करण्यासाठीं लागणाऱ्या गुणांचा विकास त्यांत होत नाहीं. संघशक्ति नाहीं–तेव्हां यापेक्षांहि जीजुत्सु, वज्रमुष्टि, फुटबॉल

वगैरे खेळ चांगले, पाश्चात्य म्हणून त्याज्य असूं नयेत असें त्यांचे म्हणण्याचें तात्पर्य. समारोप करतांना मीं पुढील मुद्दे मांडले:—(१) कोणतेहि व्यायामाची निरनिराळे प्रकाराची तुलना शक्य नाहीं. प्रत्येकांत निरनिराळे गुणांचा परिपोष असतो. (२) नमस्कारांत केवळ शरीरास कसरत असें नसून धार्मिक वळण बहुजनसमाजास प्रिय करतां येईल असें व म्हणून जास्त बरें. (३) पाश्चात्य खेळ चांगले असतील ते जरूर खेळावे. पण ते जास्त शिष्ट-संमत किंवा संभावित अशी भावना असेल तर मात्र ते खेळण्यास जरूर विरोध आहे.

ता. २६–८–२९

सकाळीं श्री. × × वेहेन आल्या होत्या. मुलांच्या वांटणीच्या वेळीं आईचे हक्क काय, त्यांना स्वतःच्या मुलींना कांहीं देतां येईल कीं नाहीं वगैरे प्रश्न विचारीत होत्या. कुटुंबांतील नाजूक संबंधांचीं माणसें परस्परांचे कायदेशीर हक्क विचारूं लागलीं म्हणजे माझ्या मनाचा गोंधळ होतो. हे संबंध वास्तविक निर्हेतुक प्रेमाचे, त्यापुढें पैशाची किंमत काय? पण नाहीं म्हटलें तरी पैशाला कांहीं तरी किंमत आहेच. मनुष्य स्वतःचें नुकसान तरीं किती सोसणार? उभयपक्षीं त्यागाची अथवा औदार्याची वृत्ति पाहिजे. पण ज्यांचे हातीं पैसे किंवा कर्तेपणा असतो तीं माणसें इतरांचे विचार ओळखूं शकत नाहींत किंवा कानाडोळा करतात. त्याचा परिणाम मग स्वतःचे हक्क शोधण्याकडे होतो. अशा वेळीं वकील या नात्यानें सल्ला किंवा माहिती हीं देत असतां मला एक गोष्ट बोचतच असते कीं प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष भांडणाचें मूळ रोवलें जातें व प्रेमसंबंध शिथिल होतात, त्यास आपण कारणी-भूत होत आहोंत. पितापुत्रांतील भांडण, भावाभावांत भांडण, नवरा–बायकोंत भांडण वगैरे प्रसंगीं सल्ला देणें म्हणजे किती बिकट व घाणेरडें काम वाटतें!!

ता. २७–८–२९

आज रात्रौ जन्माष्टमी–श्रीकृष्णजन्म. तेव्हां श्रीकृष्णमंदिरांत कीर्तनास गेलों होतों. हे सामाजिक प्रसंग आहेत. तेथें समाजसुधारणेसाठीं, म्हणजे

समाजास योग्य वळण द्यावयाचें तर समाजाशीं संबंध सुटूं नयें यासाठीं, आणि हिंदुत्वरक्षणाच्या दृष्टीनें ऐक्य भावना प्रदीप्त ठेवण्यासाठीं प्रत्येकानें निदान शिस्त म्हणून तरी जाणें अवश्य आहे.

ता. २९–८–२९

शेट कस्तुरभाईकडे नवीन कॉलेज काढण्याच्या बाबतींत चर्चा करावयास गेलों होतों. गुजरात कॉलेजपेक्षां निराळें कॉलेज असावें असें त्यांनाहि वाटतें. नव्या कॉलेजांतील वातावरण वेगळें पाहिजे. आत्मीय व स्वदेशीय वातावरण पाहिजे हेंहि त्यांस संमत आहे. पण त्यांना एक भीति वाटते. पैशाशिवाय कसें होईल? ते पैसेवाले असल्यानें त्यांनीं पुढाकार घेतला तर पैशाची जबाबदारी त्यांचेवरच पडेल. मीं त्यांचेपुढें मुद्दे मांडले ते असेः– (१) जर कॉलेजची जरूर व उपयोगिता वाटत असेल तर पैशाची काळजी नको, पैसे येतील; (२) त्यांनीं सुरुवातीस चांगली रक्कम २–२॥ लाख द्यावी म्हणजे सुरुवात चांगली होईल. इतर रकमेची किंवा मागाहूनची जबाबदारी त्यांचेवर नाहीं; (३) काम करणारीं माणसें ही पाहिली गोष्ट व तीं असलीं तर पैसा ही गुणानुक्रमानें दुसरी गोष्ट. पैशास महत्त्व खरें पण माणसांपेक्षां कमी. (४) कोणतीहि सार्वजनिक संस्था घेतली तरी आधीं सर्व पैसे गोळा झाले व मागाहून कार्य असें झालें नाहीं; पण कार्यास सुरुवात, लोकांचा विश्वास अगोदर व नंतर पैसे व अधिक कार्य असा प्रकार आहे, उदा० प्रो. कर्वे यांचें भारतवर्षीय महिला विद्यापीठ.

ता. ३–९–२९

सायंकाळीं फिरावयास आश्रमापावेतों गेलों. महात्माजींस भेटलों. तब्येतीचे कुशल प्रश्न झाले. शरीरप्रकृतीसाठीं फिरावयास जाण्याची आवश्यकता सांगतांना महात्माजीनीं जुन्या पुस्तकांतील चाणाक्ष वैद्य व श्रीमंत रोगी यांची गोष्ट सांगितली:–वैद्यानें श्रीमंताला स्वतःचे गाडींतून दूर फिरावयास नेलें व चाबूक खालीं पडलेला श्रीमंताला आणावयास लावण्याचे निमित्तानें त्याला खालीं उतरवून गाडी घराकडे हांकली. श्रीमंताला चालतच घरीं यावें लागलें

च अशा रीतीनें व्यायाम घडला व भूक लागली इ. सांगून थोरोची उक्तीहि सांगितली कीं रोज कमींत कमी १२ मैल चालणें झालेंच पाहिजे, त्यापेक्षां कमी होईल तर तें चालणेंच नव्हे.

ता. ५–९–२९

नवीन कॉलेजविषयीं चर्चा करण्यासाठीं आज सायंकाळीं शेठ अंबालाल यांचेबरोबर शाहीबागेंत गेलों होतों. शेठ अंबालाल यांनीं प्रथम चर्चा ही काढली कीं अशा कॉलेजाची जरूर आहे काय? ग्रॅज्युएटांची संख्या वाढविण्यांत काय अर्थ? कांहीं तरी उपयोगी शिक्षण देणें जास्त बरें नाहीं काय? गॅज्युएटपावेतों शिक्षण घेण्यांत सुमारें २०–२२ वर्षें वय जातें व पुढें खास शिक्षण, म्हणजे काळाचा अतिशय व्यय होतो. या त्यांच्या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे. परंतु हा प्रश्न फार बिकट आहे. राजकीय व आर्थिक परिस्थिति आपल्या हातीं असती तर वेगळा प्रकार. पण तसें नसल्यामुळें ज्या शिक्षणाकडे सामान्य शिक्षण म्हणून लोकांचा ओढा आहे तेंच, अथवा ज्या पदवीकडे ओढा आहे ती पदवी देतांना जें शिक्षण दिलें गेलें पाहिजे तें, देण्यांतच जो फायदा घेतां येईल तितका घेण्यापलीकडे सध्यां विशेष साध्य करणें दुर्घट आहे. असो. नवीन कॉलेजच्या धोरणाच्या बाबतींत एकवाक्यता आहेः—(१) शिक्षक नुसते पोपटपंची करणारे नसून जीं तत्त्वें ते मुलांस शिकवितात तीं आचरणारे असावे–स्वदेशी, साधेपणा, त्याग इ. (२) वातावरण राष्ट्रीय असावें (३) शिक्षणाचे बाबतींत तज्ज्ञ लोकांसच मुभा असून कॉलेजचे किंवा शिक्षणक्रमाचे अंतर्व्यवस्थेंत पैसे देणारे धनिकांची उगीच ढवळाढवळ नसावी. हें तत्त्व जरी आम्हांस मान्य असलें तरी धनिक मंडळीस अगदींच अलग ठेवण्यांत पैसे मिळविण्यास मदत होईल कीं काय ही एक शंकाच आहे, (४) मातृभाषाद्वारा शिक्षण. या बाबतींत शेठ अंबालाल यांचें मत जरा वेगळें दिसलें. त्यांना मुद्दा मान्य आहे, पण ग्रॅज्युएटांची उपयुक्तता केवळ गुजरातपुरतीच नसावी, गुजरातबाहेरहि असावी आणि सध्यांचे काळीं इंग्रजी हीच परप्रांतीय किंवा परदेशस्थ मंडळीचे व्यवहारांत माध्यम भाषा असलेमुळें तिचें चांगलें ज्ञान असावें अशी त्यांची

विचारसरणी आहे. प्रि. कानेटकरांचीहि हीच विचारसरणी पुण्यास दिसली होती. यांत बरेंच तथ्य आहे, अर्थात् हा मार्ग गौण. पण राष्ट्रीय शिक्षण अगदीं स्वतंत्रपणें देण्याचें ठरविल्यास विद्यार्थी येत नाहींत म्हणून सरकारी मान्यता मिळवून कॉलेज काढण्याचा जसा आमचा विचार आहे तशापैकींच हाहिं विचार. याहि दृष्टीनें या मुद्द्याचा गंभीर विचार केला पाहिजे.

ता. ६-९-२१

नवजीवन ट्रस्ट डीड करणें पुष्कळ दिवस पडलें आहे. कांहीं अंशीं उशीर माझेकडोन खरा, पण कांहीं अंशीं महात्माजी येथें नसलेमुळेंहि झालेला. आज सकाळीं त्यांचेकडोन एक निर्वाणीचें पत्र आलें. त्यांत विनोदहि दिसत आहेच, पण त्यांतील युक्तिवाद (Advocacy) मजेदार आहे. पत्र महत्त्वाचें आहे. तेव्हां मुद्याचा भाग येथें उतरतोः-" तमने ते शुं कहूं ? तमे अनेक कामवाळा. तेने द्वारे मारा जेवा भिक्षुक तो पड्याज होय. पण फी आपनार पेहेलां भिक्षुकोनो हक. कां तो पेहेलो अथवा कईंज नहीं. आ थई प्रस्तावना." (तुम्हांला आतां काय सांगूं ? तुमच्यामागें कामें पुष्कळ. तुमच्या दारीं माझ्यासारखे भिक्षुक पडलेलेच असणार. पण फी देणाऱ्यांच्या अगोदर भिक्षुकांचा हक्क आहे. त्यांचा हक्क एक तर पहिला किंवा मुळींच नाहीं. ही झाली प्रस्तावना.) सार्वजनिक कार्यास किती महत्त्व दिलें पाहिजे याची अप्रत्यक्ष रीतीनें आठवण करून दिली आहे. तें काम प्रेमाचें, त्यास आद्य स्थान दिलेंच पाहिजे. पुढें ते म्हणतातः-" तमारी पासे नवजीवन कार्यालयनुं ट्रस्ट पड्वुं छे. ए हवे रजिस्टर थवुंज जोइये. आसमानी सुल्तानीनें कोण जाणे छे ? एम थाय त्यां लगी तमारे, मारे बधाए काळी टिली करावानुं ... जोखम व्होरवुं रह्युं. एटले हवे एक अठवाडियामां ए पुरूं करी देजो..." (तुमच्याजवळ नवजीवन कार्यालयाचें विश्वस्तपत्र आहे. तें आतां रजिस्टर झालेंच पाहिजे. अस्मानी सुल्तानी केव्हां येऊन पडेल तें कोणी सांगावें? तें होईपावेतों तुम्हांला, मला आपणा सर्वांना काळा डाग लागण्याची जोखीम पत्करावी लागणार. तेव्हां आतां एका आठवड्यांतच तें पुरें करून द्या...) 'अस्मानी सुल्तानी'वरून स्वतःची शरीरप्रकृति व

सरकारी दडपशाहीचें धोरण या दोन्ही गोष्टी त्यांच्या नजरेपुढें असाव्या असें दिसतें. रात्रौ त्यांना स्टेशनवर भेटावयास गेलों होतों व लवकरच सर्व उरकतों असें सांगितलें. आज रात्रौ ते गुजरात मेलनें संयुक्त प्रांताचे दौऱ्यास निघाले.

ता. १२–९–२९

दुपारीं १२–३० ते ५ वाजेपावेतों रा. रामनारायण पाठक व रसिकलाल यांचेबरोबर बसून नवीन कॉलेजचे बाबतींत संस्थेच्या घटनेचें काम पूर्ण केलें. संस्थेचें नांव 'गुजरात विद्याप्रसारक समाज' असें सुचविलें आहे. उत्तम व आदर्श नागरिक व राष्ट्रीय वातावरण हे दृष्टिबिंदू नजरेसमोर ठेवून शिक्षण देणें हा हेतु. बहुतेक सर्व रचना पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे धोरणावर आहे. त्यांचेच नियम थोडेबहुत फेरफार करून स्वीकारले आहेत.

नवजीवन ट्रस्टविषयीं महात्मा गांधीजींस पत्र लिहिलें. ट्रस्टींची संख्या ८ नको पण कमी असावी व दूरदूरचे ट्रस्टी फारसे नसावे अशीहि सूचना केली आहे.

ता. १४–९–२९

दुपारीं १ वाजतांचे गाडीनें बडोद्यास गेलों. सायंकाळीं सीतारामबुवांचे वाड्यांतील गणपतीपुढें "प्रचलित शिक्षण" या विषयावर मला चार शब्द बोलावयाचे होते. अध्यक्षस्थानीं बडोद्याचे विद्याधिकारी होते. हा विषय घेण्याकरितां तज्ज्ञ या नात्यानें माझा अधिकार नाहीं, पण सध्यांच्या परिस्थितींत सामान्य नागरिक या दृष्टीनें जो कांहीं विचार केला आहे त्यामुळें तज्ज्ञापुढें कोणालाहि विचार मांडण्याचा हक्क आहे म्हणून मी मांडतों, असें सांगून मी माझ्या भाषणांत पुढील मुद्दे मांडले:—(१) हल्लींच्या शिक्षणास कांहींहि ध्येय नाहीं, दृष्टिबिंदु नाहीं. पूर्वीच्या काळीं वर्णाश्रमधर्माप्रमाणें प्रत्येकानें राहावें असें समाजबंधन कांहीं तरी होतें. समाज त्या तऱ्हेनें व्यवस्थित राहाण्यासाठीं शिक्षणाची जरूरी स्वीकारलेली होती व त्या धोरणानें

शिक्षण दिलें जात होतें. (२) हल्लींच्या शिक्षणास शिक्षण म्हणावें कीं काय ही शंकाच आहे. धोरण असें त्यांत कांहींच नाहीं. आपल्या राज्यकारभारांत खालच्या दर्जाच्या नौकरीसाठीं लागणारे हिंदी लोक तयार करण्याकरितां इंग्रजांनीं कारखाने काढले व त्यांसच शाळा हें नांव देण्यांत येऊन तेंच शिक्षण अशी दिशाभूल झालेली आहे. (३) उत्तम नागरिक तयार करणें हें शिक्षणाचें ध्येय. त्या दृष्टीनें राष्ट्रीय वृत्ति, स्वतंत्रता, स्वदेश व स्वभाषा-प्रेम यांचा विकास होईल अशी स्थिति किंवा वातावरण हल्लींच्या शिक्षण-संस्थांतून नाहीं. तें वातावरण पाहिजे, व तशा संस्था झाल्या पाहिजेत. (४) या कामासाठीं चारित्र्यवान् शिक्षकवर्ग—केवळ पगारी मनोवृत्तीचा नाहीं असा—पाहिजे. (५) एकंदर समाजांत सामाजिक हितांत व्यक्तीच्या हिताचा अंतर्भाव झाला आहे, अतएव समाजहित प्रथम व नंतर व्यक्तीचें हित ही भावना आली पाहिजे. व्यक्तिगत हितांतच आपली दृष्टि लीन होते ही अनिष्ट गोष्ट आहे. (६) आपलेपणाची भावना वाढण्यास स्वभाषा व स्वदेश या भावना जागृत केल्या पाहिजेत व त्या व्याख्यानांनीं नव्हे तर प्रत्यक्ष आचरणानें. (७) शिक्षण हें शाळेंतच मिळणारें नसून त्याचा पुष्कळसा भाग शाळेबाहेर असतो. त्यामुळें गृहशिक्षणाकडे व समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें आपल्या स्वतःच्या आचरणाकडे लक्ष दिलें पाहिजे. ही जबाबदारी प्रत्येक माणसा-वर आहे.

ता. १५–९–२९

दुपारीं बडोद्याहून निघोन ३ वा. अमदाबादेस दाखल झालों.

घरीं मुलांनीं राम–भरताचे नाट्यप्रयोग श्रीगणपती–उत्सवानिमित्त केले होते, पण मी येण्यापूर्वींच ते संपले होते.

ता. २२–९–२९

शेठ अंबालाल साराभाई यांचेकडे रात्रौ ९ वा. भोजनासाठीं पोचलों. जेवतांना खूप गप्पा चालल्या होत्या. भोजनोत्तर त्या सर्वांचा ओघ

म्युनिसिपल स्थितीकडे वळला. मला जें वाटतें तें मी अंबालाल यांस स्पष्ट पण सौम्य शब्दांनीं सांगितलें. मी पंच या नात्यानें अंबालाल–पक्ष व श्री. वल्लभभाईंचे अनुयायी या दोघांची हकीकत ऐकून घ्यावी व कोणाचा दोष आहे त्याचा स्वतंत्रपणें निकाल द्यावा अशी रा. अंबालालभाईंची सूचना. या सूचनेप्रमाणें करणें मला कठीण. एक तर माझे या बाबतींत विचार कांहीं बनलेले आहेत, मी केवळ तटस्थ नव्हे. दुसरें, हा प्रकार म्हणजे दोन्हीकडोन शिव्या खाण्याचा. शेठ अंबालाल यांनीं माझेवर आपला पूर्ण भरंवसा असल्याचें सांगितलें व तो आहे ही अभिमानाची गोष्ट आहे, पण त्यामुळें माझी कठीण स्थिति कशी दूर होणार?

ता. २७–९–२९

समाजसेवा परिषद उद्यां भरणार.

संकट निवारण कमेटीचे लोन फंडाकडोन एक हजार रुपये मदत घेतलेल्या एका गरीब माणसानें स्वतःचें घर म्युनिसिपल परवानगीशिवाय–म्हणजे परवानगीविरुद्ध–बांधलें तें चीफ ऑफिसरनें हुकूम करून पाडून टाकलें, याबद्दल माझेकडे अर्ज आला. मला हा प्रकार पाहून शहारेच आले. लोकांच्या सुखासाठीं कायदे कीं कायद्यासाठीं लोक? म्यु. कायद्याचा भंग पुष्कळ लोक करतात ही गोष्ट खरी, तो थांबविला पाहिजे हेंहि खरें. पण असें उल्लंघन जाणून बुजून करतात ते वेगळे व अज्ञानानें करतात ते वेगळे. जाणून बुजून करणारे वशीला आणतात व त्यांचें तट्टू चालतें आणि अज्ञानानें करणारे गरीब फुकट मरतात. कायद्याच्या अंमलबजावणींत सहानुभूति पाहिजे, सारासारविचार पाहिजे, परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे.

ता. २८–९–२९

आज व उद्यां समाजसेवक परिषदेची बैठक. अध्यक्ष रा. ठक्कर (बापा) यांना स्टेशनवरून मुक्कामाचे ठिकाणीं रा. वल्लभभाईंकडे पोचवून व परिषदेचे ठराव आणि कार्यक्रमाविषयीं सांगून घरीं आलों.

परिषदेची बैठक बरोबर ४॥ ला सुरू झाली. चिटणिसांचें निवेदन, श्री. विद्याबाईंचें भाषण, माझे विचार व अध्यक्षांचें भाषण यांमध्यें, परस्पर सहकार व कार्य करण्यासाठीं एक मध्यवर्ती सेवामंडळ असावें, अशी मुख्य कल्पना होती.

ता. २९-९-२९

समाजसेवक परिषदेचे बैठकीस २ वा. सुरुवात व्हावयाची असलेमुळें प्रेमाभाई हॉलमध्यें गेलों. सर्व ठराव व्यवस्थित मांडले गेले व भाषणेंहि बरींच आटोपशीर झालीं. ठरावांच्या मुख्य बाबी पुढीलप्रमाणें:-(१) मद्यपान-निषेधक प्रवृत्ति (२) विधवाश्रमांची आवश्यकता (३) बहिरे-मुके वगैरे अपंगांचें शिक्षण (४) तुरुंगांतील सुधारणा व तुरुंगांतून सुटून आलेवर होणारी कैद्यांची कुचंबणा (५) लहान मुलांसाठीं खेळ-करमणुकीची आवश्यकता (६) आरोग्यघेर वगैरेची व्यवस्था (७) अंत्यजोद्धार व अस्पृश्यता निवारण (८) रुग्णालयांची अव्यवस्था व तीवर उपाय. (९) बाल-संगोपन व बालसंगोपनगृहांची सुधारणा (१०) समाजसेवेसाठीं एक मध्यवर्ती मंडळ स्थापणें व समाजसेवा करणाऱ्या संस्थांची एक संपूर्ण यादी तयार करणें (११) पतित स्त्रियांचें विमोचन करण्यासाठीं आश्रम.

मध्यवर्ती सेवामंडळाची कमिटी व परिषदेची कार्यकारी कमिटी या दोहोंतहि सभासद म्हणून माझें नांव दाखल केलें गेलें आहे. या कामाचा व्याप व बोजा फारच आहे, परंतु केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं.

बोलतां बोलतां रा. ठक्कर यांनीं "तुम्ही वकिली केव्हां सोडणार?" असा प्रश्न विचारला. १९३५ सालीं सोडण्याचा विचार कळविला. "लौकर कां नाहीं?" हा त्यांचा प्रश्न. खरोखर मला दिवसेदिवस असेंच वाटावयास लागलें आहे कीं रोजचा हा व्यवसाय काय उपयोगाचा? पण वाढत्या कुटुंबांत कांहीं खर्चाच्या बाबी आहेत त्यांची वाट काय? पण त्याहिपेक्षां कुटुंबांतील माणसांची सेवेसाठीं मनोवृत्ति वळविणें हा प्रयत्न आहे. त्यासाठीं हल्लीं रोज सौभाग्यवतीबरोबर फिरावयास जातांना चर्चा करीत असतों. १९३५ पावेतों वकिली खास सोडणार-निदान समाजसेवा हा धर्म व वकिली ही

गौण एवढी स्थिति तर खास येणार असा भरंवसा वाटत आहे. परमेश्वर साहाय्य करो एवढीच प्रार्थना.

रा. ठक्कर गुजरात मेलनें रात्रौ गेले. त्यांस पोचविण्यासाठीं गेलों होतों. "किती वर्षेंपावेतों वकिली करणार?" हा प्रश्न पुनः तेथेंहि निघाला होता.

ता. ३०-९-२९

महात्मा गांधींच्या हीरक महोत्सवासाठीं दुपारीं गुजरात विद्यापीठांत मला जावयाचें होतें, पण एका अपीलांत गुंतलों होतों. तरी पण ४ वाजतां काम चंद टेवून १॥ तास जाऊन आलों व पुनः ५॥ वा. काम घेतलें.

विद्यापीठांत गेल्यावर मला फारच अडचण वाटूं लागली. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांपुढें मीं काय बोलावें? कर्मवीर मंडळी जेथें अध्यापक तेथें माझ्या-सारख्या माणसाच्या शब्दांची काय किंमत? पण रा. नरहरी परीख व काकासाहेब कालेल्कर यांच्या आग्रहामुळें शेवटीं बोलावें लागलेंच. आधीं काकासाहेब बोलले. गांधीजी हे युगपुरुष आहेत असें सांगून त्यांनीं पूर्वीची स्मृति सांगितली. स्वतः गांधींचे अनुयायी होण्यापूर्वीं सर्व बाजूंनीं गांधींना कसें तपासून सुलाखून पाहिलें ती हकिकत सांगितली. गांधी हिंदुस्थानांत आले तेव्हां दोन वर्षें मौन धारण केल्यावर त्यांनीं जें पहिलें भाषण केलें त्यांत देशास तीन वस्तू पाहिजेत असें ते म्हणाले होते. त्या म्हणजे (१) भयभीतपणा गेला पाहिजे (२) कोणतीहि चळवळ गुप्त असतां कामा नये, व (३) स्वदेशी.

काकासाहेबांचें भाषण फारच सुश्राव्य व चांगलें झालें. नंतर माझी पाळी आली. मी कॉलेजांत असतांना आमच्या वेळच्या वातावरणाची थोडीशी हकीकत सांगून नंतर १९१५ मध्यें गांधींकडे जात असें त्यावेळीं माझी कशी मनोदशा होती व हल्लीं गांधीजींमुळें मनोदशेंत किती फरक पडला आहे तें दाखविलें. गांधीजींचा उदारपणा, विरोधी मतासहि मान देण्याचा स्वभाव, नियमपालन वगैरेविषयीं माझे कांहीं प्रसंग सांगून आटोपतें घेतलें.

ता. १६–१०–२९

आज कोर्टांत एक अपील चालवयाचें होतें, पण तें बंद ठेवून डिस्ट्रिक्ट जज्ज मि. डेविस यांनीं मला चेंबरमध्यें राजकारण बोलण्यासाठीं बोलाविलें. विषय हिंदुस्थानच्या सद्यःस्थितींत कोणत्या तऱ्हेचें स्वराज्य पाहिजे हा होता. पाश्चात्य पद्धतीच्या कायदेकौन्सिलानें हिंदुस्थानास स्वराज्य मिळणारें नसून पौर्वात्य संस्कृति जी लोकांच्या अंगीं मुरली आहे तिच्या पायावरच स्वराज्य उठविलें पाहिजे हा त्यांचा मुद्दा होता. मलाहि तो मान्यच होता. फार खर्चिक असे नौकर राज्यकारभाराचा गाडा हांकण्यास राखले आहेत; त्यांना नौकरी म्हणजे जनसेवा ही भावना नसून स्वार्थ साधणें एवढेंच धोरण असतें; ते लोकांत राहात नाहींत; लोकांपासून वेगळे असतात; अशी नोकरशाही कामाची नाहीं; लोकांत सेवाबुद्धीनें व त्यागवृत्तीनें राहाणारे लोक सरकारनें नौकरींत ठेवले पाहिजेत तरच लोकांची प्रगति होईल; ग्रामसंस्था जिवंत झाल्या पाहिजेत; वगैरे धोरणावर त्यांचे विचार होते. मलाहि अर्थातच ते मान्य होते. येत्या डिसेंबरांत गव्हर्नरसाहेब येथें येतील त्यावेळीं त्यांच्यापुढें अशा तऱ्हेची एक निश्चित योजना मांडावी अशी रा. डेविस यांची कल्पना आहे. रा. वल्लभभाईंजवळहि ते बोलले होते व येथें एक राजकीय क्लब असावा आणि तेथें अशा विषयांची चर्चा व्हावी अशी ही त्यांची कल्पना. मीं त्यांना आमच्या नव्या कॉलेजाविषयींचे विचार सांगितले. नौकरी किंवा वकिली–डॉक्टरी करून स्वतःपुरता विचार न करतां समाजसेवेंत तत्पर अशा तरुणांची भरती करण्याकरितांच मुख्यतः कॉलेज आहे, हा विचार त्यांनाहि पटला व अशा कॉलेजास स्वतः शंभर पौंडापावेतों देणगीहि देऊं असें म्हणाले. आपली स्वतःची इच्छा नौकरी सोडून देऊन राजकीय–म्हणजे सामाजिक रचनात्मक–कार्य करावें व हिंदुस्थानास सेवा अर्पण करावी अशी आहे, असें ते म्हणाले. बरीच चर्चा झाली. माझेहि वकिली सोडण्याचे विचार मीं त्यांना सांगितले व शेवटीं रा. वल्लभभाई आल्यावर एकदां एकत्र जमून चर्चा करूं असें ठरविलें.

ता. १७–१०–२९

महाराष्ट्र समाजाचें चंद्रिकासंमेलन आज रात्रौ व्हावयाचें. एकंदरींत दर वर्षीं अव्यवस्था होते तेव्हां सर्वांस बोलावूं नये व दुग्धपान ठेवूं नये असा कांहींचा आग्रह होता, तरी पण मीं तें अंगावर घेतलें होतें. एकंदर उत्सव कसा पार पडतो याची काळजी होती. मला स्वतःला अंगमेहेनतीचें किंवा वेळ मोडण्याचें काम मंडळीनीं शिल्लकच ठेवलें नाहीं. तरी पण जबाबदारी असल्यामुळें व यशाची वांटेकरी स्वयंसेवक मंडळी असली तरी अपयशाचा वांटेकरी मीहि असल्यामुळें मला नजर ठेवणें जरूर होतें. समाजाचा सभासद या नात्यानेंहि जरूरच होतें. पण सर्वांनीं कमर कसून काम केलें. अर्थात् सर्वजण महाराष्ट्रीय या बुद्धीनेंच सर्वांनीं सहकार केला.

रात्रौ कार्यक्रम अगदीं वेळेवर सुरू होऊन सर्व कांहीं व्यवस्थित पार पडलें. दुग्धपान तर अपेक्षेपेक्षां व्यवस्थितपणें झालें. स्त्री-स्वयंसेविका व पुरुष-स्वयंसेवक यांचाच सर्व सहकार. शेवटीं आभारप्रदर्शक चार शब्द बोलतांना मी मराठ्यांची व्यवस्थाशक्ति व संघशक्ति यांवरच जोर दिला होता. आपणांपैकीं दरेकजण प्रथम हिंदी, नंतर हिंदु, नंतर गुजराती व शेवटीं महाराष्ट्रीय असा क्रम लावला व महाराष्ट्रीयत्वाच्या परिपोषास सर्वांनीं एकदिलानें मदत केली याबद्दल आभार मानले.

ता. १९–१०–२९

रा. अमृतलाल ठक्कर आज सायंकाळच्या समाजसेवा मंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीसाठीं आले आहेत त्यांचेकडे गेलों होतों. सायंकाळच्या बैठकीविषयीं व विषयांची चर्चा झाली. मुख्य विषय तीन : (१) मध्यवर्ती मंडळ (२) निरनिराळे ट्रस्ट वगैरे स्वीकारून काम करणारी एक विश्वासपात्र अशी रजिस्टर्ड संस्था (३) समाज-सेवासंस्थांची डायरेक्टरी. मध्यवर्ती मंडळ म्हणजे एक माहिती पुरविणारी व संस्थांचा परस्परांशीं संबंध जोडून देणारी संस्था. खरी पंचाईत ट्रस्टविषयींचीच वाटली. त्याची व्यवस्था तर उत्तम झाली पाहिजे; लोकछंदानुवर्तित्व (responsive to public opinion)

हें तर पाहिजे परंतु त्याबरोबरच्च कोणत्याहि चळवळीचे लाटेबरोबर तारूं हेलकावे खात राहील असें उपयोगाचें नाहीं, या विषयावर बरीच चर्चा केली.

ता. २७–१०–२९

घरांतील व्यवस्थेविषयीं मीं चार सहा दिवसांपूर्वी स्नान करतांना कांहीं बोललों असेन, त्याविषयीं सौभाग्यवतीनें माझी थोडीशी कानउघाडणी केली. मला वाटतें मनांत गोष्ट आली कीं, व ती सत्य व आवश्यक वाटली कीं लगेच्च स्पष्ट बोलणें हा माझ्यांत दोष आहे. त्यांतूनहि आपलीं माणसें असलीं म्हणजे माझ्या भाषेंत विशेष कटुता–कठोरता येते असेंहि वाटतें. कारण एकच्च–कळकळ. आपल्या माणसांनीं तरी चुका करूं नये व आदर्श व्हावें, सक्रिय राहावें अशी प्रबळ इच्छा. पण हा माझा दोष माझ्या मंडळींनीं समजून माझ्याविषयीं थोडी क्षमाबुद्धि ठेवावयास नको काय? तेवढ्यापुरता सौभाग्यवतीचा राग बरोबर नव्हता. बाकी माझेकडोन मी नेहमींच प्रयत्नशील असतों असें मला वाटतें. तरी पण एकंदरींत आपलें शिक्षण व वातावरणच्च असें झालें आहे कीं समजापेक्षां गैरसमजाचीच्च प्रवृत्ति दिसते. ही जर कमी झाली तर एकंदर जगाचे व्यवहार किती सुखमय–निदान कमी कष्टमय–होतील! पण हें स्वप्नच!!

ता. २८–१०–२९

सायंकाळीं युवक-संघातर्फे-संसार सुधारा हॉलमध्यें "लाहोर कॉंग्रेस होईपावेतों वासाहतिक स्वराज्य (Dominion Status) न मिळाल्यास असहकार करावा" या विषयावर चर्चा होती. पार्लमेंट पद्धतीनें चर्चा असलेमुळें मला स्पीकर नेमलें होतें. स्पीकरनें सभानियंत्रणाचें काम करावयाचें, मतप्रदर्शन वगैरे कांहीं नाहीं. चर्चा कांहीं विशेष बरी झाली नाहीं. तरी पण कांहीं जणांनीं तरी विरोध करण्याची हिंमत दाखविली. आपण कांहीं तरी जिव्हाळ्याचे विषयावर बोलत आहोंत अशी जबाबदारी दिसली नाहीं, शिस्त नाहीं, वगैरे शोचनीय प्रकार तर होतेच.

प्रांतिक समिति ऑफिसांत दुपारीं गेलों होतों. तेथें रा. रा. ×× भेटले. समाजसेवा परिषदेविषयीं गोष्ट त्यांनीं काढली. 'अशा परिषदेनें कांहीं एक होणें नाहीं, शें. ८० टक्के लोकांच्या–शेतकऱ्यांच्या–हिताचा प्रश्न हातीं घ्या, शेतकरी–संघ स्थापन करा' असें त्यांचें आग्रहाचें म्हणणें. खरें आहे. मीं ऐकून घेतलें. परंतु उत्तम कार्य जरी करतां न आलें तरी जें करतां येईल तेवढेंहि करूं नये असें वाटत नाहीं. अशानें आम्ही आमची फसवणूक करून घेत आहोंत असें त्यांचें म्हणणें. खरोखरच तसें होत आहे काय? निदान माझी तरी फसवणूक होत नाहीं असें वाटतें.

ता. २–११–२९

हिंदी राजकीय सुधारणांविषयीं व्हाइसरॉयसाहेबांनीं आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला, तो आजचे दैनिक पत्रीं आलेमुळें जिकडे तिकडे त्यावरच प्रश्नोत्तरें व चर्चा होत होती. जो तो माझें मत विचारी. मला तर त्यांत कांहींच महत्त्वाचें वाटत नाहीं. या जाहीरनाम्यानें कांहीं नवीन मिळालें अथवा कबुली दिली असें वाटत नाहीं. Dominion Status (वसाहतीचा दर्जा) केव्हां देणार अगर कसें याचें नांव नाहीं. फक्त विचारविनिमयासाठीं तुम्हांस बोलावूं एवढ्यावरच भागविलें. बोलावल्यावर मग सायमन कमिशनच्या शिफारशींपलीकडे जाऊं कीं काय याबद्दल कांहींच उल्लेख नाहीं. तुम्हांस बोलावून तुमचें म्हणणें कानांनीं ऐकूं, कृतीनें काय करावयाचें तें आम्ही ठरवूं अशा अर्थाच्या या जाहीरनाम्यावर आम्हीं कां भाळावें हें मला तर समजत नाहीं. मुंबईस सर चिमणलाल सेटलवाड वगैरे पुढाऱ्यांनीं दिल्लीस म. गांधी वगैरेंचे अभिप्राय येण्यापूर्वींच–काँग्रेसचें म्हणणें बाहेर पडण्यापूर्वींच–घिसाडघाई करून आपला अभिप्राय प्रकट केला. रा. जयकर व सरोजिनी नायडू यांनीं त्यावर सह्या केल्या ही दुःखाची गोष्ट!

ता. ४–११–२९

आज तिसरे प्रहरीं सर रुस्तुमजी वकील यांचे ऑफिसांत एक लहानशी सभा होती त्यासाठीं गेलों होतों. अमदाबाद जिल्ह्यांत लोकांस वैद्यकीय

मदत देण्यासाठीं दवाखाने काढावे, गांवोगांव औषधें देण्याच्या लहान लहान जागा असाव्या, अशी योजना होती तिचा विचार करावयाचा होता. सर रुस्तुमजी स्वतः कांहीं देणगी देऊं इच्छितात. डॉ. सुमंत यांनीं बडोदें राज्यांतील अनुभव चांगला सांगितला. उत्तेजनपर वाटला. या प्रकारच्या कामांत त्यांनीं दोन तीन तत्त्वें संस्मरणीय अशीं सांगितलीं: (१) कोणत्याहि गांवांत केवळ फुकट अशी मदत देऊं नये; गांवचे लोक जर कांहीं पैसे स्वतः काढतील तर आपण बाकीची मदत करावी; (२) गांवांत औषधें देण्यासाठीं जो मनुष्य अंगावर काम घेईल त्यास कांहींहि वेतन नसावें; (३) केवळ इंग्रजी औषधें नसावीं, त्यांचे जोडीस आयुर्वेदिक औषधेंहि असावीं. थोडा प्रयोग करून तो यशस्वी झालेवर मग लोकल बोर्डें, सरकार वगैरेंची मदत घ्यावी; परंतु शेवटीं लोकांस शिक्षण मिळून ते या बाबतींत पूर्ण स्वाश्रयी होतील या धोरणावरच काम चालवावयाचें.

ता. ५–११–२९

डॉ. ×× व मी फिरावयास गेलों असतां त्यांनीं गुजरातेंतील व विशेषतः अमदाबादेंतील राजकीय चळवळीविषयीं फारच विचित्र व माझ्या दृष्टीनें अयोग्य अभिप्राय दर्शविला. त्यांच्या मतें रा. वल्लभभाई आदि मंडळी अधिकार बळकावून बसली असून तरुण, होतकरू मंडळीस कार्य करावयास वाव देत नाहींत. मी त्यांस असे मोघम आक्षेप न करतां विशिष्ट आक्षेप करावयास सांगितलें. पण तसें करण्यांत व्यक्तींचा नांवनिर्देश करावा लागेल म्हणून त्यांनीं तें केलें नाहीं व मुग्धता स्वीकारली. मला त्यांच्या विचार-सरणींत व मतांत एककल्लीपणा व कांहीं अंशीं बिन-माहितीमुळें अनुदार-पणा वाटला. तरी पण वल्लभभाई आदि मंडळींविषयीं या मंडळींच, चुकीनें कां होईना, असें मत असणें ही गोष्ट बरोबर नाहींच. या बाबीचा खुलासा करणें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

ता. ८–११–२९

दुपारचे टपालानें रा. ठक्कर यांचें पत्र आलें. पत्र मलाच खासगी आहे. पण रा. पारेख व रा. वल्लभभाई यांचाहि अभिप्राय मीं विचारला. प्रश्न हाच कीं सेवामंडळाच्या मध्यवर्ती मंडळांत किंवा ट्रस्ट सोसायटींत आपण रा. वल्लभभाईंस घ्यावें कीं नाहीं. कांहीं लोकांचा विरोध आहे. रा. पारेख यांचे मतें त्यांना घेतलेंच पाहिजे; असा कार्यकुशल पुरुष न घेणें म्हणजे चूकच होईल; कांहींचा विरोध असेना का? मला तसें वाटत नाहीं. रा. वल्लभभाईंविषयीं मला ममत्व व पूज्यभाव आहे 'याविषयीं शंकाच नाहीं व म्हणूनच मला वाटतें कीं या भानगडींतून त्यांना सध्यां अलिप्त ठेवावें. ते आमच्याबरोबर केव्हांहि आहेतच. मला दिसत आहे त्याप्रमाणें सध्यां जी विरोध करणारी मंडळी आहेत त्यांच्याशीं आमचेंसुद्धां पूर्णपणें जमणें कठीण आहे. पुढेंमागें ते तरी निघतील किंवा आम्ही तरी निघूं. असा प्रसंग शेवटीं येणारच. तर तशांत त्यांना पुनः रा. वल्लभभाईंवर निष्कारण खडे फोडण्यास वाव नसावा. असा प्रसंग आला म्हणजे मग वल्लभभाईंस सामील करून घेण्यास अडचणच नाहीं.

सायंकाळीं रा. शंकरलाल बँकर यांजकडे बोलावल्यावरून गेलों होतों. अस्पृश्यांना मंदिरें खुलीं करण्याविषयीं गोष्ट त्यांनीं काढली. भद्रेंतील मंदिरें खुलीं होण्यास मीं अडचण सांगितली. येथें गांवांत कांहीं मंदिरें तरी खुलीं व्हावीं असा त्यांचा आग्रह. माझी इच्छा तशी खरी, पण या बाबतींत केवळ दंडेलीनें कसें चालणार? सत्याग्रह–खरें पाहिलें तर दुराग्रह–करणें म्हणजे माझे मतें वाईट. त्याचा उलटाच परिणाम होणार. मिल–मालक मंडळीस मी भेटल्यानें काम होईल असें त्यांचें म्हणणें. पण ही गोष्ट धर्माविषयक मानली जाते, तेथें माझ्या सांगण्याचा काय उपयोग? मिलमध्यें संप होण्याची गोष्टहि ते बोलले. धमकीवजा त्याचा अर्थ होता. पण तीहि घोडचूकच होईल. असो. विचार करूं असें मीं सांगितलें.

ता. ९–११–२९

रा. पुराणी यांना पत्र लिहिलें. शारीरिक शिक्षणाची निराळी संस्था असावी याविषयीं माझी संमति दर्शविली. चार लाख रुपयांचा कायम फंड असणें जरूर वाटत नाहीं. कायम फंडाच्या व्याजांतून चालणाऱ्या संस्था लोकछंदानुवर्ती व जिवंतपणा असणाऱ्या नसतात. प्रेरक मंडळींच्या नांवावर पैसे मिळतात पण त्यांचा विकास होत नाहीं. श्रीमंत मंडळीकडोन पैशाची फारशी अपेक्षा करणें वास्तविक होणार नाहीं. ती मंडळी सामान्यतः एकाद्या सिद्ध वस्तूला पैसे देतात, नवीन प्रयोग करून जी वस्तु सिद्ध करावयाची त्यासाठीं त्यांची मदत नसते असा अनुभव आहे. देशहिताच्या चळवळीचा बोजा मध्यम वर्गावरच पडतो.

अस्पृश्यांना मंदिरें खुलीं करण्याविषयीं रा. शंकरलाल बँकर यांनीं जें सांगितलें त्यासंबंधीं सकाळीं शेठ रणछोडभाईंशीं बोललों. मजुरांनीं त्यासाठीं संप करणें योग्य होणार नाहीं व या बाबतींत सत्याग्रह करणें चुकीचें आहे असेंहि माझें मत सांगितलें. मी एक तडजोड सुचविणार आहें. श्रीमंत मिलवाल्या मंडळींनीं एक नवें देऊळ सर्वांस खुलें असें बांधावें, निराळेंच अस्पृश्यांकरितां असें ठेवूं नये. असें झाल्यानें एकंदर प्रकाराचा निकाल समाधानकारक असा होण्याचा मला तर भरंवसा दिसतो. शेठ रणछोडभाईंसहि ही कल्पना बरी वाटली.

ता. १२–११–२९

क्रुबांत रा. ×× वकील भेटले. शरीरप्रकृतीवरून गोष्टी निघतां तपकीर हुंगण्याची संवय त्यांनीं सोडून द्यावी व सूर्यनमस्कार घालावे असा त्यांना मीं आग्रह केला. तपकीर सोडावी असें आपल्या मृत वडिलांचेंहि म्हणणें होतें असें ते म्हणाले. तेव्हां निदान वडिलांच्या स्मरणार्थ व श्राद्ध म्हणून तरी सोडा असें मीं त्यांस आग्रहानें सांगितलें. त्यांनीं अर्थपूर्ण दृष्टीनें माझ्याकडे पाहिलें. तपकिरीची डबी माझ्याकडे द्याच असें मीं त्यांस लगेच आग्रहानें म्हटलें व त्यांनीं ती काढून दिली. मीं जवळ ठेवली आहे. जर

त्यांची तपकीर कायमची सुटली तर एक मोठेंच परिवर्तन एका व्यक्तीचे जीवनांत झालें म्हणावयाचें !

ता. १३-११-२९

आज कार्तिकी एकादशीची सुटी असल्मुळें घरींच काम करीत होतों. मनांत असा एक विचार आला कीं आषाढी व कार्तिकी एकादशा पंढरपूरच्या विद्यापीठांतील मोठ्या स्फूर्तिदायक तिथ्या. तेव्हां या दिवसांपैकीं एकासाठीं तरी निदान श्रीक्षेत्र आळंदी येथें जाऊन पालखीबरोबर पंढरपूरपावेतों जाऊन दृश्य पाहावें व शिकावें. योग जमेल तेव्हां खरें.

ता. १४-११-२९

सकाळीं आंघोळ करीत असतां रा. शंकरलाल बँकर आले. कार्य अस्पृश्यतानिवारणाचेंच. शेठ मंगळदासकडे मी जाऊन कांहीं तरी तडजोड चालवावी असें त्यांचें म्हणणें. अस्पृश्य वर्गाचे लोक हक्कानें मागणी करूं लागले आहेत. ती मागें टाकणें आतां शक्य नाहीं. स्पृश्य वर्गानें हा अन्याय काढून टाकला पाहिजे. मीं शेठ मंगळदासकडे जावयाचें कबूल केलें.

शेठ मंगळदास यांजकडे गेलों. विषय अस्पृश्यतानिवारण. माझा दृष्टिबिंदु मांडला : (१) देवळें खुलीं करणें कठीण. ट्रस्टींना तशी कायदेशीर सत्ता आहे असें वाटत नाहीं. स्पृश्य हिंदूंचीं देवळें ट्रस्टी सर्वांस कशीं मोकळीं करणार ? कोर्टें मनाई हुकूम देतील किंवा ट्रस्टींस दूर करतील. (२) सभामंडपांत अस्पृश्यांस येऊं द्यावें. एक आडवा कठडा असावा. तेथपावेतों सर्वांस मुभा व केवळ फारच कर्मठ (orthodox) मंडळीसाठीं निराळी जागा (३) अथवा एक नवीन मंदिर बांधावें जें सर्वांस उघडें राहील. शेठ मंगळदासनां नं. २ ची कल्पनाच बरी वाटते व त्याप्रमाणें प्रयत्न करण्यास ते तयार आहेत. याविषयीं इतर मंडळीबरोबर विचारविनिमय करण्यासहि त्यांची तयारी आहे.

तेथून रा. बँकरकडे जाऊन वरील चर्चेंचा गोषवारा सांगितला. सायंकाळीं रा. काकासाहेब कालेलकर यांचेशीं चर्चा केली. अनुषंगानें इतर पुष्कळ गोष्टीहि बोललों. अस्पृश्यतेचा प्रश्न धार्मिक श्रद्धेचा असल्यामुळें एका दृष्टीनें फारच कठीणहि आहे. तरी पण अशा सुधारणा दमादमानेंच झाल्या पाहिजेत. त्यांना जरी तडजोड ही प्रगति वाटली तरी पण अस्पृश्यता-निवारण कमिटीतर्फे ते सध्यां तेथें थांबण्यास कबूल नाहींत. सत्याग्रह करणें त्यांनाहि आवडत नाहीं.

ता. १८–११–२९

सर्व मंडळीसह कांकरिया तलावावर गेलों होतों. चंद्रप्रकाश उत्तम. निसर्गाचें दर्शन मंडळींनीं करावें व निसर्गाची आवड उत्पन्न होऊन सृष्टि-सौंदर्य व परमेश्वरी स्वरूप त्याद्वारा तरी पाहाण्यास शिकावें हा मुख्य हेतु होता.

ता. २५–११–२९

आज कार्तिक वद्य ९. देशी तिथीप्रमाणें माझा ४१ वा वाढदिवस. ४१ वर्षें संपून ४२ वें लागलें.

ती. मा. बाईंनीं श्रीगुरुपूजनासाठीं (वे. शा. सं. छोटेमहाराज–बडोदें) केलेली तयारी दाखविली. चांदीचें ताट, वाट्या, पेले, तांब्या वगैरे सामान; सोन्याच्या बांगड्या, आंगठी वगैरे; लुगडीं, धोतरें, उपरणीं, फेटा वगैरे सर्व मिळून एकंदर खर्च भोजन वगैरेसुद्धां ६०० रु. पावेतों होईल असा अंदाज दिसत आहे. मला हा खर्च विशेष वाटतो, पण ती. मा. बाईंचे दृष्टीनें योग्य असलेमुळें मला त्याविषयीं बोलण्याचा अधिकार नाहीं. कुटुंबांतील प्रत्येक माणसास एवढी मुभा असलीच पाहिजे.

ता. २६–११–२९

श्रीगुरुपूजनासाठीं ती. मा. बाई चि. ताईसह आज रोजीं बडोद्यास रवाना झाल्या.

दुपारीं कलेक्टर कचेरींत जाऊन नवजीवन ट्रस्टचा दस्तैवज योग्य स्टांपवर आहे असा शेरा करवून सब रजिस्ट्रारकडे जाऊन उदईक महात्माजींनीं कोणते वेळीं यावें तें विचारून नक्की केलें व त्यांचेकडे त्याप्रमाणें मोटर पाठविण्याची तजवीज केली.

ता. २८–११–२९

ती. मा. बाईंचें श्रीगुरुपूजन आज असलेमुळें सकाळचे गाडीनें मी बडोद्यास गेलों.

दुपारीं श्रीगुरुपूजन झालें. चांदीचें सामान, दागिने वगैरे सर्व यथासांग दिलें. ती. मा. बाईंच्या मर्जीप्रमाणें सर्व कांहीं झालें, या एका विचारानेंच मला फार संतोष झाला. जेवण्यास सुमारें १२५ पान झालें असेल. सायंकाळीं परत अमदाबादेस निघालों.

ता. २९–११–२९

सायंकाळीं आश्रमांत म. गांधी यांस भेटावयास गेलों होतों. भेट थोडक्यांतच झाली. नवजीवन ट्रस्ट झालेमुळें त्यांस फारच बरें वाटलें असें दिसलें. प्रार्थनेसहि बसलों होतों.

ता. ३०–११–२९

सायंकाळीं गुजरात क्लबांत श्री. विठ्ठलभाईंस पार्टी होती त्यासाठीं गेलों होतों. बरीच मंडळी आली होती. मजा ही कीं ज्या लोकांनीं समाजसेवेचें कांहींहि काम केलेलें नाहीं, करीत नाहींत, साधे स्वदेशी कपडेसुद्धां वापरीत नाहींत अशा स्वयंमन्यांनींच पुढच्या खुर्च्या अडविल्या होत्या. पण हा नेहेमींचाच प्रकार.

ता. ५–१२–२९

दुपारीं सर चिनुभाई आले होते. त्यांचे चिनुनाथ महादेवाच्या मंदिराच्यावतींत अस्पृश्यांविषयीं काय धोरण ठेवावें हा प्रश्न होता. अस्पृश्यांस

प्रवेश करूं देणें त्यांचे मातुःश्रीस इष्ट वाटत नाहीं. अर्थातच माझा दृष्टि-बिंदु मीं सांगितला, कीं कुटुंब म्हणजे एक प्रजासत्ताक राज्य आणि मुख्य मेंबर म्हणजे अशा राज्याचा मालक नसून केवळ अध्यक्ष. तेव्हां त्याला स्वतःचीं मतें इतरांवर लादण्याचा हक्क पोचत नाहीं. मतभेदाचे प्रत्येक प्रसंगीं–तत्त्वांचा मतभेद असला तरीसुद्धां–तडजोड झालीच पाहिजे. जशीं आपण तत्त्वें समजतों तशींच विरोधी मंडळीहि तत्त्वेंच समजत असतात. आपलींच बरोबर आहेत कशावरून ?

ता. ८–१२–२९

सायंकाळीं रा. ×× वकीलांकडे त्यांचे नवीन घराचे वास्तूनिमित्त स्नेही मंडळीस मेजवानी होती. मेजवानीस जाणेंहि जिवावर येऊं लागलें आहे. सामान्य पैसेवाल्यांचा अलिकडील दृष्टिबिंदु पाहून दुःख वाटतें. जो तो केवळ आपल्या स्वतःच्याच मौजेंत व चैनींत गर्क–जितका जास्त शिकलेला तितका जास्त गर्क. एकंदर समाजाची व देशाची परिस्थिति काय याची आम्हांस सामाजिक जाणीवच नाहीं असा प्रकार दिसतो. अर्थात् कमी अधिक प्रमाणानें आमचे घरींहि तोच प्रकार. अशी दुर्दैवी परिस्थिति आहे. मला अशा तमाशांत गेल्यानें आनंद न होतां एक प्रकारची उद्विग्नता वाटते व म्हणून न जाणें बरें असें मनांत येतें. म्हणून मी गेलों नाहीं.

ता. १२–१२–२९

येथील युवक परिषदेसाठीं येणाऱ्या पाहुण्यांचें स्वागत करण्यासाठीं स्टेशनवर येण्याचें मला आमंत्रण असल्यामुळें स्टेशनवर गेलों होतों. रा. नरिमन, कमलादेवी चट्टोपाध्याय, मेहेरअल्ली अशी मंडळी आली. सुभाषचंद्र बोस आले नाहींत. स्टेशनवरून निघालेल्या मिरवणुकींत मी सामील झालों नाहीं.

युवक परिषदेच्या बैठकीस गेलों, पण मी उशीरां पोचल्यामुळें मंडपांत न जातां बाहेरूनच सर्व मंडळीस भेटून आलों. युवक परिषदेशीं माझा विरोध

नाहीं एवढ्यापुरतीच माझ्या हजेरीची जरूर. आपणास जें वाटेल तें करावयास लागावें असा काल आहे. त्याऐवजीं नुसतीं भाषणें झोडणाऱ्या परिषदा व तिखट भाषणें यांचा मला तर कंटाळा आला आहे. तरुण पिढींत शिस्त, निश्चय वगैरे गुणांऐवजीं दंभ, कीर्तिलोलुपता व देखावा यांचेंच अवडंबर फार दिसतें. सेवाधर्म दिसतच नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें मला त्या परिषदेविषयीं फारसा उत्साह वाटत नाहीं.

ता. २१–१२–२९

आज रात्रौ येथून निघोन मुंबईस जावयाचें व नंतर तेथून पुढें लाहोरास जावयाचें असलेमुळें कामें आटोपणें तीं आटोपलीं. रात्रौ गुजरात मेलनें मुंबईस निघालों.

ता. २२–१२–२९

सन १९२२ सालीं गया मुक्कामीं कॉंग्रेसला गेलों होतों. त्यानंतर या खेपेपावेतों राष्ट्रीय महासभेचे बैठकीस जाण्याचा योग आला नव्हता. तेथें जाऊन कांहीं विशेष पहावें असा उत्साहहि नव्हता. एक प्रकारें वाईट वाटत होतें व वाटतें. कळकळ व तळमळ दिसण्याच्या ऐवजीं पुष्कळशी मंडळी केवळ शाब्दिक रणें माजवितांना दिसतात, तेव्हां वाईट वाटणार नाहीं तर काय? चर्चा, चर्चा किती करावयाची? ज्याला जें प्रामाणिकपणें वाटत असेल त्यानें त्याप्रमाणें आचरण करावयास सुरुवात करावी. उगीच दुसऱ्यांचे दोष दाखविण्यांत कालक्षेप कां करावा? या व अशा विचारांमुळें अधिवेशनास जावें असा उत्साह वाटत नसे. पण पुष्कळ वर्षें झालीं तेव्हां एकदां पुनः जावें असें वाटलें. शिवाय हिंदुस्थानचे इतर सर्व प्रांत मीं पाहिले, परंतु पंजाब पहाणें बाकी होता. म्हणूनहि वाटलें कीं लाहोर, अमृतसर हीं शहरें व जातां येतां दिसेल तेवढा पंजाब पहावा. अशा विचारानें लाहोर कॉंग्रेसला निघालों. मुंबईस काम असल्यानें परभारें अमदाबादेहून न जातां मुंबईस जाऊन तेथून दिल्ली–पंजाब एक्स्प्रेसनें निघालों.

थंडी फार तेव्हां कपड्यांची तयारीहि बरीच ठेवली. गरम कापड शुद्ध खादीचें नव्हतें तरी पण देशीच होतें. महासभेचे नियमाप्रमाणें नेहमीं खादी धारण करणाराच प्रतिनिधि होऊं शकतो. मी नेहेमीं खादी वापरतों पण केवळ खादीच वापरतों असें नसल्यामुळें प्रतिनिधि होण्यास मी लायक आहें किंवा नाहीं याची मला शंकाच आहे. तरी पण गुजरात प्रांतिक समितीनें मला प्रतिनिधि निवडलें आहे व प्रतिनिधि म्हणूनच मी जात आहें.

गाडींत जागा तर चांगली मिळाली. माझे सोबती म्हणून 'टाइम्स ऑफ् इंडिया' पत्राचे प्रतिनिधि श्री. अय्यर आले. निरनिराळ्या तऱ्हेच्या विषयांवर गप्पा मारण्यांत बराच वेळ गेला. धंदेदारी वकिलांनीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सभासद व्हावें कीं काय, एकंदर चळवळींत किती पुढाकार घ्यावा, वगैरेविषयीं वाद निघाला. माझे मतें ज्यांना वकिली करावयाची त्यांनीं पुढाकार घेऊन पुढारी म्हणून वर्तूं नये. कायद्याचे ज्ञानाचा उपयोग आहे, परंतु धंदा व लोकसेवा–व तीहि परिस्थितीच्या संक्रमणाचा दृष्टिबिंदु ठेवून–करणें हें शक्य नाहीं.

ता. २३–१२–२९

रात्रौ ८॥ वा. दिल्लीस पोचलों. स्टेशनवर रा. वल्लभभाई, डॉ. चंदूलाल देसाई वगैरे मंडळी भेटली. कृपलानीहि भेटले. महात्मा गांधी आमच्याच गाडींत बसण्यासाठीं आले. ते तिसऱ्या वर्गांत होते. त्यांची व व्हाइसरॉय-साहेबांची आज मुलाखत होती. त्यांत काय झालें याकडे सर्वांचे डोळे लागलेले. तेव्हां समजून घेण्यास उत्सुक होतों, पण बातमी लागली नाहीं. व्हाइसरॉयची गाडी बॉंबनें उडवून देण्याचा प्रयत्न झाला एवढें मात्र कळलें.

ता. २४–१२–२९

सकाळीं लाहोर स्टेशनवर पोचलों. लाहोर कँटोन्मेंट स्टेशनवर महात्माजी उतरले. मी तेथेंच भेटलों. मला पाहून, "ओ हो, त्हमे क्यां थी भूला पड्या?" (तुम्ही कोणीकडे वाट चुकलां?) असें प्रेमहास्ययुक्त पण किंचित् कटाक्षानें महात्माजींनीं विचारलें. मीं किंचित् हंसूनच मुग्ध उत्तर दिलें.

लाहोर स्टेशनवर उतरल्यावर अमदाबादच्या तरुण मंडळीबरोबरच असावयाचें ठरविल्यामुळें सर्वांच्या विचारानें कॉंग्रेस कँपमध्यें जाण्याऐवजीं येथील गुजराती बंधुसमाजानें सोय केली तेथें उतरलों. हवा थंड, पाऊस. कॉंग्रेस कँपांत अजून सोय नाहीं; तेव्हां उघड्यावर पडण्यापेक्षां निदान घरांत बरें या विचारानें या सोयीचा फायदा घेतला आहे.

सुमारें ११॥ वा. गोल बागेंत स्व. लाला लजपतराय यांच्या लोकसेवा संघाच्या (Servants of People Society) वार्षिक उत्सवास गेलों होतों. महात्माजी अध्यक्ष होते. श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांनीं थोडक्यांत संघाच्या कार्याचा अहवाल दिला व शेवटीं लालाजींच्या शेवटच्या शब्दांची आठवण दिली कीं त्यांच्या छातीवर पोलिसांनीं दंडुके मारले, तो प्रत्येक ठोसा म्हणजे ब्रिटिश साम्राज्याच्या कॉफिनवर मारलेला खिळा आहे. महात्माजींनीं लालाजींची कदर करण्यासाठीं ५ लाख रुपये केवळ पंजाबी लोकांनींच द्यावे असें सांगितलें. महात्माजी हिंदींत चांगलेच बोलले. पुष्कळ लोकांनीं दागिने व पैसे दिले. महात्माजींनीं लालाजींचें शेवटचें सांगणें हें सांगितलें कीं आमरणान्त देशहितच करा व देशासाठीं मरण्यांतच गौरव आहे.

ता. २५–१२–२९

सकाळीं गांवांत फिरण्यास गेलों. सुमारें दोन तास फिरत होतों. जेवणासाठीं सुमारे ११॥ वा. शेठ कस्तुरभाईंकडे गेलों. रा. वल्लभभाई व कृपालनी यांसहि बोलाविलें होतें. गप्पागोष्टी करीत जेवणें आटोपून वल्लभभाईंबरोबर लजपत नगरीस गेलों. जाण्यास फारच वेळ लागला. गाड्यांची रांग लागून राहिली होती. रस्त्यांत व्यवस्था फारशी दिसली नाहीं. पंजाबी लोक दिसण्यांत भव्य, सुंदर पण बुद्धि विशेष दिसत नाहीं. व्यवस्था तर त्याहूनहि कमी. चैनबाजी विशेष. पुरुषांचे व स्त्रियांचे कपडेलत्ते उंची, फॅशनेबल व बहुतेक शेंकडा ९९ टक्के परदेशी–शुद्ध परदेशी. नटवेपणाहि विशेष. स्त्रिया बुरखा पाळीत नाहींत. नेहेमीं बुरखा पाळणाऱ्या स्त्रियाहि मेळ्याच्या प्रसंगीं बुरखा टाकतात असें समजलें. पुरुष मंडळी स्त्रियांच्या आधीन फार. स्त्रियांस स्वतंत्रताहि अधिक. याची एक मजेदार हकीकत रा. अलीभाई गफूरभाई

यांनीं सांगितली. त्यांचें टोप्यांचें दुकान आहे. स्वतःसाठीं कोणती टोपी घ्यावी हें पुरुष नक्की करीत नाहीं. बायकोस बरोबर घेऊन येतो. स्वतः आरशांत दहा वेळां पहातो व शेवटीं जोंपावेतों बायकोच्या संमतीचें किंवा पसंतीचें शिक्कामोर्तब झालें नाहीं तोंपावेतों सौदा पटत नाहीं. असो.

अध्यक्षांची मिरवणूक पहाण्यास अनारकलीमध्यें गेलों. सुमारें ५ पासून ६। पर्यंत वाट पहात अलीभाईंच्चे दुकानीं बसलों होतों. मिरवणुकीबरोबर सहस्रावधि लोक होते–सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे, सर्व मतांचे लोक होते हा विशेष. अध्यक्ष घोड्यावर बसलेले होते. लोकांचा उत्साह फारच होता, पण हा सर्व नुसता वरवरच होता.

या आठवड्यांत येथें परिषदांचें पेंवच फुटलेलें आहे. नाना प्रकारच्या नाना परिषदा. प्रत्येकाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, कार्यकारी मंडळें वगैरे वगैरे. सर्व ठिकाणीं हजर राहाणें अशक्य. तेव्हां हजर न राहातां तो वेळ नुसता प्रेक्षक म्हणून सामान्य निरीक्षणांतच घालवावा असें ठरविलें आहे.

ता. २६–१२–२९

आज अमृतसर शहर पहावयास गेलों होतों. शहरांत विशेष पहाण्या-सारखीं म्हणजे दोनच ठिकाणें– (१) सुवर्णमंदिर (२) जलियांवाला बाग.

जलियांवाला बाग प्रथम पाहिला. दाखविण्यास तेथीलच समोरच्या घरांत राहाणारे व त्या काळसमयीं सभेंत हजर असणारे एक गुजराती गृहस्थ होते. त्यांनीं सर्व हकीगत इत्थंभूत व रसभरित सांगितली. रोमांच उभे राहिले. जागा पूर्वी उजाड, ओसाड होती. . अमृतसरचे व्यापाऱ्यांनीं वखारी बांधण्यासाठीं घेतली होती. पण ११ एप्रिल १९१९ रोजीं सभा होऊन सुमारें ५०,००० निर्दोष, शांत, अनत्याचारी लोकांवर जनरल डायर यानें ३२ शिपायांकडून गोळ्या झाडवून सुमारें १५०० ते १८०० लोकांचे बळी घेतले. या राष्ट्रीय प्रसंगाचें स्मारक म्हणून हल्लीं ती जागा स्मारक कमेटीनें विकत घेऊन तेथें बाग करविला आहे. स्मारकाची पाटी तेथें आहे.

पुढें शीख सुवर्णमंदिराकडे गेलों. तलावांत मधोमध मुख्य मंदिर असून एका बाजूनें त्यास जावयास मार्ग आहे. शहरांत मंदिर आहे हें म्हणणें एका दृष्टीनें चुकीचेंच आहे. मंदिराचेच आजूबाजूनें शहर वसलें आहे.

मंदिरांत—म्हणजे तलावाचे कांठावर—प्रवेश करण्यापूर्वी पायांतील जोडे, मोजे सर्व काढून पाय धुवावे लागतात. एवढेंच नव्हे तर खिशांतहि तंबाखू, विडी, सिगारेट, गांजा वगैरे मादक पदार्थ असतां कामा नयेत असा कडक नियम आहे. हा नियम सर्वांसच्च सारखा लागू आहे. आपलेकडे अधिकारी किंवा युरोपियन लोकांस देवळांत किंवा मशिदींत जातांना बुटांवर चढविण्यास कपड्याचे बूट देतात. तें बरोबर नाहीं. नियम सर्वांस सारखेच्च लागू झाले पाहिजेत.

शीख लोकांची एकंदर व्यवस्था फारच टापटिपीची व जिवंतपणाची दिसली. सर्व देवळें, आवार, तलाव वगैरे स्वच्छ. 'गुरु का लंगर' (अन्नछत्र) सर्वांस मोकळें. केवळ शीखांनाच अन्न मिळतें असें नसून वाटेल त्या धर्माचा किंवा पंथाचा मनुष्य ठरीव वेळेवर आला तर त्याला अन्न दिलें जातें. तसेंच इस्पितळाचेंसुद्धां.

शीखांची सेवेची कल्पना मला फारच बहारीची वाटली. मनुष्य कितीहि मोठा झाला, त्यानें कितीहि द्रव्य दिलें, तरी पण जोंपावेतों त्यानें स्वतःच्या अंगमेहेनतीनें सेवा केली नाहीं तोंपावेतों त्यास श्रेय नाहीं. याचा परिणाम असा होतो कीं सर्व कामें झाडलोटीपासून ते देवळाच्या कारागिरीपावेतोंचीं बहुतेक सर्व शीख लोकांनीं स्वतःच केलेलीं आहेत. याला ते "सेवा" म्हणतात. थोरामोठ्यांच्या जनानखान्यांतील बायकाहि पाण्याच्या कालव्याच्या कामीं विटा, चुना आणून देण्यासारखीं कामें करतात एवढें सांगितलें म्हणजे "सेवे"ची कल्पना येईल. या कल्पनेमुळें व आचरणामुळें अहंभाव उत्पन्न होण्याची भीति कमी आहे व त्याबरोबर सामाजिक समता वाढून आत्मीय भावनाहि वेगळ्या प्रकारची होते.

याप्रमाणें पाहून शीख जातीची तारीफ व कौतुक करीत आम्ही परत फिरलों. सुमारें ४। वा. लाहोरास पोचलों. अनेक परिषदांचा आज कार्यक्रम होता; पैकीं मुख्य म्हणजे—

कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळाची बैठक. मुख्य चर्चाविषय–'स्वातंत्र्य हा अंतिम उद्देश असावा कीं नाहीं,' आणि 'बहिष्कारत्रयी (शाळा, कोर्टें व कौन्सिलें) असावी कीं फक्त कौन्सिलाचाच बहिष्कार–' हा होता.

याव्यतिरिक्त आणखी ८ परिषदा सुरू होत्या. खूप गर्दी व धुमश्चक्री. तेव्हां मी तर कशांतच न जातां अमृतसरचा रस्ता धरला व त्यांत कांहीं नुकसान नाहीं झालें.

ता. २७–१२–२९

आजचा कार्यक्रम म्हणजे कालच्यापैकीं एक दोन वगळून बाकी परिषदा चालूच असून आज त्यांत आणखी ४ परिषदांची भर पडली आहे. पैकीं एक म्हणजे कॉंग्रेसची विषयविचारिणी समिति.

परिषदांचा मुसळधार पाऊस. विषयविचारिणी सभेंतील चर्चा ऐकण्याचाहि वीट आलेला. काम करणारीं माणसें बोलत नसून ज्यांना कांहींच करावयाचें नसतें त्यांच्या जिभांची लांबी अनंत. त्यामुळें त्या कमिटीच्या बैठकीवर कडकडीत बहिष्कार घालण्याचें मीं आधींपासूनच ठरविलें होतें. विचारी पुढारी काय ठरवितात तें ऐकण्यास मी उत्सुक होतों व असतों, पण वायफळ बडबड्यांचा वितंडवाद नको.

सकाळीं कॉंग्रेस कॅंपमध्यें फेरफटका करून आलों. निघतांना बूट साफ करविण्यासाठीं एका चांभाराजवळ उभा होतों. "बाबूजी सवराज मिलेगा क्या?" असा त्यानें प्रश्न केला. "जरूर, आपन लोग आपका काम हिंमतसे करे तो क्यों नहीं मिले?" असें मीं त्याला सांगितलें. स्वराज्य या वस्तूचा विचार समाजांत किती खोल जात चालला आहे त्याचें हें द्योतक आहे.

तिसरे प्रहरीं येथील प्रख्यात शालीमार बाग पहाण्यास गेलों होतों.

सायंकाळीं कॉंग्रेस कॅंपमध्यें विषयविचारिणी सभेंत ३६ उपसूचना आल्याचें समजलें. भाषणांविषयींची माझी अटकळ दुर्दैवानें खरी ठरली!!

ता. २८–१२–२९

दुपारीं भोजनोत्तर काँग्रेस बाजूकडे गेलों. तेथें प्रदर्शन पहाणें बाकी राहिलें होतें म्हणून तिसरे प्रहरचा सर्व वेळ तें पहाण्यांत घालविला.

प्रदर्शन फारसें चांगलें म्हणतां येणार नाहीं. हिंदुस्थानांत सर्व तऱ्हेच्या वस्तू पैदा होतात व नवीन तऱ्हेच्या रहाणीकरणीसाठीं आवश्यक अशा वस्तूंचेहि कारखाने झालेले आहेत असें दिसून येतें. हें कळल्यानें बरें वाटलें, पण मोठी अडचण वाटली ती ही कीं या सर्व वस्तू एकत्रित मिळण्याची सोय असलेलें एकेक दुकान निरनिराळ्या मोठमोठ्या शहरांतूनहि नाहीं. वस्तु देशांत होत आहे पण माहितीचे व मिळण्याच्या सोयीचे अभावीं परदेशी वस्तू डोक्यावर बसत आहेत याचें विशेष वाईट वाटतें. अर्थात् कालांतरानें हीहि अडचण दूर होईलच.

ता. २९–१२–२९

आज सकाळीं काँग्रेसचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू सभामंडपाचे मैदानांत राष्ट्रीय झेंडा फडकविणार होते. त्या समारंभासाठीं आम्ही वेळेवर पोचलों. गर्दी अतोनात होती. एक गीत म्हणून झेंडा फडकविला. पं. जवाहरलाल यांचें भाषण मला ऐकूं आलें नाही.

तेथून 'शहादरा' म्हणून एक प्रेक्षणीय स्थळ आहे तें पहावयास गेलों. तिकडून येऊन राष्ट्रीय महासभेकडे आलों. तीन वाजतां बैठक सुरू होणार असल्यामुळें अडीच वाजतां मंडपांत गेलों. विषयविचारिणी सभेंत चाललेल्या अप्रस्तुत व निष्कारण चर्चांवरून आज बैठक होईल कीं काय याची मला शंकाच होती, व तीच खरी ठरली. ३ वा. चिटणिसांनीं येऊन जाहीर केलें कीं विषयविचारिणीची बैठक संपली नसल्यामुळें महासभेची बैठक ५ वा. भरेल. आजच्या बैठकींत स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांच्या भाषणांखेरीज इतर कांहीं नसल्यामुळें व महाराष्ट्र समाजांत सायंकाळीं वेळेवर जावयाचें असल्यामुळें शहरांत गेलों.

सकाळीं विषयविचारिणी सभेस रा. वल्लभभाई जात असतां एक गोष्ट मात्र मला वाटली ती मीं त्यांना सांगितली. स्थानिक संस्थांचा (म्युनिसि-पालिट्या, लोकल बोर्डे वगैरे) बहिष्कार करावा असाहि ठरावाचा एक भाग होता. माझें मत याविरुद्ध आहे. स्थानिक संस्थांचा कारभार लोकांच्या रोजच्या रहाणीकरणीशीं इतका निकट संबंधाचा आहे कीं त्यावर बहिष्कार घालणें आत्मघातकी आहे, अशक्य आहे, शहाणपणाचें नाहीं असें मला वाटतें. माझ्याप्रमाणेंच इतर पुष्कळ मंडळींचेंहि मत आहे. अशा बाबतींत तर्कशास्त्र. (Logic) चालत नाहीं. कौन्सिलचा बहिष्कार तर म्युनिसि-पालिटीचा कां नाहीं ? याला उत्तरें पुष्कळ आहेत, पण व्यवहारिता हें मुख्य उत्तर. तार, टपाल, आगगाडी यांचा बहिष्कार कां नाहीं ? याला काय उत्तर ? तसेंच याचेंहि उत्तर. स्थानिक संस्थांतून प्रत्यक्ष काम करण्याची तालीम मिळते, लोकांची सेवा प्रत्यक्ष करीत असल्याचें लोक अनुभवतात व त्यामुळें कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांविषयीं मान, आपलेपणा वाढून कॉंग्रेसची प्रतिष्ठाहि वाढते; त्यामुळें रचनात्मक कार्यक्रमास अनुकूल भूमि उत्पन्न करतां येते. माझी विचारसरणी ही थोडक्यांत अशी आहे. त्यामुळें याविषयीं मी सांगण्यास गेलों होतों. अर्थात् दोनच मिनिटें मिळालीं. त्यांत मी सांगणार काय व वल्लभभाई ऐकणार काय, किंवा माझी खात्री तरी करणार काय ? परंतु माझें कर्तव्य मीं केलें एवढेंच वाटलें. महात्माजींनीं रुकार दिलाच होता तेव्हां वल्लभभाई आमच्या म्हणण्याला हो म्हणतील हेंहि दुरापास्तच. पण महात्माजींच्या मूळ ठरावांत हा बहिष्कार नव्हता ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. आपापसांत तंटे होतात म्हणून हा बहिष्कार ठेवा अशी एक बाजू होती. पण स्थानिक संस्थांत मंडळी भांडतात म्हणून जर बहिष्कार करावयाचा तर अशी कोणती संस्था आहे कीं जिच्यांत आम्ही भांडत नाहीं ? जेथें एकतंत्री सत्ता असते तेथेंच आम्ही भांडत नाहीं, कारण भांडणास क्षेत्रच नाहीं. बाकी प्रत्येक ठिकाणीं अहंभावामुळें, स्वार्थामुळें, मत्सरामुळें, परोत्कर्षासहिष्णुतेमुळें आमचीं भांडणें लागण्याइतके दुर्दैवानें आम्ही सामाजिकदृष्ट्या पतित आहोंतच. असो.

ता. ३०–१२–२९

आज सकाळीं रा....भेटले होते. इस्टेटीविषयीं आपल्या वडिलांनीं कांहीं सूचना दिल्या कीं काय याविषयीं चौकशी करीत होते. मला दिलेल्या सूचना मीं सांगितल्या. रा. ×× चे बोलण्यांत आपल्या बापाविषयीं आदरभाव जरी कमी नाहीं तरी पण एकंदर त्यागवृत्ति दिसली नाहीं. रुपये–आणे–पैचा हिशोब जास्त दिसला. "मीं पैसे कमावले," "माझे वेगळे पैसे" वगैरे वगैरे. तेव्हां थोडीशी कानउघाडणी केली. आईबापांनीं जन्म दिला, खस्ता खाल्ल्या, लहानांचे मोठे केले, शिक्षण दिलें वगैरे अपार उपकारांपुढें पैशाची काय किंमत? माणसानें पैशाचें चीज जरूर करावें पण मनुष्यत्व घालवूं नये. कुटुंबांत मालक म्हणून न राहातां एका प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष म्हणून राहिलें पाहिजे; त्यागवृत्ति असावी; माणसें गमावूं नये; पैशानें माणसें उलट जोडावीं; वगैरे माझा दृष्टिबिंदु व विचार सांगितला. त्यांचेवर टिकाऊ असा परिणाम झाला कीं काय तें सांगणें कठीण. अलिकडे खुळचट स्वार्थच सगळीकडे बोकाळल्याचें विशेष दिसतें हेंच खरें.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
वा. क्र. ५९२३
मराठी ग्रंथ संग्रहालय, वाणे. स्थळप्रत
अनुक्रम....५...३६२३... वि: .....मिळाले.
आवक .....२६.६१.... नों: दि: ..२५-२-५१

REFBK-0007923

मानवतेचे पाझर

किं. २॥ रु.

लेखक—**नामदार दादासाहेब मावळंकर**

प्रस्तुत पुस्तकांतल्या कथा या काल्पनिक कथा नाहींत. या प्रत्यक्ष जीवनकथा आहेत. यांत लेखकानें आपला प्राण ओतला आहे. कथा लिहिण्यांत नव्हे, तर त्या घडविण्यांत. जीवनकथा म्हणून तर साऱ्या गोष्टी चित्तवेधक आहेतच; पण त्याहून चित्तवेधक म्हणजे प्रत्येक गोष्टींत दिसून येणारी श्री. दादासाहेबांची तळमळ. चौदाजणांच्या या चौदा कथा खऱ्या, पण साऱ्यांचे खरे नायक स्वतः लेखकच होत. वेगवेगळ्या कथा वाचतांना त्या त्या कथानायकाची आपल्याला पुरेपूर ओळख होते, व त्याबरोबर सारें पुस्तक वाचल्यानंतर श्री. दादासाहेबांच्या विशाल हृदयाची ओळख अगदीं सहज होते.

या पुस्तकाचा आणखीहि एक विशेष म्हणजे वाचकाला आपल्या हृदयाची ओळख करून घेण्यास तें प्रवृत्त करतें. अनुभवाचा हा सिद्धान्त असून प्रत्येक वाचकानें आपल्या अनुभवाशीं तो ताडून पहावा. कथानकाशीं लेखक समरस होतो याचें कारण कथानकांत सर्वत्र सत्य भरलेलें आहे. प्रत्येकानें हें पुस्तक एकदां अवश्य वाचून पहावें.

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.